IRBK-0100173

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे

विषय इतिहास

दा क्र १७३

IRBK-0100173

IRBK-0100173

' अरासिकेषु कवित्वनिवेदनं शिरसि मा लिख मा लिख मा लिख !

एका लोकप्रिय आंग्ल ग्रंथकाराच्या चटकदार ग्रंथावरून
लिहिलेलें सुरसग्रंथमालेचें

नववें पुष्प

# जर्मन युद्धावरील मोहीम !

लेखक,

**श्रीयुत सहृदय.**

प्रकाशक,

**वालचंद रामचंद कोठारी,**

प्रोप्रायटर—सुरसग्रंथप्रसारक मंडळी, ३६४ नारायण पेठ, पुणें.

मराठी ग्रंथ [illegible]
[illegible] करण्याच्या
[illegible] नाहीं हें या कादं-
[illegible] सारख्या अनाथ
[illegible] न [illegible]ळण्याकरितां
[illegible] गेईल.
[illegible]
ठाणे.

मुद्रक,
केशव रावजी गोंधळेकर, ' जगद्धितेच्छु ' प्रेस
४३२ शनिवार पेठ, पुणें—सिटी.

( या पुस्तकाचे सर्व हक्क मंडळीनें स्वाधीन ठेविले आहेत. )

२० मार्च १९१९.] किंमत १४ आणे. [ आवृत्ति पहिली.

IRBK-0100173

# प्रकाशकाचे दोन शब्द.

युरोप खंडांत सध्यां जो महायुद्धाचा भयंकर वणवा पेटला आहे, जर्मन लोकांनीं 'बळी तो कान पिळी' या राक्षसी तत्त्वाचा स्वीकार करून मानवजातीच्या शांततेचा जो घोर विध्वंस आरंभिला आहे, त्यासंबंधानें आपल्या राज्यकर्त्यांच्या देशांतील प्रजाजनांची मनःस्थिति कोणत्या प्रकारची आहे हें या पुस्तकांत उत्कृष्ट रीतीनें दर्शविलें आहे. स्वातंत्र्याभिमानाबद्दल इंग्लंडची आज शेंकडों वर्षांपासून इतिहासांत प्रसिद्धि आहे. न्यायप्रियतेबद्दल त्यांची आजपर्यंत अनेक वेळां सर्वांनीं वाहवा केली आहे. अनाथांना साह्य केल्याबद्दल त्यां... वारंवार प्रशंसा झालेली आहे—तो स्वातंत्र्याभिमान, ती न्यायप्रियता आ... तें अनाथप्रेम व्यक्त करण्याच्या कामीं या खेपेससुद्धां इंग्लंडनें तिळमात्र कसूर केलेली नाहीं हें या कादंबरीच्या वाचनावरून दिसून येईल. नव्हे, केवळ बेल्... मसारख्या अनाथ राष्ट्राचें संरक्षण करण्याकरितां व एकवार दिलेलें वचन पा... ळण्याकरितां इंग्लंड युद्धांत कसें सामील झालें हें वाचकांच्या दृष्टोत्पत्तीस येईल. ......

या कादंबरींतील नायकाचें व नायिकेचें स्वभावरेखन फारच कौशल्यानें व मार्मिकपणानें केलेलें आहे. नायकाची उज्ज्वल स्वदेशप्रीति, त्याचें कमालीचें शांतताप्रेम, त्याचें अलौकिक आत्मसंयमन व लोकोत्तर शौर्य, यांचें वर्णन करावें तितकें थोडें आहे. नायिकेचा प्रखर देशाभिमान तर अत्यंत प्रशंसनीय आहे.

नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका इंग्लिश पुस्तकाच्या आधारें ही कादंबरी लिहिली आहे. आयत्या वेळेस हें कार्य हातीं घेतल्यामुळें पुस्तक प्रसिद्ध होण्यास विलंब लागला, इकडे वाचकवर्ग दुर्लक्ष्य करील अशी आशा आहे.

२० मार्च १९१९.
१६४ नारायण पेठ, पुणें.

वालचंद रामचंद कोठारी.

१४०२९

# जर्मन युद्धावरील मोहीम !

## प्रकरण १ लें.

८० ८१
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
मौलाङ्‌ क्र.

### स्वातंत्र्याच्या वातावरणांत !

परक्यांच्या अद्वितीय ऐश्वर्यनिरीक्षणानेंही आशेचा समतोलपणा सांभाळणारें मन, दुसऱ्याचें वैभव पाहून न दिपणारे नेत्र, स्वातंत्र्याच्या अविरत प्रवाहानें पवित्र झालेलें वातावरण सहन करण्याची ताकद, आणि कादंबरीकाराच्या कल्पनेबरोबर धांवण्याची तयारी इतकी सामुग्री सज्ज असल्याशिवाय आपणांस आजच्या चैतन्ययुक्त कथानकांत प्रवेश करितां यावयाचा नाहीं. ज्या ठिकाणीं शांततेचें ुख अनुभविण्यांत आज निमग्न झालेली जनता उद्यांच स्वतःच्या इभ्र-ीच्या रक्षणाकरितां हातावर शिर घेऊन लढण्यास सज्ज होते; ज्या ठिकाणीं आज नौकेंतून विहार करणारे तरुण उद्यां आरमारी युद्धांत अग्रे-

सत्व मिरवितांना दिसतात; ज्या ठिकाणीं आज आपसांतील हक्क बजावण्याकरितां कायावाचामनेंकरून झटणारे मुत्सद्दी उद्यांच आपसांतील सर्व प्रश्न बाजूस ठेवून एकदिलानें समरांगणाच्या अग्रभागीं चमकतांना दिसतात; त्या, क्षणांत शांततेचें सुख अनुभविणाऱ्या तर दुसऱ्याच क्षणांत वीररसाचा आस्वाद घेणाऱ्या सदैव–जागरूक स्थळाकडे आपणांस प्रयाण करावयाचें आहे. आंग्लभूमींतील पवित्र वातावरणांत आपणांस संचार करावयाचा आहे. मित्रहो ! युरोपखंडांत चाललेल्या धुमश्चक्रीची वार्ता दररोज तुमच्या कर्णद्वयावर येऊन थडकत असेल. व्यापारी मयासुरानें भरविलेला अद्वितीय बाजार अंशतः तरी तुह्मीं पाहिला असेल. याकरितां तुमच्या मनाची व नेत्रांची थोडीबहुत सज्जता झाली आहे असें मानण्यास कांहीं हरकत नाहीं. तथापि दररोजच्या मृत जीवनास सरावलेलें तुमचें मन कथानकांतील चैतन्यपूर्ण परिस्थिति पाहून डळमळूं लागेल या भीतीनें, प्रथम तेथील मधुरतेचीच चटक तुह्मांस लावावी म्हणजे हळू हळू तुमचें मन निर्ढावेल आणि तेथील लोकोत्तर परिस्थिति अवलोकन करण्याची तुह्मांस दिक्कत वाटणार नाहीं, असें समजून कथानकांतील अत्यंत रमणीय प्रदेश आरभीं तुमच्या मनश्चक्षूपुढें ठेवीत आहें.

वसंताचा बहर होता. आंग्ल जनांची कर्तबगारी पाहूनच कीं काय, अंशुमाली सुवर्णवदनानें मंद मंद स्मित करीत होता. आसमंतांतील पुष्पपराग, दिवसभरच्या श्रमानें विगलित झालेल्या मनास उत्तेजन देण्याकरितां वायूवर स्वार होऊन इतस्ततः भ्रमण करीत होता. पुष्परागानें वायूसारखें अत्यंत चपल वाहन मंडित केलें होतें, पण आपली उदार कामगिरी करण्याला त्यास संधीच सांपडेना. सेंट जॉन या खेड्याजवळच्या अरण्यांत जन्म घेणारा पुष्पपराग आपणास कोणी भोक्ता मिळावा या उद्देशानें वनभर संचार करीत होता. तथापि त्याचा उद्देश फलप्रद होईल अशी आशाच दिसेना. बिचारा पुष्पपराग क्षणभर वनांतल्यावनांत स्थिर होऊन आजचें आपलें जीवन फुकट जाणार काय असा विचार करीत आहे, तोंच एक तरुण त्वरेनें मूनलाइट-पॅलेसच्या दिशेकडे आपला घोडा पिटाळीत आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें. त्या तरुणाची प्रसन्न मुखकांति

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

पाहतां त्याची त्वरा त्यास त्याच्या सौख्यानिधीच्या अधिकाधिक समीप नेत आहे असें दिसत होतें.

विद्यालयांतील रुक्ष जीवन संपवून हा तारुण्यांतील स्वर्ण मंदिराच्या पायऱ्या चढत आहे, हें पुष्पपरागानें तेव्हांच ताडिलें; आपल्या श्रमांचें चीज झालें असें वाटून त्यानें त्या तरुणास लागलीच आत्मसमर्पण केलें. पुष्पपरागाचा स्वाद घेत वुइल्यम द्रुतगतीनें मूनलाइट-पॅलेसकडे जात होता. तेव्हांचा त्याचा आनंद अवर्णनीय होता. आपल्या परमप्रिय लिलीनें आपणास भेटण्याचें अभिवचन दिलें, एवढेंच नव्हे तर आपणाबरोबर कांहीं काल वनश्रीचा विलास पहाण्याचेंही कबूल केलें; आतां आपणास लिलीच्या श्वासोच्छ्वासापेक्षां तूं किती हीन आहेस असें या पुष्पपरागास सांगतां येईल, तुह्मी लिलीच्या दंतपंक्तीपुढें व्यर्थ डौल मिरवूं नका असें श्वेतपुष्पकलिकांना बजावतां येईल, हसऱ्या पुष्पांचा गर्व लिलीच्या स्मितानें ह्याणून पाडतां येईल आणि तिच्या समागमांत गेलेला काळ तुमच्यापेक्षांही अधिक सुखानें गेला अशी, स्वर्गांत विहार करणाऱ्या अंशुमाली आणि त्याची वधू पश्चिमा सुंदरी ह्यांची मला खात्री पटवितां येईल; असा विचार करीत वुइल्यम आपला घोडा वायुवेगानें पिटाळीत होता.

परंतु त्याचें मन याहीपेक्षां अधिक वेगानें धांवत होतें; आधींच कॉर्नवॉल् प्रांत म्हणजे लावण्यवती तरुणींचें आगर; त्यांत लिलीचें सौंदर्य तर केवळ अप्रतिम होतें; मग नंदनवनासही शोभवील अशा लिलीच्या समागमांत नंदनवनतुल्य रम्य वनप्रदेशांतून सलील विहार करण्यास वुइल्यमचें मन उत्सुक व्हावें व त्यानें आगामिसुखाचे कल्पनासृष्टींतच घुटके घेण्यास सुरुवात करावी यांत आश्चर्य नाहीं ! आज किती तरी वर्षें वुइल्यम लिलीवर प्रेम करीत होता—कित्येक दिवसांपासून तिची नितांतरम्य मूर्ति त्याच्या हृदयसिंहासनावर अधिष्ठित होऊन राहिली होती—तिच्या काल्पनिक दर्शनसुखाचा मधुरास्वाद घेत विद्यालयांतील किती तरी समय त्यानें व्यतीत केला होता ! विद्यामंदिरांत अध्यापकांचीं व्याख्यानें ऐकतांना, खाजगी शयनमंदिरांत पुस्तकाकडे शून्य दृष्टीनें पहात असतांना, निबंध लिहिण्याच्या मिषानें आपल्या प्रणयमूर्तीचें चित्र रेखाटतांना—अनेक वेळीं

व अवेळीं त्यानें लिलीच्या प्रणयमूर्तीचें चिंतन करण्यांत स्वर्गसौख्य मानिलें होतें. त्या सुंदरीचें प्रत्यक्ष नेत्रांनीं सौंदर्यपान करण्याचा-तिच्या संगतींत बराच वेळ घालविण्याचा आजचा हा प्रसंग त्यास अत्यंत आल्हाद-कारक वाटला.

वुइल्यमचें लिलीवर निस्सीम प्रेम होतें—उलट पक्षीं तिचें प्रेम संपादन करणें त्यास अशक्य वाटत असल्यामुळें तर, त्याच्या प्रेमाचा उत्कटपणा अगदींच पराकाष्ठेस जाऊन पोहोंचला होता. लिलीनें त्याच्या आशेस लवमात्रही अवकाश कधीं दिला नव्हता; आपणास त्याच्या सौख्याची अथवा स्वास्थ्याची किंचिन्मात्र काळजी आहे असें तिनें एका शब्दानें—कृति लांबच राहिली.—सुद्धां दर्शविलें नव्हतें. केवळ शिशुपणींचा केलि-सहचर या दृष्टीनें ती वुइल्यमला लेखीत होती—त्याला ती आपल्या करमणुकीच्या खेळांतील सोबती समजत होती. "पण लिली कांहीं सर्व-साधारण कुमारिकांसारखी नाहीं," वुइल्यम आपल्या मनांत ह्मणाला; "परस्परविरुद्ध विचारांचें, परस्परविसदृश कृतींचें व विसंगत प्रलापांचें ती एक उत्कृष्ट उदाहरण आहे. नेहमींचा स्वभाव टाकून देऊन ती केव्हां कोणत्या नवीन रूपांत दिसेल याचा नेम नाहीं. ती आकस्मिकपणें मज-वर प्रेम करण्यास सुरुवात करून मला आश्चर्यमूढ करून टाकील !"

पण हें केवळ मनोराज्य होतें. यौवनावस्थेंतील आशावादी मनःस्थिती-चे हे खेळ होत, हें वुइल्यमनें ओळखिलें; तत्काळ भ्रमपटल दूर करून तो स्वतःशीं ह्मणाला, "तिचें मन वळविणें कांहीं सुलभ गोष्ट नाहीं; मुळीं ती मला माझें हृदय आपल्यापुढें व्यक्त करण्याची संधिच मिळूं देणार नाहीं. असो, निदान तिच्या चारुतम सहवासांत मला बराच वेळ घाल-विण्यास मिळेल ही गोष्ट खरी! तें तरी काय अल्पस्वल्प सौख्य आहे !"

किंचित्कालानें लिलीचा मूनलाइट-पॅलेस दृग्गोचर होऊं लागला; एका विशिष्ट व्यक्तीचें दर्शन होतें कीं काय हें पाहण्याच्या हेतूनें वुइल्यम त्या प्रासादाचें सूक्ष्म दृष्टीनें निरीक्षण करूं लागला.

"मजबरोबर वसंत ऋतूची शोभा पाहण्यास येण्याच्या तिच्या इच्छेच्या आड कांहीं आलें नसलें ह्मणजे बरें," वुइल्यम विचार करूं लागला.

कॅप्टन् लेनॉक्स आज सायंकाळीं येथें येणार आहे, हें मी जाणून आहें; आणि त्याचप्रमाणें लिलीच्या पित्याची त्याचेवर बहाल मर्जी असून त्याच्या मनांतून त्याला आपला—आपला—"

पण वुइल्यमला तें वाक्य आपल्या विचारसृष्टींत सुद्धां पुरें करणें शक्य नव्हतें. "जामात" हा शब्द अंतश्चक्षूपुढें सुद्धां आणण्याचें त्याला धैर्य नव्हतें. तो विचार अत्यंत भयप्रद होता—ती कल्पना अत्यंत दुःखदायक होती. कारण अखिल जगांत वुइल्यमचें चित्त आकर्षण करणारी मुलगी एकटी लिली होती—संपूर्ण सृष्टींत तीच फक्त त्याला प्रिय—नितांतप्रिय वस्तु होती. ती कदाचित् स्वेच्छाचारी व हट्टी असेल, घटिकेंतून शंभर वेळां मन पालटण्याइतकी चंचल असेल, आपल्या अनुचित विलासी वृत्तीनें दुसऱ्याच्या मनोवृत्ति ती दुखवीत असेल, नव्हे खुद्द वुइल्यमच्या कोमल हृदयावर तिनें अनेक वेळां जबर आघात केले असतील—पण या सर्व गोष्टींकडे पूर्ण आणि सदैव दुर्लक्ष्य करण्याची त्याची तयारी होती. तिच्या अंतःकरणांत हीन मनोवृत्तीचा लवलेशही नाहीं याबद्दल त्याची खात्री होती—तिच्यापेक्षां नीतिदृष्टया उन्नततर मनाची बालिका या पृथ्वीतलावर कधीं अवतरलीच नाहीं असा त्याचा दृढतम विश्वास होता, आणि जरी संतापाच्या भरांत वुइल्यम तिला जीं जीं दूषणें देई तीं सर्व वस्तुतः तिच्या अंगीं असलीं, तरी— ती होती कोण? लिलीच ना? आजन्मांत वुइल्यमचें कोणा तरुणीवर प्रेम जडलें असेल तर तें एकट्या लिलीवर होय!

"खरोखरीच तिचें प्रेम संपादन करण्याची मला बिलकूल आशा नाहीं!" वुइल्यम विचार करूं लागला. "तो तरुण कॅप्टन् लेनॉक्स नेहमीं तिच्या प्रासादांत येत असतो; आणि त्याचें तिजवर अमर्याद प्रेम आहे हें कोणीही सांगूं शकेल. शिवाय त्याचें घराणें शौर्याच्या व पराक्रमाच्या बाबतींत प्रसिद्ध असून त्यानें स्वतः एवढ्या अल्पवयांत सैन्यामध्यें कॅप्टन्चा हुद्दा मिळविला आहे. खुद्द लिलीला पराक्रमाची मोठी आवड आहे— वीरपुरुषावर तिची अप्रतिम भक्ति आहे. रणसेवेसारखा पूज्य व्यवसाय नाहीं असा तिचा भरंवसा आहे."

वुइल्यमचे विचार कितीतरी वेळ चालले होते. तो सेंट जॉन येथील

डॉ. लिटन यांचा एकुलता एक मुलगा. डॉ. लिटन् हे सेंट जॉन या लहानशा खेड्यांतच काय पण त्याच्या आसपास बरेच प्रख्यातीस आले होते. त्यांचें शुद्ध व पवित्र धर्माचरण पाहून, त्यांचे कडकडीत धार्मिक विचार श्रवण करून आणि अहिंसेसंबंधाचा त्यांचा युक्तिवाद ऐकून कित्येक लोक त्यांचें शिष्यत्व स्वीकारून त्यांच्या विद्वत्तेची आणि त्यांच्या अवाढव्य ज्ञानाची स्तुति करूं लागले होते. डॉ. लिटन हे सेंट जॉनसारख्या खेड्यांतच रहात, पण बोअर युद्धाच्या वेळीं आणि युद्धानंतर त्यांनीं जी युद्धावर शाब्दिक मोहीम केली आणि युद्ध हा धर्माची हत्या करण्याकरितां सैतानांनीं शोधून काढलेला मार्ग आहे, असें जें प्रतिपादन केलें त्याच्या योगानें मोठमोठ्या शहरांतून त्यांच्या नांवाची चर्चा होऊं लागली; इतकेंच नव्हे तर त्यांच्याच मताचे कित्येक पुरुष त्यांच्या सेंट जॉन येथील छोट्याशा घरीं येऊन त्यांच्या भेटी घेऊं लागले. ऑक्सफर्ड येथील विद्यालयांत कित्येक वर्षांपासून प्रोफेसरचें काम करणारे डॉ. रेंथॉल यांना तर डॉ. लिटन् यांचा युक्तिवाद इतका पटला, कीं त्यांनीं तारेनेंच डॉ. लिटन यांना त्यांच्या मतांबद्दल आपली सहानुभूति कळविली; एवढेंच नव्हे तर, लौकरच सें. जॉन या गांवीं मी आपल्या भेटीकरितां येत आहें असें त्यांनीं डॉ. लिटन यांना लिहिलें. परंतु डॉक्टर रेंथॉल यांच्या नशीबींच त्या खेड्यांतील रत्नाची भेट घेणें नव्हतें. डॉ. रेंथॉल सेंट जॉन या गांवीं येण्यापूर्वींच डॉ. लिटन हे इहलोक सोडून गेले. इहलोकची भेट क्षणिक; याकरितां परलोकीं दीर्घकाल टिकणारी भेट घेणेंच इष्ट आहे असें जाणून डॉ. रेंथॉल यांनीं आपल्या मनाचें समाधान केलें.

डॉ० लिटन परलोकवासी झाले; परंतु त्यांचीं मतें, त्या मतांना वेदवाक्य समजणारा त्यांचा पुत्र, आणि त्या मतांतील फक्त नीरस भागच ग्रहण करणारी त्यांची पत्नी हीं इहलोकीं राहिलीं. वुइल्यमचा चेहरामोहरा जरी आपल्या आईसारखा सुंदर होता तरी त्याचें अंतरंग त्याच्या मातेच्या अंतरंगाहून अत्यंत भिन्न होतें. त्यानें बहिरंगांत ज्याप्रमाणें आपल्या मातेचा सारखवटपणा उचलला होता त्याप्रमाणें अंतरंगांतही त्यानें आपल्या पित्याचा अनुवाद केला होता. डॉ. लिटन हे ह्यात

असतांना ते व त्यांचा पुत्र वुइल्यम यांचें विचारसादृश्य लक्षांत घेतलें म्हणजे, हे पितापुत्र नसून आपल्या हिंदुस्थानांत कांहीं शतकांपूर्वी होऊन गेलेली रामदास आणि कल्याण यांचीच जोडी आहे असें वाटे.

पित्याच्या निधनानंतर वुइल्यमनें आपला अभ्यासक्रम मुळींच सोडला नाहीं. तो एकाग्र चित्तानें अभ्यास करी आणि विश्रांतीच्या वेळीं शांतपणानें आपल्या पित्याच्या मतांचा विचार करी. दुसरा एखादा तरुण असता तर त्याला काळाच्या ओघांत आपल्या पित्याची विस्मृति केव्हांच पडली असती. परंतु वुइल्यमनें आपल्या मनास पित्याचा विसर मुळींच पडूं दिला नाहीं. त्यानें आपल्या पित्याचीं मतें इतक्या उत्तम रीतीनें आपल्या स्मृतिपटलावर खोदलीं होतीं आणि त्यावर डॉ. रैंथॉल यांच्या उपदेशाचा हात इतक्या सफाईनें मारला जाई कीं, प्रत्यहीं आपण आपल्या पित्याचें जोरदार व मार्मिक संभाषण ऐकत आहोंत असा त्यास भास होई.

ऑक्सफर्ड येथील विश्वविद्यालयांत अभ्यास करीत असतांना वुइल्यम यानें लष्करी शिक्षण संपादन केलें होतें. त्याचा उंच आणि सुदृढ बांधा, त्याची शिपाईगिरीची टापटीप आणि अल्पकाळांत त्यानें संपादन केलेलें लष्करी कौशल्य अवलोकन केलें म्हणजे कित्येक वर्षांच्या जुन्या लष्करी विद्यार्थ्यांनीं आश्चर्यानें तोंडांत बोटें घालावीं, आणि वुइल्यम हा मोठा योद्धा होणार व युद्धाचा प्रसंग आला तर तो चांगलें नांव कमविणार असें प्रांजळपणें कबूल करावें. आपले सहाध्यायी आपली स्तुति करून लष्करी ज्ञानाबद्दल आपली तारीफ करितात ही गोष्ट वुइल्यम याच्या कानांवर एके दिवशीं गेली. तेव्हां त्यास अत्यंत पश्चात्ताप वाटून त्यानें त्याच दिवशीं लष्करी शिक्षणास कायमचा रामराम ठोकला. पुढें एके दिवशीं वुइल्यम लंडनकडे जात असतां त्याची व कॅ. प्रिंगल याची भेट झाली. तेव्हां वुइल्यम म्हणाला—

" पुरे झालें बाबा तें लष्करी शिक्षण! सहज तुझ्या नादानें मी त्या हिंसा करण्यास शिकविणाऱ्या शाळेंत कांहीं दिवस आलों. तों माझ्या बुद्धींत केवढा फरक पडला. इहलोकावर वावरणारे मनुष्यप्राणी तितके आपले बंधु आहेत, त्यांना मदत करणें, त्यांचे अपराध पोटांत घालून

त्यांच्याशीं क्षमाभावानें वागणें हें आपलें कर्तव्यकर्म असून, त्यांचा वध लौकर व बेमालूम रीतीनें कसा करावा या कलेचें शिक्षण घेणें म्हणजे आपली नैतिक व धार्मिक अधोगति होत चलली आहे असें कबूल करण्याप्रमाणेंच आहे. ज्या देशांत लष्करी शिक्षण अधिक असतें, ज्या देशांतील भौतिकशास्त्रें युद्धकलेस अधिक प्रोत्साहन देतात त्या देशांत धर्मास पायाखालीं तुडविलें जातें; त्या देशांत नीतीची चेष्टा होते;त्या देशांत जगन्नियंत्याच्या शब्दाची प्रत्यहीं मानहानि होते; असें माझे बाबा कळकळीनें सांगत.युद्ध आणि धर्म यांचें परस्परांशीं इतकें वांकडें आहे कीं,एकाचें नांव निघालें कीं, आपण दुसऱ्यास पार विसरून जातों. युद्ध हें अधोगतीस जाणाऱ्या राष्ट्राचें काम आहे. याकरितां यापुढें लष्करी शिक्षण या शब्दाचाही मी उच्चार करणार नाहीं. " कॅप्टन् प्रिंगल याला वुइल्यमच्या भाषणाचा अर्थ कळला नाहीं. परंतु अधिक वाटाघाट करणें त्या शिपाईगड्यास पसंत नसल्यामुळें त्यानें एक शब्दही तोंडांतून काढला नाहीं. हें पाहून वुइल्यम स्वगत म्हणाला—" खरोखर, बाबा आम्हांवर अगणित उपकार करून गेले आहेत. त्यांच्या उपकारांची फेड कधींही व्हावयाची नाहीं. काय तो त्यांच्या भाषणांतील मुद्देसूदपणा ! काय ती त्यांच्या उपदेशांत दिसून येणारी कळकळ ! बस्स ! आमचे बाबा एक अद्वितीय पुरुष होऊन गेले. "

वुइल्यमचा पूर्ववृत्तांत देण्यास आम्हांस जितका वेळ लागला तितक्या वेळांत त्यानें मूनलाइट पॅलेस गांठला. लिली आपल्या पित्याबरोबर बोलत आपल्या प्रासादापुढें उभी होती. तेव्हां पश्चिमा सुंदरी भगवान् अंशुमालीचें प्रेमानें स्वागत करीत होती. तो स्वर्गीय किस्ता गिरविण्याकरितांच कीं काय लिली सस्मित वदनानें पूर्वेकडे पाहूं लागली.पश्चिमेच्या वदनावरील अनुराग लिलीनें आपल्या मुखावर धारण केला होता. अंशुमालीच्या वदनावरील प्रसन्नता वुइल्यमच्या वदनावर खेळत होती. आपला अंशुमाली अगदीं ठरलेल्या वेळेवर आपल्या भेटीस आला हें पाहून लिलीचा आनंद गगनांत मावेनासा झाला. गगनभर पसरलेल्या पश्चिमेच्या आनंदापेक्षांही आपला आनंद अवर्णनीय आहे असें तिला वाटलें.

आपणाशीं बोलत असलेल्या लिलीचें चित्त ठिकाणावर नाहीं, तें अन्यत्र विहरत आहे, हें तिच्या पित्यानें तेव्हांच ताडलें. नेल्सनसाहेबांनीं आपल्या वयाचा बहुतेक भाग लष्करी कारभारांत घालविला होता; समुद्रावरील निर्मनुष्य स्थळीं त्यांचा नित्याचा वेळ गेलेला, परंतु शिपाईगड्यास अनुरूप असा कठोरपणा आणि बेपर्वाईचें वर्तन यांनीं त्यांना स्पर्शही केला नव्हता. आंग्ल सेनासमुद्रांत त्यांचा मोठा मान असे. आंग्ल समुद्रसेनेंत त्यांची बरोबरी करणारे फार थोडे होते! अॅडमिरल नेल्सन हे शत्रूस कर्दनकाळ वाटत.परंतु खेड्यांतील आपल्या मूनलाइट प्रासादांत शांततेचे दिवस काढीत असतांना त्यांचें वर्तन इतकें सरळ व प्रेमळ असे कीं, हेच ते अॅडमिरल नेल्सन असें कोणीं एखाद्या नवख्यास सांगितलें तर तें त्यास खरें देखील वाटत नसे.

आपल्या कन्येचें लक्ष भाषणांत नसून अन्यत्र विहरत आहे हें समजतांच नेल्सनसाहेबांनीं पूर्व दिशेकडे पाहिलें. त्यांची कल्पना बरोबर ठरली. आपल्या कल्पनेप्रमाणें वुइल्यम लिटन आपणाकडेच येत आहे असें पाहून ते लिलीस ह्मणाले—

" लिली! वुइल्यम तर आला. अजून बराच दिवस आहे. संध्याकाळ होण्यापूर्वी तुह्मांस सहज परततां येईल. पहा! त्या वुइल्यमकडे पहा! त्याची घोड्यावरील मांड एखाद्या कसलेल्या वीराप्रमाणें आहे. त्याची मुद्रा रणांगणावर चमकण्याच्या योग्यतेची आहे. पण बेटा पुस्तकी घोकंपट्टी करण्यांत आणि पुस्तकी ज्ञान कमविण्यांतच मोठेपणा मानीत आहे. समरांगण हें अशा तरुणाचें क्रीडास्थान असावयास पाहिजे. परंतु हाही आपल्या बापाप्रमाणें वाचनालयें धुंडाळण्यांत आपल्या अमोल आयुष्याचा व्यय करीत आहे. "

लिली अनिमिष लोचनांनीं वुइल्यमकडे पाहूं लागली. ती आजपर्यंत वुइल्यम यास पहात आली होती. पण त्याचें स्वरूप आपल्या हृदयांत सांठविण्यास तिला आजपर्यंत वेळ पुरेसा वाटला नसावासें दिसलें. आपला घोडा एका सेवकाच्या हातांत देऊन वुइल्यम अॅडमिरल नेल्सनसाहेबांकडे आला. त्यानें त्यांच्याशीं अत्यंत नम्रपणानें हस्तांदोलन केलें. परंतु

त्या वेळीं त्याचें सर्व लक्ष लिलीच्या सुंदर वदनाकडे होतें. औपचारिक भाषण संपल्यानंतर नेल्सन ह्मणाले—

" वुइल्यम! सृष्टिसुंदरीचे विलास पाहण्याकरितां तूं फारच नामी वेळ शोधिलीस. वसंतऋतूंतील निर्मळ सूर्यप्रकाश म्हणजे आम्ही मोठी ईश्वरदत्त देणगी समजतों. अशा प्रशांत वेळीं वनांतील शोभा अवलोकन करणें मोठें भाग्य आहे. लिली ! जा, तुझ्या आनंदांत व्यत्यय आणण्याची माझी इच्छा नाहीं. परंतु इतर वनशोभा अवलोकन करण्याच्या भरांत त्या दूरवर दिसणाऱ्या टेकडीवर जाऊन आसमंतांतील शोभा पाहण्याचें विसरूं नका. आम्ही कॉर्निश लोक त्या टेकडीस वनदेवींचें लीलागृहच समजत आलों आहों. "

" तिकडे तर जाण्याचा आमचा मुख्य उद्देश आहे," लिलीच्या प्रसन्न वदनांतून शब्दोचार झाला; " मीं त्या टेकडीवरून अनेक वेळां सृष्टिसौंदर्य अवलोकन केलें आहे; पण वुइल्यम बहुतकरून आपला वेळ ऑक्सफर्डमध्यें ज्ञानसंचयांत घालवीत असल्यामुळें त्याला ती संधि अद्याप कधींही मिळाली नव्हती. ह्मणूनच आम्हीं आजचा बेत ठरविला. "

" जा, वुइल्यमसारख्या सद्वर्तनी तरुणाबरोबर फिरावयास जाण्यास माझी कोणतीही हरकत नाहीं, " ॲडमिरल ह्मणाले. " माझ्या कन्येची काळजी घेऊन तिला सुरक्षित परत आणा असें कोणासही सांगण्याची जरूर नाहीं. कित्येक पुस्तकी वीरांची ही माझी लिली काळजी घेईल अशी माझी खात्री आहे. " असें ह्मणून नेल्सननीं आपल्या कन्येच्या पाठीवरून हात फिरवीत तिला जाण्याची परवानगी दिली.

मूनलाइट पॅलेसपासून कांहीं अंतरावर गेल्यानंतर लिली वुइल्यमकडे सस्मित वदनानें पहात ह्मणाली—

" कां ! वुइल्यम, बाबा काय ह्मणाले तें ऐकिलेंना ? "

" होय. त्यांच्या भाषणाचा रोख कोणाकडे होता हें मीं ओळखिलें. तुझ्या पित्यास प्रथमपासून पुस्तकी ज्ञानाचा फारच तिटकारा. सर्व आयुष्य लष्करी कापाकापींत किंवा त्यासंबंधानें विचार करण्यांत ज्यांनीं घालविलें त्यांच्या तोंडांतून असेच उद्गार निघावयाचे. "

" वुइल्यम ! तूं ह्मणे ऑक्सफर्डच्या विद्यालयांत मोठें नांव मिळविलें आहेस. तुझें अगाध ज्ञान पाहून तुझ्या प्रोफेसरांनीं तुझी पाठ थोपटली असून तूं विद्यालयाच्या कीर्तींत भर पाडणार अशी त्यांची खात्री आहे, असें मी ऐकतें."

हे लिलीचे शब्द ऐकून वुइल्यम किंचित् ओशाळा झाला. लिलीस ज्ञानाची आवड नसून ती शौर्याची चाहाती आहे हें तो जाणून होता. तिच्या भाषणांतील उपरोध लक्षांत घेऊन तो फक्त हंसला.

तेव्हां लिली ह्मणाली—" वुइल्यम ! तुझ्या हुषारीची व ज्ञानलालसेची सर्वत्र तारीफ होत आहे."

" होत असेल. पण तुला काय त्याचें ? ॲडमिरलची कन्या विद्वत्तेस थोडीच चाहाणार आहे ? तिला आवड असावयाची शौर्याची आणि समरांगणपटुत्वाची !"

" हें कसें तुला समजलें ?" लिली हंसत ह्मणाली. " मी शिकारीसारख्या विषयास महत्त्व देतें आणि नृत्यांत सदोदित पुढाकार घेतें ह्मणून मला कोण किती हुषार आहे हें समजतच नाहीं काय ? शौर्याची आवड असणाऱ्यांना ज्ञानाचा आस्वाद घेण्याचा हक्क नसला तर नसेल, पण ज्ञानाचा नुसता सुगंध ग्रहण करण्याचाही त्यांस मज्जाव आहे काय ?"

" तूं ज्ञानाचा सुगंध ग्रहण करणार ?" वुइल्यम लिलीकडे सस्मित वदनानें पहात ह्मणाला. " लिली ! का, आमची आज फारच चेष्टा चालविली आहे ?"

" वारे ! वा ! वुइल्यम ! मी का तुझी चेष्टा करीत आहें ? स्तुति आणि चेष्टा यांतील भेदही तुझ्या लक्षांत येऊं नये हें मोठें आश्चर्य होय."

" सर्व कांहीं माझ्या लक्षांत आलें आहे," वुइल्यम गंभीरपणें ह्मणाला. " वाचनालयांत मी तेथील खांबापेक्षांही अधिक अढळपणें व अधिक काळपर्यंत बसतों असें कोणीं म्हटलें कीं तुला आनंद व्हावा, वाचनांत मी एकदां गढून गेलों म्हणजे अंतकाळ अगदीं समीप आला असला तरी मला त्याची आठवण रहात नाहीं असें कोणीं म्हटलें कीं तूं हंसावें आणि वाचनांत जाणारा काळ अगदीं व्यर्थ घालविण्याप्रमाणें आहे, तें आळशी

मनुष्याचें कर्तव्य आहे असा तूं माझा उपहास करावा, यांतील तुझा हेतु काय हें मीं ओळखिलें आहे. सांग, दोनच दिवसांपूर्वीं मी क्षणमात्र वाचनांत गुंतलों अशी संधि साधून कॅप्टन् लेनॉक्सबरोबर तूं कां निघून गेलीस ? तुझ्या आकस्मिक जाण्यानें माझ्या मनास कांहींच वाईट वाटलें नसेल नाहीं ? "

" वा ! कॅप्टन् लेनॉक्सबरोबर बाहेर फिरावयास जाण्याची माझी कोठें इच्छा होती ? पण तूं मला तसें करावयास भाग पाडलेंस ? "

" म्हणजे ? " वुइल्यमनें आश्चर्यानें विचारिलें.

" तूं जर आपलीं आवडतीं पुस्तकें क्षणमात्र बाजूस ठेवून माझ्या विनंतीप्रमाणें बाहेर येण्यास तयार झाला असतास तर मला कॅप्टन् लेनॉक्सच्या विनंतीस मान देण्याची काय जरूर होती ? मीं सबंध दोन तास तुझी वाट पाहिली. शेवटीं तुला बाहेर चलण्याविषयीं विचारिलेंही, पण तूं तोंडांतून अक्षरही काढलें नाहींस. त्यास माझा काय उपाय ? "

" असें झालें काय ? मला वाटलें मीं दहा पंधरा मिनिटांपेक्षां अधिक काळ वाचनांत घालविला नाहीं. "

" असें वाटायचेंच. तुला माणसापेक्षां त्या पुस्तकांचीच किंमत अधिक वाटते ! तुझ्याबरोबर फिरावयास जाण्याची तेव्हां मला केवढी इच्छा होती ! "

" आणि वाचनाच्या नादीं लागून मी लिलीच्या इच्छेचा भंग केला ! लिली ! माझ्या या रानटी वर्तनाबद्दल मला तूं क्षमा करशील काय ? "

लिली त्यावर कांहींच बोलली नाहीं. आणि ती जरी कांहीं बोलली असती तरी वुइल्यमला तें ऐकूं आलें नसतें. तो कसला तरी विचार करण्यांत निमग्न झाला होता. क्षणभरानें विचाराच्या तंद्रींतून जागें झाल्यासारखें करून त्यानें सभोंवार दृष्टि फेंकिली. तेव्हां आपण एका सुंदर प्रदेशांत उभे असून प्रत्यक्ष वनदेवता आपणापुढें स्मित करीत उभी आहे असा त्यास भास झाला. लिलीचें सौंदर्य त्यास आतां अनंतपटीनें वाढल्यासारखें दिसूं लागलें. लिली कॅप्टन् लेनॉक्सवर मुळींच प्रेम करीत नसून तिच्या स्वर्गीय प्रेमास पात्र होण्याचा मान आपणास मिळणार आहे

या कल्पनेनें त्याचें मन आनंदसागरांत पोहूं लागलें. त्याला तो वनप्रदेश एडन येथील नंदनवनाप्रमाणें भासूं लागला. आपल्यासमोर उभी असलेली लिली ही निष्कलंक मनाची ईव्ह असून आपण आदम आहोंत, अशी त्याची भावना झाली. तो क्षणमात्र अफाट जीवसृष्टि विसरून गेला. कॅप्टन् लेनॉक्सला टाळून लिली आपणाकरितां बराच वेळपर्यंत घुटमळत होती ही कल्पना त्यास अत्यंत सुख देऊं लागली. शेवटीं त्याच्या मनास आनंदाचा भर सहन होईनासा झाला. तो लिलीजवळ जाऊन प्रेमानें ह्मणाला:—

" लिली! हा पुस्तकी ज्ञानांत गुरफटलेला जंतु तुला हवासा वाटतो काय? या वुइल्यमकरितां तुझ्या हृदयांत स्थान आहे काय? याच्या समागमांत जाणारा काळ तुला सुखाचा वाटतो काय? "

या प्रश्नाचें उत्तर त्या मुग्ध बालिकेनें दिलें असतें तर वुइल्यमला किती वाईट वाटलें असतें! अशा प्रश्नाचें उत्तर न मिळणें म्हणजेच कार्यभाग साधणें होय अशी त्याची खात्री होती. लज्जेनें रक्तवर्ण झालेल्या त्या नवविकसित कुसुमाकडे तो भ्रमरी दृष्टीनें एकसारखा पहात होता. शेवटीं तिचे ओंठ बोलण्याकरितां हालूं लागले.

" वुइल्यम! " लिली मंजुनादानें ह्मणाली, " त्या दिवशीं मी कॅप्टन लेनॉक्सबरोबर फिरावयास गेलें याचा तुला राग तर आला नाहीं ना? मी असें अविचाराचें वर्तन पुनः कधीं करणार नाहीं. " असें ह्मणून क्षणमात्र विद्युल्लतेप्रमाणें चकाकणारीं दंतांचीं किरणें तिनें आपल्या ओष्ठांखालीं दडवून ठेविलीं. तरी तिचा कपोलभाग आपल्या रक्तवर्णानें मुखांत दडलेल्या विद्युल्लतेचें तेज प्रकट करीत होता. तिच्या कपोलांची आरक्तता आणि तिच्या अधरांचें स्फुरण हीं पाहून वुइल्यमचें हृदय जोरानें धडधडूं लागलें. त्यानें आत्मसंयमनाला रजा दिली. कित्येक वर्षेंपर्यंत जो मनोविकार दाबून ठेवण्याचा तो प्रयत्न करीत होता तो आज त्याला अनावर झाला. योग्य समय संनिध आला आहे, आपलें हृदय उघडें करण्याची हीच वेळ आहे, अशी त्याची खात्री झाली.



# प्रकरण २ रें.

——:०:——

## प्रेमाविष्करण.



“लिली,” वुइल्यम म्हणाला, “माझ्या हृदयांत काय चाललें आहे हें तुला माहीत आहे का ? आज किती तरी वर्षें मी तुझ्यावर प्रेम करीत आहें !”

“पण तू मला तसें कधींच सांगितलें नाहींस,” लिलीच्या स्वरांत हास्याची छटा दृग्गोचर होत होती.

वुइल्यम—“याचें कारण मी भीत होतों. माझ्यापेक्षां इतरांवरच तुझें अधिक लक्ष्य आहे असें मला वाटत होतें. माझ्याहून अधिक देखण्या व वैभवशाली तरुणांचें मन तुजवर जडलें आहे हें मला ठाऊक आहे. माझा स्वभाव—माझ्या संवयी—तुला रुचणाऱ्या नाहींत हेंही मी जांणून आहे. पण माझें तुझ्यावर निस्सीम प्रेम आहे ही जाणीव तुला आहे. मात्र तीच गोष्ट मुखानें उच्चारण्याचें धैर्य मला झालें नाहीं.”

लिली—“भित्र्या माणसाचा मला तिटकारा आहे.”

वुइल्यम—“तें मी जाणून आहें. पण कॅप्टन् लेनॉक्ससारखा शूर व खानदानीच्या घराण्यांत जन्मलेला तरुण तुझ्यासाठीं प्राण अर्पण करण्यास सुद्धां तयार असतांना, माझें प्रेम तुजजवळ बोलून दाखविण्याची माझी छाती नव्हती. तुझ्या प्राप्तीची संभावनाच मला दिसत नव्हती.”

लिली—“मग आज तरी तू आपलें मन कां प्रगट करीत आहेस ?”

वुइल्यम—“मी तरी काय करूं ? मला चैनच पडेनासें झालें आहे. तुझ्या पित्याला ही गोष्ट रुचणार नाहीं हें खरें, पण त्याची मी यत्किंचि-

तूही पर्वा करणार नाहीं. लिली, माझी इच्छा सफल होण्याची कांहीं आशा आहे का?"

लिलीचा अधर पुनः स्फुरण पावूं लागले; स्वतःच्या मनोवृत्ति दाबून ठेवण्याची जरी तिला संवय होती, तरी तिच्या हृदयांत मनोविकारांचें काहूर माजून राहिलें आहे हें तिच्या मुद्रेवरून स्पष्ट दिसत होतें. ती म्हणाली, " वुइल्यम, मला तुझ्या प्रश्नाचें उत्तर देतां येत नाहीं. "

लिलीचा स्वर कांहीं चमत्कारिकच भासत होता. तो तिच्या उत्कट मनोवृत्तीची साक्ष पटवीत होता.

" उत्तर देतां येत नाहीं ? " वुइल्यम उद्‌गारला. " मग–मग– "

लिली—" वुइल्यम, मी स्पष्ट बोलूनच दाखवितें. ह्या योगानें तुला वाईट वाटेल, पण माझा त्याला इलाज नाहीं. तू माझ्यावर प्रेम करतोस हें मी जाणून आहें. पण तूं तसें कधींही बोलून दाखविलें नाहींस. तूं तें व्यक्त करावेंस अशी माझी फार इच्छा होती. "

वुइल्यम—" काय ? तुझी अशी इच्छा होती ! पण तूं मला एकदाही तशी संधि दिली नाहींस. तुला त्या लेनॉक्सचीच काळजी वाटते असें दिसे. "

लिली—" तूं होऊन संधि उत्पन्न करावी अशी माझी इच्छा होती. एखाद्या पुरुषाचें एखाद्या तरुणीवर प्रेम असल्यास तिच्या प्राप्तीसाठीं वाटेल तें साहस करण्यास त्यानें तयार असलें पाहिजे. लेनॉक्सची मी लवमात्रही पर्वा करीत नाहीं. पण तूं क्षणोक्षणीं कसली तरी क्षुद्र सबब काढून मला सोडून जावेंस ! अर्थात् त्याच्याशीं बोलण्याचा व हंसण्याखेळण्याचा मला प्रसंग येई. "

" आणि तो सर्व वेळ मी तुझ्या संनिध असावें अशी तुझी इच्छा असे ना ? " वुइल्यमच्या स्वरांत आनंदाची व विजयाची छटा ध्वनित होत होती.

लिली—" मला नाहीं ठाऊक. पण मी तुझ्यापुढें मन मोकळें करणार आहें. तुझ्या प्रकृतीच्या मनुष्यावर प्रेम करण्याची माझी इच्छा नव्हती हें मी प्रांजलपणें कबूल करतें. वीरावर—कर्तबगारीच्या पुरुषावर—प्रेम

जडावें असें मी इच्छित होतें. पुस्तकालयांत बसून जुन्यापुराण्या ग्रंथांचा फन्ना पाडणाऱ्या मनुष्याची मला मुळींच आवड नाहीं; म्हणूनच असल्या पुराण ग्रंथांच्या गोष्टी सांगत असतांना मीं तुझी अनेक वेळां टर उडविली आहे. पण असें असूनही वुइल्यम—वुइल्यम ! " त्या बालिकेचा कंठ दाटून आला.

वुइल्यम—" माझी वाचनलालसा तुला तिरस्करणीय वाटत असूनही तुझें माझ्यावर प्रेम जडलें आहे हाच का तुझ्या शब्दांचा अर्थ ? "

" होय, दुर्दैवानें तसें आहे खरें ! " लिली अर्धवट हंसत अर्धवट बाष्परुद्ध स्वरानें उद्गारली.

" दुर्दैवानें ! "

" नाहीं तर काय ? " लिलीनें उत्तर केलें. " तुझा स्वभाव—तुझें वाचनावरील वेडगळपणाचें प्रेम—मला मुळींच आवडत नाहीं. तुला म्हणे इतिहासवाचनाचा मनस्वी नाद आहे ! करायचा आहे काय तो जुनाट इतिहास ? इतिहास म्हणजे आहे काय ! प्राचीन गोष्टींचें वर्णनच ना ? स्वतः मोठालीं कृत्यें करून आपलें नांव इतिहासांत अजरामर करणारीं माणसें मला अधिक आवडतात ! "

वुइल्यम—" पण माझें तुझ्यावर निस्सीम, अलोट प्रेम असल्यावर या वैगुण्याची काय किंमत आहे ? शिवाय—"

लिली—" योद्ध्यांच्या वंशांत मी जन्मलें आहें. स्पेनचा बादशहा फिलिप यानें जेव्हां इंग्लंडचा नाश करण्यासाठीं आपलें प्रचंड आरमार पाठविलें, तेव्हां माझ्या एका पूर्वजानें त्याचा धुव्वा उडविण्याच्या कामीं साह्य केलें. लढाऊ जहाजें आणि लढवय्ये सैनिक यांचा पुरवठा करून त्यानें इंग्लंडचें जुलमापासून आणि अन्यायापासून संरक्षण केलें ! नेपोलियन बोनापार्ट यानें जेव्हां संपूर्ण यूरोपखंडास त्राहि त्राहि करून सोडलें आणि आपल्या आंग्लभूमीचा सत्यानाश करण्याचा आटोकाट प्रयत्न चालविला, तेव्हां माझ्या वंशांतील लोक शौर्यानें लढले. माझा आजा सेंट जॉन या गांवातर्फे पार्लमेंटमध्यें प्रतिनिधि होता—त्यानें येथील शूर तरुणांच्या अंगांत युद्धप्रेम जागृत केलें. असें असतांना, वुइल्यम, तुझ्या मनांतून ऑक्सफर्ड

येथील पुस्तकसंग्रहालयांत, ज्यांचा जगाला कोणताही उपयोग नाहीं अशीं रद्दी पुस्तकें वाचीत बसण्याचें आहे ! खऱ्या पुरुषाला असलें ध्येय असणें शोभतें का ? ”

वुइल्यम—“ पण त्याची स्वभावप्रकृतिच तशा प्रकारची बनलेली असल्यावर ? ”

लिली—“ अजून माझें भाषण संपलें नाहीं. वुइल्यम, तुझ्या भीरुत्वाबद्दल मला शरम वाटते. परवां नाच झाला तेव्हां तुझ्यासाठीं मीं चार नाच राखून ठेविले होते—आणि तुझ्याबरोबर नृत्य करण्याची माझी उत्कट इच्छा होती. पण तुझा कोठेंच पत्ता नव्हता. मला तिष्ठत बसावें लागलें. मग पुढें जेव्हां मला समजलें, कीं तूं लायब्ररींत जाऊन कित्येक वर्षें कोणीं न उघडलेलें कसलेंसें पुस्तक वाचीत बसला होतास, तेव्हां मी रडलें ! ”

वुइल्यम—“ लिली, मला याची कल्पना सुद्धां नव्हती. माझ्याबरोबर नृत्य करण्याची तुझी इतकी उत्कट इच्छा असेल असें मला वाटलें सुद्धां नाहीं. माझी स्वतःची तुझ्याबरोबर नाचण्याची किती इच्छा होती ? पण तुला माझें नृत्य आवडत नाहीं—तूं त्याची चेष्टा करतेस असा माझा समज होता. पण त्याचें आतां काय ? तुझें माझ्यावर प्रेम आहे ही गोष्ट किती आल्हादकारक आहे ! आहेना तुझें मजवर प्रेम ? ”

लिली—“ इतका वेळ तुला मी काय सांगतें आहें ? असें असूनही तूं माझें—“

“ काय ? माझें काय ? ”

“ वुइल्यम, तुला एका गोष्टीची आवश्यकता नाहीं वाटत ? ”

“ वाटते, पुष्कळ वाटते. पण तुला राग नाहींना येणार ? ”

“ आला तर आला. तेवढा सहन करण्याचें धारिष्ट कर. ”

“ माझ्या मनांतून तुला बाहुपाशांत घट्ट आवळून धरावयाचें आहे व तुझीं शतसहस्र चुंबनें घ्यावयाचीं आहेत. ”

“ मग विलंब कां करतोस ? ”

सभय अंतःकरणानें वुइल्यम सभोंवार पाहूं लागला. तीं दोघें एका छोट्याशा टेकडीखालीं बसलीं असल्यामुळें त्यांना कोणी पहात नव्हतें. वुइल्यमचें हृदय विलक्षण जोरानें धडधडूं लागलें. त्याच्या आनंदाला इतकी प्रचंड भरती आली होती, कीं ती त्याला जवळ जवळ दुःखदायक भासली.

"प्रिये ! प्रिये !" असें ह्मणून त्यानें लिलीला गाढ आलिंगन दिलें व तिच्या सुरम्य मुखकमलाचें अनेक वेळां चुंबन घेतलें.

"माझें तूं चुंबन कां घेत नाहींस असेंच तूं मघां म्हणणार होतीस ना ?" कांहीं वेळानें वुइल्यमनें प्रश्न केला.

"होय, तेंच," लिलीनें उत्तर दिलें.

"लिली, माझ्यासारखा भित्रा मनुष्य त्रिभुवनांत सांपडणार नाहीं. पण इतके दिवस व्यर्थ दवडलेल्या वेळेबद्दल मी भरपाई करीन."

समुद्राच्या लाटा त्या टेकडीच्या पायथ्याशीं आदळत होत्या. त्या जोडप्याच्या मस्तकांवर पक्षी उडत होते व चमत्कारिक शब्द करीत होते. पण एकाचेंही तिकडे लक्ष्य नव्हतें. परस्परांच्या समागमांत तीं दोघें स्वर्गीय सुखाचा अनुभव घेत होतीं. आपल्या अभिरुचीला अनुरूप असे गुण वुइल्यमच्या अंगीं नाहींत ह्या गोष्टीचें लिलीला विस्मरण झालें होतें— आणि तिनें दिलेल्या व्याख्यानाची पर्वा करण्याइतकें वुइल्यमचें सौख्यनिमग्न चित्त भानावर नव्हतें. तिनें घेतलेलीं चुंबनें अद्याप त्याच्या ओंठांवर विलसत होतीं—तिनें उच्चारलेले प्रेमोद्गार अजून त्याच्या कर्णपुटांत मंजुनाद करीत होते. प्रणयोद्यानाच्या नंदनवनतुल्य प्रदेशांत तें जोडपें नुकतेंच प्रविष्ट झालें होतें—त्यांच्या शिरावरील निरभ्र आकाशाप्रमाणें त्यांचें जीवित संकटशून्य होतें. लिलीचें आजन्मांत त्याच एका तरुणावर चित्त जडलें होतें—आणि लिली किती जरी रागीट आणि हट्टी असली तरी ती वुइल्यमला सद्गुणांची दोषशून्य पुतळी भासत होती. आतां पुस्तकांशीं, ज्ञानाशीं आणि विद्वत्तेच्या कीर्तीशीं त्याला काय कर्तव्य होतें ? जीवर तो आज कित्येक वर्षें प्रेम करीत होता आणि जिची प्राप्ति त्याला

अशक्य वाटत होती ती तरुणी आज त्याच्या हस्तगत झाली होती. तिनें अत्यंत प्रेमानें, आपण होऊन त्याच्या गळयांत प्रेमकुसुमांची माळ घातली होती.

आपलें भाग्य एकदम इतकें उदयाला आलें याचें त्याला राहून राहून आश्चर्य वाटत होतें—तो पुनः पुनः तिच्या वदनाकडे पहात होता.

" लिली, तूं किती सुंदर आहेस ! " तो उद्गारला.

लिलीच्या नेत्रद्वयांत आनंदाचें अद्वितीय तेज चमकूं लागलें ! आपल्या प्रियकराला आपण सुंदर दिसतों हें त्याच्याच तोंडून ऐकावें असें कोणत्या तरुणीला वाटत नाहीं ?

" तुझा पोषाखही किती रमणीय आहे ? " वुइल्यम ह्मणाला.

" तूं ऑक्सफर्डहून आल्यापासून मीं तीन वेळां हा पोषाख धारण केला असून तूं एकदांही त्याची प्रशंसा केली नाहीं ! "

" आज मला तो जसा दिसतो तसा तो मला पूर्वीं कधींच दिसला नव्हता. आज मीं तुला ज्या नितांतमनोहर स्वरूपांत पहात आहें तशी तूं मला पूर्वीं कधींच दिसली नव्हतीस. लिली, तुझ्या तोडीची वस्तु त्रैलोक्यांतही सांपडणें शक्य नाहीं. "

पण या सौख्यपूर्ण प्रसंगाचें अधिक वर्णन मला करतां येत नाहीं; मला माझी इच्छा आवरून धरली पाहिजे. या " कादंबरींतल्या प्रेमाची " आपण सुज्ञ व दूरदर्शी लोक चेष्टा करितों; पण शुद्धांतःकरणाच्या मुग्ध युव-युवतींच्या प्रेमाइतकी दुसरी पवित्र वस्तु जगांत नाहीं. हें प्रेम म्हणजे आयुष्यांतील अंतिम–उच्चतम साध्य आहे, आणि असल्या पवित्र व उज्ज्वल प्रेमाचें अस्तित्व नाकारणारा मनुष्य जगांतील उत्कृष्टतम सौख्यास अंतरला असेंच म्हटलें पाहिजे.

थोड्या वेळानें शुद्धीवर येऊन वुइल्यम ह्मणाला—

" लिली, आज सायंकाळीं मी तुझ्या पित्याजवळ गोष्ट काढीन. त्यांना राग येईल हें मी जाणून आहें, पण तसल्या रागाची पर्वा मी करीत नाहीं. "

लिली—“ नको, वुइल्यम, नको. इतक्यांत बाबांजवळ ती गोष्ट काढूं नकोस. ”

“ कां बरें ? ”

“ तुझ्यासारख्या पुस्तकांत गढून गेलेल्या मनुष्याशीं मीं लग्न करावें अशी त्यांची इच्छा नाहीं. ”

“ मी आहेंच तसा चमत्कारिक. पण मीं आपला विचार आतां बदलला आहे. ‘ मी तुझ्यावर प्रेम करतें, ’ हें तुझ्या तोंडचे शब्द ऐकिल्यापासून मला कांहीं तरी कर्तबगारी करून दाखविण्याची आवश्यकता भासूं लागली आहे. आजपर्यंत विचारालाच मी फक्त महत्त्व देत होतों. यापुढें कृतीलाही तितकेंच महत्त्व देण्याचें मीं निश्चित केलें आहे. नुसत्या विचारानें कांहींच कार्य होणें शक्य नाहीं. त्याला कर्तबगारीची जोड अवश्य पाहिजे. ”

“ तूं काय करण्याचें ठरविलें आहेस ? ” लिलीनें प्रश्न केला.

वुइल्यम—“ बॅरिस्टरची परीक्षा देऊन पार्लमेंटमध्यें जाण्याचा माझा विचार आहे. मोठाल्या जनहिताच्या गोष्टी घडवून आणण्याची माझी इच्छा आहे. देशाचीं साम्राज्यसूत्रें प्रमुखत्वानें ग्रहण करण्याची माझी महत्त्वाकांक्षा आहे. माझे विचार नुसते पुस्तकरूपानें प्रसिद्ध करून मी स्वस्थ बसणार नाहीं. त्यांच्या योगानें देशाच्या कायद्यांना विशिष्ट वळण लावण्याचा व तद्द्वारा संपूर्ण जगाचें कल्याण करण्याचा माझा बेत आहे.”

वुइल्यमच्या प्रचंड बेतांची व जबर महत्त्वाकांक्षेची हेटाळणी करणें न्यायाचें होणार नाहीं. जगांत होऊन गेलेल्या प्रत्येक थोर पुरुषानें केव्हांना केव्हां असले उद्गार काढलेले आहेत. ज्या दिवशीं आंग्ल देशांतील तरुण अशक्य विचार मनांत आणण्याचें व अचाट महत्त्वाकांक्षा बाळगण्याचें सोडून देतील, त्या दिवशीं इंग्लंडच्या वैभवाचा काळ संपला असें ह्मणावें लागेल.

“ तुझे विचार फारच नामी आहेत ! ” लिली आनंदपूर्ण नेत्रांनीं उद्गारली. “ तूं पार्लमेंटचा सभासद व्हावेंस अशी माझी उत्कट इच्छा आहे;

कॉमन्सच्या सभेंत तुझें भाषण मी मोठ्या आनंदानें श्रवण करीन. पण वुइल्यम, तूं कोणते प्रश्न हातांत घेणार ? ”

वुइल्यम—“ इंग्लंडमध्यें शांततेचा कैवारी पक्ष तयार करण्याची माझी इच्छा आहे. तुझ्या पूर्वजांनीं रणांगणांत समशेर गाजविली आहे व माझ्या मातेलाही स्वतःच्या रणबहाद्दर पूर्वजांबद्दल अभिमान वाटत आहे, ही गोष्ट खरी; पण युद्धाच्या भयंकरपणाची कल्पना कर ! युद्ध या शब्दाबरोबर किती क्रूर व हृदयद्रावक देखावे अंतश्चक्षूसमोर उभे रहातात हें ध्यानांत आण ! सद्यःकालीं सुद्धां सर्व युरोपखंड युद्धाच्या तयारीनें सज्ज आहे. सर्व युरोपभर रणकंदन माजण्यास प्रसंगीं अत्यंत क्षुद्र कारण देखील बस्स होईल हें प्रत्येकजण जाणून आहे ! युद्धाचें कांहींएक कारण नसतांना प्रत्येक राष्ट्र अवाढव्य खडें सैन्य ठेवीत आहे आणि प्रत्येक राष्ट्रांतील जनता करांच्या ओझ्यानें मेटाकुटीस आली आहे. लोककल्याणाच्या पवित्र कार्यासाठीं आणि दारिद्र्याचें दुःख हलकें करण्यासाठीं ज्या द्रव्याचा उपयोग व्हावयास पाहिजे तें द्रव्य मनुष्यवधाचीं भीषण शस्त्रें निर्माण करण्याकडे खर्चिलें जात आहे. लष्कराकरितां आणि आरमाराकरितां कोट्यवधि पौंडांचा चुराडा मोठ्या खुषीनें करण्यांत येतो; आणि शिक्षणासारख्या लोकोपयुक्त शाखांकडे यत्किंचित् रकम देखील मोठ्या कष्टानें मंजूर होते. ”

लिली—“ युद्ध वाईट ही गोष्ट खरी. पण तें तूं नष्ट कसें करणार ! आपलें सर्व सैन्य कमी करून टाकावें असें तूं प्रतिपादणार काय ? तें वेडगळपणाचें होईल. ”

वुइल्यम—“ पण इतक्यांत तसें करावयाचें नाहीं. युरोपांतील संपूर्ण राष्ट्रांनीं या कामांत एकदिलानें व जुटीनें वागलें पाहिजे. जर्मनीचेंच उदाहरण घेईनास. आपणापेक्षांही जर्मन लोकांना जबर युद्धविषयक कर द्यावे लागतात. वस्तुतः ते शांतताप्रिय लोक आहेत. कैसरची युद्ध करण्याची बिलकूल इच्छा नाहीं. त्यानें तसें अनेक वेळां बोलून दाखविलें आहे. रशियाच्या झारचीही युद्ध करण्याची इच्छा नाहीं. असें असून, देशांत किती तरी गोरगरीब उपाशीं मरत असतां, लक्षावधि पौंड युद्धविषयक सामुग्री-

साठीं रशिया खर्च करतो. सध्यां एका गोष्टीची जरूर आहे. युद्ध मुळीं करावयाचेंच नाहीं असा सर्व राष्ट्रांनीं मिळून परस्परांशीं करार केला पाहिजे. लोकांच्या मनांत युद्धाविषयीं तीव्र द्वेष उत्पन्न करण्याचा व त्या योगानें युद्धाचा कायमचा नायनाट करण्याचा माझा कृतनिश्चय आहे. ”

लिली—“ सर्व राष्ट्रांनीं आपापलीं सैन्यें कमी केलीं तर तूं ह्मणतोस तसें होण्याचा संभव आहे. पण—”

वुइल्यम—“ तसें झालेंच पाहिजे. मी आपलें संपूर्ण आयुष्य या कार्याला वहाणार आहें. बस्स, लिली, झालें, माझ्या कार्याची दिशा निश्चित झाली. आतां तुझ्या पित्याची अथवा इतरांची मला कर्तव्यशून्य ह्मणण्याची प्राज्ञा नाहीं. जगभर शांततेचें साम्राज्य पसरविण्याची माझी महत्त्वाकांक्षा अत्यंत स्तुत्य आहे असें तुला नाहीं वाटत ? ”

लिली—“ अगदीं स्तुत्य, अभिनंदनीय आहे यांत संशय नाहीं. माझा सर्वांत वडील बंधु रोजर हा बोर युद्धांत लढण्यासाठीं गेला तेव्हां मी लहान होतें. पण त्या वेळच्या गोष्टी मला स्मरतात. माझा बंधु मोठा अधिकारी होणार अशी माझ्या पित्याला आशा होती. बोर लोकांचा नायनाट करणें म्हणजे अगदीं सुलभ गोष्ट आहे अशी सर्वांची कल्पना होती. बोर युद्ध चार दोन आठवड्यांत संपणार असें प्रत्येकजण ह्मणत होता. मी दररोज टपाल आलें म्हणजे बाबांजवळ बसें. एके दिवशीं त्यांना एक पत्र आलें. त्यांतील मजकूर वाचतांच त्यांची जी स्थिति झाली ती मी केव्हांही विसरणार नाहीं. रोजर ठार झाला होता. तेव्हांपासून बाबांची प्रकृति खचली; पुनः पूर्वीप्रमाणें सुदृढ ते कधींच दिसले नाहींत. ”

वुइल्यम—“ युद्धासारखा भीषण पदार्थ जगांत नाहीं. माझा निश्चय कायम झाला. मी शांततेचा पक्ष उचलणार ! युद्धावर मी मोहीम करणार ! लिली, सद्धर्माभिमानी पुरुषाला याहून पवित्रतर कर्तव्य नाहीं असें नाहीं तुला वाटत ? मग आज सायंकाळीं तुझ्या पित्याजवळ मी गोष्ट काढूं ना?”

लिली—“ नको, इतक्यांत नको. मला बाबांचें मन हळू हळू तयार केलें पाहिजे. पण, वुइल्यम, मी होऊन बोललें तेव्हां तूं आपलें प्रेम व्यक्त केलेंस. ”

वुइल्यम—“ सदैव उपदेश करण्याचें काम तुझ्याकडे व कृति करण्याचें काम माझ्याकडे राहील. ”

लिली—“ तूं भीरु आहेस अशी मला जबर शंका होती. ”

वुइल्यम—“ आणि तुला भित्रीं माणसें आवडत नाहींत ! ”

लिली एकाएकीं गंभीर मुद्रा धारण करून ह्मणाली:—“ भीरुत्वाचा मला मनस्वी तिटकारा आहे. इतर सर्व अपराध मी क्षम्य मानीन, पण नामर्दपणाचा मला मनापासून द्वेष वाटतो. ”

इतक्यांत कसलासा आवाज त्यांनीं ऐकिला. वळून पहातां वायुलहरीनें एक वर्तमानपत्र आपणांकडे येत असलेलें त्यांच्या दृष्टीस पडलें.

“ हा आजचा अंक दिसतो, ” तें पत्र हातांत घेऊन वुइल्यम ह्मणाला.

त्यानें त्यावरून दृष्टि फिरविली. टेकड्यांची मौज पहावयास आलेल्या एखाद्या इसमानें निष्काळजीपणानें टाकून दिलेल्या त्या पत्रांत कसली भयंकर वार्ता होती याची त्या जोडप्याला किंचित्‌ही कल्पना नव्हती. त्या वार्तेवर केवळ त्यांचेंच भावी आयुष्य नव्हे, तर मोठमोठ्या राष्ट्रांचें सुद्धां भवितव्य अवलंबून होतें ! त्या वार्तेमुळें संपूर्ण युरोप खंडाची कसाईखान्याच्या जागीं योजना होणार होती !



# प्रकरण ३ रें.

——:o:——

## वज्राघात !

“बोसनियामधील भयंकर अत्याचार !
आस्ट्रिया व हंगेरीच्या राजपुत्राचा अमानुष वध !
आर्चडयूक फर्डिनँड आणि त्यांची पत्नी यांच्या गाडीवर फेकण्यांत आलेला बाँब !
व्हिएना येथील जनतेनें व्यक्त केलेला तिरस्कार !
वृद्ध बादशहास झालेलें दुःख !!”

या मथळ्यांवर वुइल्यम आणि लिली यांची दृष्टि खिळून गेली· दोघांच्याही तोंडांतून कांहीं कालपर्यंत एक अक्षरही बाहेर पडलें नाहीं· शेवटीं लिली कंपित आवाजानें ह्मणाली—

“ परमेश्वरा ! बिचाऱ्यावर केवढें संकट ओढवलें ! किती भयंकर अत्याचार ! ”

“ भयंकर म्हणजे ? त्या भयंकरपणाची नुसती कल्पनाच केली पाहिजे. शब्दांनीं त्याचें वर्णन करितां यावयाचें नाहीं. शांतताप्रिय मनुष्याच्या मनावरील हा अशनिपातच ह्मणावयाचा. ही बातमी मला सकाळींच कळावयाची. पण मी सकाळपासून वाचनांत निमग्न असल्यामुळें आजच्या दैनिकाकडे लक्ष देण्यास मला वेळच झाला नाहीं; ” वुइल्यम ह्मणाला.

“ त्या बिचाऱ्या वृद्ध बादशहाच्या दुःखास तर आतां पारावारच

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे,
नौपाडा शाखा.



अ. क्र.
विभाग ३.३
१२१
२८/७/६०

नसेल. हा अत्याचार कोणीं केला असेल बरें? यांच्या मुळाशीं काय हेतु असेल ?"

"दोघां अराजक सर्व्हियन तरुणांनीं हें कृत्य केलें असें याच दैनिकांत स्पष्ट लिहिलें आहे," वुइल्यम ह्मणाला.

"खरोखर हे अराजक मानवजातीचे शत्रु आहेत. मनुष्याचा वध करणें म्हणजे यांना कांहींच वाटत नाहीं. यांचें अस्तित्व राजे लोकांस सदोदित भयप्रद होय !"

"राजे लोकांचा वध व्हावा एवढेंच कार्य साधण्याकरितां हा खून झाला असेल असें मला वाटत नाहीं. या खुनाच्या मुळाशीं कांहीं तरी राजकीय हेतु असला पाहिजे. खून करणारे तरुण, सर्व्हियन सरकारच्या अनुमतीनेंच हें नीच कार्य करण्यास धजले असाही केवळ काल्पनिक शेरा या दैनिकानें मारिला आहे. लिली, तुला युरोपांतील सध्यांची राजकीय परिस्थिति माहीत आहे काय ?"

"असल्या गोष्टी समजून घेण्याचा मीं आजपर्यंत कधींच प्रयत्न केला नाहीं," लिली ह्मणाली.

"नुकतेंच संपलेलें बाल्कन युद्ध तूं ऐकून असशील. त्या युद्धांत सर्व्हियन लोकांस एका आरमारी बंदराचा लाभ होणार होता; परंतु केवळ आस्ट्रियाचा राजपुत्र फर्डिनँड याच्या प्रयत्नामुळें आपण त्या लाभास मुकलों अशी त्यांची समजूत आहे. तसेंच आस्ट्रियांतील बोसनिया वगैरे प्रदेश आपल्या देशांत सामील करावा अशी सर्व्हियांतील देशभक्तांची बहुत दिवसांची इच्छा आहे. कारण तेथील बहुतेक प्रजाजन स्लाव्ह जातीचे आहेत. या दोन कारणांकरितां आस्ट्रियन राजपुत्राचा वध झाला असावा असें मला वाटतें."

"एकुण सर्व्हियांतील लोक बरेच क्रूर आहेत तर !" लिली ह्मणाली.

"तसें कांहीं नाहीं. तो चिमुकला प्रदेश अत्यंत दर्शनीय आहे. आपला लग्नविधि उरकल्यानंतर चार दिवस रहाण्याकरितां सर्व्हिया देशांतच जाऊं."

" तसल्या सदोदित भांडणाऱ्या रानटी देशांत जाऊन आपणांस कोणती सुखप्राप्ति होणार आहे ? परदेशास जावयाचेंच असलें तर एखाद्या सुधारलेल्या देशांत जाऊं. त्या अर्धवट रानटी सर्व्हियांत मी कधींही यावयाची नाहीं. "

" लिली! सर्व्हिया रानटी आहे ही तुझी समजूत अगदीं चुकीची आहे. मला त्या देशासंबंधानें पुष्कळ माहिती आहे, त्यावरून सर्व्हियन लोक म्हणजे रानटी आणि आस्ट्रियांतील लोक म्हणजे सुधारणेच्या शिखरास गेलेले अशापैकीं मुळींच स्थिति नाहीं. जाऊं दे. त्या गोष्टीशीं आपणांस सध्यां काय करावयाचें आहे? लग्न झाल्यानंतर परदेशास जाण्याचें ठरलें तर मग तो विचार करितां येईल. "

अशा रीतीनें अत्याचाराच्या बातमीकडे आकृष्ट झालेलें लिलीचें मन पूर्ववत् शांत करण्याचा वुइल्यमनें प्रयत्न केला, पण त्यांत त्याला यश आलें नाहीं. आतां भाषणाचा ओघ वळला असें वाटून तो समाधानानें लिलीकडे पहातो तोंच लिली ह्मणाली—

" आपल्या राजपुत्राचा निष्कारण वध झाला ही बातमी ऐकिल्याबरोबर आस्ट्रियन जनतेचीं मनें अगदीं संतप्त होऊन गेलीं असतील. या राजवधाचा सूड केव्हां घेऊं असें त्यांना झालें असेल. आपल्या राजपुत्राच्या खुनाचा सूड आस्ट्रिया आतां कोणत्या रीतीनें उगविणार ? "

हा लिलीचा प्रश्न ऐकून, अत्याचाराच्या बाबतींतील पूर्ण खुलासा ऐकिल्याशिवाय तिच्या मनास चैन पडणार नाहीं, असें वाटून वुइल्यम म्हणाला—

" या खुनाशीं सर्व्हियन राज्याचा कोणत्याच प्रकारचा संबंध नसेल. फर्डिनँड यास सर्व्हियन लोक पाण्यांत पाहत असतील, पण अशा नीच व भ्याड कृत्यास चांगले मुत्सद्दी लोक आपली संमति देतील अशी कल्पना करणेंही चुकीचें होईल. कोणीं माथेफिरू अराजकांनीं हें कृत्य केलें असलें पाहिजे. तसें असेल तर खुनी इसमांचा शोध लावून व त्यांस चौकशीअंतीं योग्य शिक्षा देऊन हें प्रकरण थोडक्यांत संपेल. पण या खुनांत सर्व्हियन सरका-

र्चा हात आहे असें जर मानण्यांत येईल तर मात्र युरोपखंडभर गोंधळ उडून गेल्याशिवाय रहणार नाहीं. "

" म्हणजे ? एका खुनामुळें युरोपखंडभर गोंधळ माजण्याचें कारण काय ? " लिलीनें पृच्छा केली.

" आपल्या राजपुत्राचा खून झाला आहे त्या अर्थी आस्ट्रियाचा बादशहा सहजच सर्व्हियन सरकारास अत्याचाराबद्दल संपूर्ण खुलासा मागणार आणि यदाकदाचित् आस्ट्रियास समाधानकारक उत्तर मिळालें नाहीं तर, खात्रीनें त्या दोन राज्यांचें आपसांत जुंपणार. आस्ट्रियन लोकांस स्लाव्ह लोकांचा वरचष्मा बिलकूल सहन होत नाहीं. याकरितां सर्व स्लाव्ह लोकांस चिरडून टाकण्यास आपणास बरी संधि प्राप्त झाली असा आनंद मानून आस्ट्रिया सर्व्हियास युद्धास आव्हान करणार, आणि याचा शेवट सर्व्हियाचीं सर्व राज्यसूत्रें आस्ट्रियाच्या हातांत जाऊन लागणार. "

" मग फारच बरें होईल, " लिली म्हणाली. " सर्व्हियाचीं राज्यसूत्रें आस्ट्रियासारख्या सुधारलेल्या राष्ट्राच्या हातांत जाणें सर्व्हियनांच्या हितावेंच होईल. सुधारणा म्हणजे काय तें तरी आस्ट्रियन लोकांच्या सहवासानें सर्व्हियन लोकांस समजूं लागेल. माझ्या एका सहाध्यायी मैत्रिणीनें आस्ट्रियाच्या राजधानींत बरेच दिवस घालविले होते. आस्ट्रियन लोक फारच हुशार, दक्ष आणि सुधारलेले आहेत असें ती म्हणे. "

" आणि तेवढ्याच आधारावरून तूं आस्ट्रियास सुधारणेच्या शिखरावर नेऊन बसवितेस आणि सर्व्हियास रानटीपणाच्या सदरांत ओढतेस, असेंच कीं नाहीं ? " असें म्हणून वुइल्यमनें स्मित केलें. तो पुढें ह्मणाला, " एकदां आस्ट्रियानें सर्व्हियावर चाल केली म्हणजे रशिया कधींही स्वस्थ बसावयाचा नाहीं. सर्व्हियन लोकांचें संरक्षण करणें रशिया आपलें पवित्र कार्य समजत आहे. कारण रशिया तसें करण्यास करारानें बांधला गेला आहे. शिवाय रशियामध्यें स्लाव्ह लोकांची संख्या विशेष असल्यामुळें आपल्याच सर्व्हियांतील बांधवांस परके आस्ट्रियन गुलाम करीत आहेत हें रशियास मुळींच पाहवणार नाहीं. "

" अर्थातच या राजपुत्राच्या खुनामुळें आस्ट्रिया आणि रशिया यांच्यामध्यें तुंबळ युद्ध सुरू होणार. रशिया थोडाच आस्ट्रियास दाद देतो. हां हां म्हणतां रशियाच्या सैन्याच्या झुंडीच्या झुंडी आस्ट्रियावर चाल करून जातील आणि अगदीं अल्प काळांत तो देश बेचिराख करून टाकतील."

" परंतु या गोष्टीचा विचार करतांना आस्ट्रिया आणि जर्मनी या दोन देशांचा जो सलोखा आहे तोही अवश्य लक्षांत घेतला पाहिजे. जर्मनीचें सामर्थ्य कांहीं हलकें नाहीं. रशिया आस्ट्रियाच्या वाटेस जात आहे हें जर्मनी स्वस्थ बसून पहाणार नाहीं."

" मग मात्र भयंकर रणसंग्राम होणार," लिली म्हणाली, " आणि असंख्य निरपराधी लोकांचे प्रत्यहीं वध होणार. पण आपणांस काय त्याचें ? जो जसें करील तसें भरील. इंग्लंडनें कांहीं आस्ट्रियाचें नुकसान केलें नाहीं. मी ही अत्याचाराची गोष्ट विसरण्याचा किती प्रयत्न करितें पण माझ्या मनांतून ती गोष्ट नाहींशीं होतच नाहीं. राहून राहून आस्ट्रियाच्या वृद्ध बादशहाची आठवण होते; आणि त्याच्या दुःखाबद्दल मन तळमळते."

" छे ! छे ! लिली ! असें दुःख मानूं नकोस. आपल्या भावी सौख्याकडे लक्ष दे. आपल्या सुखाच्या आड थोडाच हा अत्याचार येणार आहे. सर्व्हिया आणि आस्ट्रिया काय तें पाहून घेतील. त्याची कल्पना करून आपल्या सुखाचा भंग कां करावा ? माझे मघांचे शब्द खरे करण्यास सोन्यासारखी संधि मला मिळाली आहे, याबद्दल ईश्वराचे आभार मान. लौकरच माझी युद्धावरील मोहीम सुरू होईल. युद्ध करणें हें रानटीपणाचें लक्षण आहे असें मीं माझ्या बंधुभगिनींपुढें मांडीन आणि जवळच चालू असलेल्या युद्धाकडे बोट दाखवून युद्धाचा हिडीसपणा सर्वांच्या प्रत्ययास आणीन. जगन्नियंत्याचे शब्द खरे आहेत, माझ्या बाबांचे उद्गार साधार आहेत असें सोपपत्तिक रीतीनें प्रतिपादून लढाईची रानटी कल्पना प्रत्येकाच्या डोक्यांतून नाहींशी करीन. पण या कामांत मला तुझी मदत पाहिजे."

" माझी मदत ! " लिली आश्चर्यानें ह्मणाली , " मी तुला कसली मदत करणार ? "

" माझ्या सर्व जीवनक्रमांत मला तुझ्या साहाय्याची अत्यंत जरूर आहे. लिली माझी झाली, लिली पूर्णपणें माझी झाली अशी एकदां मनाची खात्री पटली ह्मणजे मला माझें कर्तव्य बजावण्यास दुप्पट अवसान येईल. याकरितां आजच संध्याकाळीं तुझ्या पित्याकडे जाऊन आपल्या विवाहास त्याची संमति मिळवावी असा माझा विचार आहे. "

हे वुइल्यमचे शब्द ऐकितांच लिलीचें मुख अत्यंत गंभीर झालें. क्षणमात्र विचार करून ती ह्मणाली—

" छे ! वुइल्यम, असें करूं नकोस. गडबडीनें सर्वच घोंटाळा उडून जाईल. बाबांची संमति इतक्या गडबडीनें कधींही मिळावयाची नाहीं. खरें विचारशील तर– " असें ह्मणून लिली मध्येंच थांबली. ती पुढें बोलली नाहीं.

तेव्हां वुइल्यम अधीरतेनें ह्मणाला—" लिली ! काय तें स्पष्ट बोल. मला असें संशयांत ठेवूं नकोस. "

क्षणमात्र विचार करून लिली ह्मणाली—" ऐक वुइल्यम, मला तुझ्यापासून कोणतीच गोष्ट लपवून ठेवावयाची नाहीं. बाबांची कॅप्टन लेनॉक्सवर बहाल मर्जी आहे. तुझ्या सद्गुणांची ते वाहवा करितात. परंतु कोणतीही कर्तबगारी न करितां तूं आपलें आयुष्य वाचनालयांतील जुनीं पुराणीं पुस्तकें पालथीं उलथीं करण्यांत कंठणार याची बाबांस मोठी चीड आहे. कॅप्टन लेनॉक्स हा कांहीं सर्वगुणसंपन्न नाहीं. पण तो योद्धा आहे. तो हळुं हळुं मेजरच्या हुद्यापर्यंत चढेल अशी बाबांच्या मनाची खात्री आहे. कॅप्टन लेनॉक्स एकदां मेजर झाला ह्मणजे त्यास कर्नल होण्यास विशेष अवधि लागणार नाहीं असें बाबांचें स्पष्ट मत आहे. यामुळें त्यांनीं माझ्यासंबंधानें आपल्या मनाचा निर्धार केला आहे—"

" कसला निर्धार ? " वुइल्यम मध्येंच ह्मणाला.

" माझा विवाह कॅप्टनबरोबर करावा असें त्यांनीं ठरविलें आहे, " लिली वुइल्यमच्या वदनाकडे पहात ह्मणाली. " पण तो त्यांचा निर्धार

हळुहळुं नाहींसा करण्याचें मीं ठरविलें आहे. विवाह माझा व्हावयाचा आहे. माझ्या अनुमतीच्या अभावीं तो केवळ बाबांच्या निर्धारानें होणार नाहीं. तेव्हां तुझ्या कर्तबगारीचा, तू आखलेल्या तुझ्या भावी आयुष्याचा, चित्रपट उत्तम रीतीनें रंगवून मी बाबापुढें मांडीन आणि त्यांची संमति मिळविण्याचें जें कार्य आज अगदीं अशक्य दिसतें तेंच मी शक्य करून दाखवीन. वुइल्यम! तुला याबद्दल कांहीं संशय वाटतो काय ? कॅप्टन लेनॉक्सचा माझ्याशीं कदाचित् विवाह होईल या भीतीनें त्याच्या काल्पनिक भाग्याबद्दल तुला हेवा वाटतो काय ? ”

“ लिली! तुझ्या शब्दाची किंमत मी आकाशवाणीहूनही अधिक समजतों. एखादें कार्य प्रत्यक्ष घडत असतांना पाहिलें तरी माझा त्यावर विश्वास बसणार नाहीं; पण माझ्या लिलीनें उच्चारलेल्या स्वप्नांतील शब्दांवरही माझा पूर्ण विश्वास बसेल. लिली! तूं माझी झालीस असें मला सांगितलेंस तेव्हांच स्वतःचें जीवन धन्य झालें अशी माझी पक्की समजूत झाली. तुझ्या पित्याचा निर्धार किंवा कॅप्टन् लेनॉक्सचें शौर्य आपल्या भावी सौख्याच्या आड येणार नाहीं. आतां आपणांस वैवाहिक सौख्याचा लाभ घेण्यास कांहीं अवधि लागेल, पण मला त्याची लेशमात्रही चिंता वाटत नाहीं. एक जन्मच काय, पण सात जन्मपर्यंत लिलीची प्राप्ति होण्याकरितां तपश्चर्या करावी इतका लिलीचा लाभ अलभ्य आहे. तो केवळ वर्ष सहा महिन्यांत आपणास होणार याबद्दल चिंता करण्यापेक्षां मीं आनंदच मानिला पाहिजे. तुझ्यासारख्या स्वर्गीय अप्सरेची प्राप्ति सहजासहजीं होत नसते. तुझी प्राप्ति करून घेण्यास मी योग्य आहें असें दर्शविण्याकरितां मी रात्रंदिवस गुलामाप्रमाणें झटेन. कायद्याच्या उच्च परीक्षा देईन. पार्लमेंटचा मेंबर होण्याचा यत्न करून त्यांत यश संपादन करीन. आणि हा वुइल्यम स्वतःस केवळ पुस्तकांत गाडून घेणारा नसून कर्तबगारीचा पुरुष आहे अशी सर्वांबरोबर तुझ्या पित्याची खात्री करून देईन. आपले परलोकवासी राजे सातवे एडवर्ड यांची शांततेचे जनक ह्मणून मोठी ख्याति होती. तेंच उदात्त कार्य मी तडीस नेईन. युद्धावर मोहीम करून, यापुढें जगांत युद्ध होऊं नये, अशीं सर्व लोकांचीं मनें तयार करीन.

युद्ध रानटी लोकांकरितां आहे, युद्ध हा शब्दच सुधारलेल्या राष्ट्रांनीं उच्चारण्याच्या योग्यतेचा नाहीं असें प्रत्येकास वाटूं लागेल, तेव्हांच माझ्या कर्तव्याची समाप्ति होईल. लिली! त्याच्या दरम्यान तूं माझ्याविषयीं आपल्या पित्याचें मन तयार कर. जितक्या लवकर लिली माझ्याशीं विवाहमांगल्यानें बद्ध होईल तितक्या लवकर मी स्वर्गसुख भोगूं लागेन. लिली, तूं माझा प्राण आहेस. तूं माझें सुखसर्वस्व आहेस. तुझ्या समागमानें मला माझें कर्तव्य बजावण्यास अत्यंत स्फूर्ति येणार आहे. हे स्फूर्तिदेवते! जेणेंकरून तुझा पवित्र समागम मला लौकर प्राप्त होईल आणि मला आपलें कर्तव्य बजावण्यास दुप्पट जोर येईल असें कर. विवाहमांगल्यानें तूं माझी होईतोंपर्यंत माझें कर्तव्य बजावण्यास तुझ्या अधरामृताचा एक घुटकाच मला प्रचंड सामर्थ्य देईल." असें ह्मणून वुइल्यमनें लिलीचें सप्रेम चुंबन घेतलें. त्या वेळीं पश्चिमा सुंदरीचा कपोलभाग अंशुमालीच्या चुंबनामुळें लाल झाला होता.



# प्रकरण ४ थें.

—:o:—

## मी लौकरच युद्ध करणार आहें !



वुइल्यम आपल्या घराकडे परत येण्यास निघाला तेव्हां निरभ्र आकाशांत रजनीनाथ प्रकाशत होता. रजनीनाथाच्या स्वैर विहाराच्या आड अभ्रपटलांनीं येऊं नये अशी तजवीज झालेली दिसत होती. वुइल्यम आपल्या भावी आयुष्याचें चिंतन करूं लागला. डोक्यावरील निरभ्र आकाशाप्रमाणें आपलें भावी आयुष्यही संपूर्णपणें निष्कलंक राहणार, त्यावर संकटाची किंवा दुःखाची लेशमात्रही छाया पडणार नाहीं; तारागणांच्या संगतींत विहार करणारा तारानाथ ज्याप्रमाणें आनंदानें व्योमभागीं विहार करीत आहे त्याप्रमाणेंच आपण लिलीच्या समवेत आयुष्यभर सुखानें कालक्रमणा करणार असें त्यास वाटूं लागलें. स्वर्गीय रजनीनाथ जें सुख उपभोगतो तें केवळ लिलीच्या प्रेमामुळें आपणास इहलोकींच उपभोगण्यास मिळणार; खरोखर लिली स्वर्गीय सद्गुणांचें निधान आहे; स्वर्गीय पावित्र्याचें निवासस्थान आहे; नाहींतर आपणास प्राप्त होणाऱ्या वैभवावर लाथ मारून तिनें केवळ प्रणयाकरितां माझ्यासारख्या विद्या हेंच धन मानणाऱ्या मध्यम स्थितींतील तरुणाचा स्वीकार केला नसता. असे विचार वुइल्यमच्या मनांत चालले होते. त्याचा आजचा आनंद अवर्णनीय होता. सबंध कॉर्नवॉल प्रांतांत आज त्याच्याइतका सुखी प्राणी दुसरा कोणी असेल किंवा नाहीं याची शंकाच होती. लिलीनें

आपली पत्नी होण्याचें कबूल केलें; तिचें आपणावर अमर्याद प्रेम आहे; तिच्या प्रेमाचा मधुर आस्वाद घेण्याचें भाग्य आपल्या एकट्याचें आहे; तिनें आपणावरील प्रेमाकरितां स्वतःस प्राप्त होणाऱ्या श्रीमंतीचा व मोठेपणाचा यज्ञ करण्याचा निर्धार केला आहे; या सुखमय विचारांत वुइल्यम इतका तल्लीन होऊन गेला कीं आपण आपल्या घराजवळ केव्हां येऊन पोंचलों याचें त्यास ज्ञानही झालें नाहीं.

वुइल्यमची विचारशृंखला वाढत वाढत, आपण युद्धावर मोहीम करून खऱ्या शांततेचा प्रसार करणार येथपर्यंत गेली. त्याला एकदम स्वतःच्या पित्याच्या शब्दांची आठवण झाली. युद्धशास्त्राचा नायनाट करून युद्ध म्हणजे एक किळसवाणें व्यसन आहे अशी सर्वत्र समजूत करण्याचा आपल्या पित्याचा विचार पूर्णपणें तडीस गेला नाहीं तो आपण नेणार, आपल्या पित्याच्या सिद्धांतांची पूर्तता आपण करणार, असें वाटून त्यास स्वतःच्या हिंमतीबद्दल अभिमान वाटूं लागला. जगाचें कायमचें कल्याण करणारें अलौकिक कृत्य आतां आपल्या हातून घडून येणार, असें वाटल्यावर त्याला स्वतःबद्दल अभिमान कां वाटूं नये? आपल्या हातून जें उदात्त कृत्य घडून येणार त्याचें बीजारोपण आपल्या मनांत आपल्या पित्यानेंच केलें, त्याच्याच उपदेशामृताच्या जोरावर आपण एवढें जबाबदारीचें कृत्य अंगावर घेण्यास तयार झालों असा विचार त्याच्या मनांत आला; त्याबरोबर त्याला आपल्या पित्याची आठवण झाली. आपण आपल्या घराजवळ येऊन पोंचलों आहोंत हें लागलीच त्याच्या लक्षांत आलें. गडबडीनें तो आपला घोडा बांधून आपल्या घरांतील वाचनालयांत गेला. तेव्हां "युद्धावरील मोहीम" हे शब्द तो स्वतःशीं गुणगुणत होता.

वुइल्यमच्या अंगांत त्याच्या आईचें रक्त अंशतः खेळत होतें. त्याच्या आईनें ज्या घराण्यांत जन्म घेतला होता त्या घराण्याची शौर्याबद्दल मोठी ख्याति होती. अर्थात् वुइल्यमच्या अंगांत युद्धप्रियता थोड्याबहुत प्रमाणानें भिनली होती. परंतु त्याच्या मनावर त्याच्या पित्याच्या उपदेशाचा व त्याच्या पश्चात् डॉ. रेंथॉल यांच्या उपदेशाचा अखंड वर्षाव होत असल्यामुळें त्याच्या अंगांतील युद्धप्रियतेचें तेज छपून राहिलें होतें—अंशतः

तें दबलें होतें-तें कोणत्याना कोणत्या मार्गानें बाहेर पडण्यास स्थान पहात होतें. आज त्यास उत्तम अवकाश मिळाला. युद्धावरच मोहीम करून आपल्या अंगांतील युद्धप्रियतेची रग जिरवून घेण्याचा विचार त्यानें केला. प्रत्यक्ष युद्ध किती भयंकर ! त्याच्याशींच सामना देण्याचा विचार वुइल्यमनें केला. युद्धाशीं सामना म्हणजे स्वतःच्या पराक्रमाची, शौर्याची व चिकाटीची पराकाष्ठा करणें होय असें त्यास वाटलें.

ऑक्सफर्ड येथील विद्यालयांत अभ्यास करीत असतांना व तेथील पुस्तकालयें पालथीं उलथीं करीत असतांना वुइल्यमला पुष्कळदां चुकल्या चुकल्यासारखें वाटत असे. तसें कां वाटत असे याचा त्यास आज उलगडा झाला. पुस्तकें वाचून किंवा ग्रंथ लिहून आपल्या पित्यानें आखलेल्या कार्यांत यशःप्राप्ति होणार नसून अद्वितीय उत्साहानें, अलौकिक सामर्थ्यानें आणि अविश्रांत चिकाटीनें सामना देण्यास आपण तयार झालें पाहिजे. युद्ध आणि त्याची भगत मंडळी यांनाच युद्धास आव्हान करून आपण यश संपादन केलें पाहिजे असें त्यास वाटूं लागलें.

परंतु यामुळें त्यास केवढा तरी आनंद झाला. जगन्नियंत्यानें उपदेशिलेल्या उदात्त तत्त्वांची सांगोपांग ओळख आपण सर्वांस करून देणार आहोंत; शांततेची सावली जगन्नियंत्याच्या बालकांना कायमची आणि निश्चित लाभावी म्हणून आपण युद्धासच सामना देण्यास तयार झालों आहोंत. युद्धास स्फूर्ति देणारीं पिशाच्चें, युद्धाचें महत्त्व गाणारे असुर, युद्धांत आनंद मानणारे राक्षस यांचा आतां आपण फन्ना उडविणार असून मनुष्यमात्राचें तारण आपण करणार आहोंत; आतां यापुढें कोणताही जबरदस्त कर माझ्या विश्वबांधवांची मान खालीं वांकविणार नाहीं, यापुढें कोणताही आपात माझ्या विश्वबांधवांच्या नेत्रांतून दुःखाश्रु काढणार नाहीं; जनतेच्या नेत्रांतून अश्रु निघतील, पण ते युद्धांत अकालीं मेलेल्या तरुणांकरितां नसून आपण शांततेचें खरें सुख अनुभवणार या आनंदामुळें निघतील; आणि या सर्वांस कारण हे माझे प्रियतम बाबा ! ”

असें म्हणून वुइल्यमनें आपल्या समोरील डॉ० लिटन यांच्या सुंदर छायाचित्राकडे पाहिलें. तो स्वगत म्हणाला—

" बाबा! प्रियतम बाबा! तुह्मी जगावर केवढा उपकार करून गेलांत!"

नानाविध ग्रंथांनीं पूर्णपणें भरलेलें तें वाचनालय! त्या ग्रंथाचा जन्मभर आस्वाद घेणाऱ्या डॉ० लिटनचा गंभीर परंतु सहास्य वदनाचा अग्रभागीं शोभणारा फोटो! आणि त्या फोटोकडे एकाग्र दृष्टीनें पाहणारा वुइल्यम! हें चित्र रजनीनाथासही इतकें मोहनीय वाटलें कीं, त्यानेंही क्षणमात्र थांबून त्या वाचनालयांत डोकावून पाहण्यास कमी केलें नाहीं.

पित्याच्या सहास्य वदनाकडे पहात असतां ते आपणाकडे पाहून स्मित करीत आहेत असा वुइल्यमला भास झाला. तेव्हां वुइल्यम ह्मणाला—

" बाबा! तुह्मीं अंतर्ज्ञानानें माझ्या मनांतील निश्चय खात्रीनें जाणला; तसें नसतें तर तुमच्या मुखावर संमतिदर्शक हास्य दिसलें नसतें. "

आणखी कांहीं काळ पित्याच्या मुद्रेकडे पाहून वुइल्यम जवळच्या एका खुर्चीवर जाऊन बसला आणि " बोअर युद्धासंबंधीं कांहीं विचार " हें डॉ० लिटन यांनीं लिहिलेलें पुस्तक वाचण्याचा प्रयत्न करूं लागला. पण प्रत्येक पानावर लिलीच्या सुंदर वदनाचें चित्र रेखाटलें आहे असा त्यास भास होऊं लागला. तेव्हां तें पुस्तक बाजूस ठेवून हृदयांत सांठविलेली प्रतिमा आपल्या मनश्चक्षूपुढें धरून तो तिचें चिंतन करूं लागला. हळू हळू त्याचे नेत्र झाकले. तो लिलीची काल्पनिक प्रतिमा पाहण्यांत इतका तल्लीन होऊन गेला कीं, लिली आपल्या जवळच बसली असून स्मित करीत आहे असा त्यास भास झाला. तो भास त्यानें आपले नेत्र उघडले तरी नाहींसा झाला नाहीं.

डोळे उघडतांच वुइल्यमला आपल्या पित्याचें चित्र दिसलें. त्याच्याकडे पहात तो ह्मणाला—

" बाबा! माझ्या मनांत उदात्त विचारांची प्रेरणा करणारी आणि माझ्या वृत्तीस कर्तबगारीचें वळण देणारी हीच ती सौंदर्यदेवता. लिली, जा! बाबांकडे जा! आणि त्यांच्या आशीर्वादाचा स्वीकार कर. बाबा! ही सौंदर्यलतिका म्हणजे माझा प्राण आहे. ही माझ्या सौख्याचें केंद्र आहे. इच्याच प्रभावानें युद्धाशीं सामना देण्यास मी तयार झालों आहें.

बाबा ! आमच्या विवाहास अनुमति देऊन आह्मांस सौख्यलाभ होईल असा आशीर्वाद द्या."

कल्पना आणि सत्यता, प्रतिकृति आणि खरेपणा यांच्या जाळ्यांत सांपडलेला वुइल्यम, आपला पिता जिवंत असून आपणाकडे पहात आहे असें मानूं लागला. त्याच्या कल्पनेनें डॉ. लिटन पुनरपि हास्य करीत आहेत असें त्याच्या मनास सुचविलें. तेव्हां तो ह्मणाला—

" बाबा ! तुह्मी बोलत नाहीं. पण तुह्मांस आमचा भावी विवाह संमत आहे असें तुमच्या हास्यावरून स्पष्ट दिसत आहे. प्रियतम लिलीशीं लग्न करून तिच्या समागमांत माझें आयुष्य सुखानें जावो असें तुह्मी आपल्या प्रसन्न वदनावरून ध्वनित करीत आहांत. येतों; मी आतां तुमची रजा घेतों. तुमच्या उपदेशाचें योग्य चीज झालें असें मी लौकरच तुमच्या प्रत्ययास आणून देईन." असें ह्मणून आपल्या पित्याशीं संभाषण करूनच आपण बाहेर पडत आहोंत अशा आविर्भावानें वुइल्यम बाहेर पडणार, तोंच " कोण ? वुइल्यम ! " असा मंजुळ शब्दनाद त्याच्या कानावर पडला.

वुइल्यम कल्पनासृष्टींतून एकदम जागा झाला. तो आपल्यासमोर पहातो तों आपली मातुःश्री उभी आहे असें त्यास दिसलें. तेव्हां विकृत मनःस्थितीची आवराआवर करून तो गडबडीनें ह्मणाला—

" आई ! तूं केव्हांच झोंपीं गेली असशील असें मला वाटलें होतें."

" माझें बाळ परत आलें नसतां मला शांतपणें कशी झोंप लागेल ? मी तुझी वाट पहात बसलें होतें. तूं आल्याबरोबर वाचनालयांतच जाशील असें मला वाटलें नाहीं. तूं येथें केव्हां आलास ? "

" मला येऊन बराच वेळ झाला. तूं झोंपीं गेली असशील असें वाटून मीं अधिक विचारपूस केली नाहीं."

" येथें तूं काय करीत होतास ? " आपल्या पुत्रास कुरवाळीत मातेनें विचारिलें.

" विचार करीत होतों."

" विचार करीत होतास ? इतक्या मोठ्यानें विचार करीत होतास ! "

" होय ! "

" कसला विचार करीत होतास ? "

" बाबांसंबंधाचा विचार करीत होतों. "

यावर वुइल्यमची आई कांहीं बोलली नाहीं. तिचे डोळे मात्र पाण्यानें भरून आले. परंतु तें तिनें वुइल्यमच्या लक्षांतही येऊं दिलें नाहीं.

कांहीं वेळानें वुइल्यम ह्मणाला—" आई ! तुला एक गोष्ट सांगावयाची आहे. पण तूं ती अगदीं गुप्त ठेविली पाहिजे. "

" तुझी इच्छाच असेल तर मी अवाक्षरही बाहेर फोडणार नाहीं. बोल, तुला जें कांहीं सांगावयाचें असेल तें निश्चितपणें सांग. "

कांहीं वेळ विचार करून वुइल्यम ह्मणाला—" ॲडमिरल नेल्सनची कन्या लिली माझी पत्नी होणार. "

" काय ? "

" लिलीनें माझी पत्नी होण्याचें कबूल केलें आहे. आई, तुला हा संबंध अनिष्ट वाटतो काय ? "

" ॲडमिरलची लिली तुझी बायको होईल अशी मला कल्पनाही नव्हती. तूं ह्मणतोस तें खरेंच ना ! "

" अगदीं खरें. निःसंशय खरें, " वुइल्यम ह्मणाला.

" वुइल्यम ! या सबंध कॉर्नवॉल प्रांतांत लिलीसारखी सद्गुणी आणि सुंदर पोर नाहीं. किती गोड स्वभावाची आणि मर्यादशील वर्तनाची ती मुलगी आहे ! आणि ती माझ्या वुइल्यमची पत्नी होणार ? माझ्या आनंदास आतां पारावार उरला नाहीं. या वेळीं तुझा पिता हयात असता तर त्यानें आपल्या सूनबाईस कोठें ठेवूं आणि कोठें नाहीं असें केलें असतें. "

" मी आतां तेंच बाबांस सांगत होतों, " वुइल्यम ह्मणाला. " त्यांनीं आमच्या विवाहास आपली पूर्ण अनुमति दिली आहे. त्यांचा आशीर्वाद घेऊनच मी आतां बाहेर पडत होतों. "

वुइल्यमचे शब्द ऐकतांच त्याच्या मातुःश्रीच्या नेत्रांस पुनः पाणी आलें. तें पुसत ती ह्मणाली—

" बाळा ! वुइल्यम ! तुझें नशीब थोर ह्मणून अशी सद्गुणी व सुंदर पत्नी तुला लाभली. तुह्मां उभयतांचें आयुष्य अत्यंत सुखांत जावो अशी परमेश्वराजवळ अहर्निश याचना करणें हेंच माझें आतां कर्तव्य उरलें आहे. बरें, पण तुमच्या विवाहास ॲडमिरल नेल्सन यांची कशी संमति मिळणार ? कॅप्टन लेनॉक्सला लिली द्यावयाची असा ॲडमिरलचा निश्चय असल्याचें मी ऐकत होतें. "

यावर वुइल्यमनें, आपण यापुढील आयुष्य कसें काढणार, पार्लमेंट-मध्यें आपण कसा प्रवेश करून घेणार व आपणासंबंधानें ॲडमिरलचें मन कसें प्रसन्न करणार हें सविस्तरपणें आपल्या मातुःश्रीस सांगितलें. तो शेवटीं हंसत ह्मणाला—" आई, मी लौकरच युद्ध करणार आहें. "

" युद्ध ! कोणाशीं युद्ध ? "

" युद्धाशींच सामना देण्याचा माझा विचार आहे, " असें ह्मणून वुइल्यमनें हंसत हंसत आपल्या मातेची रजा घेतली.

त्या रात्रीं वुइल्यमचीं सुखस्वप्नें लिलीच्या प्रेमानें मिश्रित झालीं होतीं. मधून मधून तो आपल्या शांततेच्या सामन्याचाही स्वाद घेत होता. युरोपखंडांत नांदणाऱ्या शांततेचा थोड्याच काळांत कसा विध्वंस होणार होता याची बिचाऱ्याला कल्पनाही नव्हती !

# प्रकरण ५ वें.

—:o:—

## गॉल्फ खेळ.

त्यानंतर कांहीं दिवसपर्यंत वुइल्यम लिटन सुखमय मनःस्थितींत होता—प्रेमाचें पवित्र व स्वर्गीय सौख्य तो अनुभवीत होता. लिलीची व त्याची एकांतांत विशेषतः भेट होत नसली तरी कांहीं ना कांहीं कारण काढून तो दररोज मूनलाइट पॅलेसकडे जाई. ॲडमिरल नेल्सनही त्याचें अंतर्गत ठाऊक नसल्यामुळें त्याचें मोठ्या प्रेमानें स्वागत करीत. जवळ जवळ वुइल्यमच्याच वयाचे लिलीला दोन बंधु होते. त्यांपैकीं डिक हा कांहीं दिवस वुइल्यम शिकत होता त्याच कॉलेजांत असल्यामुळें त्या दोघांची चांगली मैत्री होती. अलीकडे वुइल्यमनें टेनिसविषयीं अमर्याद प्रेम एकाएकीं व्यक्त केल्यामुळें तर त्याच्यावर डिकची विशेषच भक्ति जडली. कॅप्टन लेनॉक्स हा गॉल्फ* खेळण्यांत अत्यंत प्रवीण होता. त्याच्याशीं सामना करण्याचें धाष्ट्र्य करून वुइल्यमनें त्याला आव्हान केलें; यामुळें नेल्सनसाहेबांचेंही त्याच्यावर प्रेम जडलें.

"वुइल्यम, तूं कोणाला आव्हान करीत आहेस याचा आधीं नीट विचार कर!" कॅप्टन लेनॉक्स तिरस्कारव्यंजक स्वरांत उद्गारला. आ-

---

*हा खेळ दूर दूर अंतरावर भोंकें पाडून ठेविलेल्या मैदानांत खेळतात. शक्य तितक्या कमी टोल्यांनीं चेंडू त्या भोंकांत घालवावयाचा असतो.

तांशा लिली त्याच्याशीं पूर्वीप्रमाणें प्रेमळ मनानें वागेनाशी झाली होती; व तिचा वुइल्यमकडे असलेला विलक्षण ओढा पाहून लेनॉक्सला त्याचा हेवा वाटूं लागला होता.

डिक मध्येंच ओरडून ह्मणाला, " वुइल्यम, दुसरी एक गोष्ट तूं लक्षांत ठेविली पाहिजे. या सामन्यांत ज्याचा पराजय होईल त्यानें आपल्या क्लबच्या सभासदांना मेजवानी दिली पाहिजे. "

लागलीच समुद्रकांठावरील मैदानाकडे मंडळी निघाली. लिलीही प्रेक्षकसमूहांत होती. नेल्सनसाहेब तर सर्वांचे प्रमुख होते. त्यांना असल्या खेळांचा मनस्वी नाद होता.

खेळास प्रारंभ झाला. आरंभीं लेनॉक्सला दैव अनुकूल होतें. त्याची सरशी होणार अशीं उघड उघड चिन्हें दिसूं लागलीं. पण कांहीं वेळानें यशाचें पारडें फिरलें, व वुइल्यमचे टोले अशाच सुंदर रीतीनें बसत गेले तर तो कदाचित् यशस्वी होईल असें दिसूं लागलें. वुइल्यम अगदीं कसून खेळत होता; या सामन्यांत यश आलें तरच आपल्या संपूर्ण आयुष्यक्रमांत यश येणार अशी त्याची भावना झाली होती. लिलीचेंही इतका वेळ खिन्न असलेलें मन प्रफुल्लित झालें होतें.

प्रेक्षकसमूहांत एक चष्मा घातलेला संभावित मुद्रेचा मनुष्य होता. त्याचा आणि तेथील मंडळीचा परिचय नसूनही वुइल्यमच्या खेळण्यानें तो अगदीं खूष झाल्यासारखा दिसला. तो मोठ्यानें ह्मणालाः—

" मीं गॉल्फ खेळ खेळण्यांत अत्यंत नांवाजलेल्या लोकांना खेळतांना पाहिलें आहे; पण या गृहस्थांनीं आतां जो टोला लगावला तशा प्रकारचा टोला मीं आजन्मांत पाहिला नाहीं. "

कॅप्टन लेनॉक्सला ही स्तुति असह्य होऊन तो उद्गारला, " रावसाहेब, मी बोलतों त्याचें आपणांस वाईट वाटण्याचा संभव आहे; पण नाइलाजास्तव मला सुचवावें लागत आहे. अशा तऱ्हेच्या प्रशंसोद्गारांनीं खेळांत मोठा व्यत्यय येतो हें इतक्या दिवसांच्या प्रेक्षक या नात्यानें मिळविलेल्या अनुभवामुळें आपणांस समजावयास पाहिजे होतें. "

त्या तिऱ्हाईत गृहस्थानें नम्रपणानें म्हटलें, " माफ करा. तुमच्या

खेळांत व्यत्यय आणण्याची माझी बिलकूल इच्छा नव्हती. पुनः मी आपणाला त्रास होईल असें भाषण करणार नाहीं. आपणांला तर माझ्या बोलण्यानें त्रास झाला नाहींना ? " तो वुइल्यमकडे वळून ह्मणाला.

" मुळींच नाहीं, " वुइल्यमनें उत्तर केलें.

थोड्या वेळानें खेळ संपला. वुइल्यमला यश मिळालें.

" वुइल्यमची सरशी झाली त्या अर्थीं कॅप्टन लेनॉक्स यानें आह्मांस मेजवानी दिली पाहिजे, " नेल्सनसाहेब आनंदानें उद्गारले. " वुइल्यम, तूं फार छान खेळलास. मी तुझें मनापासून अभिनंदन करतों. "

" वुइल्यम फारच उत्तम खेळला, " आपली निराशा बिलकूल दिसूं न देतां कॅप्टन लेनॉक्स ह्मणाला.

" माफ करा, " पूर्वींचा संभावित इसम पुनः आपल्या मोडक्या-तोडक्या इंग्लिश भाषेंत उद्गारला, " मीही आपलें अभिनंदन करण्याचें धारिष्ट करीत आहें. मी इंग्लिश नाहीं ही गोष्ट खरी; पण आपल्या राष्ट्रांमधील स्नेहभावाचा फायदा घेऊन आपला परिचय करून घेण्याचा मी यत्न करीत आहें. आपल्या खेळण्यानें मी अगदीं आश्चर्यचकित झालों. आपण फारच छान खेळतां. "

त्या इसमानें आपल्या नांवाचें कार्ड वुइल्यमच्या हातांत दिलें.

" सरदार वीमर, " कार्डावरील नांव पाहून वुइल्यम ह्मणाला, " मी आपले आभार मानितों. "

" माझा व तुमचा परिचय नसून मीं बोलण्याचें साहस केलें याबद्दल क्षमा करा, " सरदारसाहेब पुढें बोलूं लागले; " पण मला रहावेचना. मीं इतकें नामी खेळणें कधींच पाहिलें नव्हतें. मी जरी जर्मन असलों तरी मी अल्सेस प्रांतांतील रहिवासी आहें; तुमच्या देशावर माझें अत्यंत प्रेम आहे. " इतकें बोलून तो तेथून निघून गेला.

" तो इसम कोण आहे ? " डिकनें प्रश्न केला.

" माझी आणि त्याची तरी कोठें ओळख आहे ? बाकी तो सज्जन मनुष्य दिसतो यांत शंका नाहीं, " वुइल्यमनें उत्तर दिलें.

" त्याचें नांव काय ? " नेल्सनसाहेबांनीं विचारिलें.

" सरदार वीमर, व्हिलर बंगला, अल्सेस; कॉंटिनेंटल् क्लब, लंडन, " वुइल्यमनें कार्डावरील मजकूर वाचिला.

" वीमर हें नांव मला आवडतें, " नेल्सनसाहेब उद्गारले; " आणि कॉंटिनेंटल् क्लबही बऱ्यापैकीं आहे. पुनः त्याची भेट झाली तर मी त्याचा परिचय करून घेईन. बरें, कॅप्टन लेनॉक्स, मेजवानीच्या तयारीला लाग. वुइल्यमनें तुजवर विजय मिळवला खरा ! "

" वुइल्यम, मला किती आनंद झाला ह्मणून सांगूं ! " थोडासा एकांत मिळतांच लिली ह्मणाली. " तूं कॅप्टन लेनॉक्सला जिंकलेंस हें फार छान झालें. "

" मलाहि तसेंच वाटतें, " वुइल्यम ह्मणाला. " पण या क्षुद्र खेळा-पेक्षां अधिक महत्त्वाच्या गोष्टी माझ्या मनांत घोळत आहेत. "

" वुइल्यम, या युद्धभूमीवर तुझा विजय झाला ही गोष्ट खरी; पण दुसऱ्या एका युद्धभूमीवर माझी सरशी होणार आहे. " कॅप्टन लेनॉक्स कांहीं वेळानें ह्मणाला.



# प्रकरण ६ वें.

## मी सैन्यांत दाखल होणार नाहीं !

मेजवानीच्या प्रसंगीं वुइल्यम अगदीं आनंदी वृत्तींत होता. लिलीचें मुखकमलही हास्ययुक्त होतें. नेल्सनसाहेबांची तर वुइल्यमवर बहाल मर्जी होती.

" वुइल्यम ! " नेल्सनसाहेब पुनः उद्गारले, " तूं खरोखरच आज मोठें यश संपादन केलेंस. तूं पार्लमेंटमध्यें जाणार असें मीं ऐकिलें आहे. "

वुइल्यम—" असा माझा विचार आहे खरा. "

नेल्सनसाहेब—" तुला खात्रीनें तेथेंही यश मिळेल. पुस्तकांचा नाद तूं सोडून देणार हें पाहून मला आनंद वाटतो बाकी तुझ्या पुस्तकी ज्ञानाचा तुला पार्लमेंटमध्यें चांगला उपयोग होईल. पण सध्यां देशाला कर्तबगारीच्या माणसांची मोठी आवश्यकता आहे. "

वुइल्यम—" माझा कर्तबगारी करून दाखविण्याचाच विचार आहे. "

नेल्सन—" तुझ्या हातून मोठालीं कृत्यें घडण्याचा पुष्कळ संभव आहे. रोजरनें पार्लमेंटमध्यें प्रसिद्धीस यावें अशी माझी फार इच्छा होती. पण दुर्दैवानें बोअर युद्धांत तो मारला गेला. आपण सध्यां शांततासुख अनुभवीत आहोंत, ही ईश्वराची कृपाच समजावयाची ! तूं उद्यां सायंकाळीं आमच्या येथें पुनः येणार ना ? येतांना आईलाही घेऊन ये. "

" होय. "

" वुइल्यम ! " लिली ह्मणाली, " आजच्या या अल्प यशानें तूं बाबांना जितकें खूष केलेंस तितकें दहा फेलोशिप्स् मिळवूनही तुला करतां आलें नसतें. उद्यां लवकर ये. "

वुइल्यम आपल्या निवासस्थानाकडे पायींच येत होता. त्याच्या आनंदाला पारावारच नव्हता, आणि त्यांत आश्चर्य तरी कसलें ? तो तरुण असून उत्साही होता; एका अत्यंत लावण्यवती तरुणीचें निस्सीम प्रेम त्याच्यावर सर्वस्वीं जडलें होतें, आणि त्याचा भावी आयुष्यक्रम अत्यत उज्ज्वल दिसत होता.

रस्त्यांत सरदार वीमरची व त्याची भेट झाली.

" वुइल्यम लिटन ! " सरदार वीमर उद्गारला, " इतक्या लौकर पुनः आपली भेट होईल असें मला वाटलें नव्हतें. "

असें ह्मणून तो वुइल्यमबरोबर चालूं लागला.

वुइल्यम—" तुह्मी आमच्या या सेंट जॉन गांवांत नवखेच दिसतां. "

वीमर—" होय. या गांवासभोंवतालच्या सृष्टिसौंदर्यानें मला वेडेंच करून सोडलें आहे. मला शांतता फार आवडते. "

वुइल्यम—" मग तुह्मांला युद्धाचा मनस्वी कंटाळा असला पाहिजे."

वीमर—" यांत काय संशय ! माझी परिस्थिति मोठी चमत्कारिक आहे. माझें नांव जरी जर्मन असलें तरी आईच्या बाजूनें मी फ्रेंच आहें. आणि माझें फ्रान्सवर अत्यंत प्रेम आहे. मी अल्सेस प्रांतांत राहतों. अल्सेस प्रांत मूळचा फ्रान्स देशांतील असून सध्यां तो जर्मन राज्याखालीं आहे हें तुम्हांस ठाऊक असेलच. मला जर्मनीचा मनस्वी द्वेष वाटतो— जर्मनीच्या लष्करी राज्यपद्धतीचा मला मनापासून तिटकारा आहे. जर्मन सरकारला माझ्या राजनिष्ठेबद्दल संशय वाटत असल्याकारणानें मीं इंग्लंडांत येऊन राहण्याचें ठरविलें आहे. "

वुइल्यम—" तुह्मांला आमचा देश एकंदरींत आवडतो तर ! "

वीमर—" तुमचा देश कोणाला आवडणार नाहीं ? स्वातंत्र्य, शांतता बंधुप्रेम आणि विश्वबंधुत्व या व असल्या उदात्त विचारांच्या बाबतींत

इंग्लंडनें जगभर प्रसिद्धि मिळविली आहे. तुमच्या त्या मूनलाईट पॅलेस-पासून थोड्या अंतरावर एक सुंदर बंगला आहे. तो विकत अथवा भाड्यानें घेण्याचा माझा विचार आहे."

वुइल्यम—" तो नेल्सनसाहेबांचाच आहे."

वीमर—" काल खेळाच्या मैदानावर होते ते सद्गृस्थ नेल्सनसाहेबच ना ? किती सज्जन मनुष्य आहे ! तुह्मां इंग्लिश लोकांचा तो उत्कृष्ट मासला आहे."

वुइल्यम—" तुह्मांला ते तो बंगला मोठ्या खुषीनें देतील."

वीमर—" ठीक आहे, मी त्यांना एकदां स्वतःच भेटेन. ते आरमार खात्यांत आहेत नाहीं ?"

वुइल्यम—" अलीकडे त्यांनीं पेन्शन घेतलें आहे; पण अद्याप त्यांचें आरमार खात्यांत मोठें वजन आहे."

वीमर—" पण मला या लष्करी खात्याचा फार तिटकारा आहे. मला युद्धाची कल्पना सुद्धां करवत नाहीं. पण लवकरच युद्धाला प्रारंभ होई-लसें दिसतें."

वुइल्यम—" कां ? या परवांच्या सर्व्हियन प्रकरणामुळें का ?"

वीमर—" होय. आस्ट्रियाचें व सर्व्हियाचें भांडण सुलभपणें मिटेल असें मला आरंभीं वाटलें होतें; पण जर्मनीच्या जोरावर आस्ट्रियानें फारच चमत्कारिक अटी घातल्या आहेत. शिवाय रशिया सर्व्हियाचा पक्ष घेणार अशींही चिन्हें दिसूं लागलीं आहेत."

वुइल्यम—" मग ?"

वीमर—" मग काय ? रशियानें सर्व्हियाचा पक्ष घेतला म्हणजे अर्थातच जर्मनी आस्ट्रियाची बाजू उचलणार ! एवढ्यावर गोष्ट थांबेल असें दिसत नाहीं. मला प्रिय असलेलें राष्ट्र—फ्रान्सही युद्धांत पडणार ! तुह्मांला मात्र भिण्याचें कारण नाहीं. तुमचें इंग्लंड, जर्मनी व इंग्लंड यांमध्यें असलेल्या स्नेहभावाच्या तहाला चिकटून राहील. तें युद्धांत सामील होणार नाहीं."

वुइल्यम—"मलाही तसेंच वाटतें. आमचें राष्ट्र युद्ध-प्रिय नाहीं. आमचें खडें सैन्य अल्प असून तें तसेंच अल्प राहील असा मला भरंवसा वाटतो."

वीमर—" मोठें सैन्य म्हटलें कीं युद्ध आलेंच—आणि युद्धाबरोबर संकटपरंपरा ओढवलीच ! बरें, त्या घरासंबंधानें काय मग ?"

वुइल्यम—" मी उद्यां नेल्सनसाहेबांजवळ त्यासंबंधानें गोष्ट काढतों. मग तुह्मी त्यांना जाऊन भेटा."

" ठीक आहे. मी आतां आपला निरोप घेतों," असें म्हणून वीमर निघून गेला.

दिवसेंदिवस अधिकाधिक भयंकर बातम्या येऊं लागल्या. जुलैच्या मध्यास आस्ट्रिया व सर्व्हिया यांच्यामधील तंटा सुलभपणें मिटण्याचीं चिन्हें दिसत होतीं; सर्व्हियानें गुन्हेगारांना यथायोग्य शासन देण्याचें अभिवचन आस्ट्रियास दिलें होतें. पण जुलैच्या २४ तारखेस असमाधानकारक वार्ता कानावर आली. आस्ट्रियानें अत्यंत फाजीलपणाच्या अटी घातल्याचें वर्तमान समजलें. कोणाही स्वाभिमानयुक्त राष्ट्राला त्या अटी मान्य करणें शक्य नव्हतें.

जुलैच्या २५ तारखेस व्हिएना येथील एका स्नेह्याचें नेल्सनसाहेबांस पत्र आलें. त्यांत पुढील मजकूर होताः—

" परिस्थिति दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. आस्ट्रियाच्या मनांतून सर्व्हियाला फारसा त्रास द्यावयाचा नव्हता. पण जर्मनीची आस्ट्रियाला फूस मिळाल्यामुळें एकंदर प्रकार उलट झाला. कैसरच्या सांगण्यावरून आस्ट्रियानें भलत्याच अटी घातल्या आहेत. कैसरचें मनोगत जाणणें शक्य नाहीं. पण त्यानें आज कित्येक वर्षे चालविलेल्या अविश्रांत प्रयत्नांमुळें जर्मनीचें लष्कर व आरमार अत्यंत पूर्णदशेस पोंचलें असून, सर्व जगांत जर्मनीच्या तोडीचें लढाऊ राष्ट्र नाहीं अशी स्थिति आज आली आहे, हें सर्वांस विदित आहे. आतां रूसो-जपानी युद्धामुळें रशिया अगदीं मेटाकुटीस आला आहे, अर्थात् त्याला भिण्याचें बिलकूल कारण नाहीं हें कैसर जाणून आहे; त्याचप्रमाणें फ्रान्सचीही युद्धाची बिलकुल

मराठी ग्रंथ संग्रहालय,
शाखा
क्र.



तयारी नाहीं हेंही त्याला ठाऊक आहे. अर्थात् आस्ट्रियाकडून सर्व्हियाला अशक्य अटी पाठविण्यांत युद्ध सुरू करण्याचा कैसरचा हेतु आहे, असा तज्ज्ञांचा तर्क आहे. रशिया सर्व्हियाचा पक्ष उचलणार आणि मग फ्रान्सही रशियाला मिळणार हें उघड आहे; असें झालें म्हणजे एकटा आस्ट्रिया, रशिया व सर्व्हिया यांना गुंतवून ठेवील; आणि जर्मनी अर्थात्च सहजासहजीं फ्रान्सला पादाक्रांत करून त्यास आपल्या साम्राज्यछत्राखालीं आणील. इंग्लंड या तंट्यांत पडणार नाहीं असा सर्वांचा—व त्याबरोबर कैसरचाही—समज आहे. माझी स्वतःची अशी खात्री आहे, कीं आपली पुरातन महत्त्वाकांक्षा फलद्रूप करण्याकडे जर्मनी प्रस्तुतच्या प्रसंगाचा उपयोग करीत आहे. एकदां फ्रान्स जर्मनीच्या ताब्यांत आला ह्मणजे त्याच्या ( फ्रान्सच्या ) समुद्रकिनाऱ्याच्या व आरमाराच्या साह्यानें तो इंग्लंडलाही सहज गिळून टाकील. ”

“ ह्या पत्रांतील सर्व मजकूर खरा आहे, ” नेल्सनसाहेब उद्गारले. “ कैसर बाह्यतः धर्माचें व शांतता प्रियतेचें कितीही ढोंग करीत असला तरी तो वस्तुतः एक जबरदस्त युद्ध-राक्षस आहे यांत बिलकूल शंका नाहीं. ”

“ पण कैसर कांहीं इतका मूर्ख नाहीं, ” एक व्यक्ति ह्मणाली; “ इंग्लंडचें सामर्थ्य तो जाणून आहे. ”

“ होय, पण तो गर्वानें फुगून गेला आहे. जर्मनी संपूर्ण जगावर सत्ता चालविणार असा त्याचा समज आहे. ”

जुलैच्या २६ तारखेस बातमी आली कीं, आस्ट्रिया—हंगेरीच्या वकीलमंडळानें बेल्ग्रेड सोडलें.

जुलैच्या २८ व्या तारखेस सायंकाळीं वुइल्यम आपल्या घरीं सहास्य मुद्रेनें वर्तमानपत्र वाचीत होता.

“ हें फार छान झालें, ” तो उद्गारला. “ सर एडवर्ड ग्रेसारखा सज्जन व चाणाक्ष मुत्सद्दी क्वचित् असेल. त्यानें सर्व्हिया व आस्ट्रिया यांमधील तंटा तोडण्याचें काम तटस्थ प्रमुख राष्ट्रांकडे द्यावें असें सुचविलें आहे. ”

" व्हियेनाहून नेल्सनसाहेबांस आलेलें पत्र तूं पाहिलेंस का ?" त्याच्याजवळ असलेला त्याचा एक स्नेही ह्मणाला.

वुइल्यम—" होय. पण त्यांतील मजकूर ह्मणजे केवळ कल्पनेचा खेळ आहे. माझें कैसरविषयीं फारच अनुकूल मत आहे. तो अत्यंत सज्जन व धर्मनिष्ठ मनुष्य आहे. कांहीं का असेना इंग्लंडला तरी निदान या युद्धांत पडण्याचें कारण नाहीं. बाकी बहुतकरून, जर्मनी, फ्रान्स, इटली व ग्रेटब्रिटन या चार तटस्थ राष्ट्रांनीं मिळून या आस्ट्रिया–सर्व्हियामधील तंट्याचा निकाल सांगावा अशी जी सर एडवर्ड ग्रे यानें सूचना केली आहे ती यशस्वी होईल असें मला वाटतें."

स्नेही—" जर्मनी या सूचनेकडे विशेष लक्ष्य पुरवील असें मला नाहीं वाटत."

पुढें लौकरच आस्ट्रियानें सर्व्हियाविरुद्ध युद्ध जाहीर केलें; त्यानंतर आस्ट्रियाच्या सरहद्दीनजीक रशियानें कांहीं सैन्य सज्ज केल्याचें वर्तमान आलें; पुढें जेव्हां रशियाचें सैन्य सर्व बाजूंनीं तयार होऊं लागलें तेव्हां युरोपखंडभर युद्धाचें असुरी नृत्य लौकरच सुरू होणार अशी भीति वाटूं लागली.

आगष्टच्या पहिल्या तारखेस जर्मनीनें रशियाविरुद्ध युद्ध जाहीर केलें.

वुइल्यमचा स्नेही त्यास ह्मणाला, " पाहिलेंस, जर्मनीनें सर एडवर्ड ग्रेची सूचना नाकारली. यावरून आस्ट्रियापेक्षां जर्मनीच युद्धासाठीं उत्सुक झाला आहे हें उघड दिसतें"

वुइल्यम—" गोष्ट फार वाईट झाली; ईश्वरकृपेनें आपणांला युद्धांत पडण्याचें कारण नाहीं हें एक बरें आहे."

" तसें कांहीं ह्मणतां येत नाहीं; जर्मनीनें लक्झेंबर्गवर स्वारी केली आहे. सर्व प्रमुख राष्ट्रांनीं लक्झेंबर्गला, तुमचें स्वातंत्र्य अबाधित राहील असें अभिवचन दिलें होतें. पण जर्मनीनें आपलें वचन मोडलें."

वुइल्यम—" ही केवळ दंतकथा आहे."

" दंतकथा आहे कीं कसें तें पहाणें आहे."

सर एडवर्ड ग्रे याचें प्रसिद्ध भाषण वाचल्यावर नेल्सनसाहेबांची जी चमत्कारिक मुद्रा झाली ती प्रेक्षणीय होती.

" सर एडवर्ड ग्रे यानें शांतता राखण्यासाठीं अविश्रांत परिश्रम केले आहेत, " नेल्सन ह्मणाले, " पण त्यांचा कांहीं उपयोग होईलसें दिसत नाहीं. कैसरनें कितीही धर्मनिष्ठपणाचीं व ईश्वरभक्तीचीं व्याख्यानें झोडलीं असलीं तरी आज कित्येक वर्षांपासून त्यानें जाणूनबुजून युद्धाची तयारी चालविली आहे अशी माझी खात्री आहे. "

" पण इंग्लंडला कांहीं युद्धांत पडण्याचें कारण नाहीं, " वुइल्यम हळूच म्हणाला.

नेल्सन—" पण फ्रान्स व इंग्लंड यांमध्यें सलोखा आहे. उद्यां फ्रान्सवर जर्मनीनें हल्ला केल्यावर इंग्लंडला तटस्थ रहातां येईल कीं नाहीं हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. "

वुइल्यम—" पण युद्ध म्हणजे किती अनर्थकारक गोष्ट आहे याचा विचार करा. "

नेल्सन—" मला तें सर्व ठाऊक आहे. युद्ध आणि रक्तपात यांचा मला चांगला परिचय आहे. पण जर्मनीला अधिक बलाढ्य व भयंकर झालेला पाहण्यापेक्षां इंग्लंड युद्धांत पडलेलें पहाणें मला अधिक आवडेल. "

वुइल्यम—"पण इंग्लंडला जर्मनीची भीति बाळगण्याचें कारण नाहीं."

नेल्सन रागीट मुद्रेनें ह्मणाले, " मला असलेली सर्व माहिती मला बोलून दाखवितां येत नाहीं.पण माझे शब्द ध्यानांत ठेव. हा सर्व बेत जर्मनीनें पूर्वींच ठरवून ठेवलेला आहे. सर्व्हिया व आस्ट्रिया यांमधील तंट्याचें केवळ निमित्त आहे. कोणत्या तरी मिषानें युद्ध जुंपण्याचा व प्रथम फ्रान्स आणि त्यानंतर इंग्लंड पादाक्रांत करण्याचा जर्मनीचा उद्देश आहे. "

इंग्लंडनें जेव्हां युद्ध जाहीर केलें तेव्हां अखिल ब्रिटिश साम्राज्यांतील प्रजाजनांला काय वाटलें हे येथें सांगण्याची जरूर नाहीं.

किचनेर साहेबांनीं जेव्हां इंग्लंड देशांतील तरुणांना आपल्या देशासाठीं, सर्व राष्ट्रांच्या स्वातंत्र्यासाठीं आणि मानवजातीच्या कल्याणासाठीं लढण्याला निमंत्रण केलें तेव्हां वुइल्यम मूनलाइट पॅलेसमध्यें हजर होता.

"मी लष्करी शिक्षण घेतलें आहे, अर्थात् मी सैन्यांत दाखल होणार," नेल्सनसाहेबांचा मुलगा जॉर्ज ह्मणाला.

" मला ताबडतोब माझ्या पलटणींत दाखल झालें पाहिजे. कॅप्टन लेनॉक्स तर गेला सुद्धां. वुइल्यम, तूंही सैन्यांत दाखल होणार ना ? " डिकनें प्रश्न केला.

" नाहीं, " वुइल्यमनें शांतपणें उत्तर केलें, " मी सैन्यांत दाखल होणार नाहीं. "



# प्रकरण ७ वें.

—:०:—

## लिली तुझ्याकडे ढुंकूनही पाहणार नाहीं !



“काय ?” डिक आश्चर्यानें ह्मणाला, “ वुइल्यम, तूं म्हणतोस तरी काय ?”

“ मला सैन्यांत दाखल होतां यावयाचें नाहीं.” वुइल्यम शांतपणानें ह्मणाला.

“ वुइल्यम ! ही थट्टा करण्याची वेळ नव्हे. हा थट्टा करण्याचा विषय नव्हे. तुला आह्मांबरोबर लष्करी शिक्षण मिळालेलें आहे. तूं आह्मांबरोबर खातीनें समरांगणावर येणार. ” डिक वुइल्यमच्या मुद्रेकडे पहात आशेनें म्हणाला.

वुइल्यम दुःखानें म्हणाला—“ डिक ! मी तुझी चेष्टा करीत नाहीं. मी जें बोलत आहें तें पूर्ण विचार करून बोलत आहें. सैन्यांत दाखल होऊन समरांगणावर जाणें मला बिलकूल पसंत नाहीं.”

“ वुइल्यम ! असें वेड्यासारखें काय बडबडतोस ? आपल्या देशाचे सध्यांचे सेनानायक लॉर्ड किचनेर यांनीं आपल्या देशाच्या इभ्रतीच्या संरक्षणाकरितां अभिनव वीरांस पाठविलेला संदेश तुला माहीत नाहीं काय ? आज इंग्लंडला पांच लक्ष तरुणांची जरूर आहे. उद्यां ही संख्या वाढण्याचा संभव आहे. अशा वेळीं तुझ्यासारख्या तरुणांनीं मा

घेणें ह्मणजे स्वतःच्या देशभक्तीचा खून करणें नव्हे काय ? बोल, वुइल्यम ! स्वस्थ बसू नकोस. मी सैन्यांत सामील होण्यास तयार आहें असे तुझे शब्द केव्हां ऐकेन असें मला झालें आहे."

"तुझी इच्छा माझ्या हातून पूर्ण होईल असें मला वाटत नाहीं," वुइल्यम शांततेनें ह्मणाला.

"पुरे! वुइल्यम, थट्टा करणें पुरे कर," डिक वुइल्यमजवळ जाऊन कळकळीनें ह्मणाला. "तूं दररोज युद्धसमाचार वाचतोसना ? युद्ध कसें उपस्थित झालें आणि इंग्लंडला युद्धामध्यें कां पडावें लागलें हें तुला माहीत आहेना ? अभिवचन दिल्याप्रमाणें इंग्लंडनें बेल्जमला या प्रसगीं मदत केली नाहीं तर इंग्लंडच्या कीर्तीस केवढा कमीपणा येईल हें तुला माहीत आहे ना ?"

"सर्व कांहीं मला माहीत आहे. सर्व कांहीं मीं वाचलें आहे."

"मग युद्धांत सामील होण्यास तूं अशी टाळाटाळ कां करितोस ?" डिक ह्मणाला. "आपला देश युद्धांत पडत आहे हें अत्यंत न्याय्य आणि योग्य आहे असें तुला नाहीं कां वाटत ?"

"कोणतेंही युद्ध न्यायाच्या आणि नीतीच्या तत्त्वांवर सुरू होणें शक्य नाहीं. व्यक्तींच्या नीतीचा खून करणें, ईश्वरी आदेशाचा अपमान करणें, हें युद्धाचें मुख्य कार्य आहे. ईश्वरी सत्तेस थोडीतरी भीक घालणारा, ईश्वराच्या शब्दास किंचिन्मात्र मान देणारा मनुष्य आपल्याच बंधूंचे खून करण्यास कसा प्रवृत्त होईल ? युद्ध म्हणजे प्रचंड प्रमाणावर चालणारा कसाईखाना होय ! त्या कसाईखान्यांत कसाबाचें काम करण्यारा माझें नांव नोंदवा असें म्हणण्यास कोणता न्यायप्रिय मनुष्य तयार होईल ? मीं तंटा करतांना एखाद्या मनुष्याचा खून केला तर तो माझा अपराध अत्यंत नीच कोटींतील समजला जाईल. प्रत्येक मनुष्य माझें नांव ऐकतांच तिटकाऱ्यानें आणि संतापानें प्रेरित होऊन माझें तोंड पहाण्याचेंही नाकारील. परंतु हाच अपराध, हाच घाणेरडा खुनाचा अपराध, अत्यंत मोठ्या प्रमाणावर एखाद्या राष्ट्रानें आपल्या वादाचा निकाल लावण्याकरितां केला म्हणजे मात्र तो न्याय्य होतो, हें आश्चर्य नव्हे काय ? एका व्यक्तीनें केला

म्हणजे अपराध ! आणि अनेक व्यक्तींनीं अर्थात् राष्ट्रानें केला म्हणजे मात्र तो अपराध नव्हे ! हें चमत्कारिक तत्व आतां फार दिवस प्रतिपादलें जाणार नाहीं."

हे वुइल्यमचे शब्द ऐकून जवळच उभा राहिलेला एक तरुण त्वेषानें ह्मणाला—"युद्ध म्हणजे मोठ्या प्रमाणावर चालणारे खून असें प्रतिपादणाऱ्या मनुष्याचा धिक्कार असो. आपला भ्याडपणा लपविण्याकरितां पुढें आणिलेलें हें कांहीं तरी कारण आहे. युद्ध आणि खून यांत ज्यास सारखवटपणा भासतो त्याची विचारशक्ति कुजून गेली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. युद्ध हें मर्दाचें काम ! खून हें भ्याडाचें काम ! युद्धास खुनाचें स्वरूप कधींही देतां यावयाचें नाहीं."

"तें कसें ? युद्ध आणि खून या दोहोंमध्यें जर सारखाच क्रूरपणा असतो, दोहोंतही जर सारखाच मनुष्यवध होतों, तर त्यांत तफावत कसली ?" वुइल्यम आपला शांतपणा न ढळूं देतां ह्मणाला.

तेव्हां तो तरुण क्षणमात्र विचार करून गर्जत ह्मणाला—"अधम पातक्यांस फांसावर लटकावणारा मांग कधीं तरी खुनी म्हणून समजला जाईल ? अपराध्यास फांशीची शिक्षा फर्मावणारा न्यायाधीश कधीं खून करणाऱ्यांच्या सदरांत येईल ? सद्गृहस्थ ! अशा गोष्टींचा वादविवाद करण्यापूर्वी आपलें डोकें ताळ्यावर आहे किंवा नाहीं याची थोडी परीक्षा करविली असती तर बरें होतें." असें म्हणून विकट हास्य करीत तो तरुण तेथून निघून गेला.

शेवटीं डिक ह्मणाला—"वुइल्यम ! मग तुझा काय विचार ठरला ! देशाच्या कर्तव्यास न जुमानतां येथेंच चैनींत दिवस काढणार ना ?"

डिकचा निर्भत्सनापूर्ण प्रश्न ऐकून वुइल्यम ह्मणाला—"डिक ! तूं कांहींही ह्मण. मी स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीविरुद्ध वागणार नाहीं. मी सैन्यांत दाखल होणार नाहीं."

यावर डिक कांहीं बोलला नाहीं. तो आपल्या इतर मित्रमंडळींसह वुइल्यमला एकटेंच टाकून निघून गेला.

थोड्याच वेळांत मूनलाइट पॅलेससमोरच्या पटांगणांत टेनिसचा खेळ सुरू झाला. वुइल्यम दररोज खेळांत पुढाकार घेत असे, पण तो आज तेथें दिसत नव्हता. तो दूर अंतरावर जाऊन विचार करीत बसला होता. तो तेथें बसला आहे हें प्रत्येकास माहीत होतें. परंतु त्याच्यासारख्या रण-भीरूबरोबर खेळणें कमीपणाचें आहे अशी प्रत्येकाची समजूत असल्यामुळें कोणींही त्याला खेळण्यास बोलाविलें नाहीं. तो जेथें बसला आहे तेथील हवा त्याच्या श्वासोच्छ्वासानें दूषित झाली असेल या भीतीनेंच कीं काय कोणीही त्याच्याजवळ जाईना. परंतु वुइल्यमची त्याच्या मित्रमंडळीपेक्षांही अधिक काळजी घेणारी एक व्यक्ति होती. ती त्यास या वेळीं विसरली नाहीं.

आपल्या मायभूमीवरील आपत्तीच्या वेळीं तिचे सर्व पुत्र एकदिलानें तिला तारण्याकरितां आपल्या प्राणांचीही पर्वा न करितां झगडणार, आणि आपण मात्र एखाद्या नेभळटाप्रमाणें स्वस्थ बसणार हा विचार वुइल्यमच्या मनांत आला नव्हता असें नाहीं. पण युद्ध म्हणजे केवळ अनाचार आहे हा त्याचा समज इतका दृढ होता, कीं, आपण अगदीं योग्य वर्तन करीत आहोंत असें त्यास वाटत होतें. आपल्या मित्रांनीं आपला त्याग केला तरी हरकत नाहीं; आपल्या ओळखीच्या मनुष्यांनीं आपणाबद्दल तिटकारा व्यक्त केला तरी हरकत नाहीं; वुइल्यम लिटन अगदीं भ्याड आहे, त्याला स्वदेशप्रेमाचें नांवही माहीत नाहीं, असा अखिल देशभर पुकारा झाला तरी हरकत नाहीं; पण आपण आपल्या अनुपमेय तत्वाचें उल्लंघन कधींही करणार नाहीं; आपण आपल्या पित्याच्या आज्ञा कधींही मोडणार नाहीं; आपल्या सदसद्विवेकबुद्धीचा आपण कधींही अपमान करणार नाहीं. पण—

वुइल्यम पुढें विचार करणार तोंच लिली आपणाकडे येत आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें.

त्याच्या विचारशृंखलेंत लिलीच्या विचाराची एक सुवर्णाची कडी गोंविली गेली. तो पुढें विचार करूं लागला—

" आपण स्वतःच्या तत्त्वाकरितां मित्रांचा रोष स्वतःवर घेण्यास तयार झालों, सार्वजनिक रीतीनें आपणास भ्याड ह्मटलें तर चालेल असें मानण्यास सज्ज झालों, पण आपल्या प्रियकर लिलीस आपलें वर्तन पसंत पडलें नाहीं तर! याच आपल्या तत्त्वाकरितां ती आपला त्याग करूं लागली तर! मग तत्त्वाची कांस धरावयाची कीं लिलीस आळवावयाचें ? तत्त्व का लिली ? पण आपली लिली कधींही आपला त्याग करणार नाहीं." ही शेवटच्या सुखमय विचाराची कडी वुइल्यम आपल्या विचारशृंखलेस जोडीत आहे तोंच रागानें संतप्त झालेली लिली त्याच्यापुढें उभी राहिली.

लिली रागावलेली आहे ही गोष्ट वुइल्यमच्या लक्षांतच आली नाहीं. क्रोधानें उत्पन्न झालेला तिच्या तोंडावरील रक्तिमा, तिच्या अधिक वक्र झालेल्या धनुष्याकार भिंवया, तिच्या सुकुमार ओष्ठद्वयाची परस्परांत एकरूप होण्याची धडपड आणि तिचा एकंदर आविर्भाव पाहून आपली लिली आज फारच मोहक दिसते असें त्यास वाटलें. लिलीप्रमाणेंच स्तब्धता धारण करून तो तिच्या वदनाकडे एकाग्रतेनें पाहूं लागला.

स्तब्ध रहाणें असह्य झाल्यामुळें लिली ह्मणाली—

" वुइल्यम ! डिक ह्मणतो ती गोष्ट खरी आहे ना ? "

लिलीचा आजच्यासारखा स्वर वुइल्यमनें कधींच ऐकिला नव्हता. आपण काय विचारतों याबद्दल लज्जा वाटून तो हळूंच ह्मणाला:—

" डिकनें तुला काय सांगितलें ? "

" काय सांगितलें असावें याची तुला कांहींच कल्पना होत नाहीं काय ? " भेदक दृष्टीनें वुइल्यमकडे पहात लिलीनें प्रश्न केला. परंतु वुइल्यम कांहींच बोलला नाहीं. तेव्हां ती संतप्त बाला ह्मणाली—

" आपल्या मायभूमीची सेवा करण्याचें सर्वांनीं कबूल केलें, आणि तूंच एकट्यानें त्यांत माघार घेतली, हें खरें ना ? तूं आपल्या देशाशीं बेइमान—"

लिलीस पुरतें न बोलूं देतां वुइल्यम मध्येंच ह्मणाला—" लिली ! जरा दमानें घेशील तर मी सर्व गोष्टींचा खुलासा करीन. मीं सैन्यांत सामील होण्याचें कां नाकारिलें तें—"

" पुरे, मला अधिक ऐकावयाचें नाहीं. मला तुझ्या खुलाशाची जरूर नाहीं, " लिलीच्या शब्दांतील क्रोध भासमान होऊं लागला; " लॉर्ड किचनेर यांनीं सर्व तरुणांस आपल्या देशाच्या निशाणाखालीं लढण्यास बोलाविलें आहे. सध्यां आपल्या देशास पांच लक्ष तरुणांची जरूर आहे. देशाच्या इभ्रतीचें संरक्षण करण्याकरितां लष्करी शिक्षण घेतलेल्या प्रत्येक तरुणानें समरांगण जितक्या लौकर गांठवेल तितक्या लौकर गांठावें अशी ही आणीबाणीची वेळ आहे. अशा प्रसंगीं तूं एखाद्या भीरूप्रमाणें घरीं रहाणार काय, हें मला कळलें पाहिजे. "

" लिली ! माझीं तत्त्वें तुला माहीत आहेत. परवां आपण त्या टेकडीकडे फिरावयास गेलों होतों तेव्हां मीं तुला काय सांगितलें तें तुझ्या लक्षांत—"

वुइल्यमला अधिक न बोलूं देतां लिली ह्मणाली—" होय ! सर्व माझ्या लक्षांत आहे. परंतु त्या गोष्टीची सध्यां जरूर नाहीं. सध्यांच्या प्रसंगीं तूं काय करणार व कसें वागणार हें मला समजलें पाहिजे. अधिक वाटाघाट न करितां मला माझ्या प्रश्नाचें उत्तर मिळालें तर फार चांगलें होईल. "

हे शब्द उच्चारीत असतांना लिलीचें सर्वांग संतापानें कांपत होतें. तिचे नेत्र क्रोधानें लालभडक झाले असून कपोलभाग अत्यंत आरक्त झाला होता. तेव्हां प्रथम सरळपणें तिच्या प्रश्नास उत्तर देणें बरें, मागून सर्व कांहीं खुलासा करूं, लिली आपलीच आहे, असा विचार करून वुइल्यम ह्मणाला—

" मी कांहींच करणार नाहीं. "

" तूं कांहींच करणार नाहींस ? "

" कांहींच करणार नाहीं. युद्धांत पडणार नाहीं, युद्ध करणार नाहीं. स्वतःच्या तत्त्वांस चिकटून राहून तीं शक्य तितक्या लौकर अमलांत आणण्याचा प्रयत्न करीन. "

वुइल्यमनें उच्चारलेले शब्द लिली किती तरी वेळपर्यंत पुनः पुनः

उच्चारित होती. शेवटीं आपला कोप अनावर होऊन आपण कांहींतरी भलतेंच बोलून जाऊं असें वाटून स्वतःजवळ त्या वेळीं शिल्लक असलेला सर्व शांतपणा खर्चून ती ह्मणाली—

" ठीक आहे. माझ्या प्रश्नास उत्तर मिळालें. मी आतां जातें. आह्मीं टेनिसचा डाव मोडिला आहे. आतां फिरावयास जावें असा सर्वांचा विचार आहे. तिकडेच मी जातें. येतें तर—"

" नको ! लिली ! माझ्यावर अशी रागावून जाऊं नकोस. क्षणमात्र थांबून माझें भाषण ऐक; आणि मग जा. "

" नाहीं. मला आतां येथें अधिक वेळ थांबतां येणार नाहीं. "

" मीं तुह्मांबरोबर फिरावयास येऊं नये असें का तुझें ह्मणणें आहे ? "

" याचा विचार तुझा तूं कर. आह्मांबरोबर फिरावयास येणें तुला आवडेल असें मला वाटत नाहीं. " असें ह्मणून लिली तेथून विद्युल्लते-प्रमाणें नाहींशी झाली.

ती दिसेनाशी झाल्यावर वुइल्यम स्वगत ह्मणाला—" दैव फिरलें म्हणजे सर्वच फिरतें यांत कांहीं संशय नाहीं. लिलीवर माझा केवढा विश्वास होता. पण तीही माझा त्याग करून निघून गेली. माझ्या शरीरांतील प्राण—माझी लिली—मला सोडून गेल्यावर नुसतीं तत्त्वें घेऊन मला काय करावयाचें आहे ? " असें ह्मणून तो पूर्ववत् विचारांत निमग्न झाला.

आपलें आतांपर्यंतचें वर्तन अविचाराचें तर नव्हतें, सर्व मित्रांनीं आपला त्याग करावा, अनोळखी मनुष्यानेंही आपणाकडे बोटें दाखवून आपली कुचेष्टा करावी, एवढेंच नव्हे तर, पूर्णपणें आपली झालेल्या आपल्या हृदय-दयितेनेंही आपणावर असंतुष्ट होऊन रागानें निघून जावें, एकाच्याही मनांत आपल्या तत्त्वांची सत्यता भिनूं नये, एकासही युद्धांत पडणें अधर्माचें आहे—अन्यायाचें आहे असें वाटूं नये, एकाचाही जगन्नियंत्याच्या शब्दांवर भरंवसा बसूं नये, यावरून आपणच कोठें चुकत आहों असें मानण्यास काय हरकत आहे ? असें वाटून वुइल्यम क्षणमात्र चिंतामग्न झाला. परंतु आपण कोणताही अविचार करीत नसून अगदीं योग्य वर्तन करीत आहोंत असें त्यास वाटलें.

जर्मनीनें होऊन युक्तिप्रयुक्तीनें कित्येक राष्ट्रांस रणयज्ञांत ओढलें यावर वुइल्यमचा विश्वास नव्हता; तरी कैसरच्या अरेरावी वर्तनामुळेंच युद्ध ओढवलें हें तो जाणून होता. कैसरची लक्झेंबर्गच्या चिमकुल्या राज्यावरील स्वारी, त्यानें बेल्जमला पाठविलेला अपमानकारक खलिता, आणि पूर्वींच्या तहनाम्यास निरुपयोगी चिटोरें ह्मणण्यांत त्यानें दाखविलेलें धाष्ट्य यांवरून, त्यानें युद्धास किती अन्यायानें प्रारंभ केला हें वुइल्यम जाणून होता. एवढेंच नव्हे तर बेल्जमच्या राजानें इंग्लंडची मदत मागितली ही गोष्ट अयोग्य केली असेंही त्यास वाटलें नाहीं. बेल्जमला संकटाच्या वेळीं मदत करण्याचें इंग्लंडनें अभिवचन दिलें होतें; तें पाळण्याचा प्रसंग आला असतां इंग्लंडनें माघार घेणें अन्यायाचें आहे हेंही तो कबूल करीत होता.

पण युद्ध !

युद्ध हे शब्द ऐकतांच त्याला आपल्या पित्याच्या वचनांची आणि प्रोफेसर रैंथॉल यांच्या शब्दांची एकदम आठवण होई. युद्ध नरकास जाण्याचें साधन आहे, युद्ध खून करणारांचा अड्डा आहे, युद्ध रानट्यांतील रानटी मनुष्याची पातकी इच्छा आहे, युद्ध केवळ अधर्म आहे, अशीं वचनें त्याच्या मनांत खळबळ उडवून देत, आणि आपण प्रत्यक्ष चाललेलें युद्ध पहात असून तेथें मनुष्यवधाकरितां चटावलेलीं पिशाच्चें इतस्ततः वावरत आहेत, रक्तपाताची इच्छा परिपूर्ण करण्याकरितां कित्येक नरपशु तेथें संचार करीत आहेत, असा त्यास भास होई.

जर्मनीनें विनाकारण निरपराधी बेल्जमला निर्वाणीचा खलिता पाठवून त्याचा अपमान करावा, जर्मनीच्या प्रचंड शक्तीपुढें आपला निभाव लागणार नाहीं या भीतीनें बेल्जमनें इंग्लंडच्या मदतीची मागणी करावी, इंग्लंडनें आपल्या छोट्याशा,पण पाणीदार शेजाऱ्यास मदत करण्याकरितां कंबर कसावी, हजारों तरुणांनीं आपलीं शिरें हातावर घेऊन आपल्या देशाचे शब्द खरे करण्याकरितां रणयज्ञांत उडी घेण्यास तयार असावें, परंतु आपण मात्र अशा प्रसंगीं कच खावी हें नामर्दपणाचें आहे असें वाटून वुइल्यमला फार दुःख होई. पण लागलीच त्याला जगन्नियंत्याच्या पवित्र शब्दांची आठवण होई. ईश्वराच्या वचनावर भरंवसा ठेवणारानें युद्ध करण्यास कसें

तयार व्हावें ? पवित्र शास्त्रांतील महत्तम तत्त्वास जेणेंकरून बट्टा लागेल असें वर्तन त्याच शास्त्रास मान देणाऱ्या मनुष्यानें कसें करावें ? असें वाटून तो पुनः गोंधळून जाई.

वुइल्यम घरीं परत आला तेव्हां त्याची आई कोठें बाहेर गेली होती. हें पाहून त्याला दुःखांत सुख वाटलें. आपण रोजच्यापेक्षां लौकर घरीं कां आलों याचीं कारणें सांगण्याचा प्रसंग टळला असें वाटून, क्षणमात्र विचार करावा या बुद्धीनें तो आपल्या वाचनालयांत गेला.

आतांपर्यंत त्यानें थोडासोडा विचार केला न्हता. परंतु पुनः एकदां विचार करून काय तें निश्चित करावें असें त्यानें ठरविलें.

आपण करीत आहोंत तें बरोबर करीत आहोंत. लिली अॅड्मिरल नेल्सन याची मुलगी. अर्थातच युद्धासारख्या अधर्माच्या गोष्टीबद्दल तिच्या मनांत प्रेम असावयाचें. तिला घरचें शिक्षण आणि दैनिक अनुभव तशाच स्वरूपाचा मिळालेला. ह्मणून तिला आपलें मनोगत बरोबर रीतीनें ओळखतां आलें नाहीं. प्रत्येक इंग्लिश तरुणानें हातांत समशेर घेऊन देशाचें संरक्षण करण्याकरितां या वेळीं झगडलें पाहिजे, तसें न करतील ते भीरु अशी तिची बालंबाल खात्री झालेली. यामुळें, आपण जर आपल्या शांततेच्या तत्त्वास सोडण्यास तयार नसलों तर लिलीस सोडण्यास तयार झालें पाहिजे हें उघडच आहे. परंतु लिलीस सोडण्याचें धाडस आपल्या हातून कसें व्हावें ? लढाई करणें जर आपणास न्याय्य वाटेल तर लढाईवर जाऊन आपण स्वतःच्या प्राणाचें विसर्जन करूं; पण लिली आपला पंचप्राण ! तिला सोडून कसें चालणार ! असा विचार करून वुइल्यम क्षणमात्र स्वस्थ बसला. त्याच्या पित्याची प्रतिमा त्यास समोर दिसत होती. तीकडे पहात तो स्वगत ह्मणाला—

"एक युद्ध करणें तरी न्याय्य असलें पाहिजे; किंवा युद्धास पातक ह्मणणारी धर्माज्ञा तरी न्याय्य असली पाहिजे. दोन्ही न्याय्य असणें संभवनीय नाहीं. बाबा ! मी ह्या वेळीं काय करूं ? इंग्लंडांतील अखिल तरुण मर्दपणानें लढण्यास सज्ज झाले आहेत त्यांत मिसळून वृद्धांच्या आशीर्वादांचा आणि लिलीच्या प्रेमाचा लाभ करून घेऊं; का युद्ध करणें

अधर्म आहे असें सांगत फिरून, प्रत्येकाच्या तिरस्कारास आणि लिलीच्या अनादरास प्राप्त होऊं ? बाबा ! असे रागावूं नका. तुमचा उपदेश माझ्या लक्षांत पूर्णपणें ठसला आहे. सद्धर्मतत्त्वें मी उत्तम रीतीनें जाणत आहें.जगन्नियंत्याच्या आज्ञा मला अवगत आहेत.केवळ शाबासकी या मधुर शब्दास भुलून मी त्यांच्या विरुद्ध कधींही वागणार नाहीं. लोकांच्या तिरस्काराची आणि रोषाची मला तिळमात्रही पर्वा नाहीं. जगन्नियंत्याच्या तिरस्कारास आणि रोषासच मला भ्यालें पाहिजे. पण तसें करण्यांत मी लिलीस मुकणार ! ”

वुइल्यमचें स्वगत पुटपुटणें संपतें न संपतें तोंच त्याची आई तेथें आली. ती ह्मणाली—

“ बाळा ! मला पुष्कळ दुःख वाटतें. पण मला तुझा वियोग कांहीं दिवस तरी सहन केला पाहिजे. मी तुझी जन्मदात्री खरी ! पण माझ्यापेक्षांही तूं आपल्या भूमातेवर अधिक प्रेम केलें पाहिजे, आणि जेव्हां तिची कामगिरी बजावण्याचा प्रसंग येईल तेव्हां माझा विचार मनासही न शिवूं देतां तूं आनंदानें आपलें कर्तव्य बजावण्यास सज्ज झालें पाहिजे. माझ्यासंबंधानें लेशमात्रही चिंता न करितां तूं खुशाल आपल्या मित्रमंडळीसह समरांगणावर जा. माझी तुला कोणत्याही प्रकारची हरकत नाहीं.”

“ आई ! ” वुइल्यम खालीं मान घालून हळूच ह्मणाला, “ समरांगणावर जावयाचें नाहीं असें मीं ठरविलें आहे. ”

“ कां ? जर्मन लोकांनीं फ्रान्स व बेल्जम या देशांचा धुव्वा उडवून शेवटीं इंग्लंडावरही चाल करून यावें व शेवटीं आम्हांस गुलाम बनवावें, असें तुला वाटतें ? जर्मनांच्या मनसोक्त वागण्यास कांहींच आळा घालूं नये, स्वतःचें संरक्षण करण्याचीही ताकद आमच्यांत नाहीं असें वर्तन करावें, असें तुला वाटतें काय ? ”

यावर वुइल्यम कांहींच बोलला नाहीं.

पुत्राचें हें अप्रासंगिक मौन न आवडून त्याची आई ह्मणाली—

“ वुइल्यम ! तूं माझ्यावरील प्रेमामुळें समरांगणावर जाण्यास मागेंपुढें पहात असशील. नाहीं तर असे शब्द तुझ्या तोंडून बाहेर आले

नसते. मलाच संतुष्ट ठेवण्याची तुझी इच्छा असेल तर क्षणाचाही विलंब न करितां समरांगणावर जाण्यास तयार हो; तेथें जाऊन आपल्या देशाची कामगिरी बजाव आणि या भूमातेचा आणि माझा तूं खरा सत्पुत्र आहेस असा लौकिक मिळीव. तूं आपलें कर्तव्य बजाविलेंच पाहिजे."

"आज माझे बाबा हयात असते तर त्यांनीं मला समरांगणावर जाण्याची परवानगी दिली असती काय ?" असें ह्मणून वुइल्यमनें आपल्या पित्याच्या फोटोकडे बोट केलें.

"त्यांनीं तुला परवानगी दिली नसती. ते युद्धाचा द्वेषच करीत."

"तसें नव्हे. आई! त्यांना खरा धर्म कोणता हें बरोबर समजत होतें. ह्मणून युद्ध करणें अधर्माचें आहे असें ते ह्मणत. याच कारणाकरितां युद्ध करणें मला नापसंत आहे."

"पण या तुझ्या करण्याचा काय परिणाम होईल याचा तूं विचार केलास काय ? तूं तरुण असून, तूं युद्धाचें शिक्षण मिळविलें असून समरांगणावर जाण्याचें मुद्दाम टाळतोस, हें ज्याला ज्याला समजेल तो तो तुझा तिरस्कार करील. तुझें मुखावलोकन करण्याचेंही कोणी मनांत आणणार नाहीं."

"मी त्याची मुळींच पर्वा करीत नाहीं. मनुष्यापेक्षां परमेश्वराची किंमत मी अधिक समजतों."

"पण मग तुझी लिली तुझ्याकडे पुनः ढुंकूनही पाहणार नाहीं!"



# प्रकरण ८ वें.

—— :o: ——

## प्रणय कीं कर्तव्य ?



“लिली तुझ्याकडे ढुंकूनही पाहणार नाहीं !” हे आपल्या आईच्या तोंडचे शब्द ऐकतांच वुइल्यमच्या मनास जबर धक्का बसला. आपल्या तत्त्वाकरितां झटण्याची त्याला जितकी तीव्र मनीषा होती तितकीच लिलीची आपणास प्राप्ति व्हावी अशी त्याची इच्छा होती. दोन इच्छांचें त्याच्या मनांत दारुण युद्ध सुरू झालें. तत्त्वाच्या नादीं लागून आपण लिलीस खास मुकणार असें त्यास वाटूं लागलें. त्याच्या अंगांत पित्याचा करारीपणा आणि मातेचा तेजस्वीपणा पूर्णपणें बाणला होता. पित्याचा करारीपणा त्यास स्वतःच्या मतास चिकटून रहावयास प्रोत्साहन देऊं लागला; आणि मातेचा तेजस्वीपणा त्यास, प्रेमास मुकलास तरी हरकत नाहीं पण स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीचा विक्रय करूं नकोस असें त्यास बजावूं लागला. अशा रीतीनें लिलीवरील प्रेमावर दोहों बाजूंनीं मारा होऊन प्रणयापेक्षां कर्तव्य श्रेष्ठ आहे असें त्याच्या मनानें ठरविलें.

प्रणयावर कर्तव्याचा विजय झाला खरा. पण त्यामुळें वुइल्यमच्या मनास किती दारुण वेदना सहन कराव्या लागत होत्या याची कल्पना वुइल्यमलाच होईल. लिलीच्या समागमास आपण कायमचे मुकणार ही कल्पना त्यास फारच त्रास देऊं लागली. लिलीही लाभेल आणि युद्ध करण्याचाही प्रसंग येणार नाहीं अशी एखादी युक्ति शोधून काढण्याकरितां

त्यानें पुष्कळ प्रयत्न केला, पण आतांपर्यंतचे आपले सर्व बेत लयास जाणार असें त्यास वाटूं लागलें. " मीं आपल्या पित्याचें मन बहुतेक वळविलें असून आपल्या विवाहास त्याची संमति मिळविण्याचा काल सन्निध येत चालला आहे," असें चारच दिवसांपूर्वीं लिली आपणास सांगून जाते काय आणि ज्याचा आपल्या सुखदुःखाशीं लेशमात्रही संबंध नाहीं असें कारण उपस्थित होऊन आपला विवाह जवळ जवळ अशक्य होतो काय; याबद्दल त्याला राहून राहून विषाद वाटे.

अशा रीतीनें विषाद मानण्यांत, दुःख करण्यांत आणि निश्चय करण्यांत वुइल्यमनें दोन दिवस घालविले. लिलीचें दर्शन घेऊन त्यास पुरे दोन दिवसही झाले नव्हते. पण आपण कित्येक वर्षें लिलीच्या वियोगजन्य दुःखांत घालवीत आहोंत असें त्यास वाटूं लागलें. केवळ दोन दिवसांचा वियोग जर आपणास इतका दीर्घ आणि त्रासदायक वाटतो तर आपला सर्व जन्म लिलीच्या संगतीशिवाय कसा जाणार याबद्दल त्याच्या मनांत जबर चिंता उत्पन्न झाली. चिंतामग्न स्थितींत तो आपल्या घरीं आला. तेव्हां बरीच रात्र झाली होती. वुइल्यम बाहेरून आला आहे हें समजतांच त्याची आई हातांत एक पत्र घेऊन त्याच्याकडे आली. तें पत्र पुढें करून ती प्रेमळ माता ह्मणाली—

" वुइल्यम ! किती चिंता करावयाची ? मी तुझी केव्हांपासून एकसारखी मार्गप्रतीक्षा करीत आहें. तूं बाहेरून आतां येशील, मग येशील असा विचार करीत मी तुझ्या वाटेकडे सारखे डोळे लावून बसलें होतें. तेव्हां तूं आतां बाहेरून आलास. ॲडमिरल नेल्सन यांच्याकडून तुला हें पत्र आलें आहे. पहा बरें ॲडमिरल काय ह्मणतात तें ! "

पत्र वाचून वुइल्यम किंचित् प्रफुल्ल वदनानें ह्मणाला—" आई, मला त्यांनीं भोजनास बोलाविलें आहे. "

" रात्र बरीच झाली आहे. भोजनाची वेळ बहुतेक टळून गेली. आतां तिकडे जाऊन काय उपयोग ? त्यांच्याकडून पत्र येऊन सुमारें दोन तीन तास झाले. "

" कांहीं हरकत नाहीं. वेळ झाली असली तरी चालेल. मी ही सोन्यासारखी संधि गमावणार नाहीं. "

आपण केलेली चूक कबूल करून आपला पुत्र समरांगणावर जाण्याचें निश्चित करणार असें मातेच्या वेड्या प्रेमास वाटलें.

परंतु, मूनलाइट पॅलेसमध्यें गेल्यावर सहजच लिलीची गांठ पडेल, तिला आपण समरांगणावर कां जात नाहीं याचा संपूर्ण खुलासा सांगूं, आणि तिचें मन आपणावरून उडणार नाहीं अशी तजवीज करूं असा वुइल्यम विचार करीत होता.

वुइल्यमनें मूनलाइट पॅलेसकडे वायुवेगानें आपली मोटार सोडली. परंतु त्याला जेवणाची वेळ गांठतां आली नाहीं. " बरें झालें, मंडळी निद्रिस्त होण्यापूर्वीं तरी आपण आलों, " असा आनंद मानीत वुइल्यम मूनलाइट पॅलेसमधील वाचनालयांत पाऊल टाकतो, तों नेल्सनसाहेब युरोपचा एक नकाशा टेबलावर पसरून विचार करण्यांत निमग्न झाले आहेत असें त्यास दिसलें.

ज्या ठिकाणीं ॲडमिरल नेल्सन बसले होते त्या स्थळास वाचनालय ह्मणणें ह्मणज केवळ शब्दच्छल करणेंच होतें. कारण ती जागा पुस्तकें ठेवण्याची वखार या नात्यानें ॲडमिरलसाहेबांनीं उपयोगांत आणिली नसून, भिन्न भिन्न नकाशांचें, समुद्रांतील देखाव्यांचें, आरमारी जहाजांचें, ड्रेडनाटचें आणि आरमारी खात्यांतील भिन्न भिन्न वस्तूंचें एक आलय ह्मणून त्यांनीं ती उपयोगांत आणिली होती. नाहीं ह्मणावयास एका छोट्याशा कपाटाच्या लहानशा खणांतील एका कोपऱ्यांत दोन तीन आरमारी युद्धासंबंधीं पुस्तकें होतीं. तेवढ्यावरून त्या जलयुध्दवस्तुसंग्रहालयास वाचनालय ह्मणावयाचें असल्यास हरकत नाहीं.

वुइल्यम आल्याची चाहूल लागतांच ॲडमिरलनें नकाशावरून आपली दृष्टि काढिली. वुइल्यमकडे सहास्य वदनानें पहात ते ह्मणाले—

" वुइल्यम ! भोजनाच्या वेळीं तूं खालीनें येशील असें मला वाटत होतें. परतु तुला कांहीं महत्वाच्या कामामुळें वेळेवर येणें झालें नसावें असें

दिसतें. असो. आतां तरी आला नाहींस! मग आतां तरी एकदम तूं निश्चय बैस. मला तुझ्याबरोबर कर्गी प्रत्येक तरुणानें आपल्या मातृभूमीच्या संरक्षणा-
— नेल्सनसाहेब आपणास झालें पाहिजे. आज त्वां लढण्याकरितां सैन्यांत ताडलें. तो शांतपणें त्यांच्या चालू अभ्यासावर पाणी सोडण्यासारखें आहे: वृद्ध ॲडमिरल करीत असलेलें स्मित केवळ वरपांगी असून त्याचें मन आंतून एकसारखें चिंतेनें जळत असावें असें त्याच्या लक्षांत आलें.

"युरोपखंडभर युद्धाचा वणवा पेटेल असें एक महिन्यापूर्वी जर कोणीं सांगितलें असतें तर त्याच्यावर आपला विश्वास तरी बसला असता काय! केव्हांना केव्हां तरी जर्मनीबरोबर आह्मांस लढावें लागणार असा माझा तर्क होता, पण तें युद्ध इतक्या लौकर ओढवेल अशी माझी कल्पनाही नव्हती. बरें झालें. या वेळीं इंग्लंडची उत्तम तयारी आहे; नाहीं तर प्रसंग मोठा कठिण होता. आज इंग्लंडनें आपल्या सैन्याची जमवाजमव करण्यांत आणि आरमाराची सिद्धता करण्यांत जितकी त्वरा दाखविली तितकी त्वरा आजपर्यंतच्या कोणत्याही युद्धांत दृष्टोत्पत्तीस आली नव्हती. इंग्लंडच्या सुपुत्रांत आज इतकें तेज विलसत आहे कीं, देशाच्या हाकेबरोबर सर्वांनीं एका दिलानें 'आह्मी सज्ज आहोंत' असें रणवीरांस शोभेसें उत्तर दिलें. तुझ्यासारख्या तरुणांची तर गोष्ट राहू दे, पण आह्मांसारख्या वयोवृद्धांसही समरांगणावर केव्हां जाऊं आणि जर्मनीचीं हाडें केव्हां ढिलीं करूं असें झालें आहे. डिक आणि जार्ज यांना तर समरांगणाशिवाय कांहीं दिसेनासेंच झालें आहे. ते लौकरच समरांगणावर आघाडीस जाणार आहेत."

"तें मला माहीत आहे," वुइल्यमनें अगदीं संक्षेपांत उत्तर दिलें.

"त्या दोघांही पोरांना युध्दाचें नुसतें वेड लागलें आहे. डिकनें युध्दकलेंत बरीच पारंगतता संपादन केली असल्यामुळें तो एकटाच समरांगणावर जाईल, आणि जॉर्ज घरीं राहील अशी माझी कल्पना होती. पण आतां पाहतों तर जॉर्जचें पाऊल डिकच्याही पुढें. असे शूर पुत्र असल्याबद्दल मला मोठा अभिमान वाटतो. बोअर युध्दाच्या वेळीं माझा ज्येष्ठ पुत्र धारातीर्थीं पतन पावला. त्याच्या मृत्यूमुळें माझ्या शरीरप्रकृतीवर

ख मी विसरत आहें तोंच झाले आहेत ! वुइल्यम ! बद्दल मला, लेशमात्रही

" कांहीं हरकत नाहीं. वेळ झाली असली तरी त्यासारखी संधि गमावणार नाहीं."

आपण केलेली चूक कबूल करून आपला पुत्र संरक्षणाकरितां मला दोन पुत्र देता आहे याबद्दल आनंदच होत आहे. कारण, माझ्या सबंध घराण्याचा धुव्वा उडाला हें मी अभिमानानें ऐकेन, पण माझ्या देशाच्या कीर्तीस लेशमात्र काळोखी लागली आहे असें ऐकणें माझ्याकडून होणार नाहीं " असें म्हणून वृध्द ॲडमिरल किंचित्काळ थांबला. वुइल्यम त्यावर कांहींच बोलला नाहीं. ॲडमिरलच्या संभाषणाचें कशांत पर्यवसान होणार हें तो जाणून होता. तथापि आपण मध्येंच बोलून तो प्रसंग मुद्दाम ओढून आणणें बरें नव्हे असें वाटून त्यानें मौनाचा स्वीकार केला.

" वुइल्यम ! " ॲडमिरल पुन्हां ह्मणाला, " ज्याप्रमाणें आमचें घराणें लढवय्येपणाबद्दल कित्येक शतकांपासून प्रसिध्द आहे त्याप्रमाणेंच तुझ्या मातेच्या घराण्याची ख्याति आहे. तुझा पिता आणि तुझे पितामह जरी शांततावादी होते तरी तुझी माता आणि विशेषतः तिचे वडील युध्दाचे भक्त होते. आमच्या घराण्यांतील कित्येक पुरुषांनीं तुझ्या मातेच्या घराण्यांतील कित्येक पुरुषांच्या खांद्यास खांदा देऊन समरांगणावर शत्रूच्या रक्ताचे सडे शिंपले आहेत. अशा प्रकारची लोकोत्तर कीर्ति संपादन करणें म्हणजे लहानसहान गोष्ट नाहीं. अशा शूर पूर्वजांबद्दल आपणांस अभिमान असला पाहिजे."

" अवश्य, " कांहीं तरी बोलावें या उद्देशानें वुइल्यम ह्मणाला.

" तूं लष्करी शिक्षण घेतलें असून त्यांत तूं प्रावीण्य संपादन केलें आहे असें डिकनें मला अनेकदां सांगितलें आहे. त्यामुळें मला तुझ्याबद्दल अत्यंत अभिमान वाटत आहे. मी जरी आरमारखात्यांतील मनुष्य आहें तरी सैन्यामध्यें तुला एखादी हुद्याची जागा मिळवून देणें माझ्या हातांत आहे."

" सैन्यांत सामील होण्याचा माझा अद्याप निश्चय झाला नाहीं, " वुइल्यम ह्मणाला.

" अद्याप तूं निश्चय केला नाहींस! मग आतां तरी एकदम तूं निश्चय केला पाहिजे. अशा प्रसंगीं प्रत्येक तरुणानें आपल्या मातृभूमीच्या संरक्षणाकरितां लढण्यास सज्ज झालें पाहिजे. आज त्वां लढण्याकरितां सैन्यांत दाखल होणें म्हणजे तुझ्या चालू अभ्यासावर पाणी सोडण्यासारखें आहे; पण त्यास नाइलाज आहे. लौकरच युध्दाचे दिवस नाहींसे होतील; आणि तुला आपला अभ्यास आणि इतर हेतु तडीस नेतां येतील. लढाईवर जाण्यानें तुझें लेशमात्रही नुकसान व्हावयाचें नाहीं."

" माझा निश्चय न होण्याचें कारण अगदीं भिन्न आहे," वुइल्यम ह्मणाला.

" तें कोणतें?"

" तुम्हांस माझ्या पित्याची आणि त्यांच्या मतांची माहिती असेलच."

" होय. कां बरें असणार नाहीं? डॉ० लिटन मोठा संभावित आणि पापभीरु पुरुष होता. तो फाजील शांततावादी होता एवढेंच कायं तें. बाकी मनुष्य मोठा उत्तम. पण त्याचें आतां काय? सैन्यामध्यें मोठ्या हुद्याच्या जागेवर तुझी नेमणूक होईल अशी मी व्यवस्था करितों. तूं आपला निश्चय एकदांचा करून टाक म्हणजे झालें."

" तुह्मी माझ्याबद्दल कळकळ व्यक्त करितां याबद्दल मी तुमचा फार आभारी आहें. पण सैन्यांत सामील व्हावयाचें नाहीं असा निश्चय मी करून चुकलों आहें," वुइल्यम शांतपणें ह्मणाला.

" काय? युध्दांत सामील व्हावयाचें नाहीं असा निश्चय तूं करून चुकला आहेस? तसा निश्चय करण्याचें कारण काय?"

" ॲडमिरलसाहेब!" वुइल्यम ह्मणाला, " जी गोष्ट स्वतःच्या सद्सद्विवेकबुद्धीस पसंत नाहीं ती करणें बरें होईल काय?"

" नाहीं. स्वतःच्या सद्सद्विवेकबुद्धीच्या विरुद्ध कोणीही वर्तन करूं नये," ॲडमिरलनें उत्तर दिलें.

" युद्ध करणें केवळ अधर्म आहे; युद्ध सद्धर्मतत्त्वांस बाध आणणारें आहे; युद्ध नीतिमत्तेचा खून करणारें आहे; असें माझी सदसद्विवेकबुद्धि मला सांगते. लहानपणापासून माझ्या मनांत युद्धाविषयी अप्रीति वाणली

असून युद्धांचा कसा नायनाट होईल याचा विचार मी रात्रंदिवस करीत असतों. अशा परिस्थितींत समरांगणावर जाणें मला कसें प्रिय वाटेल ? ”

“ म्हणजे जर्मनीशीं युध्द करण्यांत इंग्लंडची चूक होत आहे अशी तुझी कल्पना आहे काय ? आम्ही युध्दास उभे राहिलों ते जर्मनांप्रमाणें आपली रक्तपाताची अभिलाषा पूर्ण करण्याकरितां उभे राहिलों असें तुला वाटतें काय ? असें वाटत असेल तर या पत्राकडे पहा. ” असें म्हणून त्यांनीं एक पत्र बुइल्यमपुढें धरिलें. “ आस्ट्रियाचा एक राजपुत्र मारला गेला एवढ्याच कारणामुळें सध्यांचें युद्ध सुरू झालें असें तुला वाटतें काय? सध्यांचें युद्ध म्हणजे जर्मनीस स्वतःच्या सामर्थ्याबद्दल वाटत असलेल्या असत्य अभिमानाचें प्रदर्शन होय. बिचारा आस्ट्रियाचा बादशहा सर्व्हियाचा खुलासा ऐकून स्वस्थ बसणार होता. पण हें कैसरला कसें पसंत पडणार ? त्यानें बळेंच आस्ट्रियास सर्व्हियाविरुद्ध युद्ध जाहीर करण्यास भाग पाडलें, आणि आपली कित्येक दिवसांची युद्धलालसा आतां पूर्ण होणार असा गर्व बाळगीत लक्सेंबर्ग, व बेलज्यम असलीं छोटीं राष्ट्रें पायाखालीं तुडवि-ण्यास प्रारंभ केला. बुइल्यम ! बेलज्यमसारख्या क्षीणबल मित्रराष्ट्रास मदत करणें आपलें अवश्य कर्तव्यकर्म नव्हे असें तुला वाटतें काय ? वाच, हें माझ्या हातांतील पत्र वाच. म्हणजे जर्मन लोकांनीं युद्ध करण्याची तयारी आज किती वर्षांपासून करून ठेविली आहे आणि जर्मनांच्या आडदांड वर्तनामुळेंच हातांत शस्त्र धरण्याचा आह्मांवर कसा प्रसंग आला आहे हें तुझ्या लक्षांत येईल. ”

बुइल्यमनें ॲडमिरलच्या हातांतील पत्र वाचलें. कांहीं वेळ विचार करून तो ह्मणाला—

“ तुह्मी ह्मणतां तें सर्व खरें आहे. पण यामुळें युद्धास थोडेंच न्याय्य स्वरूप येणार आहे ? ”

“ मग कैसर आणि त्याच्या राक्षसी इच्छेप्रमाणें नाचणारी त्याची सेना यांनीं चालविलेले अत्याचारच तुझ्या मतें न्याय्य आहेत काय ? बेलज्यमसारख्या निरुपद्रवी राष्ट्रावर चाल करून जाणें, पूर्वींच्या तहना-म्याचें रद्दी चिटोऱ्यापेक्षां अधिक महत्त्व न बाळगणें, हेंच जर तुला पसंत

...पाडा शाखा.
क्र. ... ७७

वाटत असेल तर इंग्लंडनें आपल्या अभिवचनाप्रमाणें बेल्जमला मदत करण्याचें ठरविलें आहे याबद्दल तुला वाईट वाटणें स्वाभाविक आहे."

"ॲडमिरलसाहेब," बुइल्यम आवेशानें ह्मणाला, "तुह्मी माझ्या ह्मणण्याचा वाटेल तसा अर्थ करा. माझी त्यास हरकत नाहीं. युद्ध हे संपूर्णपणें अधर्माचें, अनीतीचें व संकटपरंपरेचें मूळ असल्यामुळे—तें कैसरनें सुरू केलें असो किंवा इतरांनीं सुरू केलें असो, त्यांत तुह्मी उपकार करण्याच्या बुद्धीनें पडा किंवा फायदा करून घेण्याकरितां तुह्मी त्यांत सामील व्हा—तुमच्या बऱ्या-वाईट हेतूमुळें त्यांतील कुजकेपणा थोडाच नष्ट होणार आहे. धर्माचीं तत्त्वें एकमतानें युद्धाच्या विरुद्ध टाहो फोडीत असतांना युध्दास बऱ्यावाईट हेतूचा दुजोरा देऊन तें न्याय्य ठरविण्याचा प्रयत्न करणें ह्मणजे केवळ वेडेपणा नसून दुष्टपणा आहे. आपल्या पवित्र शास्त्रांतील कोणतें तत्त्व युध्द करा असा उपदेश करितें ? उलटपक्षीं युध्दांत पडणें केवळ अधर्म आहे असें ठिकठिकाणीं द्योतविलें आहे. अशा धर्मतत्त्वांस पायाखालीं तुडवून, ईश्वरी इच्छेचा अपमान करून, नीतीच्या तोंडास खुनाचे—एक दोन खुनांचे नाहीं, लक्षावधि खुनांचें—अमंगल रक्त फासण्याचा प्रयत्न करणें न्याय्य आहे असें ह्मणणें आणि त्यास धर्माची परवानगी आहे असें प्रतिपादणें ह्मणजे आपणास विचार करण्यास दिलेलें डोकें नसून मडकें आहे असें ह्मणण्यासारखें आहे."

"बस्स ! वुइल्यम, जास्त बोलूं नकोस." वृध्द ॲडमिरल संतापानें ह्मणाला. "आपल्या पवित्र शास्त्रांत जीं अनेक महत्तम-तत्त्वें आहेत त्यांपैकींच एक तत्त्व, सचोटीनें वागा व स्वतःचें वचन पाळा, असा आपणांस उपदेश करितें. आपल्या राष्ट्रानें बेल्जम देशास संकटाच्या वेळीं मदत करण्याचें वचन दिलें आहे. राष्ट्राचें वचन ह्मणजे जितक्या व्यक्तींनीं तें राष्ट्र तयार झालें आहे तितक्या सर्व व्यक्तींचें वचन होय असें ह्मणण्यास हरकत नाहीं. अर्थात् आह्मीं सर्व आंग्ल लोकांनीं एक जुटीनें बेल्ज्यमचें संरक्षण करण्याचें स्वतःच्या शिरावर घेतलें आहे. आमच्या राष्ट्रानें दिलेलें वचन पूर्ण करणें हें आह्मां सर्वांचें कर्तव्यकर्म आहे. सध्दर्मानें वागण्याची ऐट करणारा एखादा मनुष्य आपल्याच वचनास

बाध येईल असें वर्तन करूं लागला तर तो पुरा पातकी, अधर्मी व नीच आहे असें मी समजेन."

"पण, ॲडमिरलसाहेब !"

"वुइल्यम ! अधिक बोलण्याची माझी इच्छा नाहीं. आजपर्यंतच्या तुझ्या वर्तनावरून पहातां माझी चूक झाली हीच गोष्ट खरी. लिली तुझ्या-संबंधानें मला कितीतरी सांगे. माझ्या डिकवरही नसेल इतकें प्रेम माझें तुझ्यावर जडलें होतें. पण आतां त्याचा काय उपयोग ? जा; तुझ्या-सारख्या देशद्रोह्याचें तोंड पहाण्याची माझी इच्छा नाहीं, जा."

वुइल्यम मुकाट्यानें ॲडमिरलच्या वाचनालयांतून बाहेर पडला. तेव्हां नेल्सनसाहेब एक दीर्घ निश्वास टाकून दुःखित मुद्रेनें वुइल्यम गेला त्या दिशेकडे पहात होते. आपण आपल्या पुत्राचीच दुःखपूर्ण भेट आतां घेतली असें त्या उदार मनाच्या गृहस्थास वाटलें.



# प्रकरण १ लें.

——:o:——

## प्रेमाचा होम !

मूनलाइट पॅलेसचा त्याग करण्यापूर्वीं ज्या ठिकाणीं आपली हृदयदयिता रहात आली त्या स्थानाकडे एकवार पहावें आणि मग आपला नीरस आयुष्यमार्ग कंठण्यास सुरवात करावी असा विचार करून वुइ-ल्यमनें मागें वळून पाहिलें; तों लिलीच आपणाकडे येत आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें. ॲडमिरलनें तर आपली हकालपट्टी केलीच; आतां लिलीच्या मुखांतून आपल्या दुःखपूर्ण आयुष्याचा निर्णय ऐकणें बाकी राहिलें आहे, असें वाटून तो अत्यंत कष्टी झाला. परंतु मनुष्यप्राणी आशावादी असतो. लिलीस आपल्या मतांचा उलगडा करून सांगावा म्हणजे तिच्या मनाची खात्री पटल्यास—

तितक्यांत लिली त्याच्याजवळ येऊन पोंचली. ती ह्मणाली—

" वुइल्यम ! थांब, क्षणमात्र थांब. तूं आपला परवांचा विचार बदल-लास किंवा नाहीं तें मला ऐकूं दे. "

वुइल्यम कांहींच बोलला नाहीं.

" तुझ्या मौनावरून कांहीं चांगलें लक्षण दिसत नाहीं. समरांगणावर जाऊन मर्दाचें काम करण्यास लाभलेली सोन्यासारखी संधि तूं गमावणार. जराग्रस्त पुरुषाप्रमाणें अथवा एखाद्या बाळंतिणीप्रमाणें घरीं बसून तूं

च्यांडांचें अग्रेसरत्व पटकावणार ! बोल, वुइल्यम, असेंच करण्याचा तुझा विचार कायम झाला ना ?"

"लिली ! तूं वाटेल तें म्हण. मी माझ्या सदसद्विवेकबुध्दीनें आखलेल्या मार्गानें जाणार. मग लोक त्याबद्दल माझा तिरस्कार करोत, द्वेष करोत अथवा मला वाटेल तें म्हणोत. मी अधर्मानें कधींही वागणार नाहीं."

"वुइल्यम ! धर्माचे आणि सदसद्विवेकबुध्दीचे इतके कांहीं देव्हारे माजवावयास नकोत. मी परवाची भोळी व अज्ञ लिली राहिलें नाहीं. तुझें मीं परवांच्या दिवशीं संभाषण ऐकिलें तेव्हांपासून चालू युध्दासंबंधानें मी शक्य तितकी माहिती मिळविली आहे. आतां माझ्यापुढें तुला जो कांहीं खुलासा करावयाचा असेल तो कर. नुसतें युध्दास अपशब्द बोलून चालणार नाहीं."

"लिली," वुइल्यम म्हणाला, "मी माझ्या मतांचा पूर्वीं एकदां तुझ्याजवळ उल्लेख केला होता. पार्लमेंटमध्यें स्वतःचा शिरकाव करून मी युद्धावर कशी मोहीम करणार हें मीं तुला सांगितलें होतें. माझा पिता शांततावादी होता. खरा धर्म कशास म्हणावें हें तो उत्तम रीतीनें जाणून होता. 'शत्रूचाही द्वेष करूं नको, कोणीं तुझ्या डाव्या गालावर मारिलें तर तूं स्वतःचा उजवा गाल त्याच्यापुढें कर; पण क्रोधाविष्ट होऊन त्याचा सूड उगविण्याची इच्छा मनांत धरूं नकोस. तसें करणें अधर्म आहे," असें आपल्या धर्माचीं तत्त्वें आपणास सांगतात. त्यांचा अनादर करून अंगांत स्वाभाविकपणें खिळलेली जालीम युद्धलालसा तृप्त करण्याकरितां झटणें म्हणजे आम्ही एकदां रानटी स्थितींत होतों; इतकेंच नव्हे त्या रानटी स्थितीचें पूर्ण द्योतक जें युद्ध तें आम्ही अद्याप प्रिय मानतों, असें दाखविण्यासारखें आहे."

"वुइल्यम ! चालू महायुद्धांत रानटीपणा कोणीं केला, युद्धलालसा कोणीं व्यक्त केली हें तुला माहीत नाहीं असें दिसतें."

लिलीस पुरें न बोलूं देतां वुइल्यम म्हणाला—"मला सर्व कांहीं माहीत आहे. सर्व गोष्टींचा पूर्ण विचार करूनच मी बोलत आहें."

याच्या राजपुत्राचा वध झाला. तेंच कारण पुढें करून जर्मनीनें कित्येक दिवस सज्ज करून ठेविलेलें शस्त्र उचललें, आणि अविचारमदाच्या जोरांत वाटेल तसे अत्याचार करण्यास सुरवात केली. जर्मनीनें काय काय अत्याचार केले, आपलीं वचनें कुजक्या दोराप्रमाणें कशीं तटातट तोडिलीं आणि योग्यायोग्यतेचा विचार न करितां जिकडे तिकडे कसा प्रलय तांडला हें तुला ठाऊक आहेच. ”

“ असेल. कैसरची युध्दप्रियता अधिक तीव्र असेल. युध्दास प्रारंभ करण्यांत कैसरनें महान् अपराध केला असेल, युरोपच्या शांततेचा संहार करण्यांत कैसरनें पुढाकार घेतला असेल. परंतु एवढ्याच कारणामुळें युध्दांतील पातकीपणा, अनाचार, अधर्म आणि संकटपरंपरा कमी होणार आहे काय ? ज्या तरुणांनीं स्वधर्माचा प्रसार करण्याकरितां झटलें पाहिजे, ज्या तरुणांनीं नीतीनें वागून आपली मनःस्थिति उत्तरोत्तर उच्च करण्यास झटलें पाहिजे, ज्या तरुणांनीं ईश्वरी कार्यास मदत करून आपला आत्मा परमात्म्याइतका विमल करण्यास झटलें पाहिजे त्या तरुणांना सैतानांनींही प्रवेश करूं नये अशा घाणेरड्या व पातकी समरांगणावर जाण्यास प्रोत्साहन देणें अधर्म आहे. ”

“ कोणत्याही सबबीमुळें युद्धास न्याय्य स्वरूप येणार नाहीं असं तुझं मत आहे काय ? ”

वुइल्यमनें आपला होकार दर्शविला. त्यावर लिली म्हणाली:—

“ इंग्लंडचा पुरा निःपात करण्याच्या उद्देशानें सोळाव्या शतकांत स्पेनचा राजा फिलिप यानें इंग्लंडवर स्वारी केली ही गोष्ट तूं अनेक वेळां वाचली असशील. त्या वेळीं तुझ्या तत्त्वाप्रमाणें आपले वाडवडील स्वस्थ बसले असते आणि विजयश्रीनें फिलिपच्या गळ्यांत माळ घातली असती तर आज आपल्या मातृभूमीची काय स्थिति झाली असती ! आपलीं घरें-दारें, आपली मालमत्ता, आपली संपत्ति परक्यांच्या स्वाधीन झाली असती. इतकेंच नव्हे, तर आपलें प्राणप्रिय स्वातंत्र्य आणि आपल्या प्राणापेक्षांही प्रिय असा आपला धर्म नामशेष झाला असता. ड्रेक, हॉकिन्स आणि त्या काळीं प्रख्यातीस आलेले इतर रणबहादुर यांनीं आपल्या देशावर

आलेलें संकट किंचित्‌ही हालचाल न करितां पहात रहावें अशी ईश्वरी इच्छा होती असें तुला वाटतें काय ? "

वुइल्यम कांहींच बोलला नाहीं.

तेव्हां लिली म्हणाली—

" सोळाव्या शतकांत इंग्लंडला जो शत्रु उत्पन्न झाला होता त्याच्यापेक्षांही बलाढ्य शत्रूशीं सध्यां प्रसंग आहे. त्याच्याबरोबर दोन हात करून त्यास दांतीं तृण घेऊन शरण येण्यास भाग पाडण्याचें शौर्य आणि तेज आज इंग्लंडमध्यें आहे. माझ्या मातृभूमीचे सुपुत्र आपल्या अलौकिक शौर्यानें समरभूमि दणाणून सोडतील, जर्मनांस स्वतःच्या सामर्थ्याबद्दल असलेला वृथा गर्व छाटून टाकतील आणि वर्तमान, भूत आणि भविष्य या कालांच्या आकाशांत सूर्याप्रमाणें तळपत राहील असें क्षात्रतेज गाजवून मातृभूमीच्या इभ्रतीची चाड राखतील. वुइल्यम ! हल्लींचें महायुध्द संपल्यानंतर वीरश्रीच्या प्रेमास प्राप्त झालेली तरुण मंडळी जें सौख्य, वैभव आणि सन्मान उपभोगतील त्यांतील स्वतःचा सिंहाचा भाग उचलल्याशिवाय मात्र तूं राहूं नकोस म्हणजे झालें. कर्तबगारी न करितां फलप्राप्तीचा सुखानुभव घेण्याची बरी युक्ति काढलीस. "

" लिली ! असें बोलणें योग्य नाहीं. "

" छे. मी एक अक्षरही अयोग्य बोललें नाहीं. भीरूनें स्वतःवर होणाऱ्या शब्दप्रहाराबद्दल वाईट कां वाटून घ्यावें ? मी तुला काय अयोग्य बोललें? "

" लिली ! तुझ्या प्रश्नास मला उत्तर द्यावयाचें नाहीं. कारण मीं तुझी कितीही समजूत घालण्याचा प्रयत्न केला तरी तो सर्वथैव फुकट जाणार हें मी समजून चुकलों आहें. लिली ! प्राणप्रिय लिली ! या युद्धाच्या क्षुल्लक कारणाकरितां तूं मला आपल्या हृदयांतून हाकून देणार ना ? लिलीचें पाणिग्रहण करणें या जन्मीं माझ्या नशिबीं आहे काय ? लिली ! तुझी मीं आशा धरावी कां—" पुढें वुइल्यमच्यानें बोलवलें नाहीं. "

तथापि लिली धैर्यानें म्हणाली, " तें सर्व तुझ्यावर अवलंबून आहे. "

" माझ्यावर अवलंबून आहे ? " क्षणार्धानें बुडणाऱ्या मनुष्यास एका लहानशा काडीचा आश्रय मिळाला.

" होय. तुझ्यावर अवलंबून आहे. पूर्वी ठरल्याप्रमाणें बाबांचें मत मीं तुझ्याविषयीं अनुकूल केलें आहे. पण "—

" लिली ! पुढचे शब्द उद्गारूं नकोस. माझ्या मनास होत असणाऱ्या दुःखाची तुला कल्पना नाहीं. "

" वुइल्यम ! मला जरा स्पष्टच बोललें पाहिजे. जो मनुष्य आपल्या मातृभूमीवर आलेल्या संकटाच्या वेळीं नामर्दासारखा स्वस्थ बसणार तो माझा पति होण्याच्या योग्यतेचा नाहीं. "

" लिली ! असा आघात माझ्या मनावर करूं नकोस. तुझी प्राप्ति करून घेण्यासाठीं स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीचा मला खून करावा लागेल इकडे लक्ष दे. "

वुइल्यमचे शब्द ऐकून लिली किंचिन्मात्र थांबली. शेवटीं ती दृढ निश्चयानें म्हणाली—" वुइल्यम ! भीरुता आणि मी यांतून तुला कोण अधिक प्रिय आहे ? जी अधिक प्रिय असेल तिचा तूं स्वीकार कर. "

" म्हणजे, लिली ! मी युद्धास न गेलों तर तूं माझा त्याग करणार काय ? "

" याचा तुला अजूनही संशय वाटतो ? " लिलीच्या आवाजांत करारीपणा भरला होता.

लिलीचे शब्द ऐकतांच वुइल्यमच्या मनावर जणूं विद्युत्पातच झाला. तो मागें सरकत सरकत तेथून निघून गेला.

वुइल्यम दिसेनासा झाल्याबरोबर लिलीचा आवेश, करारीपणा, आणि तिच्या वदनावरील अलौकिक तेज अदृश्य झालें. ती विगलित पुष्पाप्रमाणें एका आराम खुर्चीवर पडली आणि स्फुंदस्फुंदून रडूं लागली. आपण आपल्या हृदयेश्वरास मुकलों असें तिला वाटूं लागलें !

स्वातंत्र्याच्या वातावरणांत राहणारी ती बाला देशाकरितां प्रेमाचा होम करण्यास सज्ज झाली !

## प्रकरण १० वें.

## नामर्दाची निशाणी!

आ नंतर कांहीं दिवसपर्यंत सेंट जॉन या गांवांत युध्दाशिवाय दुसरें कांहींच ऐकूं येत नव्हतें. कोठेंही जा, युध्दाच्याच गोष्टी; अल्पवयस्क मुलापासून तों वृध्दापर्यंत तोच चर्चेचा विषय होऊन बसला होता.

कांहीं दिवसांनीं जर्मन लोकांनीं लीज किल्ल्यावर हल्ला चढविल्याची बातमी आली. बेल्जन लोक शौर्यानें टिकाव धरीत आहेत हें वर्तमान ऐकून सर्व साम्राज्याभिमान्यास अत्यंत अभिमान वाटला. आपले सैनिक केव्हां एकदांचे बेल्जन लोकांना साह्य करण्यासाठीं रणभूमीवर दाखल होतील असें प्रत्येकास झालें.

लीज किल्ला जर्मन लोकांनीं सर केल्याची व त्यानंतर लौकरच ब्रुसेल्स घेतल्याची भयंकर बातमी येऊन पोहोंचली. लॉरेन व अल्सेस हे प्रांत घेण्याचे फ्रेंच लोकांचे प्रयत्नही निष्फळ झाले. अदूरदर्शित्वामुळें फ्रेंच लोकांचें नुकसान होत आहे; नुसत्या प्रचंड सैन्यानें यशःप्राप्ति होणें नाहीं—त्यासाठीं हुषार सेनानायकाची जरूर आहे असें प्रत्येकास वाटूं लागलें. अर्थात् लॉर्ड किचनेर हे पॅरिसला गेले असून त्यांनीं आपल्या कुशल सल्ल्यानें युध्दाला नवीन दिशा लावून दिल्याचें वर्तमान ऐकून सर्वांना अत्यानंद वाटला.

“ आपल्या पक्षाला खात्रीनें यश मिळवून देणारा कोणी असेल तर ते

लॉर्ड किचनेर आहेत ! " प्रत्येकजण उद्गार काढी. " नेपोलियन बोना-पार्टच्या वेळीं जसे ड्यूक ऑफ् वेलिंग्टन होऊन गेले त्याप्रमाणें आजच्या प्रसंगीं लॉर्ड किचनेर हे आहेत. "

पण दिवसेंदिवस जर्मन लोक फ्रान्स देशांत अधिकाधिक दूरवर घुसत चालल्याच्या बातम्या येऊं लागल्या. एकदां शत्रूंनीं पॅरिस हस्तगत केल्या-वर मग काय राहिलें, असें प्रत्येकजण ह्मणूं लागला.

सर्व इंग्लंडांतून भराभर स्वयंसैनिकांच्या झुंडीच्या झुंडी युद्धभूमीवर जाण्यासाठीं तयार होत होत्या. पण कॉर्नवालनें या कामांत अद्याप फारशी उत्कटता व्यक्त केली नव्हती. सेंट जॉन येथील तरुणांना युध्दाचें स्वरूप समजून देण्यासाठीं व त्यांच्या मनामध्यें लढण्याविषयींची उत्सुकता उत्पन्न करण्यासाठीं सभा भरवावी असें शेवटीं नेल्सनसाहेबांनीं ठरविलें.

आतांशा वुइल्यम फारसा बाहेर जात नव्हता. तो बहुधा घरांतच बसून राही. त्याच्या मनांत दोन परस्परविरुद्ध विकारांचें तुंबळ युद्ध चाललें होतें; एक स्वतःच्या देशावरील उत्कट प्रेम व दुसरा युद्धाविषयीं मनस्वी तिर-स्कार. रस्त्यानें जात असतां प्रत्येकजण आपणाकडे पाहून चेष्टेनें हसतो व आपला तिरस्कार करतो असें वुइल्यमला वाटे.पण खरा प्रकार तसा नव्हता. युद्धद्वेष्ट्या डॉक्टर लिटनचा हा पुत्र आहे, अर्थात् तो लढाईला जाणार नाहीं हें पुष्कळांस माहीत होतें.

एके दिवशीं सेंट जॉन येथील प्रत्येक रहदारीच्या ठिकाणीं पुढील मज-कुराच्या जाहिराती दृग्गोचर होऊं लागल्याः—

" गुरुवारीं सायंकाळीं टौन हॉलमध्यें एक जंगी जाहीरसभा भरणार असून, इंग्लंड युद्धांत सामील कां झालें व आपल्या देशासाठीं लढण्यास तयार होणें हें प्रत्येक देशाभिमानी तरुणाचें कसें कर्तव्य आहे हें श्रोत्यांस समजावून दिलें जाणार आहे. सभेचें अध्यक्षस्थान ॲडमिरल नेल्सन हे अलंकृत करणार असून सेंट जॉनतर्फेचे पार्लमेंटचे सभासद व कॅप्टन लेनॉ-क्स यांचीं भाषणें होणार आहेत. ज्याला ज्याला आपल्या देशाच्या स्वातं-त्र्याची, आपल्या देशाच्या बडेपणाची आणि आपल्या देशाच्या अब्रूची चाड असेल त्यानें या सभेस हजर राहिलें पाहिजे. "

" मी मुळींच सभेस जाणार नाहीं," वुइल्यम स्वतःशीं ह्मणाला. " युद्धाचीं कारणें मला माहीत आहेत." पण जसजसा सभेचा दिवस व समय जवळ येत चालला तसतशी त्याची जाण्याविषयींची उत्कंठा वाढूं लागली.

अलीकडे वुइल्यमचें आणि त्याच्या मातुःश्रीचें फारसें भाषण होत नसे. आई आपल्या भित्रेपणाबद्दल आपला तिरस्कार करते असें त्याला वाटत होतें.

"तूं सभेला जाणार ना ?" तिनें वुइल्यमला विचारिलें.

वुइल्यम खालीं मान घालून स्तब्ध राहिला.

" कॅप्टन लेनॉक्स हा लौकरच समरांगणावर जाणार आहे. केवळ आजच्या सभेसाठीं तो येथें येणार असल्याचें समजतें," वुइल्यमची मातुःश्री पुनः बोलूं लागली. "त्याच्या शौर्यामुळें व दृढ निश्चयामुळें जिकडे तिकडे त्याची वाहवा होत आहे. लिली सुद्धां नर्स ह्मणून फ्रान्सला जाणार आहे असें मी ऐकितें."

लिलीचें नांव व तिचा बेत ऐकून वुइल्यमचें हृदय धडधडूं लागलें. लज्जेनें त्यानें खालीं मान घातली.

वुइल्यमची मातुःश्री पुढें बोलूं लागली—" काल कॅप्टन लेनॉक्स मून-लाइट पॅलेसमधेंच होता. नेल्सनसाहेब त्याची फारच स्तुति करतात. आजच्या सभेला लिलीही हजर राहीलसें दिसतें. ती नेहमीं आपल्या पित्या-बरोबर असते. अर्थात् नेल्सनसाहेब अध्यक्षस्थान स्वीकारणार असल्यामुळें तीही प्लॅटफॉर्मवर अधिष्ठित होईल."

वुइल्यमच्या मनांत अनेक त्रासदायक विचारांचें काहूर माजलें—"पहि-ल्यापासून नेल्सनसाहेबांची कॅप्टन लेनॉक्सवर मर्जी होतीच. आतां तर त्याचेवर त्यांची फारच बहाल मर्जी होणार यांत संशय नाहीं. कॅप्टन लेनॉक्सनें स्वदेशाच्या संरक्षणासाठीं किंचित्‌ही अनमान न करितां कंबर बांधिली. मी मात्र देशभक्तीच्या व सदसद्विवेकबुद्धीच्या दुहेरी कचाट्यांत सांपडलों आहें !"

सभामंडपामधील देखावा त्यानें आपल्या कल्पनेनें डोळ्यांसमोर आणिला. कॅप्टन लेनॉक्स आवेशयुक्त स्वरांत आपल्या देशाची तरफदारी करीत आहे,

त्याचें देशाभिमानपूर्ण भाषण श्रवण करून संतुष्ट झालेले लोक टाळ्यांच्या कडकडाटानें त्याचें अभिनंदन करीत आहेत व त्याच्या जवळच आसनस्थ असलेली लिली त्याच्याविषयींच्या आदरभावानें प्रसन्न होत्साती आपलें प्रेमसर्वस्व मनांतल्यामनांत त्यास अर्पण करीत आहे, असा बुइल्यमला भास झाला.

त्या दिवशीं बुइल्यम सभेस गेला. अद्याप व्याख्याते येण्याची वेळ झाली नव्हती. तथापि संपूर्ण सभामंडप श्रोतृजनांच्या गर्दीनें ठेंचून भरला होता. देशाभिमानाच्यीं गाणीं चोहोंकडून स्मृतिपटलावर आदळत होतीं. बुइल्यमचें सर्वांग रोमांचित झालें. स्वदेशासाठीं लढण्यांत व आपल्या देशबांधवांच्या स्वातंत्र्यासाठीं प्राण अर्पण करण्यांत कांहीं तरी विशेष आहे असें त्यास वाटूं लागलें. पण त्याच क्षणीं युद्धाचें भयंकर स्वरूप त्याच्या योगानें होणारे लोकांचे विलक्षण हाल, उद्ध्वस्त झालेलीं घरेंदारें वगैरेंचा करुणोत्पादक देखावा त्याच्या मनश्चक्षूपुढें उभा राहिला. आजच्या व्याख्यानाचा आपल्या मनावर कांहींएक परिणाम होणार नाहीं अशी त्याची खात्री झाली.

जाहीर केलेल्या वेळीं अध्यक्ष व वक्ते टाळ्यांच्या प्रचंड गजरांत प्लॅटफॉर्मवर येऊन बसले. नेल्सनसाहेबांच्या पाठोपाठ लिली आहे हें पहातांच बुइल्यमचें हृदय द्विधा झालें. त्यानें तिजकडे न पहाण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण त्यांत त्याला यश आलें नाहीं. तिची व त्याची दृष्टादृष्ट झाली. ती दृष्टिभेट क्षणमात्र टिकली. पण तेवढ्यानें बुइल्यमच्या हृदयांत केवढी खळबळ उडाली ! लिलीच्या कपोलांवर एकदम पसरलेली रक्तच्छटा, तिच्या ओष्ठांवर विलसणारें तिरस्कारपूर्ण स्मित आणि तिच्या चेहऱ्यावरील क्रोधाची छटा हीं त्यानें पाहिलीं. आपण तिला कायमचे मुकलों असें त्यास वाटलें.

आरंभीं नेल्सनसाहेबांनीं इंग्लंडच्या प्राचीन कर्तबगारीचें, न्यायप्रियतेचें व शौर्याचें वर्णन केलें व सध्यां इंग्लंडला शूर तरुणांची किती गरज आहे हें सांगितलें.

त्यानंतर सेंट जॉन् तर्फे असलेल्या पार्लमेंटमधील सभासदाचें भाषण झालें; पण त्याचा श्रोतृसमूहावर विशेषसा परिणाम झाला नाहीं. लोकांच्या

मनांत आवेश उत्पन्न करण्यास कशाची तरी जरूर होती. तें " कांहीं तरी " अद्याप व्याख्यात्यास सांपडलें नव्हतें. अध्यक्षसाहेबांनीं कॅप्टन लेनॉक्स यास आपलें भाषण करण्याची सूचना दिली.

कॅप्टन लेनॉक्स उठून उभा राहिलेला पहातांच वुइल्यमच्या हृदयांत मत्सरबुद्धीचें साम्राज्य पसरलें. शिपाईगड्याच्या झोकदार वेषांत लेनॉक्स फारच शोभत होता. तो आधींच तरुण व देखणा होता; त्याच्या पूर्वजांचीं नांवें इतिहासप्रसिद्ध होतीं; व त्याच्या देशाभिमानपूर्ण वर्तनाची या गोष्टींत भर पडल्यामुळें तर तो प्रत्येकास विशेषच आदरणीय वाटत होता.

त्यानें भाषणास प्रारंभ केला:—

" मी वक्ता नाहीं; आजपर्यंत कोठें सार्वजनिक ठिकाणीं भाषण केल्याचेंही मला स्मरत नाहीं. मी एक सामान्य शिपाई आहें; मी लौकरच समरांगणावर जाणार असून मी कशाकरितां जात आहें येवढेंच तुह्मांला सांगण्यासाठीं उभा राहिलों आहें. "

त्याच्या शब्दांत कळकळ व्यक्त होत होती; त्याच्या अंतःकरणापासून निघत असलेले उद्गार प्रत्येकाच्या हृदयाला झोंबले. वुइल्यमला तर ते फारच लागले. " मी लवकरच समरांगणावर जात आहें, " हेंच वाक्य प्लॅटफॉर्मवर उभें राहून आपल्यालाही उच्चारतां आलें असतें तर किती छान झालें असतें असें त्यास वाटूं लागलें.

" सद्गृहस्थहो, " लेनॉक्स पुढें बोलूं लागला, " तुमचें आम्ही सदैव संरक्षण करूं, असें वचन खुद्द कैसरनें बेल्जमला दिलें होतें; तें त्यानें निर्लज्जपणानें मोडलें. पण आपले मुत्सद्दी म्हणाले, आम्हीं ब्रिटिश लोकांनींही बेल्जमला तशाच प्रकारचें वचन दिलें आहे आणि ब्रिटिश लोकांच्या उज्ज्वल यशाला शोभेल अशा रीतीनें आम्ही आपल्या वचनाचा प्रतिपाल करणार आहोंत; मग त्या कामीं आमच्या देशांतील प्रत्येक पैसा आणि प्रत्येक मनुष्य खर्ची पडला तरी हरकत नाहीं. तुह्मी बेल्जमला दिलेलें वचन मोडाल तर आह्मी तुमच्याविरुद्ध युद्ध जाहीर करूं असा निरोप आपल्या थोर मुत्सद्यांनीं कैसरला पाठविला होता. पण कैसरनें समाधानकारक उत्तर दिलें काय ? मुळींच नाहीं. त्यानें मुळीं उत्तरच दिलें

नाहीं. अशा प्रसंगीं जर्मनीविरुद्ध युद्ध जाहीर केल्यावांचून गत्यंतर होतें असें तुम्हांस वाटतें काय ?"

"नाहीं ! नाहीं !" एकच प्रचंड ध्वनि झाला.

"असें जर आहे तर आपलें कर्तव्य करण्यास तयार व्हा ! आपल्या राष्ट्राचें वचन—आपल्या राष्ट्राची अब्रू—आपल्या राष्ट्राचें उज्ज्वल यश रक्षण करण्यासाठीं कंबर बांधा ! अखिल मानवजातीच्या शत्रूचा नायनाट करण्यासाठीं सज्ज व्हा ! अशा प्रसंगीं मागें घेणाऱ्या तरुणांना मी काय म्हणेन असें तुम्हांस वाटतें ? मी त्यांना म्हणेन कीं, तुह्मी भ्याड आहां—आपल्या देशास कलंकभूत आहां—आपल्या मातृभूमीची विटंबना करणारे नरपशु आहां !"

श्रोतृजनांनीं टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटांत कॅप्टन लेनॉक्सच्या नांवाचा, जन्मभूमीचा व स्वातंत्र्यदेवतेचा जयघोष केला. द्विगुणित आवेशानें लेनॉक्स पुढें बोलूं लागलाः—

"या कामीं आमच्या देशाला तरुण भगिनींकडूनही पुष्कळ साह्य होण्यासारखें आहे. युद्धापासून माघार घेणाऱ्या आपल्या प्रियकरांची तुह्मी निर्भर्त्सना करा—त्यांच्या तोंडावर त्यांना भ्याड, नामर्द ह्मणा—त्यांची चार लोकांसमक्ष, नव्हे या सभामंडपांत छी थू करा ! हीं पहा ! माझ्या बगलेंत पुष्कळशीं पांढरीं पिसें मी मुद्दाम घेऊन आलों आहें. ज्या ज्या तरुणीचा प्रियकर लढाईस जाण्याला कांकूं करीत असेल त्या त्या तरुणीनें एक एक पांढरें पीस आपल्या प्रियकराला बक्षीस द्यावें ! त्यांच्या भ्याडपणाची—त्यांच्या नामर्दपणाची ही एक निशाणीच होऊं द्या !" असें म्हणून त्यानें पिसांचा गुच्छ मेजावर टाकला व श्रोतृसमूहाच्या प्रचंड अभिनंदनपर आरोळ्यांच्या गडगडाटांत आपलें आसन ग्रहण केलें.

सभा बरखास्त झाली. नेल्सनसाहेब, कॅप्टन लेनॉक्स वगैरे मंडळी घरीं जावयास निघाली. जातां जातां लेनॉक्स व लिली वुइल्यमकडे आली. लेनॉक्स ह्मणाला—

"वुइल्यम, तूं स्वयंसैनिकांच्या यादींत स्वतःचें नांव दाखल केलें

कीं नाहीं ? लष्करी शिक्षण घेतलेला तूं मनुष्य; तूं आपल्या देशासाठीं समरांगणावर जाण्यास सज्ज होणार नाहींस तर करणार काय ? "

लेनॉक्सच्या शब्दांच्या तिरस्कारव्यंजक स्वरानें वुइल्यमचें हृदय विद्ध केलें. लिली आणखी काय बोलणार हें त्याला समजेना.

" तूं मग आपल्या राष्ट्राची अब्रू संरक्षण करण्याच्या कामीं साह्य करणार कीं नाहीं ? " आवेश-कंपित स्वरांत लिलीनें प्रश्न केला.

लिली आपणास ही शेवटची संधि देत आहे असें वुइल्यमला वाटलें. पण त्याच्यानें कांहीं बोलवलें नाहीं. त्यानें फक्त मानेनें नकार दर्शविला.

" असें आहे तर हें पीस माझ्यापासून बक्षीस घे ! " पीस त्याच्या अंगावर टाकून लिली उद्गारली. " त्याचा तुला मोठा अभिमान वाटेल ! व अशा प्रसंगीं तूं भूषण म्हणून तें टोपींत खोंवून मिरविशील अशी माझी खात्री आहे. "

हे अपमानकारक शब्द वुइल्यमच्या काळजाला झोंबले. तो खालीं मान घालून स्तब्ध राहिला.

" कॅप्टन, " लिली ह्मणाली, " चला. आपणांस गेलें पाहिजे. " तीं दोघेंजण निघून गेलीं.

काय करावें हें वुइल्यमला सुचेना. आपण केलेला निश्चय तडीस न्याव-याचा असा त्याचा संकल्प होता.

आतां त्याला कॅप्टन लेनॉक्सच्या शब्दांचें स्मरण झालें:—

" या सामन्यांत तुझा विजय झाला; पण अन्यत्र मी विजयश्रीला हस्त-गत करीन ! "

" मुकलों ! मी तिला कायमचा मुकलों ! पण मी तरी काय कर-णार ! " वुइल्यम स्वतःशीं उद्गारला.



# प्रकरण ११ वें.

—:०:—

## युद्ध सद्धर्मतत्त्वांस संमत आहे काय?

“आई !” घरीं येतांच वुइल्यम ह्मणाला, “मी उद्यां गांवाला जाणार!”

“कोठें?”

आपल्या मुलानें स्वदेशरक्षणासाठीं सैन्यांत दाखल व्हावें अशी वुइल्यमच्या मातुःश्रीची फार इच्छा होती. तो तसें करण्यास तयार नाहीं असें पाहून तिनें त्याच्यावर भीरुत्वाचा आरोप केला होता. तो गांवाला जातो—अर्थात् सैन्यांत दाखल होण्याकरितां तो जात असेल असें वाटून तिनें “कोठें?” असा उत्सुकतेनें प्रश्न केला.

“ऑक्सफर्डला,” वुइल्यमनें उत्तर दिलें.

त्याची मातुःश्री निराश होऊन ह्मणाली, “वुइल्यम! तूं सैन्यांत दाखल व्हावेंस अशी माझी मनापासून इच्छा आहे. पुत्रवियोगाचें व त्याच्यावरील प्राणांतिक संकटांचें जबर दुःख मला सहन करावें लागेल यांत संशय नाहीं, पण आपला पुत्र नामर्दपणाचा अंगीकार करून मातृभूमीच्या रक्षणाच्या पवित्र कर्तव्यापासून विमुख झालेला पाहण्याचें दुःख त्याहून तीव्रतर आहे.”

“आई! मी नामर्द नाहीं—मी युद्धाला, मरणाला भीत नाहीं. धर्म-

तत्त्वें माझ्या जाण्याच्या आड येत आहेत. मी वस्तुतः तुम्हां सर्वांच्या इच्छेबरहुकूम वागण्यास किती उत्सुक आहें, पण करणार काय ? सद्-सद्विवेकबुद्धीचा खून माझ्यानें करवत नाहीं. नाहींतर जनापवादाचा त्रास मीं निष्कारण कां सोशिला असता? थोडेंसें मनःस्वास्थ्य लाभावें ह्मणून मी बाबांचे स्नेही प्रोफेसर रेंथॉल यांच्या भेटीस जात आहें. ''

त्यावर वुइल्यमची मातुःश्री कांहीं बोलली नाहीं.

दुसरे दिवशीं प्रातःकाळीं वुइल्यम स्टेशनवर गेला. तेथें लोकांची खूप गर्दी जमली होती. तपासाअंतीं त्याला समजलें, कीं कॅप्टन लेनॉक्सला पोंचविण्यास ही मंडळी जमली आहे. थोड्याच वेळानें नेल्सनसाहेबांच्या मोटारींतून लेनॉक्स उतरला. त्याच्या पाठोपाठ लिली व नेल्सनसाहेबही बाहेर आले.त्यांनीं वुइल्यमला पाहिलें; पण त्याच्याशीं त्यांपैकीं कोणीच बोललें नाहीं. आपणांला ते तिरस्कारानें लेखतात ही जाणीव वुइल्यमला असह्य वेदना देऊं लागली.

स्टेशनवर हजर असलेल्या लोकांपैकीं प्रत्येकजण प्रेमानें लेनॉक्सबरोबर हस्तांदोलन करूं लागला व त्याला यश इच्छूं लागला. एकजण तर मोठ्यानें ह्मणाला, '' कॅप्टनसाहेब, काल आपण पांढरें पीस देण्याची युक्ति काढली ती फारच नामी होती. कर्तव्यविन्मुख लोकांची अशीच फजिती व्हावयास पाहिजे. ''

'' ती युक्ति माझी नव्हती, '' लेनॉक्सनें उत्तर दिलें. '' ती सुचविण्याचा मान लिलीस—नेल्सनसाहेबांच्या कन्येस—दिला पाहिजे. ''

मंडळींनीं तत्काळ लिलीच्या नांवाचा अभिनंदनपर शब्दांनीं त्रिवार घोष केला. लिली सलज्ज व रोमांचित वदनानें खालीं मान घालून उभी राहिली.

गाडी स्टेशनांत दाखल झाली. कॅप्टन लेनॉक्स आंत बसत असतां नेल्सनसाहेब आवेशानें उद्गारले, '' गृहस्थहो ! आपल्या कॅप्टनचा जयजयकार करा ! तो आपल्या मातृभूमीसाठीं—तिच्या पवित्र यशाचें रक्षण करण्यासाठीं व सर्व मानवजातीचें स्वातंत्र्य सांभाळण्यासाठीं लढण्याला

जात आहे ! या पवित्र कर्तव्यापुढें स्वतःच्या प्राणांची देखील तो पर्वा बाळगीत नाहीं. त्याचा जयजयकार करा ! ''

वुइल्यम ह्याच गाडींत बसून जाणार होता; पण त्याला कोणींच विचारिलें नाहीं. '' कर्तव्यपराङ्मुख '' ही पदवी त्याला मिळाली होती.

वुइल्यम ऑक्सफर्ड येथें पोंचला तेव्हां सायंकाळ झाली होती. पण त्याच वेळीं प्रोफेसर रॅथॉलची भेट घ्यावयाचा त्याचा विचार असल्याकारणानें तो थेट त्यांच्या घरीं गेला. प्रोफेसरसाहेबांनीं त्याचें स्वागत करून ह्मटलें—

'' वुइल्यम, तुला पाहून मला फार आनंद होतो. मला मनःस्वास्थ्याचा लेशही आतांशा अनुभवण्यास मिळत नाहीं. जिकडे तिकडे युद्ध ! सद्धर्मतत्त्वांचा विचार लोकांच्या स्वप्नांत तरी येतो कीं नाहीं याची शंकाच आहे ! ''

वुइल्यम—'' मीही त्याच गोंधळाला कंटाळून तुमच्या भेटीस आलों. प्रोफेसरसाहेब, इंग्लंड युद्धांत सामील झालें यासंबंधानें तुमचें मत काय आहे ? ''

प्रोफेसर—'' स्वतःच्या उज्ज्वल यशासाठीं—अब्रूसाठीं—आपलें राष्ट्र युद्धांत सामील होत आहे असें आपण ऐकतों. पण ही सबब कोणत्या युद्धांत इंग्लंडनें पुढें केलेली नाहीं ? परवांच्या बोअर युद्धांत कसला मोठेपणा—कसलें उज्ज्वळ यश पालथें पडत होतें ? हें सर्व फोल आहे. सध्दर्माच्या दयाळु तत्त्वांचा भीषण व रक्तपातप्रिय युध्दाशीं कसा मेळ घालावयाचा ? ''

वुइल्यम—'' तें सर्व खरें. पूर्वींचीं युध्दें न्याय्य होतीं कीं अन्याय्य होतीं याच्याशीं आपणांला कर्तव्य नाहीं. सद्यःस्थितिसंबंधानें आपण बोलूं या. कोणत्याही सबबीवर, कसलीही परिस्थिति आली तरी—कांहींही कारणें उत्पन्न झालीं तरी युध्दास उभें राहणें अन्याय्यच आहे काय ? या युध्दांत कैसरचा येथून तेथून पाजीपणा आहे अशी माझी खात्री आहे. त्याला जगांत सत्ता पाहिजे आहे—दुसऱ्याचा मुलूख अन्यायानें काबीज करण्याची त्याची दुष्ट इच्छा आहे; अशा प्रसंगीं इंग्लंडसारख्या राष्ट्रानें

कैसरची दुष्ट महत्त्वाकांक्षा हाणून पाडण्यासाठीं युध्दांत सामील होणें सध्दर्मतत्त्वांस संमत आहे कीं नाहीं ? ”

“ केव्हांही नाहीं ! ” प्रोफेसरसाहेब आवेशानें उद्गारले.

वुइल्यम—“ एकूण तुमचें ह्मणणें कैसरला वाटेल तें करूं द्यावें असें आहे काय ? बेल्जम, फ्रान्स इत्यादि राष्ट्रांना चिरडून टाकण्यास त्याला पूर्ण मुभा द्यावी असें तुमचें मत आहे काय ? ”

प्रोफेसर—“ मी तसें ह्मणत नाहीं. माझें ह्मणणें इतकेंच कीं, मानवजातीच्या कोणत्याही व्याधीवर युद्ध हा कांहीं उपाय नव्हे. त्यापासून मानवजातीचें केव्हांही कल्याण होणें शक्य नाहीं. रक्तपात, खून, दारिद्र्य, दुर्भिक्ष्य इत्यादि भयंकर गोष्टींना प्रसवणारें युद्ध केव्हांही सध्दर्मतत्त्वांस संमत असणें शक्य नाहीं. ”

वुइल्यम—“ ती नेहमींची गोष्ट झाली. जर्मनीनेंच मुळीं युद्धाला उभें रहावयास नको होतें, हें मी मान्य करतों. युद्ध ही वाईट गोष्ट आहे हेंही खरें. पण सद्यःस्थितींत काय करावयाचें हें आपण पाहिलें पाहिजे. जर्मनीनें दुष्टपणा केला ही गोष्ट खरी. बेल्जमशीं केलेला तह कैसरनें पायाखालीं तुडविला. फ्रान्सचा नाश करण्यास तो नीचपणानें उद्युक्त झाला. अशा वेळीं इंग्लंडसारख्या सामर्थ्यशाली राष्ट्रानें काय करावयास पाहिजे ? त्याला स्वस्थ बसणें शोभेल काय ? बेल्जम व फ्रान्स या राष्ट्रांना, त्यांच्या संरक्षणार्थ तहानें बांधल्या गेलेल्या इंग्लंडनें साह्य करणें हें त्याचें परमपवित्र कर्तव्य नाहीं काय? चोहोंकडे ‘ युध्दास तयार व्हा ! आपल्या देशाचें नांव राखण्यासाठीं कंबर बांधा ! ’ असा पुकारा देशभर ऐकूं येत असतांना खऱ्या सध्दर्मानुयायानें काय करावयाचें ? ”

प्रोफेसर—“ या प्रश्नाला फक्त एकच उत्तर आहे. सध्दर्मप्रणेत्यानें केलेल्या सदुपदेशाप्रमाणें त्यानें वागलें पाहिजे. जगभर शांतता नांदावी, अखिल मनुष्यजातीनें एकमेकांशीं भावंडांप्रमाणें प्रेमानें वागावें, हें उदात्त व थोर तत्त्व शिकविणाऱ्या सध्दर्मोत्पादकाची आज्ञा मान्य केली पाहिजे. आपण जर्मनीचा पराजय केला नाहीं तर तो एखाद्या दिवशीं आपल्या स्वातंत्र्यावर घाला घालणार असें आपण ऐकतों ही गोष्ट खरी, पण आप-

त्याला या गोष्टीशीं काय कर्तव्य आहे! ही सर्व सृष्टि व तिचे व्यवहार त्रिजगच्चालक परमेश्वराच्या आधीन आहेत. त्याच्या इच्छेप्रमाणें-त्यानें सध्दर्मोपदेशाच्या द्वारें व्यक्त केलेल्या स्वतःच्या इच्छेप्रमाणें--आपणांस वागलें पाहिजे. प्रत्येक जण कांहींतरी सबब काढून त्याची आज्ञा मोडूं लागल्यावर जगाच्या कल्याणाची व उन्नतीची आशाच नको!"

प्रोफेसरसाहेबांचें भाषण ऐकून वुइल्यमचें समाधान झालें. आपण केलें तें योग्य केलें असें त्यास वाटलें. पण अद्याप त्याच्या शंका समूळ नष्ट झाल्या नव्हत्या. प्रोफेसरांचें कोठेंतरी चुकतें, असें त्याला वाटत होतें. पण कोठें, हें सांगावयाचें सामर्थ्य त्याच्यामध्यें नव्हतें.

रात्रीची वेळ होती. वुइल्यम आपल्या बिऱ्हाडाकडे चालला होता. इतक्यांत त्याला एका स्त्रीचा आर्तस्वर ऐकूं आला. तो जवळ येऊन पहातो तों एका रानटी मनुष्यानें तिला पकडली असून तो तिला यथेष्ट चोप देण्याच्या रंगांत आहे असें त्यास दिसून आलें. विशेष विचार करण्यांत वेळेचा अपव्यय न करितां वुइल्यम एकदम त्या रानटी इसमावर धांवून गेला व त्यास एका रट्टयासरसें त्यानें जमीनिवर लोळविलें. पण त्याच क्षणीं त्या इसमाच्या साह्यास दुसरा एक मनुष्य येऊन त्या दोघांनीं मिळून वुइल्यमवर हल्ला केला. वुइल्यमचा त्यांच्यापुढें फार वेळ टिकाव निघणें शक्य नव्हतें. त्यानें मोठ्यानें ओरडून पोलिसांना हाक मारिली. थोड्याच वेळांत पोलिसांनीं त्या दोघां रानट्यांस पकडून नेलें. पोलीस अधिकाऱ्यानें वुइल्यमचें नांव टिपून घेतलें व त्याचे आभार मानिले.

स्थानिक वर्तमानपत्रांनीं या शूर कृत्याबद्दल वुइल्यमची मुक्तकंठानें प्रशंसा केली. प्रोफेसर रेंथॉल देखील ह्मणाले:—

"वुइल्यम, या शौर्याबद्दल मला तुझें अभिनंदन केलें पाहिजे."

वुइल्यम—"पण प्रोफेसरसाहेब, मी अगदीं गोंधळून गेलों आहे. तात्कालिक आवेशाच्या भरांत मीं त्या दुष्टावर हल्ला केला खरा, पण सद्धर्मतत्त्वांप्रमाणें मी वागलों नाहीं असें मला वाटूं लागलें आहे. युद्ध, बलाविष्करण हा कधींही मानवजातीच्या दोषावर इलाज होऊं शकत नाहीं असें आपण काल ह्मणालां होतां. पण मला तसें वाटत नाहीं. सर्व

जीवित काय आहे ९९

गोष्टी बलावर अवलंबून आहेत. माझ्या बलाविष्करणाभावीं त्या रानटी इसमानें त्या स्त्रीस ठार केलें असतें आणि पोलीसच्या सामर्थ्याभावीं मी त्या दोघां इसमांच्या कचाट्यांत सांपडून मेलों असतों. सारांश, सामर्थ्यावांचून कांहीं नाहीं. पण सद्धर्माच्या अहिंसातत्त्वास हें संमत नाहीं. मग माझें कालचें वर्तन योग्य होतें कीं अयोग्य होतें ? ''

प्रोफेसर—'' तुझें वर्तन योग्य होतें यांत मुळींच संशय नाहीं. ''

वुइल्यम—'' असें जर आहे तर इंग्लंडनें जर्मनीविरुद्ध युद्ध जाहीर केलें यांत वाईट काय केलें ? काल तो रानटी इसम जसा त्या स्त्रीस छळीत होता, त्याप्रमाणेंच जर्मनीनें बेल्जमचा छळ नाहीं का आरंभला ? त्या स्त्रीच्या रक्षणासाठीं माझें त्या इसमाशीं लढणें जर न्यायाचें होतें तर बेल्जमच्या संरक्षणार्थ इंग्लंडचें जर्मनीशीं होणारें युद्ध न्यायाचें कां नसावें ? ''

प्रोफेसर—'' तूं वर्तमानपत्राचे ताजे अंक वाचले का ? रणभूमीवर कसला भयंकर रक्तपात व केवढाले अत्याचार होत आहेत याची तुला कल्पना आहे का ? ''

वुइल्यम—'' तें सर्व खरें. पण त्यामुळें कोडें उलगडत नाहीं. हे अत्याचार जर जर्मनीच्या दुष्टपणामुळें होत आहेत तर जर्मनीला शासन करणें सामर्थ्यशाली इंग्लंडचें कर्तव्य नव्हे काय ? लॉर्ड किचनेर लढण्याला अधिक तरुण पाहिजेत असें जाहीर करीत आहेत. या प्रसंगीं मीं काय करावें ? ''

प्रोफेसर—'' सद्धर्मतत्त्वांचें पुस्तक वाच जा ! सद्धर्मोत्पादकानें उपदेशिलेलीं अहिंसातत्त्वें हृदयांत सांठीव, जा ! ''

वुइल्यम—'' होय, पण—''

'' मला अधिक बोलण्यास फुरसद नाहीं, '' असें मध्येंच ह्मणून प्रोफेसरसाहेबांनीं तेथून निसटता पाय घेतला.




... ग्रंथ संग्रहालय, ...
... शाखा.
अ. क्र. ..............
विभाग ..............
क्रमांक, ..............
नों. दि. ..............


## प्रकरण १२ वें.

—:o:—

## जर्मनीची राक्षसी महत्त्वाकांक्षा.

दुसरे दिवशीं वुइल्यम लंडन येथें दाखल झाला. बॅरिस्टरच्या परीक्षेची तयारी करण्याचा त्याचा बेत कायम ठरला होता. तो जरी प्रस्तुत युद्ध न्याय्य आहे अशी बाजू घेऊन प्रोफेसरसाहेबांशीं बोलला होता, तरी त्याचें अंतरंग अद्याप युद्धाच्या विरुद्धच होतें. युद्ध हें मानवजातींत आढळून येणाऱ्या उच्चतम गुणांचा सत्यानाश करणारें आहे;—अर्थात् आपला शांततेचा पक्ष सोडावयाचा नाहीं असा वुइल्यमनें निश्चय केला.

पण तत्कालीन लोकमताच्या प्रवाहाचे त्याच्या मनावर जबर आघात होऊं लागले. युद्धाशिवाय दुसरा शब्द कोठें ऐकूं येईना व दुसरा मजकूर कोणत्याही वर्तमानपत्रांत दृग्गोचर होईना.

लंडन येथें गेल्यावर जर्मनीची बाजू धरून लिहिणाऱ्या एका वर्तमानपत्राचा अंक त्याला मिळाला. कैसरची युद्ध करण्याची मुळींच इच्छा नव्हती असें त्यांत प्रतिपादन केलें होतें. त्यानें युद्ध टाळण्याचे अविश्रांत परिश्रम केले; त्याची युद्ध करण्याची इच्छाच असती तर इतकीं वर्षें जर्मनी शांततासुखांत राहणें शक्य नव्हतें. इतर राष्ट्रांनीं जर्मनीला युद्धांत सामील होण्यास भाग पाडल्यामुळें या देशांतील लोकांना आपलें कर्तव्य बजावल्यावांचून गत्यंतर नाहीं, असा मजकूर त्यांत होता.

एके दिवशीं सायंकाळीं वुइल्यम एका छोट्याशा उपहारगृहांत बसला होता. तेथें त्याच्या परिचयाचा एक माणूस त्याला भेटला. तो बोलतां बोलतां वुइल्यमला ह्मणाला:—

" मीं परवां एक चमत्कारिक हकीगत ऐकिली. "

" कसली ? "

" माझी व अल्सेस प्रांतांतील एका श्रीमंत पेढीवाल्याची ओळख आहे, त्यानें मला ती सांगितली. कांहीं दिवसांपूर्वी कैसरच्या संगतींत जेवण्याचा प्रसंग त्याला आला होता. तेव्हां कैसर ह्मणाला, ' बहुतेक युरोपखंड भौतिक उन्नतीच्या नादीं लागून सद्धर्मापासून दिवसेंदिवस पराङ्मुख होत चालला आहे. युरोपखंडाच्या या जबरदस्त व्याधीचा नायनाट करण्याचें काम ईश्वरानें जर्मनीवर सोंपविलें आहे. जर्मनीचा बादशहा या नात्यानें युरोपचें संरक्षण करणें व युरोपभर सद्धर्मतत्त्वांची सक्तीनें जागृति करणें हें मी आपलें कर्तव्य समजतों. नास्तिकपणाच्या भयानक रोगापासून युरोपचें संरक्षण करण्यास युध्द हाच एक मार्ग आहे. ' त्या पेढीवाल्याला कैसरचें हें सर्व भाषण अगदीं कळकळीचें वाटलें. कैसरसारखे धर्मनिष्ठ लोक जगांत क्वचित् असतील असें त्याचें मत आहे. "

कांहीं वेळानें तो माणूस निघून गेल्यावर वुइल्यम तेथून उठला व उपाहारगृहाच्या मागच्या बाजूस एका वृक्षाखालीं बाकावर जाऊन बसला. तेथून त्याला उपाहारगृहांत काय चाललें आहे हें दिसत होतें, पण तो मात्र वृक्षपर्णांनीं अंतर्हित असल्यामुळें अदृश्य होता.

थोड्या वेळानें दोन गृहस्थ उपाहारगृहांत आले; त्यांना पाहिजे असलेले पदार्थ देऊन नौकर निघून गेला.

त्यांपैकीं एकजण बोलूं लागला, " सुदैवानें आसपास कोणीही दिसत नाहीं. आपणांस येथें पुष्कळ बोलावयास सांपडेल. "

" नाहीं तरी आपणांला कधीं अडथळा असतो ? इंग्लिश लोकांसारखे मूर्ख लोक पृथ्वीच्या पाठीवर क्वचित् असतील. त्यांना फसविणें फार सुलभ आहे. त्यांतून आपणांला आपल्या आईबापांनीं लहानपणापासून इंग्लंडांतच

शिक्षण देवविलें असल्याकारणानें आपणांस इंग्लिश भाषा अस्खलित बोलतां येते. ”

बुइल्यमचें हृदय जोरानें उडूं लागलें. या दोघांपैकीं एकास आपण पूर्वी कोठें तरी पाहिलें आहे असें त्यास वाटलें. पण त्याला बरोबर स्मरण होईना. दोघेही अगदीं जातिवंत इंग्लिश असल्याप्रमाणें दिसत होते.

पहिला बोलूं लागला—“ आपल्या जर्मन बादशहासाठीं मला कांहीं माहिती मिळवावयाची होती; ती मला कॉर्नवालमध्यें मिळाली. ”

दुसरा—“ काय ह्मणतोस ? ”

पहिला—“ होय. सेंट जॉन नांवाच्या एखा छोटेखानी गांवांत ! ती मोठीच मौज झाली. ”

बुइल्यम एकाएकीं दचकला. त्या इसमाला त्यानें ओळखलें. स्वतःस सरदार वीमर म्हणविणारा गृहस्थ हाच अशी त्याची खात्री झाली. पण त्याच्या पूर्वीच्या व आतांच्या स्वरूपांत केवढी तफावत दिसत होती !

तो इसम पुढें बोलूं लागला—“ एक पेन्शन घेतलेला व वजनदार असा आरमारखात्यांतील अधिकारी सेंट जॉन येथें राहतो अशी बातमी मला लागली. कैसरला पाहिजे असलेली ब्रिटिश आरमारासंबंधाची माहिती त्याचेपासून काढून घेण्याच्या उद्देशानें मी त्या गांवीं गेलों. त्याच्या मुलीवर बुइल्यम नांवाच्या एका तरुणाचें प्रेम जडलें आहे ही माहिती मीं मिळविली व युक्तीनें त्याची ओळख करून घेतली. ”

दुसरा—“ तूं नांव कोणतें धारण केलें होतें ? ”

पहिला—“ मी अल्सेस प्रांतांतील रहाणारा असून माझें नांव सरदार वीमर आहे असा मीं बहाणा केला. जर्मन सरकाराचा व त्याच्या युद्धप्रेमाचा मला तिटकारा असल्याचें दर्शवून बुइल्यमची मर्जी मीं संपादन केली. वाटेल तें झालें तरी शांतता पाहिजे असें मानण्याइतका तो पोऱ्या मूर्ख आहे. झालें. मग माझा अपेक्षित हेतु तडीस जाण्यास मला फारसे प्रयास पडले नाहींत. नेल्सनसाहेबांच्या—त्या आरमारखात्यांतील अधिकाऱ्याच्या—मालकीचा एक बंगला मला भाड्यानें घ्यावयाचा

आहे असें मिष करून वुइल्यमच्या द्वारें मीं त्या निष्कपटी व बडबड्या वृद्धाची ओळख करून घेतली. एक जाड्या रकमेचा चेक विसार ह्मणून त्याच्यापुढें टाकिल्यावर त्याचा विश्वास संपादन करण्यास विलंब लागला नाहीं. हळू हळू युक्तिप्रयुक्तीनें इकडच्या तिकडच्या गप्पा मारतां मारतां सर्व महत्त्वाची हकीगत मीं त्याचेपासून काढून घेतली ! ती माहिती कैसरच्या कितीतरी उपयोगीं पडेल ! छेः! मला राहून राहून त्या बोलक्या वृद्धाचें व त्या शांतताप्रिय तरुणाचें मनस्वी हंसू येतें ! त्या आरमारी अधिकाऱ्याला ब्रिटिश आरमाराचा केवढा गर्व ! जगांत आमच्या आरमाराची बरोबरी करणारें आरमार सांपडणें शक्य नाहीं असें तो ह्मणे ! मूर्ख बेटा ! आपल्या कैसरचा मुत्सद्दीपणा त्याला कसा कळणार ? आजपर्यंत इंग्लंडनें जगभर आपली सत्ता गाजविली व बढाई मिरविली; पण सत्तेचें पारडें आतां लौकरच फिरणार ! ”

दुसरा—“ सध्यांचा समय युद्धाला योग्य होता असें तुला वाटतें काय ? केव्हांतरी युद्ध होणार होतें ही गोष्ट सत्य; पण कैसरनें थोडीशी घाई केली असें नाहीं तुला वाटत ? त्याच्या मनांतून प्रथम फ्रान्सचा नायनाट करून त्याचें आरमार आपल्या ताब्यांत घ्यावें व नंतर इंग्लंडवर हल्ला करावा असें होतें. पण त्याचा डाव किंचित् बिघडला. इंग्लंडशीं १९२० च्या सुमारास जर्मनीचें युद्ध जुंपेल असें आपणांस वाटत होतें. ”

पहिला—“ तुझें म्हणणें बरोबर आहे, पण परिणाम केव्हांही सारखाच व्हावयाचा. रशियाला आणि बाल्कन संस्थानांना गुंतवून ठेवण्यास आस्ट्रिया समर्थ आहे. तोंपर्यंत कैसर इकडे पॅरिस हस्तगत करील. मग रशियाची गुरमी जिरविण्यास जर्मनीला मुळींच अवधि लागणार नाहीं. ”

दुसरा—“ पण इंग्लिश लोक उत्कृष्ट लढवय्ये असल्याबद्दल प्रसिद्धि आहे. ”

पहिला—“ फार, फार प्रसिद्धि ! परवांच्या बोअर युद्धांत त्यांचें खरें पाणी समजलें. अवघे सत्तर हजार शेतकरी ते काय, पण त्यांना नुसतें गप्प बसविण्यासाठीं इंग्लिश लोक सतत चार वर्षें झगडत होते !

मग आपल्या बलाढ्य जर्मन सैन्यापुढें त्यांचा काय टिकाव लागणार ? तीन आठवड्यांच्या आंत आपली अजिंक्य सेना पॅरिसच्या जवळ जाऊन ठेपली ! एकदां पॅरिस हस्तगत झाल्यावर लॉर्ड किचनेरच्या क्षुद्र फौजेचा धुव्वा उडविण्यास कितीसा अवकाश लागणार आहे ! ”

वुइल्यमला आतां स्वस्थ बसवेना. तो तेथून उठला व मागील दारानें शिरून उपाहारगृहाच्या मालकाला त्यानें सर्व हकीगत कळविली. पण ते व आणखी दोन तीन गृहस्थ मिळून भोजनगृहांत येतात तों ते जर्मन हेर नाहींसे झाले होते !

वुइल्यम आपल्या बिऱ्हाडाकडे परतला. त्याच्या डोक्यांत त्या दोघां जर्मन हेरांचें संभाषण सारखें घोळत होतें. प्रत्येक सरकारास गुप्त हेर ठेवावे लागतात हें तो जाणून होता; पण त्या दुष्ट मनुष्यानें सरदार वीमर असें नांव धारण करून आपणांस व नेल्सनसाहेबांस फसवून ब्रिटिश सरकारास अपायकारक अशी माहिती मिळवावीं याचें त्याला मनस्वी वाईट वाटलें. शिवाय त्या दोघां हेरांच्या भाषणावरून हेंही उघड होत होतें, कीं, आज कित्येक वर्षेपर्यंत कैसर युद्धाची तयारी करीत आहे. स्वसंरक्षणासाठीं जर्मन सैन्य अस्तित्वांत आलें नसून इतर राष्ट्रांवर अन्यायानें हल्ला करून स्वतःचा अंमल सर्वत्र फैलावण्यासाठीं त्याची योजना केली गेली आहे याबद्दल त्याची खात्री झाली. इंग्लंडचा थोरपणा कैसरच्या मत्सरी मनास असह्य झाला असून युरोपखंडभर आपलें सत्ताजाल पसरण्याची राक्षसी महत्त्वाकांक्षा त्याला युद्धास प्रवृत्त करीत आहे, याबद्दल वुइल्यमला लवमात्रही संशय राहिला नाहीं. जर्मनी म्हणजे एक जबरदस्त लढाऊ लोकांचा समुदाय असून त्यांच्या साह्यानें सर्व जगावर साम्राज्य गाजविण्याची कैसरची दारुण लालसा आहे, हें विस्मयकारक सत्य त्याच्या दृष्टोत्पत्तीस आलें !

“ आणि समजा, जर्मनीला या कामांत यश आलें ! मग काय परिणाम होईल ? आपल्या शांततेच्या मोठमोठ्या आशा इंद्रधनुष्याप्रमाणें विलय पावणार ! ” वुइल्यम विचार करूं लागला. “ बस्स ! या राक्षसी वृत्तीच्या कैसरची, जगांत अशांतता माजविणाऱ्या या उन्मत्त जर्मन सैनि-

कांची, आपल्या प्रचंड महत्त्वाकांक्षेला लाखों मनुष्यांचे बळी घेणाऱ्या या जर्मन युद्धपिशाच्चाची खोड मोडली पाहिजे ! पण मी हे कसले क्रूर विचार मनांत आणतों आहें ! असें करणें ह्मणजे सैतानाशीं लढण्याकरितां स्वतःला त्याच्याच हीन स्थितीस पोंचविण्यासारखें आहे ! सद्धर्मतत्त्वांचें प्रतिपादन करणाऱ्या महात्म्याची अहिंसाविषयक आज्ञा केवळ झूट आहे असें मला ह्मणावें लागेल ! सद्धर्मानुयायाला युद्धांत सामील होतां येत नाहीं."

पण याच्याच विरुद्ध विचार त्याच क्षणीं वुइल्यमच्या शांतताप्रिय हृदयावर जोराचा हल्ला करीत होते. त्याची जाज्वल्य स्वदेशभक्ति व जन्मभूमीवरील त्याचें अमर्याद प्रेम हीं त्याला दुष्ट जर्मन महत्त्वाकांक्षेचा नायनाट करण्याच्या कामीं साह्य करण्यास अत्यंत प्रोत्साहन देत होतीं—या जगभर रणकंदन माजविणाऱ्या उन्मत्त जर्मन युद्धभक्तांची खोड मोडण्यास आपापल्या परीनें झटणें हें प्रत्येक शांतताप्रेमी मनुष्याचें कर्तव्य आहे असें त्यास वाटत होतें. "पण नाहीं," तो स्वतःशीं उद्गारला, "या विकारांच्या आहारीं पडून सद्धर्मोत्पादकाची परमपवित्र आज्ञा उल्लंघितां येत नाहीं. आपल्या शत्रूवर सुद्धां प्रेम कर ! एखाद्यानें तुझ्या उजव्या गालावर चापट मारली तर डावा गाल पुढें कर ! असें मानणाऱ्या सद्धर्मनिष्ठानें युद्धांत पडून आपल्या विश्वबांधवांची हत्या करण्यास तयार कसें व्हावयाचें ! छे ! हें मुळींच शक्य नाहीं. मग या निश्चयापायीं माझें कितीही नुकसान झालें तरी बेहेत्तर !"

त्याचें नुकसानही कांहीं थोडें अल्पस्वल्प झालें नव्हतें. परमप्रिय—जीविततुल्य—सर्वांगसुंदर लिलीच्या पवित्र व निस्सीम प्रेमाला तो शाश्वतचा मुकला होता. आतां त्याला लिलीची पुनश्च प्राप्ति होणें शक्य नव्हतें. भीरु, नामर्द, कर्तव्यपराङ्मुख इत्यादि नांवें ठेवून तिनें त्याला स्वतःपासून लाथेनें दूर झुगारून दिलें होतें !

वुइल्यमनें खिशांतून आपलें पॉकेट—बुक काढलें व त्यांतून लिलीनें दिलेलें पांढरें पीस बाहेर काढलें. त्याच्याविषयीं तिला जें वाटत होतें त्याची ती निशाणी होती ! नामर्द ! स्वदेशवंचक ! भीरु ! हीं विशेषणें तिनें त्याला दिलीं होतीं.

याप्रमाणें वुइल्यम विचारतंद्रींत मग्न असतां दारावर नौकरानें थाप मारिली व एक पत्र वुइल्यमच्या स्वाधीन केलें.

" माझ्या मातेचेंच हें पत्र असलें पाहिजे," असें स्वतःशीं म्हणत त्यानें तें फोडलें.



# प्रकरण १३ वें.

——:o:——

## काय, या क्षुद्र चिठोऱ्यासाठीं ?

ऑक्सफर्ड येथील स्थानिक वर्तमानपत्राचा अंक बुइल्यमच्या मातुःश्रीकडे कोणीं तरी पाठविला असावा असें दिसलें. कारण तिच्या पत्रांत पुढील मजकूर होताः—

" बुइल्यम, तुझा मला अत्यंत अभिमान वाटतो. तुमचा बुइल्यम नामर्द आहे, तो लोकापवादाला भिऊन येथून पळून गेला असें प्रत्येकजण येथें ह्मणूं लागला होता. पण तुझ्या ऑक्सफर्ड येथील शूर कृत्यावरून त्यांचें ह्मणणें खोटें आहे असें सिद्ध होतें. मीं त्या अंकाच्या पन्नास प्रती मागवून त्या आपल्या स्नेह्यांकडे व आप्तेष्टांकडे पाठविल्या आहेत. येथील स्थानिक पत्रांतही तुझ्या पराक्रमाची सविस्तर हकीगत प्रसिद्ध करविण्याची मीं व्यवस्था केली आहे.

" बुइल्यम, तुझ्या स्वभावाचें कोडें मला सुटत नाहीं ! आपलीं शांततावादित्वाचीं मतें बाजूस ठेवून तूं त्या अनाथ स्त्रीचें त्या दोघां नरपशूंपासून संरक्षण केलेंस. बुइल्यम, दुष्टापासून एका अनाथ अबलेचें रक्षण करण्यांत—अथवा तिच्या रक्षणासाठीं दुष्टांना शासन करण्यांत आणि बेल्जमसारख्या अनाथ राष्ट्रांना बेचिराख करणाऱ्या जर्मनीला शासन करण्यात कांहीं फरक आहे असें तुला वाटतें काय ? "

" असो. लिली नर्स होऊन फ्रान्सला जाणार आहे. तिची आणि कॅप्टन लेनॉक्स याची वचनावचनी अद्याप झाली नसली तरी ती लौकरच होईलसें दिसतें होतां होईल तोंवर त्याच्या संनिध रहाण्यास सांपडावें या हेतूनेंच लिली परदेशास जात असावी.

" वुइल्यम, तूं मात्र तिच्या प्रेमाला मुकलास. ती तुझा मनस्वी तिरस्कार करते—तुझ्यासारख्या नामर्दाला स्नेही समजून घरीं येऊं जाऊं दिल्याबद्दल नेल्सन पश्चात्ताप व्यक्त करितात, असें मीं ऐकिलें आहे. वुइल्यम, या गोष्टी माझ्या हृदयाला किती दारुण वेदना देत असतील याची कल्पना कर. तूं समरांगणावर गेल्यास माझ्या मनाला अहोरात्र चिंता लागून राहील ही गोष्ट खरी, पण या दुःखाच्या मानानें ती कांहींच नव्हे. माझ्या पुत्रानें आपल्या देशासाठीं स्वतःचा प्राण अर्पण करण्याचा निश्चय केला आहे हें ऐकून मला किती आनंद वाटेल! असो. तुझ्या पराक्रमाचा वृत्तांत वाचण्यापूर्वी आपल्या स्नेह्यांस तोंड दाखविण्यास मला शरम वाटत होती."

वुइल्यमनें एक दीर्घ निश्वास टाकून पत्र मिटलें. " दुष्टापासून एका अबलेचें रक्षण करणें जर न्याय्य आहे तर—पण नाहीं, असला विचार मनांत येऊं देतां उपयोग नाहीं," तो स्वतःशीं ह्मणाला, " जर्मनांनीं एक युद्ध सुरू करण्याचा नीचपणा केला म्हणून इंग्लंडनेंही तसेंच करावें काय? कुत्रें आपणास चावलें म्हणून आपण त्याला उलट चावणें भूषणास्पद ठरेल काय?"

दुसरे दिवशीं, आज सायंकाळीं इंपीरियल नाटकगृहांत एक जंगी जाहीर सभा भरणार, अशा अर्थाचीं हस्तपत्रकें वुइल्यमच्या पहाण्यांत आलीं. युद्धाची वास्तविक कारणें लोकांस समजावून देण्याचा आणि राष्ट्राचें कर्तव्य काय आहे हें सांगण्याचा सभेचा उद्देश होता. वुइल्यम योग्य वेळीं नाटकगृहाकडे जावयास निघाला.

जातां जातां तो एका पुस्तकांच्या दुकानीं थांबला. त्याला एकंदर परिवर्तन पाहून चमत्कार वाटला. " अगदीं नवीन प्रसिद्ध झालेल्या कादंबऱ्या!" " नूतन उत्कृष्ट चरित्रें!" इत्यादि जाहिरातींच्या ऐवजीं

युद्धविषयक पुस्तकांच्या जाहिरातींनीं आणि पुस्तकांनीं दुकान गच्च भरलें होतें. त्यानें त्यांपैकीं एक जाहिरात वाचली:—

## जर्मनी आणि भावी युद्ध !

### लेखक:—जनरल बर्नहार्डी.

### एका प्रसिद्ध जर्मन सेनानायकानें व्यक्त केलेले जर्मनीचे विलक्षण बेत व महत्त्वाकांक्षा !

हें पुस्तक जर्मनींत अत्यंत लोकप्रिय झालें असून तें वाचण्याविषयीं प्रत्येक देशाभिमान्याला जर्मन बादशहा कैसर यानें शिफारस केली आहे !

वुइल्यमनें तें पुस्तक विकत घेतलें.

कांहीं वेळानें वुइल्यम इंपीरियल नाटकगृहांत दाखल झाला. प्रेक्षकांची खूप गर्दी जमली होती. देशभक्त व राष्ट्रप्रेमी कंठांतून निघणारा राष्ट्रगीतांचा रोमांचोत्पादक ध्वनि सर्वत्र दुमदुमत होता.

"बस्स !" वुइल्यम स्वतःशीं ह्मणाला, "स्वदेशभक्तीमध्यें एक प्रकारची दैवी शक्ति वास करीत आहे, यांत शंका नाहीं. राष्ट्रप्रेम हें स्वर्गीय सौख्याचें निधान आहे. मानवी अंतःकरणांत राष्ट्रप्रेमाची भावना अक्षय्य राहणार. तिचा त्याग करणें—तिला विसरून जाण्याचा प्रयत्न करणें शक्य नाहीं."

अल्पावकाशानें प्रेक्षकांच्या जयजयकाराच्या प्रचंड आरोळ्यांत व्याख्याते व्यासपीठावर आरूढ झाले.

आरमारखात्याची वरिष्ठ देखरेख करणाऱ्या प्रधानाकडे प्रमुख वक्तृत्वाचें काम होतें. त्याचें भाषण जरी श्रोत्यांना विकारवश करणारें नव्हतें तरी त्यांत त्यानें युद्धाच्या कारणांचें व इंग्लंडच्या सत्पक्षाचें फारच उत्कृष्ट रीतीनें विवेचन केलें.

" युद्ध जर कदाकाळीं न्याय्य ठरणें शक्य असलें, " वुइल्यम स्वतःशीं ह्मणाला, " तर सध्यांचें इंग्लंडनें जाहीर केलेलें युद्ध तसें ठरणार यांत संशय नाहीं. पण मनुष्यवध करणारें युद्धच मुळीं न्याय्य असणें संभवनीय आहे काय? जर्मन लोकांनीं युरोपखंडाच्या शांततेचा भंग करावा हें अन्यायाचें आहे हें खरें; पण रक्तपात बंद करण्यासाठीं रक्तपाताचें साधन उपयोगांत आणणें अपरिहार्य आहे काय? पशुतुल्य उन्मत्तपणाचा नायनाट करण्यासाठीं क्रूरपणाचा आणि अनंत दुःखांचा वर्षाव करणें न्याय्य होईल काय? "

दुसऱ्या वक्त्याचें भाषण अत्यंत वक्तृत्वपूर्ण आणि हृदयस्पर्शी झालें. त्यानें पुढील हकीगत आपल्या भाषणांत सांगितली—

बर्लिन येथें आपल्या इंग्लिश वकिलाला कैसरच्या वकिलानें प्रश्न केला, " आह्मीं बेल्जम व फ्रान्स यांविरुद्ध युद्ध जाहीर केल्यास तुह्मी आह्मां जर्मनांविरुद्ध युद्ध जाहीर कराल काय? " आपल्या वकिलानें उत्तर दिलें, " अर्थात्! " " कां? " जर्मन वकिलानें विचारलें. " बेल्जमचें व फ्रान्सचें संरक्षण करण्यास आह्मी तहाच्या अटींनीं बांधले गेलों आहोंत ह्मणून! " आपला वकील ह्मणाला. त्यावर जर्मन वकिलानें प्रश्न केला, " काय? तहनामा ह्मणजे काय? एक कागदाचा चिटोरा! क्षुद्र चिटोऱ्यासाठीं तुह्मी आह्मां बलाढ्य जर्मनांशीं लढण्याचें साहस करणार? "

सद्‌गृहस्थहो, मी ह्मणतों, तें चिटोरें ह्मणजे जर इंग्लंडच्या एकवचनत्वाची व सत्यशीलत्वाची निशाणी आहे तर इंग्लंडनें युद्धास उठावें हें न्याय्य नाहीं काय?

" आहे! न्याय्य आहे! " इतर प्रेक्षकांबरोबर वुइल्यमही आवेशानें उद्गारला.

पण इतक्यांत त्याला स्वतःचें स्मरण झालें. सद्धर्मनिष्ठांनीं युद्धांत सामील होणें केव्हां तरी न्याय्य होईल काय? खुद्द कैसरलाच सद्धर्मतत्त्वांची आठवण करून दिली असती, " तुझ्यासारख्या धर्मनिष्ठ ह्मणविणाऱ्या राजास युद्धाला उठणें—असंख्य मनुष्यबांधवांची क्रूरपणानें हिंसा घडविण्यास उद्युक्त होणें—शोभतें काय? " असा त्याला प्रश्न केला असता

तर त्यानें समशेर खालीं ठेविली नसती का ? सद्धर्मप्रेमी ह्मणविणारे लोक युद्धाला ' न्याय्य ' हें विशेषण कसं देतात–ते स्वतः असल्या दुष्ट कृत्यास कसे प्रवृत्त होतात हेंच मला समजत नाहीं.

तिसऱ्या व्याख्यात्यानें एक स्वानुभवाची गोष्ट सांगितली:—

" सहा वर्षांपूर्वी बर्लिन येथें भरलेल्या शांततापरिषदेस मी हजर होतों. राष्ट्राराष्ट्रांमधील बखेडे युद्धासारख्या क्रूर उपायांनीं शमविण्याऐवजीं कोणत्या सौम्य उपायांनीं मिटवावे याची चर्चा करण्यासाठीं ती परिषद् भरली होती. पण त्या परिषदेचा शेवट कसा झाला असें तुह्मांस वाटतें ? ती परिषद् बर्लिन येथें—जर्मनीच्या राजधानींत—भरली होती हें लक्षांत ठेवा. आह्मी सर्वजण जगांत शांतता कशी राखावी या उच्चतम व परमपवित्र विषयाची वाटाघाट करण्यासाठीं एकत्रित झालों होतों. "

वुइल्यमच्या सर्वांगावर रोमांच उभे राहिले. जगभर शांततेचें अबाधित साम्राज्य वसविणें ही त्याची उन्नततम महत्त्वाकांक्षा होती, हें त्याचें उच्चतम ध्येय होतें.

" पण पुढें काय झालें? " व्याख्याता पुढें बोलूं लागला. " परिषदेचा अध्यक्ष प्रास्ताविक भाषण करण्यासाठीं उभा रहातो न रहातो इतक्यांत जर्मन सरकारानें पाठविलेले सैनिक आंत घुसले आणि त्यांनीं प्रतिनिधींना तेथून हुसकून लाविलें. राष्ट्रांना शांततेंत कसें रहातां येईल–मानवजातीला शांततासौख्य अक्षय्य कसें अनुभवण्यास मिळेल या परमपवित्र विषयाची जर्मनीच्या राजधानींत नुसती चर्चा करण्याचीसुद्धां आह्मांस मनाई होती. अशा राष्ट्राला जर युरोपभर वाटेल तसा धुमाकूळ माजवूं दिला तर आपणां इंग्लिशांच्या स्वातंत्र्याची काय अवस्था होईल ? "

वुइल्यम आश्चर्यानें थक्क झाला. काय ! जगांत शांतता कशी राखावी या विषयाची चर्चा सुद्धां कैसरला पसंत नाहीं काय ? जर्मनी युद्धासाठीं–मानवजातीचें रक्त पिण्यासाठीं–इतका उत्सुक झाला आहे काय ? कैसरचा आणि त्याच्या राज्यांतील युद्धपक्षाचा उन्मत्तपणा–त्यांचा असुरी क्रूरपणा–या थरास गेला आहे काय ? वुइल्यम त्याच चमत्कारिक मनःस्थितींत बिऱ्हाडाकडे परतला.

वाटेंत त्याला एक स्नेही भेटला.

" वुइल्यम, " तो ह्मणाला, " हें तूं वाचलेंस का ? कैसरनें स्वतःच्या सैन्याला सोडलेला हा हुकूम आहे. वाचून तरी पहा ! "

वुइल्यमनें वाचलें:—

" आमच्या इतर सैनिकांस आमचा असा हूकूम आहे, कीं त्यांनीं सध्यां आपला सर्व पराक्रम–सर्व धैर्य–सर्व शौर्य एकत्रित करून इंग्लिश सैन्याचा नायनाट करावा–जनरल फ्रेंच यानें जमविलेल्या क्षुद्र सैनिकांचा धुव्वा उडवून टाकावा. "

वुइल्यमचें हृदय त्वेषानें उचंबळूं लागलें.

" पण हा हुकूम जर्मन सैनिकांना पाळणें अशक्य झालें ! " त्याचा स्नेही ह्मणाला. " जनरल फ्रेंच यांचे 'क्षुद्र सैनिक' त्यांना नष्ट करतां आले नाहींत. कैसरनें आपल्या सैनिकांवर स्वतःचे अगदीं निवडक लोक पाठविले—एकास पांच असें इंग्लिश व जर्मन यांमधील प्रमाण होतें—तथापि आपल्या लोकांची फळी फोडण्याचें सामर्थ्य जर्मनांमध्यें नव्हतें. "

" तूं अद्याप लष्करांत दाखल झाला नाहींस याचें मला आश्चर्य वाटतें, " वुइल्यम ह्मणाला.

" मीं पुष्कळ प्रयत्न केला. पण माझी दृष्टि बरोबर नसल्यामुळें मला सैन्यांत घेतलें नाहीं. तूं केव्हां जाणार ? "

वुइल्यम कांहींएक उत्तर न देतां बिऱ्हाडाकडे निघाला.

खोलींत गेल्यावर " वेळ कसा घालवावयाचा ? " हा प्रश्न वुइल्यमच्या मनापुढें उभा राहिला. असल्या विकारवश मनःस्थितींत झोंप येणें कांहीं शक्य नव्हतें. त्याला एकदम बर्नहार्डीच्या पुस्तकाचें स्मरण झालें. तो तें वाचावयास बसला व लौकरच वाचनांत गढून गेला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
नौपाडा शाखा.



# प्रकरण १४ वें.

—— :o: ——

## जर्मन युद्धावरील मोहीम !

ज्याप्रमाणें भूकंपाच्या योगानें रम्य सरोवराच्या ठिकाणीं प्रचंड डोंगर उत्पन्न व्हावा अथवा प्रचंड झंझावातानें दशदिशा दणाणून टाकीत असतां सुरुचिर तरुराजि उन्मूलून त्या ठिकाणीं वृक्षविहीन अरण्य तयार करावें अथवा जादूच्या काल्पनिक राज्यांतील प्रास्पेरोनें आपली काठी फिरवून प्रशांत समुद्रांत वादळ उत्पन्न करावें त्याप्रमाणें आमच्या कथानायकाच्या मनःस्थितींत त्या छोट्याशा पुस्तकानें खळबळ उडवून दिली. त्या पुस्तकांतील धार्ष्ट्याची प्रमेयें मूर्तिमंत असुरी स्वरूप घेऊन त्याच्यापुढें नाचूं लागलीं. आपण आजपर्यंत युद्धास अधर्माचें, अनीतीचें, अन्यायाचें माहेरघर समजत आलों, पण येथें या पुस्तकांत काय लिहिलें आहे ? " युद्ध करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे ! युद्धाशिवाय राष्ट्राचें हित साधणार नाहीं ! युद्ध आवश्यक क्रियांपैकीं आहे एवढेंच नव्हे तर युद्धक्रियेसारखा सद्गुण नाहीं. युध्दें व्हावीं अशी ईश्वरी इच्छा असून त्याच्याच प्रोत्साहनानें युध्दासारखीं पवित्र कार्यें होतात " हीं व अशा प्रकारचीं अन्य प्रमेयें त्याचें स्मृतिपटल फोडून युध्दांतील रक्तवर्ण रसानें त्याच्या नेत्रांपुढें तळपूं लागलीं. अशा प्रकारचे विचार कोणीही प्रसिध्द करणार नाहीं. हा आपणास वृथा भ्रम होत असावा असें वाटून त्यानें आपल्या हातांतील ' जर्मनी आणि भावी युध्द ' हें पुस्तक भराभर चाळण्यास सुरवात केली.

तेव्हां त्या पुस्तकांत ग्रथित केलेले जर्मनीचे युध्दसिध्दांत त्याच्या नेत्रासमोर येऊं लागले:—

" युद्धाच्या अभावीं हीन दर्जाचीं आणि खालावत जाणारीं राष्ट्रें भराभर चांगल्या व उदयोन्मुख राष्ट्रांची वाढ खुंटवितील आणि सहजच सर्व जगाची अवनति होऊं लागेल."

" ज्याचा ताबा आहे त्यास मालक समजावयाचें नसून ज्या विजयी वीरास तो ताबा काढून घेतां येईल त्यास मालक समजावें."

" बळी तो कान पिळी, हा नियम सर्वथैव खरा असून सत्य पक्ष कोणता याचा निर्णय युद्धाच्या मध्यस्थीनेंच लागतो."

" युद्ध अत्यावश्यक आहे एवढेंच नव्हे तर युद्ध सर्वतोपरी न्याय्य आहे असें विचाराअंतीं दिसून येईल."

" सर्व विधानांचा थोडक्यांत समावेश करावयाचा म्हटलें तर, युद्धाचा नायनाट करण्याकरितां सुरू झालेले प्रयत्न केवळ मूर्खपणाचे नसून अनीतीचे आहेत. अशा प्रकारचे प्रयत्न करणारे मनुष्य मानवजातीस बट्टा लावणारे होत!"

" शांततेच्या तहनाम्या अन्वयें बलिष्ठ राष्ट्राप्रमाणेंच दुबळ्या राष्ट्रासही समसमान हक्कानें नांदतां येतें, ही सर्वस्वी अनीति आहे."

" शांततेचे प्रयत्न जर यशस्वी झाले तर त्यामुळें सर्व राष्ट्रांची अवनति होईल, इतकेंच नसून अखिल मनुष्यजात निःसत्व व निर्वीर्य होईल."

" शांततेकरितां प्रयत्न करणाऱ्यांच्या मार्गांत आडकाठी घालण्याकरितां प्रत्येक उपाय अंमलांत आणिला पाहिजे."

शेवटचें तत्त्व वाचीत असतां बर्लिन येथील शांततापरिषदेंत जर्मन शिपायांनीं धुमाकूळ घालून ती सभा हुसकून कां लाविली हें वुइल्यमच्या लक्षांत आलें. आतां आपण भ्रमांत नसून नीट शुध्दीवर आहोंत अशी त्याची खात्री झाली. जर्मन लोक या जगांत राहणारे आपणासारखे मनुष्यप्राणी नसून ते अत्यंत कठोर जगांत राहणारे असुर आहेत, असें त्यास वाटूं लागलें. त्यांचें जग निराळें, त्यांचा धर्म निराळा, त्यांची नीति निराळी. जें आपणास

कर्तव्य वाटतें तें त्यांना पातक वाटतें. जें आपणास त्याज्य, तें त्यांना वंद्य. जें आपणास नापसंत तें त्यांना पसंत. त्यांचा आणि आपला ईश्वर अत्यंत भिन्न ! आपल्या आणि त्यांच्या विचारांत,मनांत आणि आचरणांत जमीन-अस्मानचें अंतर !

जर्मन लोक खरोखरच अगदीं भिन्न दैवताचे भक्त आहेत. खऱ्या परमेश्वरास बळी देऊन त्यांनीं निराळ्याच दैवताचे देव्हारे माजाविले आहेत. ज्या दैवताची रक्तपातावर अत्यंत आसक्ति आहे, युध्द या शब्दाचा उच्चार होतांच जें हर्षभरानें डोलूं लागतें, शांततेचा शब्द ज्याच्या साम्राज्यांत उच्चारणें महान् पातक समजलें जातें तें दैवत कसलें ? तें मूर्तिमंत पिशाच्च ! तें प्रत्यक्ष सैतान होय ! अशा युध्दासक्त असुरास, अशा शांतताद्रोही पिशाच्चास, अशा सध्दर्मद्वेष्ट्या सैतानास उच्चासनावर स्थापून युध्दप्रिय जर्मन त्याची मनोभावें आराधना करीत आहेत. हें युध्दपिशाच्च आपल्या स्वैर इच्छेनें साम्राज्याचीं सूत्रें हालवीत असून तेंच त्याच्या ध्यानीं लागलेल्या भगत जनांस प्रिय होत आहे.

जर्मनीचीं हीं विलक्षण तत्त्वें वाचून वुइल्यमच्या विचारपरंपरेस अगदीं निराळें वळण लागलें. अशा राष्ट्रांशीं सलोख्यानें रहाणें—त्याच्याशीं स्नेहभावानें वागणें अशक्य आहे असें त्यास वाटूं लागलें. जर्मनीवर प्रेम करणें म्हणजे एखाद्या पिसाळलेल्या कुत्र्याला लडिवाळपणानें गोंजारणेंच होय ! सर्व मानवजातीला मान्य अशीं नीतितत्त्वें जर जर्मनांना पसतच नाहींत तर त्यांच्याशीं स्नेहभावाचें बोलणें लावावयाचें कसें ? “ शांततेसाठीं तरी तुम्ही आपली समशेर म्यानांत घाला—अहिंसेचीं उदात्त तत्त्वें प्रतिपादणाऱ्या सध्दर्मप्रणेत्याच्या स्मृतीसाठीं तरी तुम्ही आपली युध्दासक्तता सोडून द्या, ” असें जर्मनांना अथवा जर्मनीच्या दारुणमहत्त्वाकांक्षाप्रेरित कैसरला ह्मणून उपयोग काय ? ज्यांना शांतता ठेवण्याचा प्रयत्न करणें केवळ अनीतिमय वाटतें त्यांच्याशीं हा युक्तिवाद काय कामाचा ?

बर्नहार्डीसारख्या लोकांनीं पुढील युक्तिवादाचें मंडन केलेलें आहे:—

अत्यंत उच्च सुधारणेस जाऊन पोंचलेल्या व सुसंस्कृततामंदिराच्या उन्न-

ततम शिखराच्या अग्रभागीं विराजणाऱ्या राष्ट्रानें जगावर सत्ता गाजविलीच पाहिजे.

जर्मनी हें राष्ट्र ( या लेखकाचा मताप्रमाणें ) सुधारणेच्या व सुसंस्कृततेच्या परमोत्कृष्ट दर्ज्यास पोंचलें आहे यांत तर शंकाच नाहीं. १

झालें. यावरून हें उघड दिसतें, कीं आपल्या सत्ताप्रसाराच्या आड येणाऱ्या राष्ट्रांशीं युद्ध करण्याचा जर्मनांना केवळ हक्कच नसून तसें करणें हें त्यांचें कर्तव्य आहे. अनुकूल संधि प्राप्त होईपर्यंत त्यांनीं थांबलें पाहिजे ही गोष्ट खरी, पण मग मात्र रक्तपाताला अथवा मानवकोटीवर ओढवणाऱ्या इतर संकटांना न जुमानतां त्यांनीं युद्ध केलें पाहिजे.

बर्नहार्डी लिहितो, " प्रशियाचा इतिहासप्रसिद्ध थोर बादशहा फ्रेडरिक दि ग्रेट यानें जाणूनबुजून युद्ध उपस्थित करूनच प्रशियाच्या वैभवमंदिराचा पाया घातला. "

या सर्व गोष्टी—वरील सर्व विवरणें—ध्यानांत घेऊन, कैसरनें समरांगणावर जाणाऱ्या आपल्या सैनिकांस उद्देशून केलेल्या भाषणाचा बुइल्यमनें विचार केला. कैसर ह्मणालाः—

" परमेश्वराची जर्मनांवर बहाल मर्जी आहे हें ध्यानांत असूं द्या. जर्मनीचा बादशहा या नात्यानें परमेश्वराचा दिव्य अंश माझ्यामध्यें अवतरला आहे. मी परमेश्वराचें आयुध आहें. माझी आज्ञा अमान्य करणाऱ्यांच्या मस्तकावर परमेश्वराच्या वज्राचा आघात होवो ! नामर्दांना व नास्तिकांना मृत्यु येवो ! "

केवढी ही भयानक आज्ञा !

अशा तऱ्हेचीं व्याख्यानें देणाऱ्या कैसरला हें सर्व कांहीं सत्य वाटत असेल—त्याचा त्यावर मनःपूर्वक विश्वास असेल. पण त्याचा परिणाम किती दारुण होत आहे ! त्याची महत्त्वाकांक्षा सर्व जगाला घातक आहे. मानवजातीच्या सुखसर्वस्वाची राखरांगोळी करून टाकणारी आहे !

" माझ्या धर्माचा स्वीकार तरी करा अथवा मरण पतकरा ! " असें ह्मणणारा महंमद व त्याच्या आज्ञेवरहुकूम एका हातांत कुराण

व दुसऱ्या हातांत समशेर घेऊन त्याच्या तत्त्वाचा जयघोष करीत त्याला अनुसरणारे त्याचे सैनिक, ह्या सर्व गोष्टी मनःपूर्वक करीत होते—त्यांचा या तत्त्वावर दृढ विश्वास होता—आपल्या धर्माचा अंगीकार केल्यानेंच मानवजात तरणार आहे अशी त्यांची खात्री होती. जगन्नियंत्याच्या आणि खिस्ती धर्माच्या नांवाखालीं स्पेन देशांतील मूर लोकांचे हालहाल करणारीं फर्डिनंड व इसाबेला हींही आपल्या सदसद्विवेकबुद्धीच्या सांगण्याप्रमाणेंच वागत होतीं. ह्मणून काय झालें ? त्यामुळें त्यांचें भयंकर स्वरूप कमी घातक झालें काय ? युद्ध-सिद्धांतांवर अढळ श्रद्धा ठेवणाऱ्या जर्मनांचें विश्वघातकत्व, त्यांची श्रद्धा प्रामाणिक आहे ह्मणून, कमी घातक होईल काय ? उलट त्यामुळें त्यांचा भयंकरपणा अधिक हिंसक ठरतो. जर्मनीवर सत्ता चालविणाऱ्या युद्धपक्षीय लोकांना सद्धर्मप्रणीत अहिंसातत्त्वेंच जर मान्य नाहींत, तर त्यांच्याशीं युक्तिवाद करून काय उपयोग ? त्यांना जो स्वतःचा जन्मसिद्ध हक्क वाटतो तोच इतरांचा प्राण घेणारा आहे ! या क्रूर जर्मनांशीं युक्तिवाद करण्याचा प्रयत्न करणें म्हणजे विषारी व विक्राळ दाढांच्या मनुष्यरक्तपिपासु व्याघ्राशीं युक्तिवाद करण्यासारखेंच आहे. युद्धप्रेम, युद्धासक्ति, युद्धभक्ति हींच त्यांच्या राष्ट्रधर्माच्या पदावर विराजित झालीं आहेत; त्यांच्याइतक्या, किंबहुना त्यांच्याहूनही अधिक बळाच्या साह्यावांचून त्यांचें दमन करणें शक्य नाहीं.

युध्दामध्यें जर्मनांनीं केलेल्या अत्याचारांच्या बातम्या आतां बुइल्यमला सत्य वाटूं लागल्या; त्यांच्या भयानक धर्मतत्त्वाला त्या धरूनच आहेत अशी त्याची आतां खात्री झाली.

एक जर्मन युध्दपक्षीय लेखक ह्मणतोः—

" परकी राष्ट्रासाठीं स्वार्थत्याग करणें, स्वतः परिश्रम सहन करून इतर राष्ट्रांना साह्य करणें सर्वस्वी अनीतीचें आहे. "

" राजकीय दृष्ट्या जीं पातकें समजलीं जातात, त्या पातकांमध्यें दुर्बलत्व हें श्रेष्ठ आहे—अत्यंत निंद्य पातक आहे. परमेश्वराच्या आज्ञेविरुध्द तो एक जबर गुन्हा आहे. "

बेल्जमशीं केलेला तह जर्मनांनीं पायांखालीं कां तुडविला हेंही आतां वुइल्यमच्या लक्षांत आलें. कारण बर्नहार्डी ह्मणतो, " प्रबळ राष्ट्राच्या महत्त्वाकांक्षेला व वैभवप्राप्तीला एखादा तह जर व्यत्यय आणूं लागला—त्या तहामुळें जर त्या राष्ट्राच्या सत्ताप्रसाराला आडकाठी येऊन त्याची पीछेहाट होऊं लागली—तर तो तह मोडणें हें केवळ न्याय्यच नसून तो लाथेनें झुगारून देणें हें त्या राष्ट्राचें कर्तव्य आहे. "

" जगांत साम्राज्य प्रस्थापित करण्याच्या आपल्या प्रयत्नांत आपण कचरतां कामा नये—आपलीं ध्येयच्युति होऊन उपयोग नाहीं, " असें बर्नहार्डीचें विधान आहे.

अर्थात् आपल्या दुष्ट महत्त्वाकांक्षांच्या आड येणारें प्रत्येक राष्ट्र आपला शत्रु होय—त्याला चिरडून टाकिलें पाहिजे, अशी जर्मनांची ठाम समजूत आहे. याच हेतूनें आज कित्येक वर्षें जर्मनी आपल्या अजिंक्य ( ? ) सेनेची घटना करीत आहे. स्वपरसंरक्षण हें मुळीं जर्मनांचें तत्त्वच नव्हे—स्वसत्ताप्रसार व परकीयांचें पीडन हें त्यांचें ध्येय आहे. एरव्हीं आपणांला जगाचें साम्राज्य मिळणें शक्य नाहीं, अशी त्यांची कल्पना आहे.

इंग्लंड हें आपल्या सत्ताप्रसारास प्रचंड विघ्न असल्यामुळें त्याची सत्ता नष्ट कशी करावी या विचारास जर्मनी लागला आहे, हें वुइल्यमच्या आतां मनावर बिंबलें. युरोपांतील राष्ट्रें ह्मणजे जर्मनीच्या दृष्टीनें केवळ बुद्धिबळाच्या पटावरील खेळणीं होत. आपल्या महत्त्वाकांक्षेच्या सिद्धीला अवश्य असेल त्याप्रमाणें त्यांपैकीं कांहीं राष्ट्रांना साह्य करावयाचें व इतरांना जेरीस आणून सोडावयाचें हा त्यांचा बेत आहे. तुर्कस्थानाला साह्य केलें पाहिजे, पण फ्रान्सचा नाश केला पाहिजे. कां ? फ्रान्सनें त्यांचा काय अपराध केला आहे ? या प्रश्नास एकच दारुण उत्तर—" आह्मां जर्मनांच्या महत्त्वाकांक्षेला फ्रान्स अडथळा करतें—त्याचें अस्तित्व आमच्या सत्ताप्रसाराच्या आड येतें. "

बर्नहार्डी लिहितोः " कोणत्याना कोणत्या उपायानें फ्रान्सचा कांटा आपल्या मार्गांतून दूर केला पाहिजे. जर्मनांच्या राजनीतींतील पहिली

महत्त्वाची गोष्ट ही आहे. फ्रान्सला इतक्या संपूर्णपणें चिरडून टाकिलें पाहिजे, कीं पुनः त्यानें आपल्या वाटेंत येतां कामा नये. ”

वुइल्यमनें तें पुस्तक दूर फेंकून दिलें. तें पुस्तक वाचणें हें पातक आहे असें त्यास वाटूं लागलें. त्यांतील नीचपणाच्या युक्तिवादाची व सैतानी विवेचनपद्धतीची त्याला किळस आली. आपण इतका वेळ पाप पंकांतून मार्ग क्रमित होतों असें त्यास वाटलें. तो स्वतःशीं उद्गारला, “ या जर्मन विचारशैलीचा—तीपासून जन्म घेणाऱ्या त्यांच्या युद्धासक्तीचा—व तीमुळें उद्भवणाऱ्या त्यांच्या भयंकरपणाचा समूळ नाश केला पाहिजे, त्यांच्या उन्मत्तपणाचें उच्चाटन केलें पाहिजे. जर्मनीशीं युद्ध करणें एक परमपवित्र कर्तव्य आहे. परमेश्वराच्या–सद्धर्मप्रणेत्याच्या अहिंसातत्त्वाच्या प्रसारार्थ हें युद्ध आहे.

वुइल्यमच्या एकंदर विचारपरंपरेला नवीन वळण लागलें. सर्व वस्तुस्थिति त्याला निराळ्या रूपांत दिसूं लागली. युद्ध हें अत्यंत भयानक—मानवी अंतःकरणांत वास करणाऱ्या पावन भूतदयेस घातक आहे खरें; पण जर्मनांची विषारी युद्धलालसा नष्ट केल्यावांचून गत्यंतर नाहीं. जर्मनीशीं करावें लागणारें प्रस्तुत युद्ध न्याय्य आहे.

“ ज्याच्याजवळ तरवार नसेल त्यानें आपलीं वस्त्रें विकून ती पैदा करावी !” हे शब्द कोणीं उच्चारले होते ? सद्धर्मप्रणेत्याचेच हे शब्द नव्हत का ? हे शब्द उच्चारतांना त्याच्या दिव्य दृष्टीसमोर सद्यःकालीन परिस्थिति असली पाहिजे यांत शंका नाहीं.—वुइल्यमची अशी खात्री झाली.

तो स्वतःशीं ह्मणाला—“ मला आतां या प्रश्नाचा उलगडा झाला. जर्मनीशीं युद्ध करणें ह्मणजे शांततेच्या प्रसारासाठीं झटणें होय अशी माझी खात्री झाली. हें युद्ध नसून युद्धावरील मोहीम आहे. आमची ही **जर्मन युद्धावरील मोहीम** मानवजातीनें शांततेचें सुख अनुभवावें यासाठींच आहे—जगांतून दुष्ट युद्धलालसेचा नायनाट करावा हाच उच्च हेतु तिच्या मुळाशीं आहे. मी जर्मनांचा द्वेष करतों असें मुळींच नाहीं. लक्षावधि जर्मन शांतताप्रिय व व्यवसायमग्न लोक आहेत. त्यांना जर स्वस्थ राहूं दिलें तर ते सरळपणानें आपापला धंदा करीत रहातील.

पण त्यांना युद्धपिशाचबाधेनें पछाडल्यामुळें, जर्मनींतील युद्धपक्षीय अग्रणीसर्पांच्या विषारी वचनफूत्कारांनीं त्यांना विवश केलें असल्यामुळें, त्यांच्या हातून हीं दुष्कृत्यें घडत आहेत. त्या सर्पांना जगांतून नाहींसें केल्या-वांचून मानवजातीस तरणोपाय नाहीं. या जर्मन युद्ध-राक्षसाचें उच्चाटन करणें ह्मणजे खुद्द जर्मनांवर उपकार करण्याप्रमाणेंच आहे. त्या योगानें ते लोक सुखी होतील."

"बस्स !" तो मोठ्यानें उद्गारला, "मी उद्यां सैन्यांत दाखल होणार ! हें माझें आद्य कर्तव्य आहे !"

दुसरे दिवशीं प्रातःकाळीं वुइल्यम सैन्यांत नांवें नोंदविण्याच्या स्थानास गेला. तेथें बरीच मंडळी एकत्रित झाली होती. त्यांपैकीं कांहीं कनिष्ठ दर्ज्यांतील होते; पण मुख्यतः कारकून, तरुण व्यापारी वगैरेंचाच त्यांत भरणा होता. त्यांपैकीं एकानें वुइल्यमला विचारिलें:—

"दाखल होणार वाटतें ?"

"होय," वुइल्यमनें उत्तर दिलें.

"कांहीं लष्करी शिक्षण घेतलें होतें ?"

"होय."

"कोणत्या शाळेंत ?"

"क्लिफ्टन येथील शाळेंत."

"तेथें किती वर्षें होतां ?"

वुइल्यम उत्तर देणार होता; इतक्यांत एक मोटारगाडी जवळच येऊन थांबली व एक उंच, लष्करी बाण्याचा इसम बाहेर आला. त्यानें स्वतः-भोंवतीं पाहिलें; तो इमारतींत शिरणार, तोंच त्याची दृष्टि वुइल्यमकडे वळली व तो तत्काळ त्याच्याकडे आला.

# प्रकरण १५ वें.

——:o:——

## लेफ्टेनंट.

"कोण ? वुइल्यम !" कॅप्टन् प्रिंगलनें प्रश्न केला.

"होय !" वुइल्यमनें उत्तर दिलें.

"येथें कां आला होतास ?"

"सैन्यांत दाखल होण्याकरितां ?"

"ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. तूं युद्धाच्या अगदीं विरुद्ध होतास. हें अचाट परिवर्तन झालें कशानें ?"

वुइल्यमनें उत्तर केलें—"अद्याप युद्ध हें अत्यंत वाईट अशी माझी खात्री आहे.पण एकंदर विचार करितां या युध्दांत जर्मनीविरुद्ध लढणें न्यायाचें आहे असें मला वाटूं लागलें आहे. यापुढें पांच मिनिटें सुद्धां इंग्लंडांत राहण्याची माझी इच्छा नाहीं. केव्हां एकदां सैन्याच्या आघाडीस जाईन असें मला झालें आहे."

प्रिंगल—"पण तुला अधिकाऱ्याची जागा मिळणें सोपें नाहीं."

वुइल्यम—"मला तरी त्याची कोठें गरज आहे ? सर्वांनाच अधिकारी होतां येणें शक्य नाहीं. सामान्य शिपाई म्हणून कां होईना, पण जर्मनांशीं प्रत्यक्ष लढण्याचा प्रसंग शक्य तितक्या लवकर यावा येवढीच माझी इच्छा आहे."

प्रिंगल—" शाबास ! याचें नांव देशाभिमान, याला ह्मणतात खरी कळकळ. स्वतःच्या वडेपणाची आणि हलकेपणाची पर्वा न करितां मातृभूमीच्या रक्षणासाठीं प्राण अर्पण करण्यास तयार असणें हेंच खऱ्या मर्दाचें लक्षण आहे. पण, वुइल्यम जर्मनीवर इतका संताप काय ह्मणून ? "

वुइल्यम—" याचें कारण जर्मनींतील अधिकारी वर्ग ह्मणजे केवळ युद्ध-पिशाचाची उपासना करणारा आहे. शांतता, विश्वबंधुत्व यांसारख्या उदात्त व मानवजातीस शोभणाऱ्या भावनांचा तिरस्कार करण्यास या वर्गानें जर्मनीला शिकविलें आहे. युद्ध-प्रेम हें जर्मनांच्या हाडामांसांत खिळून गेल्यासारखें झालें आहे. यांची ही दुष्ट भावना नष्ट केल्याशिवाय जगास केव्हांही शांततेचा लाभ होणार नाहीं."

प्रिंगल—" तुझीं धार्मिक मतें कोठें गेलीं ? "

वुइल्यम—" माझ्या धर्मनिष्ठेमुळें तर माझ्या विचारांस इतका करारीपणा प्राप्त झाला आहे. काळोख्या रात्रीं घराचीं दारें उघडीं ठेवून चोरांपासून स्वतःचें रक्षण करण्याविषयीं ईश्वराची प्रार्थना करणें जितकें मूर्खपणाचें आहे, तितकेंच अन्यायानें युध्द करण्यांत धर्म सांठला आहे असें जर्मनी मानीत असतां त्याला युध्दापासून परावृत्त करण्याविषयीं देवाला विनाविणें हें मूर्खपणाचें आहे. युध्द करण्याविषयीं ईश्वर आपणांस प्रेरणा करीत आहे, समशेरीच्या बळानें सर्व युरोप पादाक्रांत करण्याविषयीं ईश्वर आपणांमध्यें अंतःस्फूर्ति उत्पन्न करीत आहे अशी जर्मनांची समजूत असतां आपण हात जोडून स्वस्थ बसणें व स्वतःचें संरक्षण करण्याविषयीं परमेश्वराची पोकळ स्तुति करणें हें केवढें अजागळपणाचें आहे ! हा जर्मनीनें उभारिलेला व पूज्य मानिलेला युध्दराक्षस परमकारुणिक ईश्वराच्या जागीं जर्मनांनीं प्रस्थापित केलेलें हें युध्दपिशाच्च—पायांखालीं चिरडून टाकिलें पाहिजे. असें केल्यानेंच जगांत शांतता नांदण्याचा संभव आहे. जगांतून युध्दाचा नायनाट करावयाचा असल्यास आरंभीं जर्मनीच्या या युध्दलालसेचा बीमोड केला पाहिजे. माझ्या विचारांची मजल येथपर्यंत येण्यास पुष्कळ वेळ लागला, पण आतां मला क्षणभरही चैन

पडेनासें झालें आहे. या कार्यास मला दैवी प्रेरणा प्रवृत्त करीत आहे असा माझ्या मनाला भास होत आहे."

प्रिंगल—"शाबास ! वुइल्यम, शाबास ! धार्मिक दृष्टीनें सांप्रतच्या युध्दाचें तूं अत्युत्तम मंडन केलेंस. मला स्वतःला धर्माचें विशेष प्रेम वाटत नाहीं आणि मी त्याची फारशी भीतिही बाळगीत नाहीं. मी सर्व-साधारण इंग्लिशांप्रमाणें आहें. आपलें वचन पाळणें हें प्रत्येक इंग्रजाचें कर्तव्य आहे—अनाथांचें रक्षण करणें हें प्रत्येक इंग्रजाचें ब्रीद आहे येवढें मला समजतें आणि त्याप्रमाणें मी वागतों. तथापि सध्द्र्मतत्वांची आणि युध्दाची सांगड कशी घालतां येईल, हा एक मला कठिण प्रश्न होता. पण तुझ्या भाषणानें माझी शंका दूर झाली. बरें, गप्पा पुष्कळ झाल्या. तुला अधिकाऱ्याची जागा मिळणें शक्य आहे. पण तुला घोड्यावर बसतां येतें का ?"

"अगदीं उत्तम."

"तुला मोटारीची माहिती आहे का ?"

"आहे."

"तूं कधीं फ्रान्सला गेला होतास का ?"

"अनेक वेळां मी जर्मनीस सुध्दां गेलों होतों."

"जर्मन भाषा तुला येते का ?"

"अगदीं उत्कृष्टपणें."

"ठीक आहें; मी तुझ्यासंबंधानें कर्नलसाहेबांजवळ गोष्ट काढीन. तोंप-र्यंत तुझ्या परीक्षेचें काम अगोदर होऊन जाऊं दे. आरंभीं धांदल अस-ल्याकारणानें वाटेल तशीं माणसें सैन्यांत भरीत असत. पण आतां योग्य चौकशी केल्यावांचून एकाचेंही नांव दाखल करण्यांत येत नाहीं."

वुइल्यम परीक्षेंत उतरला. नंतर प्रिंगल त्यास ह्मणाला—

"तूं जा आतां. तुझी योग्यता मी जाणून आहें. कर्नलसाहेबांजवळ तुझी शिफारस करण्यास मी चुकणार नाहीं. पण इतक्यांत तुला मी कांहींच सांगूं शकत नाहीं."

घरीं येतांच वुइल्यमनें मातुःश्रीला पत्र लिहिलें:—

" आई, मी सैन्यांत दाखल झालों. तुला हे शब्द वाचून आश्चर्य वाटेल, मीं माझीं धार्मिक मतें सर्वस्वीं सोडून दिलीं असा तुझा समज होईल, पण तसा प्रकार मुळींच नाहीं. जर्मनीनें पूज्य-पदीं प्रस्थापित केलेल्या या युद्ध-राक्षसाचा नायनाट करणें आपले कर्तव्य आहे असें मला वाटूं लागलें आहे. पण यापूर्वी जर मी सैन्यांत दाखल झालों असतों तर मला समाधान वाटलें नसतें—मी सदसद्विवेकबुद्धीचा खून करीत आहें, जनापवादाला भिऊन मी अत्यंत निंद्य आचरण करीत आहें, असें वाटून मला अहर्निश तीव्र मनःसंताप सहन करावा लागला असता. जरी माझ्या या वर्तनामुळें एक अत्यंत मूल्यवान् वस्तूला मी मुकलों असलों, तरी स्वतःच्या मताप्रमाणें वागल्याचें समाधान मला आज अनुभवण्यास मिळत आहे. माझी व कॅप्टन प्रिंगलची गांठ पडली असून मला अधिकाऱ्याची जागा मिळण्याचा बराच संभव आहे. पण मला त्याची किंमत वाटत नाहीं. वाटेल त्या पेशांत समरांगणावर जाण्यास मी उत्सुक झालों आहें. नवलविशेष वरचेवर कळवीत जाईन."

दुसरे दिवसापासून वुइल्यमला शिपाई या नात्यानें लष्करांत दाखल व्हावें लागलें. आरंभीं बरेच दिवसपर्यंत त्याला दिवसभर ड्रिल करावी लागली, जाड्या भरड्या अन्नावर उदरनिर्वाह करावा लागला, साध्या अंथरुणावर रात्र कंठावी लागली. पण त्याला त्याचें कांहींच वाटलें नाहीं. समरभूमीवर जाण्यापूर्वी अशा प्रकारच्या संवयी लावून घ्याव्या लागतात व ज्याला मातृभूमीची अनन्यमनानें सेवा करावयाची आहे त्याला शांतपणानें हें सर्व सहन केलें पाहिजे, हें तो जाणून होता. याप्रमाणें कांहीं दिवस गेल्यावर एकाएकीं त्याला कर्नल सॅम्सवर्थसाहेबांचें आमंत्रण आलें; " तुम्हांस लेफ्टेनंट नेमण्यांत आलें आहे," असें त्यास त्यांनीं कळविलें.

वुइल्यमला आपला हर्ष शब्दरूपानें व्यक्त करणें अशक्य झालें.

# प्रकरण १६ वें.

—— :०: ——

## समरांगणावर !

अधिकारी या नात्यानें वुइल्यमला पुष्कळ काम करावें लागलें. आज आपणास समरांगणावर जाण्याचा हुकूम होईल, उद्यां होईल याप्रमाणें वाट पहाण्यांतच किती तरी दिवस निघून गेले.

अखेर एकदांचा हुकूम आला. एका. गच्च भरलेल्या आगगाडींत बसून तो दक्षिण किनाऱ्याकडे निघाला. तो जरी लढण्यास उत्सुक झाला होता, जर्मनीची दारुण व निर्घृण मानव-रक्त-पिपासा नष्ट करण्यासाठीं तो जरी अत्यंत उत्कंठित झाला होता, तरी समरांगणाकडे निघालेल्या इंग्लिश तरुणांना पाहून त्याचें हृदय खचलें. बहुतेक सैनिक अगदीं तरुण—कांहीं कांहीं तर निव्वळ पोरवयांतील होते. इंग्लंडच्या लोकसंख्येंतील अगदीं निवडक पुरुषांचा सैन्यांत बहुतांशीं भरणा झालेला होता. बहुतेकजण बळकट, सुदृढ बांध्याचे व प्रफुल्लित वदनाचे तरुण होते. युध्द म्हणजे केवळ खेळ आहे अशी त्यांची कल्पना असावी असें त्यांच्या सहास्य चेहऱ्यांवरून दिसत होतें. तथापि अधिक सूक्ष्मपणें पहाणाऱ्या वुइल्यमला त्यांची करारी व चमत्कारिक दृष्टि पाहून त्यांचें अंतर्गत ताडतां आलें. आपण कसल्या भयानक कार्यासाठीं जात आहोंत याची त्यांना पूर्ण जाणीव आहे हें वुइल्यमनें ओळखलें. ते आनंदी स्वरांत राष्ट्रगीतें ह्मणत होते—पण त्याच वेळीं त्यांच्या मनश्चक्षूसमोर त्यांच्या स्वर्गीय गृहसौख्याचें चित्र उभें रहात नसेल काय ?

ज्यांवर त्यांचें निस्सीम प्रेम जडलें आहे अशा सुरुचिर तरुणींचीं मुखकमलें त्यांच्या अंतर्दृष्टीपुढें लास्य करीत नसतील काय ? त्यांपैकीं कित्येकांना आपल्या गृहाचें व प्रियकरणीचें पुनर्दर्शन होणारही नसेल !

थोड्याच दिवसांच्या अवधींत त्यांपैकीं कित्येक जणांचीं ताठलेलीं प्रेतें रणभूमीवर पडलेलीं असतील—कित्येकजण जन्माचे लुले होऊन इस्पितळांत पडलेले असतील !

“ युद्धासारखी क्रूर व निर्घृण वस्तु दुसरी नाहीं ! ” वुइल्यम स्वतःशीं ह्मणाला. “ युरोपखंडांतील सुधारलेल्या राष्ट्रांच्या सुकीर्तीला ती मुळींच शोभत नाहीं. इतिहासांत सांप्रतच्या युद्धासारखें अनीतिमान् अधर्मयुद्ध केव्हांही घडलेलें ऐकिवांत नाहीं. बस्स, माझें कर्तव्य मला बजावलेंच पाहिजे. माझ्या कर्तव्याची दिशा आतां अगदीं निश्चित झाली आहे. इंग्लंडनें अगदीं निरुपायास्तव—अनाथांच्या संरक्षणासाठीं व दुष्टांना शासन करण्यासाठीं आपली समशेर उचलली आहे. इंग्लंड सत्पक्षासाठीं लढत आहे. आह्मी इंग्लिश लोक ऐश्वर्याच्या लालसेनें अथवा नवीन प्रांत काबीज करण्याचा इच्छेनें मुळींच लढत नाहीं. आह्मीं एका दुबळ्या राष्ट्राला दिलेलें वचन पाळण्यासाठीं, आपलें ब्रीद सांभाळण्यासाठीं, मानवजातींत शांततासौख्याच्या प्रसारासाठीं—परमपवित्र हेतूनें लढत आहोंत. ही जर्मन युद्धावरील—अन्याय्य युद्धलालसेवरील मोहीम आहे. शांततेच्या प्रसाराप्रीत्यर्थ मी या युद्धांत सामील झालों आहें. युरोपखंडांतील प्रत्येक राष्ट्राचें चैतन्यसर्वस्व युध्दाच्या तयारींत खर्ची घालण्यास भाग पाडणारा व सर्व जगाच्या शांततेचा क्षणोक्षणीं भंग करण्याची भीति घालणारा हा जर्मनीचा युध्द—राक्षस, जर्मनींतील युध्दपक्षानुयायांनीं पूज्य मानिलेलें हें युध्द—पिशाच्च सर्वतोपरी नष्ट केल्यावांचून तरवार म्यानांत घालावयाची नाहीं असा प्रत्येक शांतताप्रिय शूरानें निश्चय केला पाहिजे. ”

लौकरच इंग्लिश खाडी ओलांडून वुइल्यम, कॅप्टन प्रिंगल व इतर सैनिक फ्रान्सच्या भूमीवर दाखल झाले. पॅरिस येथें फ्रेंच लोकांनीं अत्यंत प्रेमानें व हर्षानें त्यांचें स्वागत केलें.

" इंग्लिश लोकांचा सर्वदा विजय असो ! " हाच ध्वनि सर्वत्र ऐकू येत होता. अश्रुपूर्ण नेत्रांनीं वृध्द जन त्यांचें स्वागत करीत होते; वृध्द स्त्रिया त्यांच्यावर आशीर्वादांचा वर्षाव करण्याच्या कामांत एकमेकींशीं स्पर्धा करीत होत्या; अल्पवयस्क मुलींचे समूह आनंदयुक्त शब्दांनीं त्यांचें अभीष्ट चिंतित होते.

" बाळा ! " वुइल्यम एका फळांच्या दुकानांत शिरतांच त्याची वृध्द मालकीण ह्मणाली, " तुला काय पाहिजे तें घे. तुह्मी इंग्लिश लोक आमचे रक्षणकर्ते आहांत—आमचे परम अभीष्टकारी आहांत. आमच्या लोकांची लढण्याची इच्छा नव्हती; पण जर्मनीनें आह्मांस तसें करण्यास भाग पाडिलें. तुह्मी मित्राप्रमाणें पुढें येतां आणि ह्मणतां, ' भिऊं नका, आह्मी तुमचा सत्पक्ष जाणून तुह्मांस साह्य करण्यासाठीं येत आहों ! जर्मनांना आपण नायनाट करूं ! त्यांचा उन्माद जिरवून टाकूं ! ' छे, छे, मी पैसे घेणार नाहीं. तुला पाहिजे असतील तितकीं फळें घे. "

" पण बाई, तूं गरीब असशील.या युद्धानें तर तुला फारच अडचणींत पाडलें असेल ! " वुइल्यम ह्मणाला.

" कांहींही असो. मी कांहीं घेणार नाहीं. तुह्मी इंग्लिश लोक आमचे साहाय्यकर्ते आहां ! जगाच्या कल्याणासाठीं परिश्रम घेणारे आहां ! तुह्मां-पासून मी कांहींसुध्दां घेणार नाहीं. "

त्या वृध्द स्त्रीचे शब्द श्रवण करून वुइल्यमचें हृदय विरघळलें. या दुष्ट व घोर रणकंदनानें निदान एक तरी चांगली गोष्ट घडवून आणिली—फ्रेंच व इंग्लिश यांच्यामधील सुप्त स्नेहभाव जागृत केला, असें त्यास वाटलें.

वुइल्यम दुकानांतून बाहेर पडला; इतक्यांत कॅप्टन प्रिंगल त्यास ह्मणाला, " वुइल्यम, हा गृहस्थ काय ह्मणतो तें ऐक. मला त्याचें जलद बोललेलें समजत नाहीं."

" मी फक्त तुमचें अभीष्ट चिंतितों हें सांगूं इच्छित आहें, " तो गृहस्थ फ्रेंच भाषेंत ह्मणाला. " तुह्मीं इंग्लिश लोकांनीं आमचें संरक्षण केलें यांत बिलकूल संशय नाहीं. तुह्मी आमच्या मदतीस धांवून आलां

नसतां तर जर्मन लोकांनीं यापूर्वीच पॅरिस सर केलें असतें, आणि १८७० सालची पुनरावृत्ति जगाला पहाण्यास मिळाली असती. मी त्या युध्दांत होतों; त्या वेळची माझी मनोवृत्ति मला स्मरते आहे. आह्मीं जर त्या वेळीं आमचा शब्द मोडला असता तर आमच्या देशाचा बचाव झाला असता. पण नाहीं; एकदां गेलेलें वचन परत घेणें हें तेजस्वी राष्ट्राचें ब्रीद नव्हे. स्वतःची कीर्ति गमावण्यापेक्षां मरण पुरवलें. पण या खेपेस जर्मन लोकांना पूर्वींप्रमाणें जय मिळविणें शक्य नाहीं-त्यांनीं विजयाशा सोडून द्यावी. तुह्मीं इंग्लिश लोकांनीं यशाचें पारडें फिरवून टाकिलें आहे. "

रस्तोरस्तीं वृध्द स्त्रियांच्या व तरुणींच्या झुंडीच्या झुंडी इंग्लिश सैनिकांचें अभिनंदन करीत होत्या. वस्तुतः युध्दांत पडण्याची कांहीं आवश्यकता नसून, प्रातीची लवमात्र आशा नसून, केवळ वचनासाठीं व न्यायपक्ष-समर्थनासाठीं इंग्लंड युध्दांत सामील झालें याचेंच त्यांना आश्चर्य वाटत होतें-इंग्लिशांविषयीं त्यांना अत्यंत आदर वाटत होता.

फ्रेंच लोकांचा प्रेमळपणा पाहून वुइल्यमला फारच कौतुक वाटलें; पॅरिस शहरांतील प्रत्येक रस्त्यांत नागरिकांनीं त्याचें व प्रिंगलचें अभिनंदन केलें. ते दोघे जण एका उपाहारगृहांत फराळासाठीं गेले असतां कांहीं फ्रेंच लोक त्यांच्याबरोबर आंत शिरले व त्यांचीं बिलें देण्याचा त्यांनीं आग्रह धरिला.

" छे, छे, " वुइल्यम ऐकत नाहीं असें पाहून ते ह्मणाले, " तुह्मी आमचे पाहुणे आहांत. तुह्मी आमचे स्नेही आहांत; आह्मांस साह्य करण्यासाठीं-आमच्या पक्षानें लढण्यासाठीं-आमच्या दुष्ट शत्रूंची दाणादाण उडविण्यासाठीं तुह्मी आलां आहांत. तुह्मांला कसलाही खर्च पडतां कामा नये. इंग्लिश लोकांचा सर्वत्र विजय असो ! "

इंग्लिश लोकांना आपल्या दाक्षिण्यानें खूष करण्यासाठीं फ्रेंच स्त्रिया व पुरुष परस्परांशीं स्पर्धा करीत होते. इंग्लिश सैनिकांशीं वारंवार हस्तांदोलन करण्याचा ते आग्रह धरीत; दोन वृद्ध स्त्रियांनीं तर वुइल्यमला अगदींच गोंधळांत पाडिलें—दोघींनींही त्याच्या दोन्ही गालांचें चुंबन घेण्याचा विलक्षण हट्ट धरिला.

रस्त्यांतून सरळ चालण्याचीसुद्धां त्यांना पंचाईत पडूं लागली. चोहोंकडून लोक त्यांच्याभोंवतीं गोळा होत आणि त्यांच्याशीं हस्तांदोलन करण्याचा हेका धरीत.

लौकरच पॅरिस सोडून समरांगणावर जाण्याचा हुकूम आला. इतर सैनिकांसमवेत वुइल्यम व प्रिंगल आगगाडींत बसून निघाले. वाटेनें थोड्याच दिवसांपूर्वीं युद्धामुळें उद्ध्वस्त झालेले प्रांत त्यांना लागले; शेतांतील पिकांची शत्रूंनीं नासधूस केली होती; खेडींच्या खेडीं जाळून फस्त केलीं होतीं !

एके ठिकाणीं साइडिंगवर गाडी थोडा वेळ थांबली. वुइल्यम व प्रिंगल खालीं उतरले. इतक्यांत शेजारच्या शेतांतून एक फ्रेंच इसम आला व त्यांच्याशीं बोलूं लागला.

" मित्रांनों, " तो वृद्ध शेतकरी ह्मणाला, "जर्मन सैनिकांनीं माझें घर जाळून टाकिलें. मी लहानपणापासून त्याच घरांत रहात होतों. बरें झालें, त्यांनीं माझा गोठा शाबूद ठेविला, आणि माझीं पिकें गोळा केलेलीं नसल्यामुळें त्यांना त्यांची फारसी नासाडी करतां आली नाहीं; नाहीं तर मला व माझ्या बायकामुलांना अन्नान्न करीत फिरावें लागलें असतें. माझ्या घरीं माझी तरुण मुलगी नव्हती, ही एक देवाची खैरच झाली ह्मणावयाची ! "

" कां बरें ? " वुइल्यमनें प्रश्न केला.

" हा पहा माझा शेजारी. या शेजाऱ्याला विचारा. "

त्या इसमानें सांगितलेली हृदयविदारक कहाणी आमच्यानें येथें देववत नाहीं. ती फारच भयकर, दारुण आहे. ती ऐकून वुइल्यमचें हृदय व्यथित झालें—" ईश्वराच्या कृपेनें जोंपर्यंत या देहांत प्राण आहेत तोंपर्यंत जर्मनीशीं लढावयाचें ! " असा त्यानें स्वतःशीं निश्चय केला.

" तिचें वय फारच अल्प होतें, " तो बिचारा बाप सद्गदित स्वरानें सांगूं लागला; " तिच्याइतकी देखणी मुलगी आमच्या खेड्यांत नव्हती. तिनें आत्महत्या केली. त्या मानवरूपधारी सैतानांनीं तिला शीलभ्रष्ट केल्यावर ती जिवंत रहाणें शक्य आहे काय ? "

"पहा, प्रिंगल ! जर्मन सुधारणेच्या सुंदर वृक्षाला आलेलीं कडू फळें पहा !" वुइल्यम त्वेषानें ह्मणाला. "हा कशाचा परिणाम ? जर्मनीनें प्रस्थापित केलेल्या युद्धराक्षसाचा !"

कांहीं वेळानें फिरतां फिरतां एका खंदकांत पडलेलीं दोघां सैनिकांचीं प्रेतें त्यांच्या दृष्टीस पडलीं. दोघांनीं एकमेकांस आपल्या बाहूंनीं घट्ट पकडलें होतें. त्यांपैकीं एकजण फ्रेंच व दुसरा जर्मन होता.

"या विचाऱ्यांचा एकमेकांविषयीं किंचित् सुद्धां खाजगी द्वेष असण्याचें कारण नसून केवळ युद्धाच्या भयंकर प्रोत्साहनामुळें यांनीं परस्परांच्या नरडीचा घोट घेतला !" प्रिंगल ह्मणाला.

"आपल्या मुख्य प्रधानाचें ह्मणणें खोटें नाहीं," वुइल्यम उद्गारला. "युद्ध ह्मणजे केवळ अत्याचारांचें व क्रूरपणाचें प्रदर्शन आहे. पण आपणांला लढल्यावांचून गत्यंतर नाहीं. जर्मनीची ही मनुष्यहिंसक प्रबळ युद्ध-लालसा नष्ट केल्यावांचून युरोपखंडाला शांतता लाभणार नाहीं. देव करो आणि युरोपखंडांतील हें शेवटचेंच युद्ध ठरो !"

ते गाडींत येऊन बसले. गाडी पुनः चालू झाली. कित्येक सैनिक आनंदानें राष्ट्रगीतें गात होते. इतर गप्पाष्टकें झोडींत होते. इतक्यांत शेजारच्या लाइनीवरून उलट दिशेनें चाललेली एक गाडी त्यांच्या दृष्टीस पडली. हींत जखमी झालेले शिपाई होते.

"पहा !" वुइल्यम उद्गारला, "एक गाडी सशक्त, निरोगी व उत्साहपूर्ण लोकांनीं भरून समरांगणाकडे चालली आहे तर दुसरी समरांगणावर जखमी झालेल्या लोकांनीं भरून परत चालली आहे. आपणांपैकीं कित्येकांस याच रीतीनें परतण्याचा प्रसंग येणार आहे !"

याचें कारण काय ?

याचें कारण जर्मनींतील युद्धपक्षाच्या लोकांनीं, "युध्द हेंच एक दैवत आहे, त्याची पूजा केली पाहिजे ! युध्द हेंच जगाला तारणारें आहे, युध्द हेंच मानवजातीच्या उन्नतीचें उत्कृष्टतम एकाकी कारण आहे !" अशा प्रकारचीं तत्त्वें प्रतिपादन केलीं व जगाच्या शांततेचा, मनुष्यजातीच्या उच्चतम सुखाचा भंग केला !

थोड्याच वेळानें गाडी थांबली. आपण समरांगणानजीक येऊन पोंचलों हें वुइल्यमच्या लक्षांत आलें.

तोफांचा—यमदूतिकांचा--भीषण रव स्पष्ट ऐकूं येत होता. तोफांचा—युद्धासारख्या दुष्कृत्याला भौतिक शास्त्रांनीं केलेल्या साह्याचा--तो ध्वनि ऐकून सर्वांच्या अंगावर रोमांच उभे राहिले.



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
नौपाडा शाखा.

# प्रकरण १७ वें.

——:o:——

## आशातंतु !

कॅप्टन लेनॉक्स, त्याला स्वतःला वाटलें तितक्या लौकर समरांगणावर जाऊं शकला नाहीं. याच कारणामुळें त्याला पुनः मूनलाइट पॅलेसमध्यें दाखल होतां आलें. योगायोगच कांहीं विलक्षण; त्याला लिली तेथें भेटली. ॲडमिरल नेल्सन हे कांहीं युद्धविषयक कामासाठीं लंडनला गेले होते; आणि लिली अद्याप नर्स या नात्यानें फ्रान्सला जाण्यास निघाली नसल्यामुळें कॅप्टन लेनॉक्सला ती एकटीच घरीं सांपडली.

" लिली, " कॅप्टन लेनॉक्स ह्मणाला, " माफ कर. मला तुझी भेट घेतल्यावांचून चैनच पडेना. आमचा फ्रान्सला जाण्याचा दिवस थोडासा पुढें ढकलण्यांत आल्याकारणानें मला इकडे येतां आलें. पण मला पाहून तुला संतोष वाटत असल्याप्रमाणें दिसत नाहीं ! "

" तसें कांहीं नाहीं, " लिलीनें उत्तर केलें; " इतकेंच कीं तुमच्या येण्याची मीं अपेक्षा केली नव्हती. तुह्मांला परवां जाते खेपेस सेंट जॉन गांवानें जो मान दिला त्यानंतर पुनः अशा रीतीनें परत येणें थोडेंसें अपकर्षकारक नाहीं का दिसत ! "

वरील शब्द उच्चारतांना लिलीनें स्मित केलें;पण तिच्या एकंदर मुद्रेवरून तिच्या शरीरप्रकृतींत बराच अनिष्ट फरक पडला आहे हें स्पष्ट दिसत होतें

" उत्कर्षाची आणि अपकर्षाची मीं कां पर्वा करावी ? " लेनॉक्स उद्गारला. " मला चैन पडेना ह्मणून मी आलों. तूं अद्याप इंग्लंड सोडलें नाहींस हें मी जाणून होतों; तुझ्या भेटीची खात्री होती ह्मणून मी आलों. आज रात्रीं मी परत जाणार. "

" सध्यां माझें मन खेळांत अथवा इतर करमणुकींत लागेलसें मला वाटत नाहीं. तथापि तुह्मांसाठीं—"

" खेळाची गोष्ट कशाला काढतेस ? मी खेळण्यासाठीं प्लायमौथपासून येथपर्यंत आलों नाहीं. मी आलों याचें कारण—पण तें तुला माहीतच आहे. तो एंजिनिअर बेनेट तुला ऐकून ठाऊक असेलच. तो उद्यां समरांगणावर जाणार आहे. त्याचें काल लग्न झालें. थांबण्यांत अर्थ नाहीं असें त्याला व त्याच्या प्रियतमेला—दोघांसही वाटलें. असल्या चमत्कारिक प्रसंगीं विवाह करणें मूर्खपणाचें आहे अशी तिची समजूत घालण्याचा तिच्या आप्तवर्गानीं पुष्कळ प्रयत्न केला, पण तिनें त्यांच्या उपदेशाकडे पूर्ण दुर्लक्ष्य केलें. ' माझा प्रियकर समरांगणावर जात आहे त्या अर्थी मला त्याच्याशीं विवाहबद्ध झालेंच पाहिजे, ' तिनें आपल्या हितचिंतकांस स्पष्ट उत्तर दिलें; ' घरीं आपली नवपरिणीत वधू आपली वाट पहात आहे ही भावना त्याच्या मनांत जागृत रहावी अशी माझी इच्छा आहे. ' ' पण समज, तो युद्धांत ठार झाला ! ' एक वृद्ध स्त्री तिला ह्मणाली. ' हरकत नाहीं. त्याची विधवा ह्मणून घेण्यांत मला अभिमान वाटेल, ' तिनें टासून उत्तर दिलें. कां ? पोरगी बाणेदार आहे कीं नाहीं ? "

लिलीनें उत्तर दिलें नाहीं.

" पुष्कळ लोकांनीं याच मार्गाचें अनुकरण केलें आहे, " लेनॉक्स घाईनें पुढें बोलूं लागला; " त्यांच्या मनांतून पुष्कळ दिवस थांबावयाचें होतें; पण युध्द उपस्थित होतांच त्यांनीं तांतडीनें लग्नें केलीं. "

" तुमच्याही मनांतून लग्न करावयाचें आहे काय ? " हे शब्द उच्चारल्याबद्दल लिलीला स्वतःचा राग आला. पण तिची चित्तवृत्ति क्षुब्ध झाली असल्यामुळें तिच्या मुखावाटें ते शब्द निघून गेले.

“ मी मोठ्या आनंदानें लग्न करीन ! ” लेनॉक्स विकारवश होऊन उद्गारला. “ वाटेल तो स्वार्थत्याग करीन पण लग्नाची संधि मी दवडणार नाहीं ! लिली, मी कशाकरितां आलों हें तूं जाणून आहेस. त्या दिवशीं तुझ्याशीं बोलण्याचा योगच जुळून आला नाहीं. पण आतां माझ्यानें स्तब्ध रहावत नाहीं. माझें तुझ्यावर किती निस्सीम प्रेम आहे हें तूं जाणून आहेस. पहा, तूं माझ्या आशेला किंचित् जरी अवकाश दिलास तरी—तरी—”

पण लिलीनें कांहींच उत्तर दिलें नाहीं. गेल्या दोन तीन आठवड्यांमध्यें तिला फार त्रास झाला होता. वुइल्यमबरोबर विवाहित होण्याचा तिनें निश्चय केला होता. तिनें आपलें प्रेम त्याच्यासमोर व्यक्त केलें होतें; त्याची पत्नी होण्याचें वचन तिनें दिलें होतें. पण त्यानंतर एकाएकीं युध्दरूपी कृष्णमेघानें त्यांच्या भावी सौख्यसूर्याला ग्रासलें—आणि तिच्या ओळखीच्या प्रत्येक तरुणानें राष्ट्रप्रेमासाठीं समरांगणाकडे दौड ठोकिली असतां, तिच्या प्रेमविषयानें—वुइल्यमनें—धार्मिक समजुतीच्या आवरणाखालीं स्वतःचा नामर्दपणा छपविण्याचा प्रयत्न करून युध्दाला जाण्याचें टाळलें;—निदान लिलीला तरी तसें वाटत होतें. वुइल्यमचा विचार तिला असह्य होऊं लागला. स्वतःस आंग्लभूमीचा पुत्र ह्मणविण्यास ज्याला लवमात्रही अधिकार नाहीं अशा तरुणावर प्रेम केल्याबद्दल तिला स्वतःचा द्वेष वाटूं लागला. “ आपण आपलें प्रेम त्याजजवळ व्यक्त केलें–आपण स्वतःस आलिंगण्याची त्याला परवानगी दिली–त्याला आपल्या अधरांचीं पुनः पुनः चुंबनें घेऊं दिलीं–छे! आपण अत्यंत गहन पातक आचरिलें,” असें लिलीला वाटूं लागलें.आपल्या मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठीं आणि कीर्तीसाठीं प्राण समर्पण करणाऱ्या सत्पुरुषांच्या वंशांत जन्मलेल्या तरुणीनें एका नामर्दाशीं प्रणयबद्ध व्हावें ! धिक्कार असो तिला ! हा विचार लिलीचें हृदय जाळूं लागला. इतकें असूनही आश्चर्याची गोष्ट, तिच्यानें वुइल्यमची मूर्ति हृदयांतून काढून टाकवेना. तो रणभीरु आहे अशी समजूत झाली तरी तिचें त्याजवर प्रेम होतेंच ! सेंट जॉन येथें भरलेल्या सभेंत तिनें त्याचा अपमान केला तेव्हां सुद्धां तिचें त्याजवर प्रेम होतेंच! “ कांहींही असो, राष्ट्रप्रेमानें

ज्यांच्या मनोवृत्ति स्पृष्ट झालेल्या नाहींत, राष्ट्राच्या विमल यशाचा व स्वातंत्र्याचा प्रश्न उपस्थित झाला असतां जो त्यांच्या रक्षणासाठीं समरांगणावर जाण्यास तयार होत नाहीं, तो पुरुष म्हणविण्यास योग्य आहे काय ? बस्स ! ही लिली अशा रणभीतावर कधींही प्रेम करणार नाहीं!" असा तिनें अखेरीस निश्चय केला.

पण हा वरकांती निश्चय काय कामाचा ? बुइल्यमवर तिचें अद्यापही प्रेम होतेंच. तिच्या हृदयाच्या अगदीं अंतर्भागांत, बुइल्यम रणभीरु नाहीं असें तिला वाटत होतें.

कॅप्टन लेनॉक्स मूनलाइट पॅलेसमध्यें दाखल झाला, त्याच क्षणीं त्याच्या येण्याचें कारण लिलीनें ताडलें होतें. आज कित्येक महिने तो तिजविषयीं विलक्षण आस्था दाखवीत होता; त्याच्या एकंदर वर्तनाचें मर्म तिनें ताडलें होतें. शिवाय त्याचे गुणही तिला आवडत होते. तो स्वतः शूर पुरुषांच्या वंशांत जन्मला असून त्याचें आपल्या मातृभूमीवर विलक्षण प्रेम होतें. तो देखणा, सुदृढ व उदार अंतःकरणाचा होता. त्याच्याशीं लग्न केलें असतां तिच्या घराण्याला कमीपणा न येतां उलट त्याचें भूषण वाढणार होतें. तिच्या परमप्रिय पित्याचीही इच्छा तशीच होती. समरभूमीवर जाण्याची टाळाटाळ करणाऱ्या बुइल्यमपेक्षां लेनॉक्स हा अनंतपटीनें आदरणीय होता.

लिली कांहीं बोलत नाहीं असें पाहून लेनॉक्स ह्मणाला, "लिली, तुला माझ्या बोलण्याचा राग तर नाहींना आला ?"

लिली—"छेः ! राग येण्याचें काय कारण ?"

लेनॉक्स—"मग माझ्या मनःकामना तडीस जाण्याची आशा आहे तर ? तूं मला अगदीं नक्की वचन दे असा हेका मी धरीत नाहीं. तुजपेक्षां दुसऱ्या कोणावर माझें अधिक प्रेम नाहीं, एवढें तूं ह्मणालीस तरी बस्स झालें. मी अधिक धैर्यानें समरांगणावर जाईन. लिली, एवढे शब्द तुला नाहींत कां उच्चारतां यावयाचे ?"

"नाहीं." पण तिच्या कंपयुक्त स्वरावरून तिच्या मनावर झालेला अनुकूल परिणाम ध्वनित होत होता.

लेनॉक्स—“ मला कोणी प्रतिस्पर्धी तर नाहींना ? ”

लिली—“ नाहीं. ”

लेनॉक्स—“ तसें आहे तर मला अंशतः तरी वचन द. ”

लिली—“ तुमचें त्या योगानें समाधान होणार नाहीं. ”

लेनॉक्स—“ मला तुझ्या हृदयाचा एक कोंपरा जरी मिळाला तरी बाकीचा प्रांत मी लौकरच काबीज करीन. बोल ! ”

वुइल्यमवर आपण एके काळीं प्रेम करीत होतों ही गोष्ट लेनॉक्सपासून छपवून ठेवणें लिलीला न्याय्य वाटेना. ती निश्चयानें ह्मणाली:—

“ तुम्हांला एक गोष्ट सांगितली पाहिजे. माझें कोणावर प्रेम जडलें नव्हतें असें मी ह्मणालें, पण तें असत्य आहे. ”

लेनॉक्स—“ असेना कां ! सध्यां तरी त्या व्यक्तीवर तुझें– ”

लिली—“ छे, मुळींच नाहीं. ”

लेनॉक्स—“ ती व्यक्ति कोण ? ”

लिली—“ तुमचा तर्क नाहीं का चालत ? ”

लेनॉक्स—“ कोण ? वुइल्यम ? ”

लिली—“ होय. पण आतां त्याचें नांव उच्चारण्याचीसुद्धां मला शरम वाटतें. तसल्या रणभीरूवर प्रेम जडूं दिलें हें मीं मोठें पातक केलें असा मला प्रतिक्षणीं पश्चात्ताप होतो. ”

लेनॉक्स—“ तुझें तें प्रेम केवळ क्षणिक असलें पाहिजे. तुझ्यासारख्या शूर अंतःकरणाच्या तरुणीचें तसल्या भेंकडावर वास्तविक प्रेम जडणें शक्य नाहीं. ”

लिली—“ मला भीरुत्वाचा जितका तिरस्कार वाटतो तितका दुसऱ्या कोणत्याही गोष्टीचा वाटत नाहीं. त्या वुइल्यमचा विचार हृदयांतून काढून टाकण्याचा मी सारखा प्रयत्न करीत आहें. ”

लेनॉक्स—“ त्याची तूं बिलकूल चिंता करूं नकोस. तसल्याशीं स्नेह केल्याबद्दल मला स्वतःला पश्चात्ताप वाटतो. लिली, त्याला आपण आपल्या मनांतून सहज हुसकून लावूं. ”

क्षणमात्र लिलीला लेनॉक्सचा राग आला. तिच्या मनांतून वुइल्यमचा पक्ष घेऊन बोलावयाचें होतें. तुझ्यापेक्षां वुइल्यम शूर आहे असें लेनॉक्सला ह्मणण्याची तिची इच्छा होती. पण तिला बोलवेना.

लेनॉक्स– " मला तुझ्या हृदयप्रांतांत थोडेंसें स्थान दे; मग वुइल्यमचा विचार मनांतून काढून टाकण्यास तुला बिलकूल त्रास पडणार नाहीं. "

लिली—" इतक्यांत मला कांहींच सांगतां येत नाहीं. "

लेनॉक्स—" पण तूं मजवर प्रेम करण्याचा—निदान मला सदय दृष्टीनें लेखण्याचा—प्रयत्न तरी करशील ना ? "

लिली—" तेवढें वचन मी देतें. "

लेनॉक्स—" झालें,तूर्त मला अधिक कांहीं नको. लिली, आतां मला एक चुंबन—"

लिली—" छे, छे ! ती गोष्ट काढूं नका ! "

लेनॉक्स—" हरकत नाहीं. तुझ्या तेवढ्या वचनानेंच, माझ्यासारखा सुखी मनुष्य जगांत नाहीं असें मला वाटूं लागलें आहे. माझी समरांगणावरून परत येण्याची तूं वाट पहात रहाशील नाहीं ! "

लिली—" कोणाला ठाऊक. वर्तमानपत्रांवरून तर असें समजतें, कीं नर्स होऊन जाणाऱ्या स्त्रियांना सुद्धां धोका आहे. "

लेनॉक्स—" तूं तो विचार सोडून देशील असें मला वाटत होतें."

लिली—" कां बरें ? स्वदेशासाठीं लढणें हें जसें तुह्मां पुरुषांचें कर्तव्य आहे, तसेंच आपल्या हातून देशकार्याला होईल तेवढी मदत करणें हें आमचें कर्तव्य आहे. मी स्वकर्तव्यापासून ढळणारी स्त्री नाहीं."

लेनॉक्स प्रशंसापूर्ण दृष्टीनें तिजकडे पाहूं लागला. " बस्स ! बायको असावी तर अशी असावी ! " तो स्वतःशीं उद्गारला. " केवढा स्वाभिमान—केवढी कर्तव्यदक्षता ! झाली, मला तिची प्राप्ति झाली ! एवढ्याशा वचनाची सुद्धां ती अत्यंक काळजी वाहील. वुइल्यमचा विचार तिच्या मनांतून कायमचा नष्ट होणार याबद्दल तर शंकाच नको."

लेनॉक्स उघडपणें ह्मणाला, " कदाचित् फ्रान्समध्यें आपली भेट होईल. मी जखमी झाल्यास—"

" नको तो विचार ! " लिली सकंप स्वरांत उद्गारली.

" अरे वाः ! तिचें माझ्यावर प्रेम आहे ! " लेनॉक्स मनांत ह्मणाला. " माझ्या जखमी होण्याचा विचार तिला असह्य होतो. "

तो मोठ्यानें ह्मणाला, " कांहींही असो, तुझ्या शुश्रूषेचा विषय होणारा मनुष्य भाग्यवान् यांत शंका नाहीं. मला तें सौभाग्य लाभल्यास त्या संधीचा मी शक्य तितका उपयोग करून घेईन. "

त्याच दिवशीं कॅप्टन लेनॉक्स प्लायमौथकडे जाण्यास निघाला. लिलीची प्राप्ति आपणास होणार अशी त्याची खात्री होती. नेल्सनसाहेबांची आपणावर बहाल मर्जी आहे हें तो जाणून होताच; शिवाय वुइल्यमचा आपल्या मार्गांतील कांटा कायमचा दूर झाला असल्यामुळें त्याची भीति बाळगण्याचें बिलकूल कारण नाहीं अशी त्याची ठाम समजूत होती. झालें; लिली तर केवळ सद्गुणांची पुतळी ! तेवढ्याशा पुसट वचनाला सुद्धां ती अत्यंत महत्त्व देणार याबद्दल त्याला बिलकूल शंका नव्हती. अर्थातच तो अगदीं हर्षपूर्ण हृदयानें जाण्यास निघाला.

याप्रमाणें तिन्हीही व्यक्ति फ्रान्सवर प्राप्त होणार होत्या. आपल्या देशाला लढाऊ तरुणांची जरूर आहे एवढें कारण लेनॉक्सला बस्स होतें. हें युद्ध न्याय्य आहे का नाहीं, इंग्लंडला युद्धांत सामील होणें आवश्यक आहे कीं कसें, या प्रश्नांचा विचार करण्याचें काम त्याचें नव्हतें. आपलें राष्ट्र युद्धांत सामील झालें आहे आणि आपल्या मनगटांत समशेर धरण्याचें सामर्थ्य आहे, या दोन गोष्टी त्याला बस्स होत्या.

लिली फ्रान्सला जाणार होती याचें कारण, प्राणरक्षण करणें हें आपलें कर्तव्य आहे असें ती समजत होती. स्त्रीजातीचें परमपवित्र व उदात्त कर्तव्य बजावण्यासाठीं ती आपलें प्रिय घरदार सोडून आपला प्राण धोक्यांत घालण्यास तयार झाली होती. स्त्रियांना लढण्याची परवानगी असती, तर लिली समरांगणावर जाण्यास सुद्धां कचरली नसती. आपल्या जन्म-

भूमीच्या उज्ज्वल यशासाठीं लढतांना जखमी झालेल्या वीरांची शुश्रूषा करण्यासाठीं शक्य तितके परिश्रम करण्यास ती तयार होती.

वुइल्यम निराळयाच कारणामुळें जात होता. युद्धाचा त्याला मनापासून तिटकारा होता, युद्ध हें अत्यंत निंद्य, मानवजातीस कलंकभूत, अशी त्याची खात्री होती; आणि म्हणूनच तो समरांगणावर जाण्यास इतका उत्सुक झाला होता. अखिल युरोपखंडाच्या शांततेचा भंग करणाऱ्या युद्धपिशाच्चाचा समूळ नाश करण्यासाठीं—मानवसृष्टींत शांततेचा प्रसार करण्यासाठीं तो जिवावर उदार झाला होता—हातांत समशेर धरण्याची ताकद आहे तोंपर्यंत युद्धासक्त जर्मनांशीं झगडण्याचा त्यानें निश्चय केला होता.



# प्रकरण १८ वें.

——:०:——

## तोफांच्या धडधडाटांत.

दिवसभरच्या श्रमानें विगलित झाल्यामुळें ह्मणा अथवा समरभूमीवर होत असलेला घनघोर रक्तपात कांहीं काल तरी आपल्या दृष्टीआड व्हावा ह्मणून ह्मणा अथवा पृथ्वीचा दुसरा गोलार्ध प्रकाशित करण्याचें उदार कार्य बजावण्याकरितां ह्मणा, भगवान् सहस्ररश्मि पश्चिमासुंदरीशीं संलग्न होत होत आतां अगदींच दिसेनासा झाला होता. हें पाहून तारागणांचा समूह आकाशांतील खिडक्यांतून आपले चंचल नेत्र फिरवीत हळू हळू निरभ्र आकाशमंडळांत गोळा होऊं लागला.

पुष्पवृक्षाच्या पल्लवांवर पडून पुष्पांशीं खेळत वायु विश्रांति घेत होता. पशुपक्ष्यांचे थवे आपापल्या विश्रांतिस्थळीं विश्रांति घेण्यांत मग्न झाले होते. निसर्गसुंदरी जणूं युद्धप्रिय असुरांकडे पाहून, माझी शांतता मोडणें तुझ्या स्वाधीनचें नाहीं असें त्यास आपल्या नितांत चेष्टेनें कळवीत होती. अशा वेळीं वुइल्यम आपल्या कित्येक देशबांधवांसह समरभूमीच्या आघाडीस येऊन पोंचला. समरांगणावर अगदीं आघाडीस जाऊन युद्धाचें बीजारोपण करणाऱ्या जर्मन लोकांचा निःपात कधीं करीन आणि युद्धाचीं पाळेंमुळें खणून जर्मनांनीं पोसलेला विषारी युद्धवृक्ष केव्हां निर्मूल करीन असें त्यास झालें होतें. पण—

" धाड ! धाड !! धाड !!! "

आणि त्यानंतर कानावर आलेल्या कर्कश आरोळ्या, अंतकाळचे विव्हळणें व करुणेचे आलाप !

जिकडे तिकडे दिसणारे प्रेतांचे ढीग, रक्ताच्या नद्या आणि मांसाचा चिखल !

त्वेष ! मत्सर ! क्रौर्य आणि हृदयशून्यतेचा बाजार !

अशा प्रकारचें प्रेतांचा थरकांप करणारें तेथील दृश्य पहातांच वुइल्यम कांहीं काळ स्वस्थ उभा राहिला. आपण खरा सृष्टि पहात आहोंत का स्वप्नसृष्टींत संचार करीत आहोंत हें त्यास समजेना. युद्धास तो आजपर्यंत प्रत्यक्ष नरक समजत आला. आतां तो नरक अत्यंत किळसवाणा, खोल व भयप्रद आहे अशी त्याची खात्री झाली. सुधारणेच्या जोरानें काल्पनिक स्वर्गसुखासही खालीं पाहूं लावणाऱ्या या मृत्युलोकावर अशा प्रकारचा हीन नरक असावा ही गोष्ट वुइल्यमच्या मनास अत्यंत लागली.

" या हीन नरकाचें उच्चाटन करणें, युध्दास भूतकालीन विस्मृतीच्या खोल दरींत ढकलून देणें आणि आपल्या विश्वबांधवांस नितांत शांततेचा पूर्ण आस्वाद घेण्यास संधि देणें हें आपलें आद्य कर्तव्य आहे; या घाणेरड्या नरकाचा विध्वंस करण्याकरितां आपल्या व आपल्या देशबंधूंच्या मनांत ईश्वरी प्रेरणा झाली आहे ! नाहीं तर स्वतःची कोणतीही कार्यसिध्दि नसतांना लक्षावधि आंग्ल तरुण शांतपणानें इंग्लिश खाडी ओलांडून फ्रान्सच्या किनाऱ्यावर कसे उतरते ! लॉर्ड किचनेर साहेबांनीं देशाच्या कार्याकरितां धांवा, असें प्रसिध्द करण्याचा अवकाश, कीं हजारों तरुणांच्या झुंडी सैन्यांत कां सामील होत्या ? सुंदर तरुणी सुखविलासांस लाथ मारून, जुने अनुभविक वीर शांततेच्या आयुष्यास झुगारून, विलासी तरुण आपलीं सुखाचीं साधनें विसरून भराभर समरांगणाकडे कां धावूं लागते ? इतकेंच नव्हे, लिलीसारख्या सार्वभौम सुंदरीचा त्याग करून आपल्या सदसद्विवेकबुद्धीस भजणारा मी समरभूमीवर कां आलों असतों ? युद्धाचा विनाश—युध्दावरील मोहीम—जर्मन युध्दासुराचा निःपात होईल तितक्या लौकर करावा अशी ईश्वरी इच्छाच दिसते. " तो स्वतःशीं ह्मणाला.

असा विचार करून वुइल्यम समरांगणाकडे धांवूं लागला. त्याचा तो आवेश पाहून त्याच्यासभोंतालचे कित्येक तरुण त्याच्याकडे विस्मय-चकित मुद्रेनें पाहूं लागले. समरांगणावर जाऊन शत्रूशीं दोन हात करण्याचा आपणास अद्याप हुकूम आला नाहीं असें त्यास तितक्यांत एका तरुणानें सांगितलें. तेव्हां वुइल्यम आपल्या चमत्कारिक वर्तनाबद्दल स्वतः-शींच हसत निरुपायानें परत फिरला.

वुइल्यमला प्रत्यक्ष समरांगणावर येऊन पंधरवडा लोटला होता. दर-रोज निकराचे हल्ले आणि प्रतिहल्ले होत. मेघांच्या गडगडाटासही कमी-पणा आणणारा तोफांचा धडधडाट, पर्जन्यवृष्टीसही खालीं पहावयास लाव-णारी अग्नीची वृष्टि, विजेच्या लखलखाटास न्यूनत्व आणणारा शस्त्राचा चकचकाट हीं पाहिलीं म्हणजे पंचमहाभूतें खवळून गेलीं आहेत असें वाटे. नेत्रांस अंध करणारे, मनास भिवविणारे आणि कानांच्या कानठाळ्या बसविणारे युध्दप्रसंग म्हणजे कांहींच नव्हतें अशी वुइल्यमच्या मनाची तयारी हळू हळू होऊं लागली. अनेक मनुष्यांचा एकदम संहार करणाऱ्या तोफेच्या गोळ्याची त्यास दिक्कत वाटेनाशी झाली. अग्निप्रलयाकडे तो लीलेनें पाही. प्रेतांचे ढीग पाहतांना त्याचें मन लेशमात्रही कचरत नसे. राष्ट्राच्या कार्यास मनोभावें कशी मदत करावयाची, युध्दाचें निर्मूलन कर-ण्याकरितां कसें झटावयाचें एवढेंच काय तें तो जाणत होता. युध्दासुराचा संहार करण्याकरितां आपणांत ईश्वरी तेज अवतरलें आहे असें त्यास वाटूं लागलें. त्याचें वदन चंद्रकलेप्रमाणें समरतेजानें अधिकाधिक विलसूं लागलें. त्याचा आनंद पाहून आसपासच्या तरुणांनीं आनंदित व्हावें, त्याचा आ-ल्हाद पाहून आसपासच्या तरुणांचीं वदनें प्रफुल्लित व्हावींत, आणि सर्वांनीं मिळून आवेशानें रणगीताची गर्जना करावी.

नेमलेल्या कुस्तीचा दिवस जवळ आलेला पाहून मल्ल आखाड्याकडे ज्या मुद्रेनें पाहतो त्या मुद्रेनें वुइल्यमनें समरभूमीकडे पहावें, परंतु अद्याप आपणास लढण्यास हुकूम सुटत नाहीं याबद्दल किंचित् निराश होऊन आपणांस सांगितलेलीं युद्धाव्यतिरिक्त कामें मनोभावें करावीं असें वुइ-ल्यमचे बरेच दिवस चाललें होतें. आपल्यासारख्या हजारों तरुणांस

प्रत्यक्ष लढण्याचा मान मिळावा आणि आपण मात्र युद्धाची पिछाडी सांभाळीत रहावें हें वुइल्यमला दिवसेंदिवस असह्य होत चाललें. सेनापतीकडे जाऊन लढण्याची परवानगी मिळवावी असें त्यास अनेकदां वाटलें. परंतु समरांगणावर मनाच्या क्रियेस विशेष मान नसतो. तशा प्रकारचा हुकूम सुटेपर्यंत आपण पिछाडीच राखली पाहिजे हें तो पूर्णपणें जाणून होता. ह्मणून आघाडीस जाऊन युद्धावर मोहीम चढविण्याची सुसंधि केव्हां प्राप्त होईल, जर्मन युद्धासुराचें निर्मूलन करण्याचें आपलें महद्भाग्य कधीं उघडेल याची तो चातकाप्रमाणें वाट पाहूं लागला.

एके दिवशीं सायंकाळीं वुइल्यम अतृप्त कर्णांनीं इंग्लिश वीरांची मर्दुमकी ऐकत होता. त्या दिवशीं आंग्ल वीरांनीं मोठ्या शौर्यानें जर्मनांची पिछेहाट केली होती. इतकेंच नव्हे तर जर्मनांचे कित्येक खंदक त्यांनीं सर केले होते. अशा महायशांत आपला कांहींच भाग नसावा याबद्दल वुइल्यमला वाईट वाटत होतें. इतक्यांत एक तरुण त्याच्याजवळ येऊन ह्मणाला—

"लेफ्टेनंटसाहेब ! कर्नल सॅम्सवर्थ तुह्मांस बोलावित आहेत." मेघाकडे अतृप्त नयनांनीं पाहणाऱ्या चातकास मेघवृष्टि होत असलेली पाहून ज्याप्रमाणें आनंद व्हावा त्याप्रमाणें वुइल्यमला आनंद झाला. कर्नल सॅम्सवर्थ आपणास कांहीं तरी जबाबदारीची कामगिरी सांगण्याकरितांच बोलावित आहेत अशी त्याची खात्री होती. ही जबाबदारीची कामगिरी आघाडीस जाऊन लढण्याची असेल तर किती उत्तम होईल, असा विचार करीत तो कर्नलजवळ जाऊन पोंचला.

"वुइल्यम !" कर्नल सस्मित वदनानें ह्मणाले, "तुला मीं आजपर्यंत तिष्ठत ठेविलें तें निष्कारण नव्हतें. तूं जरी युद्धासंबंधीं उच्च प्रतीचें शिक्षण मिळविलें आहेस, तरी तूं प्रत्यक्ष युद्धास अगदींच नवखा होतास. युद्धाचें शिक्षण आणि प्रत्यक्ष युद्ध यांमध्यें फार अंतर आहे. तेव्हां तुझें मन येथील परिस्थिति पाहून कचरूं नये, तुझे डोळे लढाईच्या रक्तपातास सरावावेत, ह्मणून मीं आजपर्यंत प्रत्यक्ष समरांगणावर तुला नेलें नाहीं. आतां तुझ्या मनाची व नेत्रांची पूर्ण तयारी झाली असेल असें जाणून तुला मी

प्रत्यक्ष रणभूमीवर समरतेज दाखविण्यास बोलावित आहे. तुझ्या हुकुमाखालीं कित्येक तरुण वीर लढतील. बहुत करून उद्यांच तुझ्या कामगिरीची आह्मांस जरूर पडेल. आह्मी आज जर्मनांचे बरेच खंदक सर केले आहेत. ते परत घेण्याकरितां जर्मन उद्यां प्रयत्न केल्याशिवाय राहणार नाहींत."

कर्नलचे शब्द कानावर पडतांच वुइल्यमला अत्यानंद झाला. तो ह्मणाला, "मी आपला अत्यंत आभारी आहे. राष्ट्रकार्याकरितां माझे कित्येक देशबंधु लढत असतां त्यांच्याकडे स्वस्थपणें पाहणें मला असह्य होऊं लागलें होतें. जर्मनीची खोड मोडण्याची सुसंधि केव्हां मिळेल याची मी एकसारखी वाट पाहत होतों; तोंच आज आपण मला आघाडीस येऊन लढण्याबद्दल हुकूम दिला. आपण माझ्यावर अत्यंत उपकार केले. या उपकाराची फेड——"

"गप्प, वुइल्यम! अधिक बोलूं नकोस." वुइल्यमच्या खांद्यावर हात ठेवून कर्नल गद्गदवाणीनें ह्मणाले. "युद्धांतील प्राणनाश पाहूनही न डगमगणारे माझे नेत्र तुझ्या दोन शब्दांनीं भरून आले. राष्ट्रकार्याकरितां झटणारे तुझ्यासारखे स्वार्थत्यागी तरुण जोंपर्यंत माझ्या मातृभूमीवर निपजत आहेत तोंपर्यंत अपेशाची चिंता करण्याचें तिला कारण नाहीं. जा. उद्यां सिंहाच्या छाव्याप्रमाणें अद्वितीय पराक्रम कर, आणि स्वातंत्र्याच्या वातावरणांत राहणाऱ्या तरुणांचें समरतेज जगाच्या प्रत्ययास आण. वुइल्यम! तूं माझे शब्द खरे करशील यांत मला तिळप्रायही संशय वाटत नाहीं. जा. दिवसभरच्या श्रमानें तूं थकला असशील. रात्रीं आनंदानें विश्रांति घे——"

"आणि उद्यां——" वुइल्यम मध्येंच ह्मणाला.

"उद्यां सूर्योदयाबरोबर तुला समरांगणाच्या अग्रभागीं चमकलें पाहिजे."

कर्नलला लवून अभिवादन करून वुइल्यम प्रसन्न वदनानें तेथून आपल्या राहुटीकडे जाण्यास निघाला. तेव्हां फार दिवसपर्यंत परीक्षेचा निकाल ऐकण्याकरितां आतुर झालेल्या विद्यार्थ्यांच्या वदनावर आपण

यशस्वी झालों असें ऐकल्यामुळें जो आनंद दृग्गोचर व्हावा तोच आनंद वुइल्यमच्या वदनावर चकाकत होता.

आपल्या शौर्यानें जर्मनांस हाणून पाडीत आहोंत, आपण त्यांचा पुरा निःपात केला आहे, अशीं सुखस्वप्नें अनुभवीत ती रात्र वुइल्यमनें काढली. दुसरा दिवस उजाडला. वुइल्यम आपल्या कित्येक वीर गड्यांसह न्याहारी आटोपून सशस्त्र अग्रभागीं दाखल झाला. त्या वेळचा त्याचा आनंद अवर्णनीय होता. लिली आणि सर्व जग यांस तो पूर्णपणें विसरला होता. त्यास लिलीची आठवण असती तर आतांच्या आनंदाइतका आनंद लिलीशीं आपला विवाह होतांना तरी होईल किंवा नाहीं याचें त्यास गूढ पडलें असतें. थोड्याच वेळांत खऱ्या मर्दाची कामगिरी आपण करणार, थोड्याच वेळांत आपली युध्दावरील मोहीम सुरू होणार, थोड्याच वेळांत जर्मन असुरांचा निःपात करण्यास आपण प्रारंभ करणार असें वाटून तो स्वतःस धन्य मानूं लागला. या युद्धांत आपण विजयी झालों तर जगावर केवढा उपकार होईल ! जगांत इंग्लंडची महती किती वाढेल ! सर्व जग इंग्लडला किती धन्यवाद देईल ! ईश्वराचे असंख्य आशीर्वाद इंग्लंडवर स्वर्गीय सौख्याची वृष्टि करतील ! आणि अशा उदात्त कार्यास, अशा पवित्र कार्यास, नव्हे अशा धर्मकृत्यास आपला हातभार लागणार. पुढील विचार वुइल्यमच्या ओंठांतच जिरून गेले.

" धाड ! धाड ! ! धाड ! ! ! " जर्मन तोफांची सरबत्ती ऐकूं आली. तितक्याच जोराचा धडधडाट इंग्लिश तोफांनीं केला.

जिकडे तिकडे धुराचे डोंगर दिसूं लागले. काय हुकूम सुटतात हें ऐकण्याकरितां इंग्लिश वीर आतुर झाले. तोफांचा धडधडाट सारखा चालू होता. इतक्यांत इंग्लिश वीरांस खंदक सोडून पुढें चाल करण्यास हुकूम सुटला. इंग्रजांचा सेनासमुद्र जर्मनांवर तोफांची सरबत्ती करीत पुढें सरकूं लागला. विरुध्द दिशेनें जर्मन सेनाही चाल करून येऊं लागली. इंग्लिश सेनेस खड्या आवाजांत हुकुमावर हुकूम सुटूं लागले. त्या हुकुमांची यथायोग्य अंमलबजावणी करण्यापलीकडे वुइल्यम अधिक जाणत नव्हता. एकदोनदां शत्रुपक्षाच्या गोळ्या त्याच्या दंडास लागून गेल्या,

पण तो धीर वीर लेशमात्रही डगमगला नाहीं. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून सुटणाऱ्या हुकुमांची तो आपल्या रणमर्द गड्यांस पहाडी आवाजानें माहिती करून देत होता. " गोळ्या झाडा! " असा हुकूम केव्हां सुटतो याकडे इंग्लिश वीरांचें लक्ष्य लागलें. जर्मन सेना आतां दृष्टीच्या आणि गोळ्यांच्या टप्प्यांत आली होती. अशा स्थितींत निमिषार्ध गेला. लागलीच ' गोळ्या सोडा ! " असा हुकूम सुटला. असंख्य बंदुकींचे कडकडाट होऊं लागले. जर्मन सेनेंतील शिपाई पटापट मरूं लागले. पुढें चाल करण्याचा त्यांचा वेग संपुष्टांत आला. त्यांच्या सैन्याच्या रांगाच्या रांगा नष्ट होऊ लागल्या. जर्मन सैन्यांत थोड्याच वेळांत हाहाःकार उडाला. आतां जर्मन सेना खास परतणार असें स्पष्ट दिसू लागलें.

जर्मनीच्या मानानें इंग्रजांचा नाश जरी कमी झाला तरी त्या भयंकर चकमकींत प्राणहत्या झाल्याशिवाय थोडीच रहाणार होती. वुइल्यमच्या डाव्या व उजव्या बाजूनीं कित्येक वेळां प्रतिपक्ष्यांच्या गोळ्या सणसणत गेल्या. नव्हे कांहीं वेळानें तर आपल्या दोनी अंगचे वीर धारातीर्थी पतन पावले ही गोष्ट वुइल्यमच्या लक्षांत आली. दोन इंच उजव्या अंगास आपण असतों किंवा चार इंच डाव्या अंगास असतों तर केव्हांच आपली इतिश्री झाली असती हें तो जाणून होता. पण त्या योगानें त्याचें धैर्य लेशमात्रही कमी झालें नाहीं. तो किंचित्‌ही डगमगला नाहीं.

जर्मनीची चाल जरी खुंटली होती, परत फिरण्याचे केव्हां हुकूम सुटतात याकडे जरी त्यांचे लक्ष वेधलें होतें तरी इंग्लिश सेनेची चाल बंद पडली नाहीं. ती चालूच होती. कांहीं वेळानें इंग्लिश सेनेनें जर्मन सेनेस गांठलें. भयंकर धुमश्चक्री चालू झाली. तोफा निकामी झाल्या, बंदुकी चालतनाशा झाल्या, तेव्हां समशेरी आणि संगिनी यांचें युद्ध सुरू झालें. दोन्हीं सैन्यें हातघाईवर आलीं. महायुद्धांत असे हातघाईचे प्रसंग फारच विरळा असतात. बहुधा मनुष्यांची झणण्यापेक्षां यंत्रांचीच लढाई चालते. पण आतां मात्र खरी मनुष्यांची लढाई चालू झाली. इंग्लिश वीरांपुढें जर्मन असुर हातघाईच्या लढाईंत बिलकूल टिकाव धरीत नाहींत असा अनुभव आला. जर्मन लोक आपणांसारखे सशक्त व सशस्त्र

असून ते हातघाईच्या लढाईत माघार कां घेतात याचें वुइल्यमला आश्चर्य वाटूं लागलें. परंतु आपल्या समरतेजास ज्याप्रमाणें धर्माचें, न्यायाचें, बंधुप्रेमाचें आणि खऱ्या कळकळीचें प्रोत्साहन मिळत आहे त्याप्रमाणें युद्धासुरानें जमविलेल्या या त्याच्या भगत जनांस कसें मिळणार ? आपण अधर्मानें लढत आहोंत, युद्धाची जरूर नसतां आपण हातांत शस्त्र घेतलें आहे, हें आपलें कृत्य देवाच्या दरबारीं अत्यंत पातकाचें ठरेल असें ज्यांचें मन नित्यशः बोचत असतें त्यांच्या हातून यांत्रिक हालचालींपलीकडे थोडेंच कार्य होणार आहे ! असें वाटून वुइल्यमनें आपल्या मनाचें समाधान केलें.

आपणापुढें उभे असलेले जर्मन, आपल्या संगिनीच्या प्रहारासरशी चित होणारे जर्मन, आपल्या समशेरीच्या घावानें परलोकचा दरवाजा खुला होऊन तिकडे जात असलेले जर्मन आपले निसर्गतः शत्रु नसूनही पटापट मरत आहेत हें पाहून प्रथम वुइल्यमला वाईट वाटलें. पण जर्मन युद्धासुराचा असुरी संप्रदाय मोडण्याकरितां आपणास असें करावें लागत आहे; सर्व जगास नितांत शांततेचा चिरकालीन लाभ मिळावा याकरितां आपणास असें करावें लागत आहे, हें लक्षांत येतांच त्याचें शौर्य द्विगुणित झालें.

झालें ! जर्मन लोकांस परत फिरण्याचा हुकूम मिळाला. ते आपलीं शस्त्रें टाकून, तोफा सोडून, युद्धसामुग्रीचा त्याग करून जिवाचें रक्षण करण्याकरितां पळत सुटले. आतां आपणांस त्यांचा पाठलाग करण्याचा हुकूम मिळेल असें इतर वीरांबरोबर वुइल्यमलाही वाटलें. पण त्यांत त्याची निराशा झाली. जर्मनांचा पाठलाग करणें धोक्याचें आहे असें जाणून इंग्लिश सेनापतीनें आपल्या सेनेस परत खंदकाकडे बोलाविलें. क्षणार्धांत इंग्लिश सैन्य खंदकाच्या आड झालें.अद्याप तोफांची फैर उभयपक्षांकडून अप्रतिहतपणें झडत होती; तिकडे दुर्लक्ष करून वुइल्यम शांतपणें आपल्या तोंडावरील घाम पुशीत होता.त्याच्या आसपास रक्ताचा सडा शिंपला असून ठिकठिकाणीं प्रेतें पडलीं होतीं.जखमी झालेल्या व मरणाच्या मार्गास लागलेल्या वीरांचे अंतकाळचे शब्द अस्पष्टपणें ऐकूं येत होते. जखमी

वीरांस तेथून सुरक्षित स्थळीं नेण्याचें काम सुरू झालें होतें. वुइल्यम तोंडावरील हातरुमाल काढून समोर पाहतो तों आपला एक जुना सहाध्यायी आपणापुढें उभा आहे असें त्यास दिसलें.

" कोण ? वुइल्यम ! तूं येथें असशील अशी मला कल्पनाही नव्हती."

" वा ! पिकफर्ड ! येथें तूं भेटशील असें मला स्वप्नांतही वाटलें नव्हतें. आपली गांठ पडून कितीतरी दिवस झाले ? युद्धाचें शिक्षण घेत असतां आपली प्रथम ओळख झाली. इकडे समरांगणावर तूं केव्हां आलास ? " वुइल्यमनें विचारिलें.

" मला येथें येऊन बरेच दिवस झाले. फ्रान्सच्या किनाऱ्यावर आह्मींच प्रथम पाय ठेविला. " पिक्फर्ड ह्मणाला. " पण तूं तेथें कसा आलास ?"

" कां बरें ? जन्मभूमीकरितां लढण्याचा मला हक्क नाहीं काय ? "

" तसें नव्हे. वुइल्यम ! तूं सैन्यांत सामील होण्यास तयार नव्हतास असें मीं ऐकिलें होतें. "

" तुला तें कोणीं सांगितलें ? "

" कॅप्टन् लेनॉक्स ह्मणत होता, कीं तूं कांहींतरी फोल सबबी दाखवून राष्ट्रकार्यापासून विन्मुख झालास. एका सुंदर तरुणीच्या हातून मीं वुइल्यमला त्याच्या भीरुपणाची निशाणी म्हणून एक पांढरें पीसही दिलें असें तो हंसत सांगत होता. वुइल्यम ! हें सारें खरेंना ? "

" पीस दिल्याचेंही त्यानें तुला सांगितलें तर ! " वुइल्यम क्रोधानें ह्मणाला. तेव्हां पिकफर्ड ह्मणाला—

" वुइल्यम ! त्याच्या त्या चमत्कारिक वर्तनाबद्दल मीं त्याची खूप खरड काढली. काल रात्रींच आह्मी तुझ्याबद्दल बोलत होतों. "

" ह्मणजे ? कॅप्टन् लेनॉक्स येथेंच लढत आहे कीं काय ? "

" तुला त्याची वार्ताही नाहीं ? काय त्याचें तें सध्यांचें ऐश्वर्य ! त्याच्या हुकमाखालीं लढणारे मर्द त्याला देवाप्रमाणें पूज्य समजतात. लौकरच तो मेजर होईल. मेजर झाल्यावर आपण हां हां ह्मणतां कर्नल होऊं असें तो ह्मणत असतो. त्याच्या विवाहाचेंही निश्चित झालें आहे. "

" लेनॉक्सचा विवाह जमला ? कोणाबरोबर ? " वुइल्यमनें उतावळेपणानें प्रश्न केला.

" ॲडमिरल नेल्सन तुझ्या ओळखीचे असतीलच ? "

" मग ? " वुइल्यमची आतुरता वाढली.

" त्यांची मुलगी लिली ! ती सुंदर तरुणी तूं पाहिली आहेस ? "

" होय, " वुइल्यमच्या आतुरतेंत चिंतेची भर पडली.

" लिलीशींच कॅप्टन् लेनॉक्सचा विवाह जमला. "

" लिलीशीं कॅप्टन् लेनॉक्सचा विवाह ! " वुइल्यमनें आपल्या मनांतील आश्चर्य व्यक्त केलें. " पिकफर्ड ! तुला ही बातमी कोणीं सांगितली ?"

" स्वतः लेनॉक्सनेंच सांगितली. "

त्यावर वुइल्यम कांहीं बोलला नाहीं. आपणास स्वतःच्या हृदयाचा अधिकारी करणारी कोमल मनाची लिली दोन-चार आठवडे लोटतात न लोटतात तोंच आपल्या वचनाचा भंग करील असें त्यास वाटेना. आपण भ्याड असूं असें लिलीला वाटल्यास, फार झालें तर ती आपला त्याग करील, आपलें मुखावलोकन पुनः करणार नाहीं. पण लागलीच लेनॉक्सवर फिदा होऊन त्याची पत्नी होण्याचें कबूल करील असें त्याचें मन त्यास सांगेना. क्षणमात्र त्याला समरभूमीचा आणि तेथील कामगिरीचा विसर पडला. त्याला लिलीची संतप्त मूर्ति दिसूं लागली. भ्याडपणा आणि ही लिली यांतून तुला ज्याची आवड असेल त्याचा स्वीकार कर, असें खणखणीत आवाजानें लिली ह्मणत आहे असा त्यास भास झाला. सदसद्विवेकबुद्धीप्रमाणें वागल्याबद्दल आपणास चांगलेंच बक्षीस मिळत आहे असें वाटून तो क्षणमात्र उद्विग्न झाला. तेव्हां पिकफर्ड ह्मणालाः—

" कां ? वुइल्यम ! कसला विचार चालला आहे ? "

" विचार कसला ? " स्वतःच्या उद्विग्न वदनावर जुलमाचें हास्य पसरीत वुइल्यम ह्मणाला. " कॅप्टन् लेनॉक्स सध्यां कोठें आहे ? "

" येथें आसपास असेल. एक तासापूर्वीं युद्ध हातघाईवर आलें तेव्हां मीं त्याला लढतांना पाहिलें.त्याचा त्या वेळचा आवेश पाहण्यासारखा होता.

नेत्र खदिरांगाराप्रमाणें लाल करून त्वेषानें प्रतिपक्षाच्या वक्षःस्थळाच्या चिंधड्या उडवितांना तो कर्दनकाळाप्रमाणें दिसत होता. या वेळीं तो कोठें तरी खंदकांत विश्रांति घेत बसला असेल."

असें पिक्फर्ड ह्मणत आहे तोंच कॅप्टन् लेनॉक्सचा पत्ता नाहीं, तो नापत्ता झाला असा सर्वत्र पुकारा झाला.

कॅप्टन लेनॉक्स नापत्ता झाला असें समजतांच वुइल्यमला अत्यंत आनंद व्हावयास पाहिजे होता; आपल्या प्रेमाच्या आड येणारा आपोआप नाहींसा झाला, आतां लिली आपलीच होणार असें वाटून त्याचें मन साल्हाद उडावयास पाहिजे होतें; पण तसें न होतां उलट त्याच्या मनास तळमळ लागून राहिली. हें पाहून स्वतःच्या अस्वाभाविक मनःस्थितीबद्दल वुइल्यमला आश्चर्य वाटलें व धन्यताहि वाटली. रणवीरास शोभेसा अल्प विचार करून तो पिकफर्डला ह्मणालाः—

" पिक्फर्ड ! कॅप्टन लेनॉक्सला तूं कोठें पाहिलेंस ? तो अद्याप जिवंत असण्याचा पुष्कळ संभव आहे."

" तो युद्धांत घायाळ होऊन पडला असल्यास उभयपक्षांकडून होणाऱ्या अग्नीच्या वर्षावांतून तो निभावून निघाला असेल असें मला वाटत नाहीं. ऐक, तोफांचा कसा धडधडाट चालला आहे. या खंदकापासून सुमारें चारशें यार्डपर्यंत आपण जर्मनांवर चालून गेलों होतों. तेथें त्या उंच झाडाजवळ कॅप्टन लेनॉक्स अतुल शौर्यानें लढत होता. तेथेंच तो पडला असल्यास—"

" त्याला वांचवितां येईल," वुइल्यम मध्येंच ह्मणाला; " कॅप्टन घायाळ झाला असल्यास त्याला वेळेवर मदत पोंचली नाहीं तर तो प्राणास मुकेल. आणखी दोन तासांत सूर्यास्त होईल. सूर्यास्तानंतर त्याला शोधून काढणें अशक्य होईल. याकरितां शक्य तितक्या लौकर त्याचा तपास लाविला पाहिजे."

" कॅप्टन लेनॉक्सचा तपास लावणें अगदीं अशक्य आहे. त्याच्याकडे जाणारा मनुष्य त्याच्याजवळ जाऊन पोंचण्यापूर्वींच तोफेच्या माऱ्यानें

अथवा बंदुकीच्या हजारों गोळ्यांनीं छिन्नविच्छिन्न होऊन जाईल. असल्या प्रत्यक्ष मरणाच्या घरीं कोण चालून जाणार आहे ? ”

हें पिक्फर्डचें भाषण वुइल्यम लक्षपूर्वक ऐकत होता. तो क्षणमात्र विचार करून ह्मणालाः—

“ इतक्या संकटांतून जर कोणी कॅप्टन लेनॉक्सला सुरक्षितपणें येथें घेऊन आला तर ? ”

“ तर तो अत्यंत उदार हृदयाचा असून धैर्य आणि शौर्य यांचा मूर्तिमंत पुतळाच आहे असा त्याचा सर्वत्र गौरव होईल. तरुण वीर त्याचा कित्ता आपल्यापुढें ठेवतील. वृद्ध सेनापति त्याची वाहवा करतील. सुंदर तरुणी त्याचें दर्शन घेण्यांत जीविताचें साफल्य समजतील. पण असलें अचाट कृत्य करण्यास कोणी तयार होईल असें मला वाटत नाहीं. ”

“ पिकफर्ड ! कॅप्टन लेनॉक्सकडे जाऊन त्याला योग्य ती मदत करण्यास एक तरुण तयार आहे, ” वुइल्यम हसत ह्मणाला.

आसपासचे कित्येक तरुण वुइल्यमकडे पाहूं लागले.

“ मग तो तरुण कॅप्टनचा प्रेमळ बंधु असला पाहिजे. ”

“ छे. तो कॅप्टनचा बंधु नव्हे. ”

“ बंधु नसल्यास तो कॅप्टनचा जिवलग मित्र असला पाहिजे. ”

“ तो त्याचा जिवलग मित्रही नाहीं. उलट कॅप्टनसंबंधानें त्याच्या मनांत मत्सर वास करीत आहे. ”

“ कॅप्टनचा मत्सर करणारा मनुष्य असल्या आगीच्या खाईंत उडी घेईल असें मानणें म्हणज स्वतःची विचारशून्यता कबूल करण्याप्रमाणें आहे. वुइल्यम ! कॅप्टन लेनॉक्सकरितां मरणाच्या घरास चालून जाण्यास कोण तयार आहे ? ”

“ मी तयार आहें, ” वुइल्यम शांतपणें ह्मणाला.

“ कॅप्टननें तुझा अपमान केला असूनही ? ”

“ फक्त अपमान नव्हे. तो माझ्या सुखसर्वस्वावर घाला घालणारा, माझ्या लिलीच्या प्रेमाचा अपहार करणारा, माझ्या भावी जीवनक्रमास भेसूर स्वरूप देणारा आहे. ”

" आणि असें असून तूं त्याच्या संरक्षणासाठीं जिवाची पर्वा न करितां अग्नाच्या वर्षावांत उडी घालणार ?"

" होय, आणि आपल्या देशबंधूचे प्राण वांचविणार. मी आपल्या देशबंधूस स्वतःच्या प्राणापेक्षां अधिक समजतों. स्वार्थी कार्याहून राष्ट्रकार्य कित्येक पटींनीं श्रेष्ठ आहे. राष्ट्रकार्य करतांना आपसांतील वैमनस्यें, आपसांतील भेदभाव, आपसांतील मानापमान साफ विसरून जावे लागतात. "

" एकूण आज राष्ट्रप्रेमाचें अद्वितीय उदाहरण आमच्या दृष्टीस पडणार, " आसपासची तरुण मंडळी वुइल्यमकडे आदरबुद्धीनें पहात ह्मणाली.

वुइल्यम लागलीच इष्टस्थळाकडे जाण्यास सज्ज झाला. त्या वेळीं त्याचीं गात्रें क्षुधेनें व तहानेनें विगलित झालीं होतीं. तो अगदीं थकून गेला होता. ज्या स्थळाकडे जावयाचें तें स्थळ केवळ कसाईखाना बनलेलें ! तेथें असंख्य प्रेतें अस्ताव्यस्त पडलेलीं. कित्येकांस अंतकाळची घरघर लागली आहे, कित्येकांस श्वास लागला आहे, कित्येक शेवटचें पाणी मागत आ पसरून पडले आहेत, कित्येक वेदना असह्य होऊन तळमळ करीत आहेत, अशा ठिकाणीं वरून गोळ्यांचा वर्षाव होत असतां जावयाचें ! तोफेचा एक गोळा येऊन पडला तर कित्येक मनुष्यांच्या शरीरांच्या ठिकऱ्या उडत. असे अनेक गोळे एकसारखे पडत होते. बंदुकींच्या गोळ्यांचा तर सारखा वर्षाव होत होता. त्यांतील एक गोळी किंवा तोफेच्या धडधडाटांतील अत्यल्प अंशही आपणास यमसदनांस पाठविण्यास पुरेसा आहे, अशा परिस्थितींत आपण प्रवेश करावयाचा या विचारानें वुइल्यम क्षणमात्रही गोंधळला नाहीं.खंदकाच्या वर डोकावून पाहिलें तरी कसले अनर्थ ओढवतात हें त्याला माहीत होतें. तथापि लेशमात्रही न डगमगतां फक्त कर्तव्याकडे लक्ष देऊन तो कॅप्टन लेनॉक्सकडे जावयास निघाला. उभें सरळ चालत जाणें अशक्य होतें. म्हणून तो भुईसरपट दबत दबत जाऊं लागला. त्याच्या शरीराभोंवतीं कित्येक गोळ्या पडत. त्याच्या मस्तकावरून गाळ्या सूं सूं करीत निघून जात. पण त्याचा लेशमात्रही विचार न करितां तो हळु हळु पुढें सरकूं लागला.

आपण निम्मा अधिक मार्ग सुरक्षितपणें आक्रमिला, असा वुइल्यम आनंद मानीत आहे तोंच आपणाकडे एका जखमी होऊन पडलेल्या जर्मन शिपायाचें लक्ष गेलें आहे असें त्यानें पाहिलें. त्यानें लागलीच आपल्या बंदुकीस हात घातला आणि गोळी झाडून त्या जर्मन शिपायास जमीनदोस्त केलें. तसें करण्यास त्यानें एकच सेकंडाचा अवधि लाविला असता तर त्याला स्वतःलाच जमीनदोस्त व्हावें लागलें असतें.

पिक्फर्डनें दाखविलेल्या झाडाजवळ येऊन बरींच प्रेतें खालती वरती केल्यानंतर वुइल्यमला जखमी होऊन पडलेला कॅप्टन लेनॉक्स दिसला. कॅप्टन लेनॉक्सच्या जखमेंतून अद्यापही रक्त वहात होतें. जखम फारच मोठी असून तींतून अतिशय रक्त गेलें असल्यामुळें कॅप्टन बेशुद्ध झाला होता. तथापि त्यास तेथून नेऊन एकदम औषधोपचार केला तर त्यांतूनही तो वांचेल अशी वुइल्यमला आशा वाटूं लागली. लागलीच तो कॅप्टनला वाहून नेण्यास सज्ज झाला.

वुइल्यमला राष्ट्रीय प्रेमाचा जोर नसता, स्वदेशप्रेमाची ज्योति त्याच्या मनांत तेवत नसती, बंधुप्रेमाचें अवसान त्याच्या मनांत नसतें तर आपल्यापेक्षांही अधिक वजनाच्या कॅप्टनला भर दिवसा शत्रूच्या तोफांचे गोळे आणि बंदुकांची निशाणबाजी चुकवीत नेण्याचें धैर्य, व इच्छा त्यास झाली नसती. पण ती तशी झाली—हा स्वातंत्र्याच्या वातावरणांत सांपडणारा जुना अनुभव आहे.

कॅप्टन लेनॉक्सला आपल्या पाठीवरून वाहून आणीत असतां अर्धा अधिक मार्ग आक्रमीपर्यंत आपण काय करितों याची स्मृति वुइल्यमला होती. पुढें हळु हळु त्याची स्मृति जात चालली. अत्यंत श्रमामुळें तो बेशुद्ध होऊं लागला. आपण काय करीत आहोंत यासंबंधाचें त्याचें भान नष्ट होऊं लागलें. आपलें कर्तव्य आपल्या हातून पार पडतें किंवा नाहीं याची त्यास भीति वाटूं लागली. पण ती क्षणमात्रच. क्षणार्धांत त्याची स्मृति नाहींशी झाली. त्याची शुद्धि नष्ट झाली ! तरी तो कॅप्टन लेनॉक्सला, आपल्या प्रेमांत माती कालविणाऱ्या आपल्या द्वेष्ट्याला

आपल्या पाठीवर वहातच होता. अशा प्रकारचा हिय्या क्वचित् पाहण्यास सांपडेल.

वुइल्यम पुनः शुद्धीवर आला तेव्हां आपल्याजवळ कॅप्टन प्रिंगल आणि कर्नल सॅन्सवर्थ हे उभे असून आपल्याभोंवतीं हजारों आंग्ल तरुण जमले आहेत असें त्याच्या दृष्टीस पडलें.

" माझी कामगिरी सिद्धीस गेली ना ? कॅप्टन लेनाक्सला मी सुरक्षितपणें घेऊन आलों ना ? " वुइल्यम उठून बसत असतां ह्मणाला.

त्याच्याशीं प्रेमानें हस्तांदोलन करून कर्नल ह्मणाले—

"वुइल्यम ! तू आज आपल्या शौर्याची,धैर्याची आणि कर्तव्यतत्परतेची कमाल केलीस. जर्मन युद्धासंबंधानें इतिहास लिहितांना इतिहासकार तुझें नाव सुवर्णाक्षरांनीं आपल्या इतिहासांत नमूद करतील. कवि तुझ्या कृतीवर वीररसप्रधान काव्यें रचितील. आणि कादंबरीकार तुझी आजची कृति उत्तमोत्तम अलंकारांनीं नटवून जनतेपुढें मांडतील. वुइल्यम ! तूं धन्य आहेस ! तूं आंग्लजननीचा खरा पुत्र आहेस. माझ्या तरुण मित्रांनों ! आज वुइल्यमनें घालून दिलेला धडा तुम्ही विसरूं नका. तुम्हांपैकीं प्रत्येक तरुणानें वुइल्यम बनावें अशी आंग्ल जननीची इच्छा आहे."

कर्नलचे शब्द ऐकून वुइल्यमच्या मनास झालेल्या आनंदाची आह्मापैकीं एकास तरी खरी कल्पना करितां येईल काय ?



# प्रकरण १९ वें.

——:o:——

## कैसरची मुलाखत!



सर्व जगांत विलासाच्या, ऐश्वर्याच्या, शोभेच्या, सत्तेच्या आणि राजकीय हक्कांच्या दृष्टीनें युरोपखंड अत्यंत श्रेष्ठ. त्यांतून फ्रान्स देशांतील सुखाचीं साधनें, ऐश्वर्य, राजकीय हक्कांची उन्नतावस्था आणि एकंदर सौंदर्य तर विलक्षणच! पारिस फ्रान्सची राजधानी! जगांतील सर्वांत सुंदर, वैभवशाली, विलासी आणि अफाट नगर! तें इहलोकचें नाक, तें सौंदर्याचें जीवित, तें विलासाचें आगर, तें इहलोकचें सारसर्वस्व पादाक्रांत करून तेथें आपला विजयध्वज फडकावण्याची जालिम महत्त्वाकांक्षा कैसर आतां विसरावयाला लागला होता. पारिसकडे पुढें पाऊल पडण्याऐवजीं आतां पिछेहाट होणार असें त्यास वाटूं लागलें होतें. तथापि दररोजच्या असंख्य प्राणहानीस मुळींच खळ पडला नाहीं. युद्ध करण्यास आपणास संधि मिळत नाहीं ही वुइल्यमची तक्रार आतां पूर्णपणें लुप्त झाली होती. जलमार्गानें प्रवास करणारास ज्याप्रमाणें रात्रंदिवस पाण्याशिवाय दुसरें कांहींच दिसत नाहीं त्याप्रमाणें वुइल्यमला सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत आणि पुष्कळ वेळां पुनः सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंत समरांगणाशिवाय कांहींच दृष्टीस पडेना. त्याचें मन दररोजच्या अघोर कृत्यांस सरावत चाललें. मरणाची त्यास दरकार वाटेनाशी झाली. प्रेतांतून संचार करतांना त्याच्या तोंडावर स्मित चमकूं लागलें. जर्मनांचा वध करतांना त्याच्या मनाची स्थिरता अचल राहूं

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
नोंदणी क्र.

लागली. सुखदुःखांची परंपरा त्याच्या अढळ मनास शिवेनाशी झाली. कॅप्टन लेनॉक्सला मृत्यूच्या दाढेंतून ओढून आणल्यापासून त्याची जिकडे तिकडे वाहवा होऊं लागली. वरिष्ठ अधिकाऱ्यांचा वुइल्यम अगदीं प्राण होऊन बसला. त्यांतून त्यानें एक दोन जर्मन हेरांस मोठ्या चातुर्यानें पकडल्यापासून तर तो प्रत्येकास हवा हवासा वाटूं लागला. कर्नल सॅप्सवर्थ आणि तेथील सेनापति यांनीं वुइल्यमला अत्यंत महत्त्वाचीं व जबाबदारीचीं कामें त्याच्या छोट्याशा दर्जाकडे दुर्लक्ष करून सांगावीं; आणि तीं त्यानें नेटानें पार पाडावींत असें प्रत्यहीं होऊं लागलें. वुइल्यमला त्याचे वरिष्ठ अधिकारीच प्यार करीत असें नाहीं तर त्याच्या हुकमतींतील सैनिकही त्याच्यावर अगदीं मरून पडत. वुइल्यमनें त्यांच्याशीं अगदीं मैत्रीनें वागावें. त्यांच्याबरोबर सुखदुःखास तोंड देण्यास तयार व्हावें. तो आधिकारी ह्मणून कधीं गर्व करीत नसे, कोणास टाकून बोलत नसे किंवा कोणाचा अपमान करीत नसे. यामुळें त्याचे सर्व सैनिक त्याच्यावर देवाप्रमाणें भक्ति करीत.

आपल्या हाताखालील सैनिकांबरोबर गप्पा गोष्टी करीत वुइल्यम न्याहारी करीत होता. अद्याप विरुद्ध बाजू थंड होती. तेव्हां न्याहारीस थोडा अधिक वेळ लागला तरी हरकत नाहीं असें वाटून त्यानें इंग्लंडची राणी इलिझाबेथ इच्या वेळीं इंग्लंडनें कसें अप्रतिम शौर्य गाजविलें याचें वीररसपूर्ण वर्णन करण्यास सुरवात केली होती. प्रत्येकाचे डोळे वुइल्यमच्या आवेशपूर्ण मुखाकडे लागले होते. वुइल्यम केव्हां हातांतील चहाचे घोट घेई, केव्हां दोन शब्द बोले. चहाचा शेवटचा घोट घेऊन तो आपल्या छोट्या व्याख्यानाची पूर्तता करणार तोंच त्याला कसलासा आवाज ऐकूं आला. त्यासरशी तो एकदम उठून उभा राहिला. चहाचे प्याले जमिनीवर फेकले गेले. दहाच सेकंदांच्या आंत वुइल्यम आपल्या रणमर्द गड्यांसह शत्रूला सामना देण्यास सज्ज झाला. तो ह्मणाला—

" मित्रहो ! तें समोरून येणारें सैन्य आपलेंच असावेंसें दिसतें, पण थांबा; इतक्यांत कांहींच निश्चित सांगतां येणार नाहीं. जर्मन लोक आमच्या सैनिकांसारखा वेष करून आह्मांस फसविण्याचा पुष्कळ वेळां प्रयत्न

करितात. तशाचपैकीं आजचा डाव असावा."

असें वुइल्यम ह्मणत आहे तोंच त्यांच्या विरुद्ध दिशेनें धांवत येणाऱ्या सैन्यानें इंग्लंडचा जयजयकार गाजविला.

"क्षणमात्र थांबा," वुइल्यम आपल्या सेनेस ह्मणाला. "इंग्लंडचा हे जयजयकार गाजवितात एवढ्यावरून ते इंग्लिश आहेत असें मानतां यावयाचें नाहीं. मी दोन मिनिटांच्या आत ते कोण आहेत याचा शोध करतों." असें ह्मणून वुइल्यम समोरून येणाऱ्या सेनेकडे वेगानें गेला. तेथें जाऊन तो आतां विचारपूस करणार तोंच आठ दहा सशस्त्र वीर त्याच्या अंगावर धांवून आले.

"एक शब्द उच्चारलास तर तुझे राई राई एवढे तुकडे होतील," चोहोंकडून एकच ध्वनि निघाला. पण लेशमात्रही न गडबडतां आपल्या सेनेकडे तोंड करून वुइल्यम ह्मणालाः—

"हे जर्मन आहेत. एकदम गोळया झाडा." हे शब्द उच्चारतांना तो स्वतःस पूर्णपणें विसरला. शत्रु समीप आल्याची वर्दी शक्य तितक्या लौकर आपल्या सेनेस द्यावी एवढाच विचार त्याच्या मनांत होता.

वुइल्यमचा शब्दोच्चार होण्याचा अवकाश. लागलीच तोफांची सरबत्ती सुरू झाली. बंदुकांचे कडकडाट होऊं लागले. जर्मन सेनेची भयंकर हानि होऊं लागली. आपला कार्यभाग पार पडत नाहीं असें जाणून ती छोटीशी सेना आपल्या शिबिराकडे परतली. पण वुइल्यम मात्र शत्रूचा कैदी झाला. शिल्लक राहिलेले जर्मन शिपाई त्याला घेऊन आपली छावणी जवळ करूं लागले.

आतां वुइल्यमला स्वतःचा विचार करण्यास सवड मिळाली. आपण शत्रूच्या हातांत सापडलों, आतां आपली सुटका होईपर्यंत आपण आपल्या उदात्त कार्यास मुकणार हा विचार मनांत येऊन त्याला किंचित्‌काळ वाईट वाटलें. पण आपण नाहींसे झाल्याबरोबर कित्येक तरुण आपली जागा भरून काढण्यास पुढें सरसावतील आणि सर्व जगाचें कल्याण करण्याचा आपल्या मातृभूमीचा सद्धेतु पार पाडण्यास हातभार लावतील असा विचार करून त्यानें आपल्या मनाचें समाधान केलें. जर्मनींतील कारागृह-

वास आपणांस अत्यंत त्रासदायक होणार ही कल्पनाही त्याच्या मनास शिवली नाहीं. राष्ट्रकार्य करतांना तुरुंगवासच काय, प्रत्यक्ष यमयातनाही त्यानें सहन केल्या असत्या.

अर्ध्या तासाच्या आंत वुइल्यमसह जर्मन शिपाई आपल्या शिबिरांत आले. तेथें वुइल्यमची उठण्याबसण्याची व खाण्यापिण्याची उत्तम तजवीज झाली. कित्येक जर्मन तरुण त्याच्या भोंवतीं जमत, त्याला निरखून पहात आणि एक शब्दही न बोलतां परत जात. आपला तिरस्कार करण्याऐवजीं, आपला अपमान करण्याऐवजीं, आपला छल करण्याऐवजीं, आपणास हे इतक्या प्रेमानें आणि गोडीनें कां वागवीत आहेत याचें वुइल्यमला मोठें कोडें पडलें. तें सोडविणें अथवा सोडविण्याचा प्रयत्न करणें हाच वुइल्यमचा सबंध दिवसाचा व्यवसाय झाला.

सूर्यप्रकाश बळावत चालला. जेवणाची तयारी झाली तरी आपलें आतां काय करणार याचा उलगडा वुइल्यमला झाला नाहीं. वृद्ध मनुष्याच्या क्षीण शक्तीप्रमाणें सूर्याचें तेजही हळू हळू खालावत चाललें. पक्षिवर्गाचे थवे आपापल्या निवासस्थानाकडे जातांना वुइल्यमला दिसूं लागले. भिन्न भिन्न स्थानांहून कामगिरीवरून जर्मन तरुण आपल्या शिबिराकडे परत येऊं लागले. तरी आपलें काय होणार हें वुइल्यमला समजलें नाहीं.

आतां तर सूर्यप्रकाश अगदीं नष्ट झाला होता. त्या संतापदायक ग्रहराजाची जागा सौख्यदायक चंद्रानें पटकावली. त्रासदायक सूर्यप्रकाशाच्या ठिकाणीं आतां आल्हादकारक चंद्रप्रकाश चकाकूं लागला. तरी आपलें काय होणार याचा ठाव वुइल्यमला लागला नाहीं.

मध्यरात्र उलटून गेली होती. वुइल्यम अद्याप जागाच होता. आतां आपणास एखाद्या जड वस्तूप्रमाणें आयुष्य काढावें लागणार. लढाई नाहीं, शांतता नाहीं, कायद्याचा अभ्यास नाहीं, पार्लमेंटची पायरी नाहीं, लिलीचें प्रेम नाहीं, तिचा कोप नाहीं, सुख नाहीं, दुःख नाहीं अशा चमत्कारिक मृत स्थितींत आपलें आयुष्य जाणार याबद्दल तो चिंता करीत होता. तोंच आपल्या तंबूंत कोणीतरी आल्याचा त्यास भास झाला.

त्यानें दृष्टि उचलून वर पाहिलें. तेव्हां एक सशस्त्र जर्मन वीर आपणासमोर उभा आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें.

आपणाकडे बुइल्यमचें लक्ष पोंचलें आहे असें पाहून तो जर्मन वीर ह्मणाला—" माझ्याबरोबर क्षणमात्र बाहेर चलतां काय ? "

बुइल्यम एक शब्दही न बोलतां त्याच्या मागोमाग जाऊं लागला. तशा मृतवत् स्थितींत तेथें पडून राहण्यापेक्षां जर्मन वीराच्या पाठोपाठ जाणें त्याला पसंत वाटलें.

बुइल्यम चालूं लागला तेव्हां त्याच्या दोन्ही बाजूंनीं चार सशस्त्र जर्मन तरुण मूक वृत्तीनें चालत होते. त्याच्याकडे प्रथम आलेला जर्मन पुढें चालत असून तो ज्या दिशेनें पाऊल टाकील त्या दिशेनें आपणांस जावयाचें यापेक्षां बाकीचे जर्मन तरुण कांहीं जाणत नव्हते. वाट चालत असतां पुढें चालणारा जर्मन ठिकठिकाणीं थांबे. तेथील पहारेकऱ्यांच्या कानांत कांहीं सांगे आणि पुनः मार्ग क्रमण्यास सुरवात करी. हा आपला रात्रीचा परावलंबी प्रवास केव्हां थांबणार याची बुइल्यमला कल्पनाही नव्हती. सूर्योदयापासूनच्या आपल्या वर्तनक्रमाचें चित्र त्याच्या मनश्चक्षूसमोर होतें. आपण जर्मनांचे कैदी असून आपला मानमरातब एखाद्या राजकीय पाहुण्याप्रमाणें ठेविला जात आहे हें पाहून त्यास आश्चर्य वाटत होतें. त्यांत सध्यांच्या चमत्कारिक प्रवासाची भर पडली. तेव्हां आपण जागृत स्थितींतील अनुभव पहात नसून स्वप्नसृष्टींतील कल्पना अनुभवीत आहोंत असें त्यास वाटूं लागलें. आपण जागे आहोंत कां झोंपीं गेलों आहोंत, आपण आपल्या छावणींत पडलों आहोंत कां जर्मन शिबिरांतून भटकत आहोंत, आपण पूर्ववत् स्वतंत्र आहोंत कां शत्रूचे कैदी झालों आहोंत, इत्यादि संशयात्मक प्रश्न त्याच्यापुढें उभे राहिले. आपल्या पायांखालील जमीन आपण आक्रमीत आहोंत, दूरवर दिसणारीं झाडें जवळ जवळ येत आपल्यामागें पडत आहेत, अरण्यांतील तंबू सोडून आपण शहरांतील उंच उंच इमारती पाहूं लागलों आहोंत, नव्हे या जवळच्या उच्च प्रासादांत शिरणेंही आपल्या नशीबीं आहे; इत्यादि विचार त्याच्या मनांत उद्भवत होते; तो स्वतःशीं ह्मणाला, " पण थांबा !

माझ्या डोळ्यांची व माझ्या पायांची जशी मी निद्रेंत नसून जागा आहें अशी खात्री झाली त्याप्रमाणें लौकरच माझ्या कानांची खात्री होईल."

त्या वेळीं वुइल्यम उत्तम रीतीनें शृंगारलेल्या, विद्युद्ज्योतींनीं प्रकाशित केलेल्या अशा एका अत्यंत शांत परंतु सुशोभित दिवाणखान्यांत उभा होता. त्याच्या आसपासचे जर्मन तरुण आतां त्याच्याजवळ नसून दुसरेच किंचित् वयातीत दोन जर्मन अधिकारी त्याच्याजवळ सशस्त्र उभे होते. समोरच्या पडद्याकडे एकाग्र दृष्टीनें पहात ते चित्राप्रमाणें खडे होते. या सर्वांचा अर्थ काय, आपणासह हे जर्मन अधिकारी स्वस्थपणें येथें कां उभे राहिले आहेत, याची कल्पनाही वुइल्यमला होईना. अशा रीतीनें दगडी पुतळ्याप्रमाणें पाव तासपर्यंत उभें राहिल्यानंतर समोरचा पडदा एकदम बाजूस झाला; आणि आपण एका वरिष्ठ जर्मन अधिकाऱ्यापुढें उभे आहोंत असें वुइल्यमच्या लक्षांत आलें.

एका सुंदर टेबलावर भिन्न भिन्न प्रकारचे शेंकडों कागद पडले आहेत, समोरच एक उज्ज्वल दीप विद्युत्तेजानें प्रकाशत आहे, त्या प्रकाशांत टेबलावरील कागदांकडे एकाग्रतेनें पहात, क्वचित् प्रसंगीं त्यावर कांहीं टिपणें करीत, पुनः क्षणमात्र विचार करीत, आणखी दुसऱ्या कागदांकडे पहात जर्मनींतील उच्च दर्जाच्या लष्करी अधिकाऱ्याचा वेष धारण करून एक मध्यम वयाची पण सशक्त व्यक्ति बसली आहे. आपण जवळ उभे आहोंत हें त्याच्या ध्यानींमनींही नाहीं; स्वतःच्या समोरील कागदपत्रांशिवाय त्याला दुसरें कांहींच दिसत नाहीं; हें पाहून आज आपण चमत्कारिक सृष्टींत वास करीत आहोंत असें वुइल्यमला वाटूं लागलें.

स्वतःच्या टिकटिकण्यानें तेथील नितांत शांततेचा भंग करणारें घड्याळ, तुम्हांस येऊन अर्धा तास होऊन गेला असें दर्शवूं लागलें. तेव्हां कागदपत्रें पाहण्यांत चूर झालेल्या व्यक्तीनें आपली मान वर उचलली, आणि वुइल्यमकडे बारीक दृष्टीनें पाहण्यास सुरवात केली. त्याच्या त्या पिळलेल्या मिशा, तोंडाचा मोठा जबडा, मुखावर वसत असलेलें विलक्षण तेज आणि विशेषतः त्याच्या नेत्रांतील अलौकिक चमक पाहून हा मनुष्य प्राण्यांवर प्रभुत्व गाजविणारा कोणीतरी श्रेष्ठकुलोत्पन्न पुरुष असावा, जर्मन

सैन्यांतील अत्यंत वरिष्ठ दर्जाचा अधिकार त्याच्या चरणांशीं लोळत असावा अशी वुइल्यमची खात्री झाली. इतकेंच नव्हे, आपण कोणासमोर उभे आहोंत याची त्याला थोडी कल्पनाही झाली. परंतु त्या कल्पनेचें खात्रींत पर्यवसान होण्यापूर्वींच स्वतःच्या मातृभाषेंत उद्गारलेले अधिकारी शब्द त्याच्या कानांवर पडले.

" तुझें नांव वुइल्यम लिट्न ! "

वुइल्यमनें आपल्या सभोंवार पाहिलें; तों आपल्याजवळ उभे असलेले जर्मन अधिकारी निघून गेले आहेत असें त्याच्या लक्षांत आलें. तो निमिषमात्र विचार करून ह्मणाला—

" होय. माझें नांव वुइल्यम लिट्न असें आहे."

" कर्नल सॅप्सवर्थ याच्या हाताखालील तूं एक लेफ्टेनंट आहेस. आज सकाळीं तूं आपल्या लोकांसह टेहेळणी करण्यासाठीं निघणार होतास, इतक्यांत तूं पकडला गेलास; परंतु तशा स्थितींतही आपल्या लोकांस सावध करून तूं आपल्या प्रतिस्पर्ध्यांचा बेत उलथून पाडलास."

" होय, तसें झालें खरें."

" तुला सैन्यांत सामील होऊन किती दिवस झाले ? "

" सुमारें दोन अडीच महिने."

" आणि त्याच्यापूर्वीं ? "

" मी कायद्याचा अभ्यास करीत होतों."

" ह्मणजे कायद्याच्या पुस्तकावरून उचलून तुला समरांगणावर आणिलें ? लष्करी शिक्षणाची तुह्मां इंग्लिश लोकांस कांहीं जरूरच वाटत नाहीं असें दिसतें ? "

" तस नव्हे. मला लष्करी शिक्षण मिळालें आहे. इंग्लंडमध्यें लष्करी अधिकाऱ्यांचें शिक्षण देणाऱ्या संस्था आहेत. त्यांपैकीं एका संस्थेंत मला लष्करी शिक्षण मिळालें आहे."

" अस्सें. चालू युद्धांत विजयश्री आपणास माळ घालील अशी तुमची कल्पना असेल ? "

"कल्पना नाहीं—"

"तर?"

"खात्री आहे."

"खात्री आहे! तुह्मां इंग्रजांची यशाबद्दल खात्री आहे?"

"होय," वुइल्यम किंचित्‌ही न डगमगतां ह्मणाला; "युद्धाच्या शेवटीं आह्मांस विजयप्राप्ति होणार याबद्दल आमची पूर्ण खात्री आहे."

"असा विश्वास उत्पन्न होण्याचें कारण काय? कोणत्या गोष्टीमुळें तुमची अशी खात्री झाली?"

या प्रश्नाचें उत्तर वुइल्यमच्या जिव्हेवर खेळत होतें. पण ते उच्चारावें किंवा न उच्चारावें याचा त्यास क्षणमात्र विचार पडला. शेवटीं तो पूर्ण विचार करून ह्मणाला:—

"मी स्पष्टपणें बोललों तर आपणास राग नाहींना यावयाचा?"

"राग? स्पष्टपणें बोलल्याबद्दल मला राग येत नसतो. मीं विचारलेल्या प्रश्नाचीं उत्तरें अगदीं स्पष्टपणें मला मिळालीं पाहिजेत. बोल. यशप्राप्तीवर तुमचा इतका भरंवसा कां?"

"जगचालक परमेश्वर आमच्या पक्षाचा असल्यामुळें आह्मांस अपेशाची भीति नाहीं."

"काय? परमेश्वराच्या अस्तित्त्वावर तुझा विश्वास आहे?"

"तितका दृढविश्वास माझा दुसऱ्या कशावरही नाहीं."

"एकूण तुमचें लढणें न्याय्य आहे असें तुला वाटतें?"

"का वाटणार नाहीं?" वुइल्यम आवेशानें ह्मणाला. "आह्मी जुलमाचा विनाश करून स्वातंत्र्य तेज फांकण्याकरितां, स्वतःच्या वचनांची चाड राखण्याकरितां, एवढेंच नव्हे तर ईश्वरप्रणीत शांततेचा प्रसार करण्याकरितां लढत आहोंत. मग आमचें लढणें न्याय्य कां होणार नाहीं? मग आह्मांस परमेश्वराचा पाठिंबा कां मिळणार नाहीं?"

वुइल्यमच्या तोंडचे शब्द ऐकतांच त्याच्या समोरील व्यक्तीनें त्याच्याकडे तीक्ष्ण दृष्टीनें पाहिलें. त्याच्या नेत्रांत चमकणारें तेज इतकें विलक्षण

होतें कीं त्याच्याकडे पाहणारास भीतीच वाटे. किंचित्काळ वुइल्यमच्या शब्दांचा विचार करून तो ह्मणाला—

" बेल्जमशीं झालेल्या त्या भिकार तहनाम्याचा विचार तुझ्या मनांत घोळत असावासें दिसतें. त्या तहनाम्याच्या चिटोऱ्यास तुह्मी इंग्लिश लोक कितीशी किंमत देतां ? "

" स्वतःच्या प्राणाइतकी ! किंबहुना त्याहूनही अधिक. " वुइल्यम अभिमानानें ह्मणाला.

त्याच्याकडे पाहून स्मित करीत त्याच्या समोरील पुरुष ह्मणाला— " वुइल्यम ! तूं हुशार असून स्पष्टवक्ता आहेस अशी माझी खात्री झाली आहे. इंग्लंडांतील मुत्सद्यांचीं मतें तुला माहीत नसलीं तरी जनतेच्या मतांची तुला माहिती असली पाहिजे. इंग्लंडांत चालू युद्धाबद्दल लोकमत काय आहे हें तुला सहज सांगतां येईल. "

" सध्यांचें युद्ध ह्मणजे पातकपरंपरा आहे, आजपर्यंत जगावर जे जे अन्याय घडून आले त्यांतील हा सार्वभौम अन्याय आहे, हे रानटी लोकांसही रानटी वाटणारें कृत्य आहे असें चालू युद्धासंबंधानें इंग्लंडचें लोकमत आहे. इंग्लंडची जनता चालू युद्धाकडे तिरस्कारव्यंजक भावनेनें पहाते. आह्मी इंग्लिश लोक शांततेचे भक्त आहोंत. आह्मांस शांततेची आवड आहे. "

" अर्थात् इंग्लंडची जनता युद्धास नाराज असेल ? "

" नाराज ! नुसती नाराज नाहीं ! युद्ध हा शब्दोच्चार करणेंही आह्मांस पातक वाटतें. "

" मग युद्धामध्यें तुह्मी अद्वितीय शौर्यानें कसे लढतां ! ज्या युद्धाबद्दल तुह्मी नाराज आहांत, ज्या युद्धाचा तुह्मांस तिटकारा आहे, त्याच युद्धांत तुह्मी इतकें अतर्क्य शौर्य कसें गाजवितां ? "

" कारण युद्धाचा नायनाट करण्याकरितां आपण लढत आहोंत अशी प्रत्येक आंग्ल तरुणाची खात्री आहे. जर्मनांनीं जो युद्धरूपी वणवा पेटविला आहे त्याचा समूळ नाश करून, 'बळी तो कान पिळी' या त्यांच्या तत्वाचा

चुराडा करून ईश्वरप्रणीत धर्माचा, ईश्वरदत्त शांततेचा सर्वत्र फैलाव करणें आपलें श्रेष्ठ कर्तव्य आहे अशी प्रत्येक आंग्ल तरुणाची समजूत आहे. ह्मणून आह्मांमध्यें अतर्क्य शौर्य, अलौकिक धैर्य आणि अद्वितीय कार्यतत्परता सदैव जागृत रहाते."

"ह्मणजे? तूं काय म्हणतोस तें मला समजलें नाहीं."

"आह्मी सध्यांच्या युद्धावर मोहीम केली आहे."

"युद्धावर मोहीम! युद्धासंबंधीं तिटकारा व्यक्त करणारांची युद्धावरील मोहीम! बुइल्यम, तुझ्या भाषणाचा आशय अद्याप माझ्या लक्षांत आला नाहीं."

"आणि तो शेवटपर्यंत येईल असें मला वाटत नाहीं. ज्याला युद्धाची अत्यंत आवड आहे, नव्हे युद्ध हें राष्ट्राच्या भरभराटीला व जीवनाला आवश्यक आहे अशी ज्याची समजूत झालेली आहे त्याला युद्धावरील मोहिमीचें रहस्य समजणार नाहीं. तथापि ज्याअर्थी तुमची इतकी जिज्ञासा आहे त्या अर्थी तुह्मांस आमचें लोकमत समजावून सांगण्याचा मी थोडासा प्रयत्न करितों. माझा अल्प इतिहास तुह्मांपुढें ठेविला तर मीं आपलें काम उत्तम रीतीनें बजावलें असें होईल. युद्ध करणें हा केवळ अधर्म आहे असें माझ्या पित्याचें दृढ मत असे. तें मत माझ्या बालहृदयावर इतक्या उत्तम रीतीनें खोदलें गेलें कीं, युद्ध करणें मोठा गुन्हा आहे असें मला वाटूं लागलें. 'कसाही प्रसंग आला तरी क्षमाभाव सोडूं नकोस, सूड घेण्याची भावना मनांतून हद्दपार कर,' वगैरे शास्त्राज्ञा मी अक्षरशः सत्य मानूं लागलों. त्यामुळें अर्थातच जेव्हां युद्धास प्रारंभ झाला आणि हजारों तरुण सैन्यांत सामील होऊं लागलें तेव्हां मीं त्याबद्दल आपली नाराजी दर्शविली. कारण, युद्धप्रियता आणि धर्मतत्परता यांची सांगड कधींही जमावयाची नाहीं असा माझा दृढ विश्वास होता."

"पण तो तुला सोडावा लागला असेल?"

"नाहीं. उलटपक्षीं माझा तो विश्वास अनंतपटीनें दृढतर झाला आहे."

"मग तूं युद्धांत सामील कसा झालास?"

" मला कांहीं युद्धविषयक जर्मन ग्रंथ वाचावयास मिळाले. त्यावरून युद्धाचें बीज जर्मनीनें कसें खोल पुरलें आहे, जगाच्या अंतापर्यंत सर्वांच्या शांततासुखांत युद्धाचें विष पसरण्याची जर्मनीनें, किंवा कांहीं युद्धप्रिय जर्मनांनीं कशी कंबर बांधली आहे हें मला समजलें. जणूं माझ्या अंगांत दैवी संचार झाला. जगाच्या शाश्वत कल्याणाकडे व सुखाकडे लक्ष देऊन युद्धप्रियतेचीं पाळेंमुळें खणून काढण्याचा मीं निश्चय केला. हा निश्चय युद्धावर मोहीम केल्याशिवाय, युद्धप्रियांचा नायनाट केल्याशिवाय, युद्ध-प्रेमाचा फैलाव करणाऱ्यांना परलोक दाखविल्याशिवाय कधींही शेवटास जाणार नाहीं असें ठरवून मी त्याच दिवशीं माझ्या देशबंधूंस त्यांनीं आरंभिलेल्या उदात्त कार्यास मदत करण्यास तयार झालों. त्याच दिवशीं मीं आपली लेखणी टाकली आणि समशेर उचलली. "

युद्धावरील मोहीम म्हणजे काय हें आतां त्या जर्मन अधिकाऱ्याच्या लक्षांत आलें. तो कांहीं वेळ विचार करून म्हणाला—

" सर्व इंग्लंड अशाच मताचें आहे काय ? "

" यांत काय संशय ? जर्मन प्रजाजनांबद्दल आमच्या मनांत कोणताही वाईट ग्रह नाहीं. पण जर्मन युद्धासुरांचा, युद्धप्रिय जर्मनांचा आम्ही अत्यंत द्वेष करितों. त्यांना जमीनदोस्त केव्हां करून टाकूं याचा सदैव विचार करितों. "

" परंतु हा विचार शेवटास जाणार नाहीं, असें तुम्हांस वाटत नाहीं काय ? जर्मनीजवळ आज किती सैन्य आहे याची तुला कल्पना आहे काय ? जर्मनीच्या अफाट सेनासमुद्रापुढें तुमचें लहानसें सैन्य काय करणार ? "

"विजयश्री संपादन करणार, दुसरें काय ? इंग्रजांच्या शौर्याची तुम्हांस अद्याप कल्पना नाहीं असें दिसतें. ज्या ज्या आंग्ल वीरानें समरभूमीच्या मध्य-स्थीनें परलोक गांठला, आज जो जो आंग्ल वीर समरांगणावर लढत आहे आणि युद्धाच्या अंतापर्यंत जो जो आंग्ल वीर समरांगणावर चमकेल त्या सर्वांची समरांगणावर अग्रभागीं चकाकण्याची पूर्ण मनीषा होती, आहे व असणार. राजसत्तेच्या जुलमामुळें आम्ही लढत नसून राजसत्तेच्या प्रेमा-करितां आम्ही लढत आहोंत. म्हणून ओढून आणलेल्या असंख्य जर्मनांस

आम्ही भारी आहोत. आमची लहानशी सेना जर्मनीच्या अवाढव्य सेनेस खात्रीनें चीत करील. याशिवाय आमचे हिंदु मर्द, आफ्रिकेंतील पठ्ठे आणि कानड्यांतील वीर दंड ठोकून सामना देण्यास तयार आहेतच. इंग्लिश साम्राज्य किती बलिष्ठ आहे, किती एकजीव आहे, किती सद्धर्मानें वागणारें आहे हें लवकरच तुमच्या लक्षांत येईल."

"आणि अशा स्थितींतही स्वतःस युद्धाचा तिटकारा असल्याबद्दल तुम्ही घमेंड मारणार ?"

"नव्हे कृतीनें करून दाखविणार! जर्मनींतील युद्धप्रियता, जर्मनींतील युद्धासुर, जर्मनींतील युद्धास प्रोत्साहन देणारीं मतें नामशेष होईतोंपर्यंत इंग्लंड आपलें शस्त्र परत घेणार नाहीं. जेव्हा युद्धाच्या काळ्याकुट्ट अंधकाराचा नाश होईल, शांततेचा चंद्र भूमंडलावर प्रकाशूं लागेल, बेल्जमसारख्या छोट्या राष्ट्रांचें स्वातंत्र्य परत मिळेल आणि यापुढें युद्ध विषाची उत्पत्तीच होणार नाहीं अशी खात्री पटेल, तेव्हां इंग्लंड आपलें शस्त्र खालीं ठेवील; तोंपर्यंत इंग्लंड आपल्या पराक्रमाची पराकाष्ठा करणार."

"अशी पराकाष्ठा करून यशप्राप्ति झालीच तर इंग्लंड आपला कोणता हेतु साधणार आहे ?"

"स्वतःचा फायदा साधणें हा हीन उद्देश इंग्लंडच्या मनात नाहीं. बेल्जमसारख्या दुबळ्या राष्ट्राचा फायदा झाला आणि शांततेचें पुनरुज्जीवन झालें ह्मणजे आपण कृतकृत्य झालों असें इंग्लंड समजतें."

"मग जर्मनीची काय वाट ?"

"जर्मनीच्या अंगांतील युद्धप्रियतेचें वारें पूर्णपणें नष्ट होईपर्यंत इंग्लंड जर्मनीचा पिच्छा पुरविणार—"

"आणि नंतर जर्मनीला इंग्लिश साम्राज्यांत सामील करणार असेंच कीं नाहीं."

"छे! छे! ही कल्पनाही खऱ्या इंग्रजांच्या मनास शिवणार नाहीं. युद्धाची समाप्ति झाल्यानंतर शांतताप्रिय जर्मन सुखानें जर्मनींत कालक्रमणा करतील. त्यांची युद्ध करण्याची खोड मोडली, ते पुनः युद्धास तयार होणार नाहींत इतके ते शांत झाले आणि युद्धासुराचे देव्हारे मोडून तेथें सद्धर्मत-

त्यांची स्थापना होऊं लागली ह्मणजे आमचें कार्य संपलें."

हे वुइल्यमचे शब्द ऐकून तो जर्मन महापुरुष किंचित्काळ स्वस्थ बसला. वुइल्यमला एक प्रश्न विचारावा कीं न विचारावा याची भवति न भवति त्याच्या मनांत सुरू झाली होती. आपल्या प्रश्नाचें उत्तर काय मिळणार याची त्यास थोडी बहुत कल्पना झाली होती. तेव्हां प्रश्न विचारून स्वतःस अत्यंत लागणारें उत्तर मिळवावें किंवा प्रश्नाच्या भानगडींतच पडूं नये याचा तो विचार करीत होता. कांहीं वेळ विचार करून तो ह्मणाला,

"जर्मनीचा बादशहा कैसर याच्यासंबंधानें तुला काय वाटतें? त्याच्यासंबंधानें इंग्लंडांतील लोकमत काय आहे?"

"कैसर सद्गुणांचा पुतळा नसला तरी बराच सद्गुणी होता. त्यानें आपली चिकाटी, मनोबळ आणि सामर्थ्य यांचा उपयोग अधर्माचा प्रसार करण्याकरितां केला नसता, खऱ्या सद्धर्मतत्त्वांची त्यानें कांस धरली असती तर तो युरोपखंडांतील पुण्यश्लोक नृपांत गणला गेला असता. परंतु त्याच्या शरीरांत युद्धपिशाच्च शिरल्यामुळें त्याचे गुण, त्याची पात्रता, त्याची योग्यता यांची माती झाली. तो अहंमन्य बनला. युद्ध न्याय्य आहे, आवश्यक आहे, त्याच्याशिवाय राष्ट्रजीवन नाहीं या अत्यंत घातक तत्वाचा उगम त्याच्यापासून होऊन कित्येक युद्धासुरांच्या मध्यस्थीनें त्यांचा फैलाव होऊं लागला. थोड्याच काळांत युद्धाच्या विषमय वचनांचा इतका सुळसुळाट झाला, कीं 'युद्ध न करणें अनीतीचें आहे,' 'युद्ध न केल्यास राष्ट्राची वाढ खुंटणार,' 'शांततेच्या प्रसाराकरितां प्रयत्न करणें शुद्ध वेडेपणा आहे; याकरितां शांततेच्या पक्षाभिमान्यांस इहलोकांतून नष्ट केलें पाहिजे,' अशीं घाणेरडीं मतें जर्मनीभर उजळ माथ्यानें फडकूं लागलीं. कैसर या अनीतिमान् मतांचा आद्य गुरु. तो स्वतःस युद्धदैवत समजूं लागला. सर्व युद्धप्रिय जर्मन खऱ्या परमेश्वराकडे आणि त्यानें घालून दिलेल्या नियमांकडे दुर्लक्ष करूं लागले, नव्हे पदोपदीं त्याचा अपमान करूं लागले आणि कैसरच्या त्या युद्धासुराच्या भजनीं लागून युरोपखंडभर पिशाच्चाप्रमाणें नाचूं लागले. सर्व जगावर आपलें प्रभुत्व गाजवावें अशी कैसरला महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली. त्या महत्त्वाकां-

क्षेच्या पूर्तीकरितां त्यानें युद्धहोम पेटविला. या युद्धाच्या वणव्यांत प्रत्यहीं लक्षावधि लोकांची हत्या होत आहे. हा अमानुष मनुष्यसंहार, ही अघोर प्राणहानि, हा भयंकर रक्तपात कैसरची महत्वाकांक्षा तडीस जाण्याकरितां होत आहे. पण कैसरनें खूप लक्षांत बाळगावें, कीं इहलोकचा त्याचा उद्देश तडीस तर जाणारच नाहीं पण तो आज ज्या पातकांच्या राशी जमा करीत आहे त्या त्याला अत्यंत हीन नरकाकडे ओढून नेतील. आजपर्यंत जगावर जीं जीं पातकें झालीं त्यांत कैसरचें पातक पहिल्या प्रतीचें गणलें जाईल. आणि जगाच्या अंतापर्यंत अघोरपातकी ह्मणून त्याचा निर्देश केला जाईल!"

वुइल्यमचा आवेशपूर्ण पण कळकळीचा शब्दनाद त्या जर्मन महापुरुषाच्या कानांत बराच वेळपर्यंत घुमत होता. त्याच्या तेजोपूर्ण वदनावर कांहीं काळ भयाची निशाणी स्पष्ट दृग्गोच्चर होत होती. वुइल्यमच्या भाषणाचा परिणाम त्याच्यावर अल्प तरी झाला असावा असें दिसत होतें. पण तें निमिषमात्रच. दुसऱ्याच निमिषांत त्यानें कर्कश घंटानाद केला. त्याबरोबर वुइल्यमजवळ थोड्या वेळापूर्वीं उभे राहिलेले जर्मन अधिकारी तेथें आले, आणि वुइल्यमला घेऊन जाऊं लागले.

दरम्यानचा पडदा हळू हळू सरकूं लागला. वुइल्यमनें मागें वळून पाहिलें तों तो जर्मन महापुरुष पूर्ववत् कागद चाळण्यांत निमग्न होऊन गेला आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें. वुइल्यम प्रसन्न वदनानें आपल्याबरोबरच्या अधिकाऱ्यांसह जाऊं लागला. कांहीं अंतरावर गेल्यानंतर तो एका अधिकाऱ्यास ह्मणाला—

"आतां माझी कोणाशीं मुलाखत झाली?"

"जर्मन बादशहा कैसर यांच्याबरोबर तुझें संभाषण झालें."

"अशी माझी कल्पना होतीच. मीं आपलें मनोगत स्पष्टपणें प्रकट केलें याबद्दल मला किती आनंद होत आहे! इंग्लंडच्या बाजूनें एवढी कामगिरी बजावल्यानंतर आतां मी जन्मभर जरी तुमच्या कैदेंत राहिलों तरी मला वाईट वाटणार नाहीं."



# प्रकरण २० वें.

—:o:—

## मला तूं विसरून जावेंस.

आर्त स्वर, दुःखाचे सुस्कारे आणि करुणाव्यंजक किंकाळ्या यांनीं दवाखाने, इस्पितळें आणि त्यांच्या आसपासचा प्रदेश सदैव भरलेला असावयाचा. कसलाही आनंदी प्राणी तेथें गेला तरी तेथील परिस्थिति पहातांच तो आपल्या नेहमींच्या स्वभावास विसरून त्या दूषित वातावरणाच्या तावडींत क्षणमात्र तरी सांपडावयाचा, असा आपला अनुभव आहे. परंतु हा अनुभव समरांगणावर जखमी झालेल्या वीरांची शुश्रूषा होत असलेल्या इस्पितळांतून क्वचित् प्रत्ययास येतो. तेथें ज्यांचीं अवयवें छिन्नविच्छिन्न झालीं आहेत, ज्यांच्या हाडांचा चुराडा उडाला आहे, ज्यांना बोलण्याची किंवा हालण्याचीही शक्ति उरली नाहीं असे कित्येक वीर एकमेकांजवळ पडलेले असतात तीं विस्तीर्ण व हवाशीर इस्पितळें, तेथील योग्य अंतरानें मांडलेलीं आसनें, ती अवर्णनीय स्वच्छता, ते उदार आणि निःस्वार्थी डॉक्टर, त्या प्रेमळ आणि तत्पर सेविका आणि सर्व दुःखें आनंदानें सहन करणारा तो रुग्णवर्ग पाहिला म्हणजे निरनिराळ्या उच्च विकारांनीं मन भरून येतें. इस्पितळ स्थापणारांचा, तेथें निःस्वार्थ बुद्धीनें काम करणाऱ्या डॉक्टरांचा, एकाग्रतेनें शुश्रूषा करणाऱ्या सेविकांचा आणि शेवटीं तो लाभ घेणाऱ्या भाग्यशाली वीरांचा उदारपणा मनांत बाणतो आणि थोड्याच अंतरावर चाललेल्या

घनघोर संग्रामाशीं त्यांची तुलना करितां रानटीपणा आणि सुधारणा इतक्या जवळ जवळ कशा नांदतात याबद्दल अचंबा वाटल्याशिवाय रहात नाहीं.

अशाच एका इस्पितळाकडे आपणांस आज जावयाचें आहे. जे आंग्ल तरुण समरांगणावर लढतांना घायाळ होतील त्यांच्यापैकीं कांहीं जणांच्या शुश्रूषेची तरी तजवीज व्हावी या उद्देशानें एका उदारमनस्क फ्रेंच सरदारानें आपला राहण्याचा प्रासाद खुला करून दिला होता. तेथें फ्रेंच व इंग्लिश डॉक्टर कित्येक सेविकांसह मनोभावें झटत होते. तेथील स्वच्छता, व्यवस्था आणि टापटीप अवर्णनीय होती. तेथें किती तरी रोगी भयंकर जखमी होऊन व कांहीं तर आसन्नमरण स्थितींत पडले होते. पण एकाच्याही चर्येवर निराशेची किंवा म्लानतेची छटा नव्हती. नाहीं ह्मणावयास तो बाहेर मोकळी हवा खात आराम खुर्चीवर पडलेला रोगी कांहींसा खिन्न दिसत आहे. हा तर बहुतेक बरा झाला आहे, याची जखम पूर्णपणें बरी झाली असून एक दोन दिवसांत हा आपल्या कामावर जाईल. जखमेपासून त्रास होण्याची वेळ केव्हांच निघून गेली. यानें तर आपणास लौकर समरांगणावर जावयास मिळणार ह्मणून आनंद मानावयास पाहिजे. पण हा उलट खिन्न झालेला दिसतो याचें कारण काय असावें बरें ! अरे, हा तर आपल्या पूर्ण ओळखीचा दिसतो. अशक्ततेमुळें यास आतांपर्यंत आपण ओळखूं शकलों नाहीं. हा कॅप्टन लेनॉक्स ! आपल्या कथानायकानें मृत्यूच्या जबड्यांतून ओढून आणिलेला आंग्ल वीर ! याची मुद्रा इतकी खिन्न कां बरें दिसते ?

ग्रहराज पूर्वदिग्भागीं नुकताच प्रकाशूं लागला होता. आपल्या किरणांच्या द्वारें तो जीवसृष्टीवर स्वर्गीय अमृताचा वर्षाव करीत होता. त्या अमृताचेच मौक्तिकबिंदु बनून वनस्पतीवरून चकाकत असावेत असा भास होत होता. सर्व जीवसृष्टि सचेतन व सतेज दिसूं लागली होती. अशा वेळीं कॅप्टन लेनॉक्स डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणें मोकळ्या हवेंत आराम खुर्चीवर पडला होता. मंजुळ वायु, सुरुचिर सूर्यप्रकाश आणि मधुर उषःकाल यांच्या योगानेंही लेनॉक्सच्या वदनावरील खिन्नता कमी झाली नाहीं. आपण वांचलों हें ठीक झालें नाहीं, त्याच झाडाखालीं मरून पडलों

असतें; तर बरें झालें असतें, आतां प्रत्येकजण ' तुला वुइल्यमनें पुनर्जन्म दिला; असें ह्मणणार आणि मी तें खालीं मान घालून सहन करणार. तो प्रसंग जर लिलीला कळला तर ! तर आपल्या सर्व आयुष्याची माती झाली ! आपण लिलीच्या प्रेमास कायमचे अंतरलों ! आपल्या डोळ्यादेखत वुइल्यम लिलीचें पाणिग्रहण करणार आणि आपण तो अनिष्ट प्रसंग पहाण्याकरितां जिवंत राहणार ! यापेक्षां त्याच झाडाखालीं मरून पडलों असतों, वुइल्यमला अतर्क्य शौर्य गाजविण्यास प्रसंग मिळूं दिला नसता तर किती बरें झालें असतें ! लिली माझ्याकरितां अश्रु ढाळित बसली असती, वुइल्यमचा तिनें धिक्कार केला असता आणि लिलीभोंवतीं घिरट्या घालणाऱ्या माझ्या पिशाच्चाला तरी समाधान वाटलें असतें !

लेनॉक्सच्या म्लान वदनावर अधिकच खिन्नता पसरली. आजारी असतांना जी व्यथा त्यास झाली नव्हती, तितकी किंबहुना त्यापेक्षां अधिक मानसिक व्यथा त्या वेळीं तो सहन करीत होता. आज लिली कॉर्नवालमधील आपल्या मूनलाइट पॅलेसमध्यें असती तर किती उत्तम झालें असतें. वुइल्यमच्या पराक्रमाचें कृत्य तरी तिच्या कानावर गेलें नसतें. पण लिली नर्स झाली ! सेविका होऊन या देशांत आली ! जखमी देशबंधूंची शुश्रूषा करण्याकरितां समरांगणाजवळील या इस्पितळांत काम करूं लागली ! आतांपर्यंत माझा बचाव कसा झाला ही हकीगत तिला समजली असेल ! समजली नसल्यास लौकरच ती तिच्या कानावर पडेल ! आणि मग ? पुढील दुःखद कल्पना लेनॉक्सच्यानें करवेना. वुइल्यमचें अघटित कृत्य आणि त्यामुळें झालेला आपला बचाव ही बातमी बहुतेकांच्या तोंडीं झाली आहे; तेव्हां ती सहजच लिलीस समजेल अशी कॅप्टन लेनॉक्सला भीति वाटूं लागली.

" पण नाहीं, " लेनॉक्सनें आपणास अनुकूल अशी दिशा स्वतःच्या विचारास दिली. " ती माझ्या बचावाची अमंगळ बातमी लिलीस समजणार नाहीं. तिच्याशीं आपला विवाह होईतोंपर्यंत आपण या बाबतींत तोंडास खीळ घातली आणि अन्य मार्गानें ती हकीगत तिच्या कानावर

जाणार नाहीं अशी काळजी घेतली म्हणजे आपलें कार्य झालें. विवाहानंतर हजारदां कां ती हकीगत तिला समजेना. "

कॅप्टन लेनॉक्स क्षणमात्र या अनुकूल विचाराचें स्वास्थ्य चाखीत होता. पण त्यांत विशेष माधुर्य भरलें आहे असें त्यास वाटेना. लिलीशीं आपला विवाह होणार कधीं ? आणि तो अनिश्चित दीर्घकाळ जाईपर्यंत लिलीपासून ती गोष्ट लपवून ठेवावी कशी याचा त्यास विचार पडला.

" काय ? कॅप्टन ! तुह्मी विचारांतसे ! समरांगणावर जाण्यास दोनच दिवसांचा अवधि आहे तोही तुह्मांला सहन होत नाहीं काय ?" लिलीचा मंजुनाद झाला.

क्षणमात्र लिली आली नसती तर बरें झालें असतें, आपणास शांतपणें विचार तरी करितां आला असता असें कॅप्टनला वाटलें. पण वाटून काय उपयोग ? लिली मूर्तिमंत त्याच्यापुढें उभी होती. तेव्हां आपल्या वदनावरील खिन्नतेची छटा जबरीच्या हास्याखालीं दडपण्याचा यत्न करीत तो ह्मणाला—

" लिली ! आह्मां वीरांच्या आतुरतेची तुला कल्पना नाहीं. दोन दिवसांचा अवधि मला दोन वर्षांसारखा भासत आहे. मला समरांगणावर जाण्याची आजच परवानगी द्या असें मीं डॉक्टरांना अनेकदां विनविलें. पण प्रत्येक वेळीं 'आणखी दोन दिवस त्याबद्दल शब्द काढूं नका,' असेंच मला उत्तर मिळालें. त्यामुळें नाइलाज होऊन मला येथें रहावें लागत आहे. बरें ! लिली ! काल सकाळपासून तूं कोठें होतीस ? इतक्या वेळांत मला एकदांही भेटली नाहींस ? "

" काल सकाळीं जखमी झालेले आणखी पन्नास तरुण येथें आणिले आहेत. त्यांची शुश्रूषा करण्यांत मी आतांपर्यंत एकसारखी चूर होतें. आतां कोठें थोडीशी सवड मिळाली, तेव्हां मी इकडे आलें. खरोखर युद्ध म्हणजे क्रूरतेची कमाल आहे. होय, बरी आठवण झाली. तुह्मांस विचारीन विचारीन असें ह्मणत होतें. तुह्मी जखमी होऊन पडलां असतां— "

लेनॉक्सच्या मनाचा थरकांप उडला.

" तुम्ही जखमी होऊन पडलां असतां तुम्हांस मृत्यूच्या जबड्यांतून कोणीं सोडवून आणिलें ?"

लेनॉक्सचें हृदय चिंतेनें दग्ध झालें. काय उत्तर द्यावें हें त्यास समजेना. तो विचारमूढ दृष्टीनें लिलीकडे पाहूं लागला.

" मी तुमच्या आजारीपणांत सेवा करीत होतें— "

सेवेचें सुख न देतां लिली, मूनलाइट पॅलसमध्यें राहती तर बरें झालें असतें असें लेनॉक्सला वाटलें.

"— तेव्हां तुम्ही जखमी कसे झालां, तुमची सुटका कशी झाली वगैरे हकीकत तुम्ही मला सांगाल अशी माझी कल्पना होती. पण त्या बाबतींत मौन धरणेंच तुम्हांस बरें वाटलें. "

" सुटका कशी व्हावयाची ? व्हावयाच्या रीतीनेंच झाली. त्यांत इतकें सांगण्यासारखें काय असणार ? सुटका कशी झाली हें समजून घेण्यापेक्षां सुटका झाली हें पाहून तुला अधिक आनंद होत नाहीं काय ?"

" याबद्दल मलाच काय पण इंग्लंडांतील प्रत्येक स्त्रीस व पुरुषास आनंद होईल. पण तुमची सुटका म्हणे मोठ्या शिताफीनें आणि धैर्यानें केली. "

" हें तुला कसें समजलें ?" लेनॉक्स घाबरून ह्मणाला.

" दोन दिवसांपूर्वीं मी सहज लंडन येथील एक जुनें दैनिक वर्तमानपत्र वाचीत बसलें होतें तेव्हां माझ्या हें वाचण्यांत आलें. "

" काय वर्तमानपत्रकार आणि त्यांचे बातमीदार उलाढाली करणारे असतात ! त्यांना ती क्षुल्लक हकीगत प्रसिद्ध करण्याचें काय कारण होतें ? "

" क्षुल्लक हकीगत ! " लिली आश्चर्यानें ह्मणाली. " वर्तमानपत्रांत तर ती हकीगत किती प्रशंसापूर्ण भाषेंत लिहिली आहे. बरें तुमची सुटका कोणीं केली ? "

जो नको होता तो प्रश्न झाला. कॅप्टन लेनॉक्स तो प्रश्न ऐकून क्षणमात्र गोंधळला. शेवटीं मनाचा हिय्या करून तो ह्मणाला—

" मी त्या वेळीं बेशुद्ध होतों माझी सुटका कोणीं केली हें मला समजलें नाहीं. " कॅप्टन लेनॉक्सला आपली सुटका कोणीं केली हें माहीत होतें. पिक्‌फर्डनें त्याला सर्व हकीगत सांगितली होती. यामुळें आपण सत्याचा खून करीत आहोंत, केवळ असत्य बोलत आहोंत असें वाटून त्याचें तोंड काळें ठिक्कर पडलें. खरें बोलण्याचेंही आपल्या अंगांत धारिष्ट नसावें हें पाहून तो खजील झाला. आपण नामर्दाहून नामर्द बनलों असें त्यास वाटूं लागलें.

" तुमची सुटका कोणीं केली हें त्या वेळीं तुम्हांस समजलें नसलें तरी मागून तुम्हांस कोणींतरी कळविलें असेल. "

" नाहीं. मी त्या वेळीं बेशुद्ध होतों, " कॅप्टननें गोंधळून भीत भीत आपली री ओढली.

लिलीनें विचारलें, " तुम्ही केव्हां बेशुद्ध होतां ? "

" केव्हां ? पिकफर्डनें मला सर्व हकीगत सांगितली तेव्हां. "

हें ऐकून लिली हंसली. पण तिच्या हास्यांत आश्चर्यापेक्षां तिरस्काराचीच छटा अधिक होती. ती म्हणाली—

" मीं वाचलेल्या दैनिकांत सर्व हकीगत दिलेली आहे. "

" काय ! " झोंपेंतून दचकून उठल्याप्रमाणें लेनॉक्स म्हणाला, " त्या दैनिकांत काय लिहिलें आहे ? "

" त्यांत तुमच्या शौर्याची यथायोग्य स्तुति केली आहे. तुमची लौकरच मोठी बढती होईल असेंही त्यांत लिहिलें आहे. शिवाय—"

पण कॅप्टन लेनॉक्स आपल्या बढतीचा विचार करीत नव्हता. लौकरच लिलीच्या प्रेमास आपणास मुकावें लागणार याचा तो विचार करीत होता.

" शिवाय तुमची सुटका कोणीं केली हेंही त्यांत नमूद केलें आहे. "

" काय ? वुइल्यम लिट्‌ननें माझी सुटका केली असें त्या दैनिकांत प्रसिद्ध झालें आहे ? " कॅप्टन लेनॉक्स भांबावून जें बालावयास नको होतें तें बोलून गेला. आतां पश्चात्ताप करणें हेंच त्याच्या स्वाधीन राहिलें.

" वुइल्यम लिट्‌न असे शब्द तेथें असते तर ! तर मी किती सुखी

झालें असतें ! दुर्दैवानें लेफ्टेनंट लिट्न् असें नांव त्या दैनिकांत आहे. हा लेफ्टेनंट लिट्न वुइल्यम लिट्न असू शकेल काय ? "

"अगदींच असंभवनीय !" आणवेल तितकें उसनें धैर्य आणून आपण इतक्यांत काय बोललों याचा विचार न करितां कॅप्टन लेनॉक्स ह्मणाला. " वुइल्यम लिट्न रणभीरु ! भ्याड ! त्या नामर्दानें समरांगणावर काय यावें ? लेप्टेनंटचा अधिकार असा कांहीं वाटेवर पडला नाहीं वुइल्यम-सारख्या बेहिंमती नेभळटाला चार दोन आठवड्यांच्या अवधींत मिळा-याला ! लिली ! नामर्दपणाची निशाणी तूं वुइल्यमला दिली तो प्रसंग तुला आठवत नाहीं काय ? "

" सर्व कांहीं मला आठवतें. जशी वुइल्यमनें नामर्दाची निशाणी ग्रहण केली त्याप्रमाणेंच मोठ्या मी मी ह्मणणाऱ्यासही त्यानें अनेक प्रसंगीं खालीं पहावयास लाविलें आहे. लष्करी शिक्षण घेतांना, मर्दपणाचे खेळ खेळ-तांना त्यानें आपले अग्रेसरत्व दुसऱ्याकडे जाऊं दिलें नाहीं, याची मला पूर्ण आठवण आहे. वुइल्यम लढाईस भिऊन समरांगणावर आला नाहीं असें, कॅप्टन, तुमच्यासारख्यानें तरी ह्मणावयास नको होतें. तुह्मांस त्याचें शौर्य, धैर्य आणि चलाखी हीं पूर्णपणें माहीत होतीं. वुइल्यम जर खरोखरच समरांगणावर असेल तर लेफ्टेनंटचाच काय पण एवढ्या अवधींत कर्नलचा अधिकार मिळेल असें शौर्य त्यानें गाजविलें असेल. तसल्या अग्नीच्या वर्षावांत, तसल्या मरणाच्या खाईत प्रत्यक्ष मृत्यूच्या जबड्यांतून ज्यानें तुह्मांस ओढून काढिलें त्याचें धैर्य व शौर्य हलकें असेल काय ? "

" लिली ! ज्या वुइल्यमचा तूं त्याग केलास—"

" मीं वुइल्यमचा त्याग केला नाहीं. "

" ज्या वुइल्यमला तूं हृदयांतून हाकलून दिलेंस—"

" वुइल्यम अद्याप माझ्या हृदयांत आहे ! "

" ज्या वुइल्यमला तूं भ्याड व नामर्द समजलीस—"

" ती माझी चूक होती. "

" त्या वुइल्यमची तूं माझ्यासमोर तरफदारी करतेस काय ? "

" मी त्याची तरफदारी करीत नाहीं. तुह्मी मात्र सत्य लपवून ठेवीत आहां, मला फसविण्याचा प्रयत्न करीत आहां. "

" फसविण्याचा प्रयत्न ! "

" होय जाणून बुजून फसविण्याचा प्रयत्न ! तुमची मुक्तता कोणीं केली हें तुह्मांस पूर्णपणें माहीत असूनही तुह्मी ती हकीगत मुद्दाम माझ्यापासून लपवून ठेवतां ! असत्य बोलण्यास तुह्मी तयार होतां ! असत्य बोलून, मला फसवून तुह्मी आपला कोणता कार्यभाग साधून घेणार होतां ! "

" प्रेम ! केवळ प्रेमाकरितां, लिलीची प्राप्ति करून घेण्याकरितां मी असत्य बोललों. लिली ! मला त्याबद्दल माफ कर. "

" तें नंतर पहातां येईल, " लिली करारी आवाजानें ह्मणाली. " प्रथम मला सर्व सत्य समजलें पाहिजे. "

लिलीच्या क्रुद्ध वदनाकडे पहात कॅप्टन लेनॉक्स ह्मणाला—" लिली ! अशी रागावूं नकोस. मी सर्व खरें सांगण्यास तयार आहें. "

" सांगा. तुमची मुक्तता कोणीं केली ? "

" लेफ्टेनंट लिट्न यानें. "

" ह्मणजे ? " लिली ओरडून ह्मणाली.

" वुइल्यम लिट्न यानें. "

" ही गोष्ट खरी ना ? "

" अगदीं खरी. "

" वुइल्यम सैन्यांत सामील होऊन लेफ्टेनंट झाला आहेना ? "

" होय. "

" तुह्मांस ही हकीगत कशी समजली ? "

" माझा एक स्नेही पिक्फर्ड या उपनांवाचा आहे त्यानें मला नुकतीच सांगितली. "

" मग त्या वेळीं तुह्मी बेशुद्ध नव्हतां ना. "

" नव्हतों, " कॅप्टन लेनॉक्स ह्मणाला.

त्याच्याकडे तिरस्कारानें पहात लिली तेथून जाण्यास निघाली. तेव्हां तो ह्मणाला—" लिली ! तूं मला क्षमा करणार ना ? "

पण, "मला तूं विसरून जावेंस हें बरें," असें ह्मणून कॅप्टनकडे पुनः न पहातां लिली तेथून निघून गेली.

त्याच दिवशीं लिलीनें त्या इस्पितळास रामराम ठोकला. वुइल्यमचा आपण व्यर्थ अपमान केला ही गोष्ट तिच्या मनास शरशल्याप्रमाणें टोंचूं लागली. वुइल्यमची भेट घेऊन त्याची क्षमा मिळविल्याशिवाय आपल्या जिवास चैन पडणार नाहीं असें तिला वाटूं लागलें. वुइल्यमचा शोध करण्याकरितां ती असहाय बाला समरांगणावर जाण्यास सज्ज झाली !

परंतु त्या वेळीं वुइल्यम कोठें होता ?

तो जर्मनांच्या छावणींत कैद होऊन पडला होता.



संग्रहालय, ठाणे.
अ. क्र ........
विभाग ........

# प्रकरण २१ वें.

—:o:—

## दोन बक्षिसें

मध्यरात्र उलटून गेली होती. दिवसभर चाललेल्या घनघोर युद्धामुळें समरांगणाचा विस्तीर्ण प्रदेश प्रेतांनीं व्यापला होता. कित्येक आसन्नमरण वीरांच्या अंतकालीन घरघरीशिवाय दुसऱ्या कशानेंही रात्रीच्या शांततेचा भंग होत नव्हता. उपवनास मनोहर स्वरूप देणारा, पर्वतांच्या माथ्यास रमणीयत्व आणणारा, नदीच्या वालुकामय प्रदेशास, समुद्राच्या जलमय सपाटीस आणि अरण्याच्या वृक्षमय शोभेस नितांत मोहकपणा आणणारा रजनीनाथ व्योममार्गी हंसत होता. इतर स्थानांहून आल्हादकारक वाटणारें त्याचें हास्य त्या वेळीं समरांगणावर अत्यंत भीतिप्रद वाटत होतें! जिकडे तिकडे रक्ताचे पाट वाहिले आहेत, हाडांचे ढीग व मांसाचा चिखल यांनीं समरभूमि व्यापून सोडिली आहे, ठिकठिकाणीं प्रेतें दृग्गोचर होत आहेत, अंतकाळची क्रूर मुद्रा, सूड घेण्याची तीव्र लालसा किंवा सूड घेतल्यामुळें मुखावर चमकणारें असुरी हास्य अद्याप प्रेतांच्या वदनावर दिसत आहे; मधून मधून अंतकाळच्या निराशापूर्ण किंकाळ्या श्रवणेंद्रियांवर येऊन आपटत आहेत आणि हा सर्व भयप्रद देखावा दाखविण्याचें काम चंद्रानें, आल्हादकारी चंद्रानें आपल्या शिरावर घेतलें आहे! चंद्रा! अशा भयप्रद

प्रदेशावर प्रकाश पाडणें हें त्या अरसिक सूर्याचें काम ! स्मशानभूमींतील वैराग्य चव्हाट्यावर आणणें, भयंकर खोल दरींत आपल्या करांचा प्रवेश करून तेथील भीषणता जगाच्या निदर्शनास आणणें अथवा असल्या समरभूमीवरील भयानक देखाव्यावर प्रकाश पाडणें हें त्या सूर्याचें काम ! त्वां दिवसभर श्रमलेल्या प्राण्यांस स्वर्गीय अमृताच्या वर्षावानें प्रफुल्लित करावें, उपवनांतून भेटणाऱ्या प्रणयी जनांस सुखवावें, क्रीडानौकांतून विहार करणारांस, प्रासादाच्या गच्चीवर बसून नगरसौंदर्य पहाणारांस अथवा सृष्टिसौंदर्य निरीक्षण करण्याकरितां वनांतून भटकणारांस प्रमुदित करावें आणि फारच धार्ष्ट्य करावयाचें असल्यास विरहीजनास संताप देणें, अनीतिमान् लोकांस धाकांत ठेवणें किंवा चौर्यकर्मपटूंस स्वतःच्या कर्तब-गारीपासून परावृत्त करणें अशा प्रकारचीं जगदानंदकारी कार्यें त्वां करावीं. तें सोडून हें भलतेंच तूं काय आरंभिलें आहेस ? तूं प्रकाश पाडला नस-तास तर हा भयप्रद देखावा काळोखाच्या पोटांत दडून गेला असता ! रात्रीं एकटें दुकटें भटकणाऱ्यांची दृष्टि भीतीनें चलायमान झाली नसती आणि—पण जाऊं द्या. तुझ्याकडे तरी काय दोष ? हा सर्व त्या सहस्ररश्मी-चा खेळ ! त्याच्याच डोळ्यांनीं तूं पहातोस ! त्याच्याच विकट हास्य-रवाचा प्रतिध्वनि तुझ्या मधुर स्मितांत होतो.

परंतु तूं क्षणमात्र प्रकाशला नाहींस तर चालणारच नाहीं काय ? त्या ढगाच्या आड जाऊन विश्रांति घे. म्हणजे या कोमल बालिकेच्या दृष्टीस समरांगणावराल भयानक दृश्य दिसणार नाहीं.

समरांगणावर मध्यरात्रीच्या वेळीं पिशाचांनीं संचार करावा ! वेताळानें मेजवानी झोडावी ! भुतांनीं बागडावें ! आणि हडळींनीं विहार करावा ! या ठिकाणीं अशा वेळीं एकाकी तरुणीनें येण्याचें धाडस कां करावें ? लिली, तुझ्यासारखें महिलासमाजांतील नाजुक पुष्प आपल्या उपवनांत, आपल्या मूनलाइट पॅलेसांतच रहावयास योग्य ! तेथून तें विचालित झालें, कीं लागलीच कोमेजण्यास लागावयाचें ! पण तुझ्या अंगचें तेज, तुझ्या अंगचें धारिष्ट अवर्णनीय आहे. मूनलाइट पॅलेसच्या सुखविलासांतून इस्पितळांतील काबाडकष्टांत एकदम उडी घेतलीस. पण तुझा आनंदी

स्वभाव, तुझें प्रेमळ वर्तन आणि तुझें पवित्र आचरण यांत लेशमात्रही तफावत पडली नाहीं. आणि आतां तर तूं निःशंकपणें समरांगणावरून विहरतेस ! तुझे ते तेजस्वी नेत्र पूर्वींच्याइतक्याच तेजस्वीपणानें, किंबहुना त्याहून अधिक तेजानें चकाकत आहेत. त्यांत भीतीचा अंशही दिसत नाहीं. तुझें तें प्रसन्न वदन पूर्वीच्या इतक्याच प्रसन्नतेनें हंसत आहे. त्यावर भीतीची किंचित्‌ही छटा नाहीं. लिली ! तूं समरदेवता तर नव्हेस !

चालतां चालतां लिलीचे सस्मित वदन किंचित् गंभीर झालें; विस्तीर्ण नेत्र किंचित् आकुंचित झाले आणि तिची चाल किंचित् मंद झाली. आपण जें धारिष्ट करण्याचें मनांत योजिलें आहे त्यांत किती व कसल्या अडचणी येतील याचा ती आतां विचार करूं लागली. सरळ मार्गानें जाऊन, सरळ मार्गानें वागून आणि सर्वत्र सरळपणाचा उपयोग करून असलें महत्त्वाचें कार्य पार पडणार नाहीं, असें तिला वाटूं लागलें. आतां-पर्यंत प्रतापशाली वुइल्यम आणि त्याची सुटका यांशिवाय तिच्या मना-पुढें दुसरा विषय नव्हता. जर्मनांनीं वुइल्यमला कैद करून नेलें ही गोष्ट सर्वतोमुखी झाली असल्यामुळें ती लिलीस कळण्यास फारसा विलंब लागला नाहीं. ज्या वुइल्यमचा शोध काढण्याकरितां आपण इस्पि-तळाचा त्याग केला आणि येथपर्यंत समरांगणावर आलों तो वुइल्यम आपणास दिसला नाहीं, नव्हे कदाचित् जन्मभरही त्याची आतां भेट व्हावयाची नाहीं असा विचार मनांत येतांच तिला अत्यंत दुःख झालें ! वुइल्यम समरांगणावर आला, इतकेंच नव्हे तर त्यानें अद्वितीय धारिष्ट व पराक्रम दाखवून सर्वांस चकित करून सोडलें हें लिलीस समजल्यापासून वुइल्यमविषयीं तिच्या मनांत दडून राहिलेलें प्रेम तिच्या मनश्चक्षूस पूर्ण-पणें दिसूं लागलें. वुइल्यम आपला प्राण आहे ! वुइल्यम आपला आत्मा आहे ! त्याच्याशिवाय आपलें जीवन व्यर्थ आहे असें तिला वाटूं लागलें. लागलीच तिनें आपलें दुःख आवरलें. जर्मन लोकांच्या छावणींत जाऊन आपल्या प्राणाचा शोध करावयाचा असा तिनें निश्चय केला आणि त्याच पावलीं तिनें जर्मन शिबिराची वाट धरली.

वुइल्यम, त्यावरील प्रेम आणि त्याची सुटका यांशिवाय लिलीस दुसरें कांहीं दिसत नव्हतें. समरांगण, तेथील हिडीस परिस्थिति आणि रात्रीची भीतिप्रद शांतता यांच्या योगानें लिलीचा दृढनिश्चय डळमळला नाहीं. जर्मन छावणींत आपला कसा प्रवेश होईल, प्रवेश झाला तर वुइल्यमची भेट कशी होईल आणि भेट झाली तरी त्याची सुटका आपल्या हातून कशी होईल हे विचार तिच्या प्रसन्न मुखमंडलास गंभीर स्वरूप आणूं लागले. ती विचार करीत क्षणमात्र एका ठिकाणीं उभी राहिली. जर्मन हेर इंग्लिशांसारखा छद्मी वेष धारण करून इंग्लिशांच्या छावणींतून फिरत असतात असें तिनें अनेक वेळां वर्तमानपत्रांतून वाचलें होतें. याचा तिला आतां उपयोग झाला. आपण जर्मन सैनिकाचा वेष धारण केला तर ! तर आपणास जर्मनांच्या छावणींत सहज प्रवेश करितां येईल आणि प्रवेश झाल्यानंतर वुइल्यमची गांठ घेणें विशेष अवघड पडणार नाहीं. एकदां वुइल्यमची गांठ पडली ह्मणजे त्याच्या सुटकेचा मार्ग शोधून काढण्यास कितीसा अवधि आहे ! अशा मनोराज्याच्या कड्या एकास एक जोडीत लिलीनें वुइल्यमच्या सुटकेपर्यंतची, नव्हे त्याच्याशीं आपला विवाह लागेपर्यंतची एक विचारशृंखला तयार केली. तिचें मुख पूर्ववत् प्रसन्न दिसूं लागलें. आतां स्वतःकरितां जर्मन वेष कसा पैदा करावा याचा विचार ती करूं लागली.

क्षणमात्र विचार करून ती आत्मगत हंसत ह्मणाली— "येथें जर्मन वेषास कोणती न्यूनता आहे ? कित्येक जर्मन तरुणांचीं प्रेतें येथें पडलीं आहेत. त्यांच्यापैकीं एखाद्याच्या अंगावरील आपणास जमेसा पोषाख घेतला ह्मणजे झालें."

झालें ! दहाच मिनिटांत लिली अदृश्य झाली ! तिच्या ठिकाणीं एक सुंदर जर्मन वीर दिसूं लागला. अंगावरून उतरलेल्या आपल्या आवडत्या स्त्रीवेषाकडे एकवार सप्रेम पाहून तो तरुण जर्मन पुनः मार्ग क्रमूं लागला.

पूर्वीं न होणारा बुटांचा खडखडाट आतां शांततेचा भंग करूं लागला. पूर्वीं न होणारा आयुधांचा चकचकाट आतां होऊं लागला. कंबरेस लटकाविलेल्या चकचकीत शस्त्राशीं खेळत लिली जर्मन छावणीकडे जाऊं

लागली. तेव्हां, माझ्या प्रियकर बुइल्यमची मी मुक्तता करणार, एवढाच विचार तिच्या मनांत घोळत होता.

अशा रीतीनें तो वेषधारी जर्मन तरुण मार्ग क्रमित असतां तो एका-एकीं थांबला. त्याच्यानें पुढें पाऊलच टाकवेना. आपल्यासमोरून एक सशस्त्र जर्मन वीर आपणाकडेच येत आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें. त्याचा भीतीनें थरकांप उडाला. एक जर्मन दृष्टीस पडला तर आपण इतके गांगरून जातों. लक्षावधि जर्मनांच्या छावणींत आपण धैर्यानें कसे वावर-णार हा विचार त्याच्या मनापुढें उभा राहिला. कसें तरी करून सध्यांचा प्रसंग टाळावा मग पुढच्यापुढें पाहतां येईल, असा विचार करून किंचित् दिशा बदलून तो चालूं लागला. हें पाहून समोरून येणारा जर्मन वीर अस्सल जर्मन भाषेंत ह्मणाला—

" ए जर्मन ! उभा रहा. तोंड चुकवून कोठें निघून जातोस ? तुझे आमचे सलामीचे हात झालेच पाहिजेत ! "

लिलीनें सभय मुद्रेनें आपणाकडे धांवत येत असलेल्या जर्मन सैनिकाकडे पाहिलें; आणि जमिनीकडे दृष्टि लावून ती सचिंत उभी राहिली. आपणा-कडे धांवत येणारा जर्मन वीर आपणास जर्मन समजूनही आपणावर कां चाल करून येत असावा याची तिला कल्पनाही होईना.

आतां लिलीचा प्रतिस्पर्धी लिलीजवळ येऊन पोंचला. तो अत्यंत आवेशानें जर्मन भाषेंत ह्मणाला—" तरुणा ! असा नामर्दासारखा खालीं मान घालून काय उभा राहिलास ! परवां तुझ्या कैसरची आणि माझी मुलाखत झाली तेव्हां तो आपल्या सैनिकांच्या शौर्याबद्दल केवढी बढाई मारित होता! आणि तूं तर येथें भित्र्या पोरीप्रमाणें उभा राहिला आहेस ! आटप, विचार करूं नकोस ! हा तुझा प्रतिस्पर्धी तुझ्यासमोर उभा आहे. त्याच्याशीं दोन हात कर. "

लिलीस जर्मन भाषा अवगत नव्हती. तिला या भाषणांतील कांहींच अर्थ समजला नाहीं. तरी हा आवाज आपल्या पूर्ण परिचयाचा आहे असें तिला वाटूं लागलें !

" अद्याप तूं आपली दृष्टि वर उचलीत नाहींस. जर्मनांच्या शौर्यास काळोखी लावण्याचा तुझा विचार दिसतो. चल ! लौकर तयार हो ! माझी समशेर जर्मन रक्त पिण्याकारितां कशी हापापली आहे. आज तीन दिवसांत तिला जर्मन रक्त मिळालें नाहीं. "

या भाषणाचा आशय लिलीस समजला नाहीं. ती खालीं मान घालून आपल्या मातृभाषेंत ह्मणाली—"माझ्यावरोबर युद्ध करण्याची तुमची इच्छा आहे काय ? "

" अलबत, " इंग्रजी भाषेंतच उत्तर मिळालें.

" पण मी माझ्या जर्मन वंधूवरोबर लढत नसतों. " लिली मर्दानी आवाजानें ह्मणाली.

" माझ्या पोषाखावरून मी जर्मन आहें अशी तुझी कल्पना होत आहे काय ? या पोषाखाकरितां माझ्यावरोबर युद्ध करण्याचें तूं नाकारीत असशील तर हा मी आपला पोषाख उतरून टाकतों. " असें ह्मणून तो वीर स्वतः-चा पोषाख उतरूं लागला.

आपल्यासमोरील जर्मनाच्या आवाजानें चकित झालेली लिली आतां आपलें मस्तक उचलून वर पाहूं लागली. तों तिला कोण दिसलें ?

वुइल्यम ! सेंट जॉन येथील वुइल्यम ! आपला प्राणप्रिय वुइल्यम ! तोच आपल्यासमोर उभा आहे असें तिला दिसलें. तेव्हां ती इतकी आश्चर्यमूढ झाली, कीं तिच्या तोंडांतून अक्षरच फुटेना.

जर्मन पोषाख उतरून झाल्यानंतर तो तरुण ह्मणाला—

" पहा ! नीट माझ्याकडे पहा ! मी आतां जर्मन राहिलों नाहीं. तुझा दुष्मन्—शुद्ध इंग्रज झालों आहें ! "

" नव्हे, तूं माझा प्राणप्रिय वुइल्यम बनला आहेस ! " असें ह्मणत लिलीनें आपलें हसरें वदन वर केलें.

तिचें सप्रेम चुंबन घेत वुइल्यम ह्मणाला—" आज माझ्या सुखाची परमावधि होणार असें दिसतें. जर्मनांचा कारागृहवास ह्मणजे मृत्यूचें आमंत्रण! असें असतां, मी माझ्यावरील पहारेकऱ्यांस भरपूर चोप देऊन त्यांचाच

पोषाख करून तेथून सुखरूप निसटलों. या ठिकाणीं अशा मध्यरात्रीच्या वेळीं तुझी भेट होईल असें स्वप्न मला पडलें असतें तर स्वप्न ह्मणूनही मीं त्यावर विश्वास ठेविला नसता. परंतु तूं मला प्रत्यक्ष भेटलीस. नव्हे मला प्राणप्रिय ह्मणण्यास तयार झालीस ! लिली ! असें चमत्कारिक वेषांतर करून तूं कोठें निघाली होतीस ? ”

“ जर्मन कारागृहांतून तुला सोडविण्यासाठीं मी निघालें होतें. ”

“ वाः! तयारीही पण चांगली केली होतीस ! बरें ! मला कारागृहांतून सोडवून तुझा कोणता फायदा होणार होता ? तूं माझ्याकरितां स्वतःस संकटांत कां घालीत होतीस ? ”

“ वुइल्यम, ” लिली प्रणयकोपानें ह्मणाली, “ तूं असले प्रश्न मला कां विचारावेत ? ”

“ लिलीनें वुइल्यमच्या प्रेमाचा धिक्कार केला असून ती कॅप्टन लेनॉक्सची पत्नी होणार अशी बातमी मला समजली ह्मणून ! ”

“ असत्य ! निव्वळ असत्य ! वुइल्यम, माझ्या शब्दांवर तुझा विश्वास आहे का त्या बातमीवर विश्वास आहे ? ”

“ लिली ! तुझे शब्द ह्मणजे मूर्तिमंत सत्य आहे. त्यावर माझा विश्वास कसा बसणार नाहीं ? ”

“ मग ऐक ! ” लिली मंजुळ स्वरानें ह्मणाली, “ युद्ध सुरू होण्यापूर्वीं तूं आणि मी एके दिवशीं सहल करण्यास गेलों होतों. तेव्हां आपण वचनबद्ध पतिपत्नी झालों. तेव्हांपासून माझें तुझ्यावर निस्सीम प्रेम जडलें. मध्यंतरीं तूं लढाईवर जाण्यास नाराज होतास तेव्हां मी तुला कमजास्त बोललें, तुझा अपमान केला, तुझ्या मनास लागेल असा वाक्प्रहार केला. पण त्या वेळीं सुद्धां तुझ्याबद्दलचें प्रेम लेशमात्रही माझ्या मनांतून कमी झालें नव्हतें. त्यानंतर दोन दिवसांपूर्वीं तूं समरांगणावर लढत असून कॅप्टन लेनॉक्सचें संरक्षण करतांना तूं अद्वितीय शौर्य गाजविलेंस असें मला समजलें. मी लागलीच तुझा शोध करण्याकरितां निघालें. कॅप्टन लेनॉक्सवर माझें प्रेम कधींही जडलें नव्हतें. मग त्याची पत्नी होण्याचें कबूल करणें दूरच. वुइल्यम ! ही तुझी लिली, एकदां तुला प्रिय

असलेली लिली, कृत अपराधाबद्दल क्षमा मागण्याकरितां तुझ्यासमोर उभी आहे. तिला क्षमा करून—" पण पुढें लिलीच्यानें बोलवेना. चंद्रप्रकाशानें मात्र तिच्या कपोलांवर पसरलेला रक्तिमा वुइल्यमच्या नेत्रांपुढें मांडिला. त्याचा आशय नीट समजून घेऊन वुइल्यम ह्मणालाः—

" लिली ! खरोखरच तूं मला धन्य करणार काय ? आजपर्यंत माझ्या भावी आयुष्यांत दिसत असणारीं काटेरीं झुडपें सुवासिक गुलाबाचीं आहेत असें तूं मला दाखविणार काय ? माझा भावी आयुष्यक्रम सुखकर करणार काय ? बोल ! लिली ! तूं सर्वस्वीं माझीच ना ? "

लिलीनें वुइल्यमकडे एक अत्यंत प्रेमळ दृष्टिक्षेप केला. ती कांहींच बोलली नाहीं. परंतु तेवढ्यानें वुइल्यम लिलीचें मनोगत समजला.

तिला सप्रेम आलिंगन देऊन तिचें चुंबन घेत वुइल्यम ह्मणाला, " खरोखर आज माझ्या सुखाची परमावधि झाली. "

कांहीं वेळानें वुइल्यमनें पुनः आपला जर्मन पोषाख चढविला. तो लिलीचा हात धरून इंग्लिश छावणीकडे हळूं हळूं जाऊं लागला. तेव्हां या जगांत आपणाइतकें सुखी दुसरें कोणी नाहीं असा त्याला गर्व वाटत होता.

वुइल्यम आणि लिली कांहीं अंतर चालून जातात तोंच त्यांना पन्नास इंग्लिश वीरांनीं गरडा दिला. हा प्रसंग आपल्या जर्मन पोषाखांमुळें आपणांवर ओढवला हें तेव्हांच वुइल्यमच्या लक्षांत आलें. परंतु अद्याप अंधकार आहे, आपली ओळख सहज पटणार नाहीं व अधिक गडबड केल्यास कदाचित् प्राणावरही बेतेल हें जाणून वुइल्यमनें आपल्याजवळचीं व लिलीजवळचीं शस्त्रें खालीं टाकून आपण शरण आलों आहोंत असें दर्शविलें. लागलीच त्यांना गिरफदार करून कर्नल सॅप्सवर्थ यांच्या तंबूकडे जर्मन हेर म्हणून पाठविण्यांत आलें.

दुसरा दिवस उजाडला. कर्नल सॅप्सवर्थ यांच्या तंबूभोंवतीं असंख्य मनुष्यांचा घोळका जमला. आपल्या छावणीभोंवतीं हिंडणाऱ्या दोघा जर्मन हेरांस शिक्षा झालेली पहावयास मिळेल म्हणून जो तो तेथें येऊं लागला. थोड्याच वेळांत कर्नलसाहेब आणि सेनापति यांच्या स्वाऱ्या

वुइल्यम आणि लिली यांना ठेविलें होतें त्या तंबूजवळ आल्या. " हेरांना पुढें आणा, " असा लागलीच हुकूम सुटला.

आतां आपणांस शिक्षा होणार या भीतीनें म्लानवदन झालेले दोन हेर पुढें येतील अशी सर्वांची कल्पना होती. पण एकजण प्रत्येकास सहास्य वदनानें मुजरा करीत येत आहे आणि त्याच्या मागोमाग किंचित् कोमळ भासणारा दुसरा, जमलेल्या थव्याकडे आश्चर्यचकित मुद्रेनें पहात तितक्याच प्रसन्न वदनानें येत आहे हें पाहून सर्व सैनिकसमूह आश्चर्यानें स्तंभित झाला.

कर्नल सॅम्सवर्थजवळ आल्याबरोबर वुइल्यमनें अत्यंत लवून मुजरा केला. परंतु त्याकडे दुर्लक्ष करून कॅर्नल ह्मणाले—

" कायरे! तुमचें काय म्हणणें आहे? हेर ह्मणून अपराधी ठरवून तुम्हांस शिक्षा कां देऊं नये! शिक्षा देण्यापूर्वी तुमचा काय खुलासा आहे हें आम्हांस ऐकून घ्यावें लागतें. "

" महाराज! " वुइल्यम पुढें बोलणार होता.

" व्यर्थ विलंब लावूं नकोस, " कर्नल रागानें म्हणाले. " दोनच शब्दांत काय तें सांग. "

" माझ्याकडे एकदां पाहिल्यास माझी आपणास सहज ओळख पटेल, " वुइल्यम ह्मणाला.

" ओळख पूर्वीच पटली आहे. तुम्ही जर्मन आहांत हें तुमच्या वेषावरून दिसत आहे. आमच्या छावणीभोंवतीं तुम्ही फिरत होतां हें पूर्णपणें शाबीत झालें आहे. "

" नाहीं! मी कोण आहें याची आपणास अजून ओळख पटली नाहीं. " वुइल्यम दोन पावलें पुढें जाऊन ह्मणाला.

" तूं अत्यंत नीचपणाचा धंदा करणारा जर्मन हेर आहेस. "

" नव्हे! आंग्ल जननीचा मी खरा पुत्र आहें. मी वुइल्यम लिटन, आपलों सेवांकित लेफ्टेनंट! "

" कोण? वुइल्यम! " वुइल्यमकडे आश्चर्यानें पहात कर्नल म्हणाले. " आणि हा दुसरा कोण? "

" ही माझी लिली ! " लिलीचा हात धरीत वुइल्यम ह्मणाला.

" एकूण ही स्त्री आहे ! इंग्लिश स्त्री आहे ! "

" होय, अॅड्मिरल नेल्सन यांची कन्या ! "

" लिली ! " कर्नल सॅप्सवर्थ म्हणाले, " तूं आतां बरीच मोठी दिसूं लागलीस. सुमारें आठ वर्षांपूर्वी मीं तुला पाहिलें होतें. तेव्हां तूं केवळ नऊ वर्षांची होतीस. तुम्हीं हा जर्मन वेष कां धारण केला आहे ? "

" वुइल्यमनें थोडक्यांत सर्व खुलासा केला. आपली व कैसरची मुलाखत कशी झाली, आपण त्या वेळीं काय ह्मणालों, पुढें आपण मोठ्या चातुर्यानें तेथून कसे निसटलों हें सांगून तो शेवटीं ह्मणाला—

" माझ्या हातून यापुढेंही स्वतःच्या मायभूमीची सेवा घडावी अशी ईश्वरी इच्छा होती; ह्मणून मला ही युक्ति सुचली. केवळ देशभक्तीकरितां मला हा जर्मन वेष धारण करावा लागला. "

वुइल्यमचा अद्भुतपूर्ण इतिहास श्रवण करून तेथें जमलेले सर्व तरुण प्रेमानें वुइल्यमची धन्यता गाऊं लागले. तेव्हां कर्नल सॅप्सवर्थ सर्व राष्ट्रभक्तांस उद्देशून म्हणाले—

" तरुण मित्रहो ! हा तुमच्यासमोर उभा राहिलेला वुइल्यम एक अद्भुत पुरुष आहे. त्याची राष्ट्रसेवा, त्याचा पराक्रम, त्याची कर्तव्यतत्परता, सर्वच अलौकिक आहेत. याच्या कर्तबगारीमुळें याला एकदम कर्नलचा हुद्दा मिळाला आहे. हा ज्या दिवशीं शत्रूच्या हातांत सांपडला त्याच दिवशीं याला कर्नलच्या हुद्यावर नेमल्याचा हुकूम माझ्या हातांत आला. पण निरुपायास्तव आजपर्यंत मला स्वस्थ बसावें लागलें. "

" कर्नल वुइल्यम लिट्न यांचा विजय असो, " चोहोंकडून गंभीर ध्वनि झाला.

तेव्हांचा लिलीचा आनंद अवर्णनीय होता. ती वुइल्यमला प्रेमानें ह्मणाली, " खरोखरच आज तुझ्या सुखाची परमावधि झाली. "

" परमावधि तर खरीच ! तुझ्या पित्यानें आपल्या विवाहास पूर्ण संमति दिली आहे. हें पत्र वाच, " इतका वेळ पत्र वाचण्यांत गुंतलेला वुइल्यम आनंदानें ह्मणाला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें
नोंदणी क्र. [illegible]८७

लिलीनें तें पत्र वाचलें. तें वुइल्यमला त्यांच्या मातुःश्रीकडून आलें असून त्याखालीं अॅडामिरल नेल्सन यांनींही दोन ओळी लिहिल्या होत्या. वुइल्यम अखेरीस समरांगणावर गेला, इतकेंच नव्हे तर तेथें त्यानें अत्यंत पराक्रम गाजविला यामुळें खूप होऊन नेल्सनसाहेब आपली कन्या वुइल्यमला देण्यास तयार झाले होते.

पत्र वाचून झाल्यावर लिली आनंदभरानें ह्मणाली, " वुइल्यम ! तूं कर्नल झालास असें बाबांना समजलें तर त्यांना काय वाटेल ? "

" मी लवकरच मेजर होईन असें त्यांना वाटेल, " वुइल्यम हंसत ह्मणाला.

× × ×

त्या दिवशीं वुइल्यम आणि लिली कर्नल सॅप्सवर्थ यांच्या तंबूंत झालेल्या मेजवानीस हजर होतीं. कॅप्टन प्रिंगल, पिक्फर्ड आणि वुइल्यमचे इतर स्नेही तेथें आले होते. सूर्यास्त होतांच कर्नल वुइल्यम लिट्न आपल्या हुद्यावर रुजू होण्याकरितां बेल्जमकडे जाण्यास निघणार होता.

मेजवानीनंतर सर्वांची रजा घेऊन तो लिलीकडे आला. तेव्हां लिली जर्मन वीराच्या वेषांत नव्हती. ती आपल्या जन्मसिद्ध, निसर्गसुंदर अशा जनानी वेषांत होती. तेव्हांचें तिचें लावण्य वुइल्यमला अवर्णनीय वाटलें. तो ह्मणाला—

" लिली ! मी आतां जातों. लौकरच तूंही आपल्या इस्पितळाकडे रवाना होशील. युद्धाची समाप्ति होईपर्यंत, आरंभिलेलें राष्ट्रकार्य संपेपर्यंत, आमची युद्धावरील मोहीम विजयी होईपर्यंत, आपणांस आपल्या स्वार्थी सुखास विसरलें पाहिजे. तूं आपलें शुश्रूषा करण्याचें काम नेटानें कर. मीही आपलें राष्ट्रकार्य उत्तम रीतीनें बजावतों. मग आपण आपल्या बक्षिसांची अपेक्षा करूं ! लिली ! माझ्या कर्तबगारीबद्दल मला फारच रमणीय बक्षीस मिळणार आहे. "

" आणि मीही आपल्या कामगिरीबद्दल जगांतील अत्यंत मूल्यवान बक्षीस मिळविणार आहे, " लिली प्रेमानें ह्मणाली.

" तुझें बक्षीस माझ्या या बक्षिसापुढें अगदीं फिक्कें पडेल. " असें ह्मणून वुइल्यमनें लिलीस सप्रेम आलिंगिलें.

तेव्हां ' माझ्या बक्षिसाची सर तुझ्या बक्षिसास येणार नाहीं, ' असें लिली कुरकुरत होती.

IRBK-0100173

IRBK-0100173

# प्रकरण २२ वें.

—:o:—

## दोन वर्षांनंतर !



इसवी सन १९१७ च्या वसंताचा बहर सर्वांगसुंदर असणार ! एक नाहीं दोन नाहीं लागोपाठ तीन वर्षे युद्धाच्या धुमश्चक्रींत केव्हां निघून गेलीं याची कल्पनाही कोणास झाली नाहीं. युद्धाची परिसमाप्ति सुमारें तीन वर्षांनीं होणार अशीं मुत्सद्यांचीं मतें, भविष्यवाद्यांचे ठोकताळे आणि बहुजनसमाजाचें अनुमान असल्यामुळें त्या दूरवर दिसणाऱ्या शांततेच्या काळाकडे सर्व शांतताप्रियांचें लक्ष लागून राहिलें आहे. आपणास त्या दूरस्थ प्रदेशाचा थोडासा अंदाज करितां येतो, त्यापलीकडे आपली दृष्टि पोंचत नाहीं असें राजकारणपटु प्रांजळपणें कबूल करितात. तर चार दोन वांकडीं तिकडीं कोष्टकें मांडून भविष्यवादी आपल्या ठोकताळयास असें असें येतें, असें सांगतात. बाकीची जनता तर त्या दूरस्थ काळाबद्दल पूर्णपणें अज्ञ असते. पण कवि आणि कादंबरीकार यांची गोष्ट अगदीं भिन्न आहे. कवीच्या काव्यदृष्टीस काय किंवा कादंबरीकाराच्या कल्पनानेत्रांस काय ज्याप्रमाणें भूत आणि वर्तमान यांचें पूर्ण ज्ञान असतें त्याचप्रमाणें भविष्यकालचा दूरवर प्रदेश त्यांना स्पष्ट दिसतो. आज सुधारणेच्या शिखरास पोंचलेलें राष्ट्र आगामिकालीं रानटी स्थितीस पोंचणार किंवा आज रानटी स्थितींत दिसणारें राष्ट्र कांहीं काळानें अत्यंत सुधारलेलें होणार, आज संपत्तीच्या मदानें फुगलेला पुरुष

उद्यां दारोदार भिक्षा मागणार किंवा आपल्याजवळ दमडी पैची याचना करणारा भिकारडा थोड्याच काळांत श्रीमंत होणार, उलट्या अंबारीचो सुलटी केव्हां होईल आणि नरांचा नारायण केव्हां होईल, अशा प्रकारच्या गोष्टी कवि आणि कादंबरीकार यांना पूर्णपणें अवगत असतात. ह्मणून एखाद्याच्या जन्माच्या वेळीं शोक आणि मृत्यूच्या वेळीं आनंद ही मंडळी साजरा करीत असते. या द्वयीस सुताच्या धाग्यानें स्व जावें आणि तेथील अप्सरांचें लावण्य अवलोकन करून तें रसिक कसें मांडावें हें ठाऊक असतें. सारांश काय कीं, कवि व काद यांना अगम्य असें कांहींच नसतें. आतां या द्वयीचें आपसांतील ना आहे या प्रश्नाचा निर्णय लावणें जितकें महत्त्वाचें आहे । अप्रासंगिक असल्यामुळे दोन वर्षानंतरचा वसंत कादंबरीकाराच्या कल्प दुर्बिणींतून कसा दिसतो हें पाहण्याकडे वळूं.

युद्धाचा वणवा पूर्णपणें विझला आहे; जर्मनीचा युद्धविषयक ग झाला असून तेथील युद्धासुरांचा आणि युद्धप्रिय जनांचा नायनाट आहे; तेथें फक्त शांतताप्रिय जन राहिले असून बाकीचे युद्धानुयायी क च्या जबड्यांत नष्ट झाले आहेत; इंग्लंडनें आपली उदात्त कामगिरी पाडली आहे. त्याची जर्मन युद्धावरील मोहीम पूर्णपणें यशस्वी झाली आ फ्रान्सच्या कांहीं शहरांचा नाश झाला तरी त्यांनीं कित्येक वर्षांपूर्वीं गम विलेला व जर्मनींत सामील झालेला त्यांचा प्रांत त्यांस परत मिळाला आहे; बेल्जमच्या नुकसानीची भरपाई जर्मनीनें केली असून बेल्जम व त्यासारख्या छोट्या राष्ट्रांच्या स्वातंत्र्यास यावच्चंद्रदिवाकरौ कोणी शिवणार नाहीं अ इंग्लंडनें तजवीज केली आहे; फ्रान्सची अब्रू इंग्रजांनीं राखिली असें फ्रा न्सच्या प्रधानमंडळानें उघड बोलून दाखविलें आहे; सर्व जगास त्यांच्या ईश्वरदत्त शांततेचा हक्क मिळवून दिल्याबद्दल सर्वत्र इंग्रजांची वाहवा होत आहे; आपण उभारलेल्या उदात्त कार्यास आपल्या साम्राज्यांतील सर्व देशांनीं फलप्राप्तीची आशा न करितां मदत केली याबद्दल इंग्रज साम्राज्य आपल्या घटकावयवांचें शक्य तितकें हित करीत आहे; हिंदुस्थ नचें अलौकिक साम्राज्यप्रेम पाहून इंग्लंडांतील कित्येक उदार मतवाद